म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... निबंध
क्र. 3211

...दास : संत तुकडोजी

तात्त्विक दर्शन

REFBK-0025781

प्रा. डॉ. राम घोडे

संदर्भ निबंध

3200

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

22 JAN 1989

26 FEB 1989

8 MAR 1989

11 AUG 1990

18 AUG 1990

30 OCT 1991

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

समर्थ रामदास–संत तुकडोजी

तौलनिक--दर्शन

★ लेखक ★

प्रा. डॉ. राम घोडे

एम्. ए. मराठी; एम्. ए. राज्यशास्त्र, बी. एड्., पीएच्. डी.

मराठी विभाग, हिस्लॉप कॉलेज, नागपूर.



REFBK-0025781

राजीव प्रकाशन

यू–९ लक्ष्मीनगर, नागपूर

प्रकाशक :

राजीव प्रकाशन

C/o प्रा. सौ. रेखा घोडे
एम्. ए. बी. एड्.
यू–९ लक्ष्मीनगर, नागपूर–२२

सर्वाधिकार :

लेखकाचे स्वाधीन

मुद्रक :

किसनलाल मुंदडा

गुरुदेव मुद्रणालय
महाल नागपूर–२.

प्रथम आवृत्ती

११ आक्टों. १९८८

श्रीसंत तुकडोजी महाराज
पुण्यतिथी दिन

मुखपृष्ठ सजावट

श्री. राजू वानखेडे

सेल्फमेड अँड्स 'तृप्ती'
मोदी २, सिताबर्डी–नागपूर.

मुखपृष्ठ छपाई

शक्ति ऑफसेट वर्क्स

वर्धा रोड, नागपूर.

पुस्तके मिळण्याचे ठिकाण :

'राजीव प्रकाशन'

C/o प्रा. सौ. रेखा घोडे, यू–९ लक्ष्मीनगर नागपूर.

मूल्य ५० रुपये

समर्थ रामदास – संत तुकडोजी : तौलनिक दर्शन

"साधु दिसती वेगळाले । परि ते स्वरुपी मिळाले ।
अवघे मिळोनी एकचि झाले । देहातीत वस्तु ॥"

–समर्थ रामदास

"संत देहानें जरी भिन्न दिसती । परि ध्येय धोरणाने अभिन्न स्थिती ।
साधने जरी नाना दिसती । तरि सिद्धान्तमती सारखी ॥"

–संत तुकडोजी

★

• समर्थ रामदास व राष्ट्रसंत तुकडोजी
यांच्या विराट व्यक्तिमत्वाचे व नेत्रदीपक कर्तृत्वाचे
तौलनिक दर्शन घडविणारा अभिनव ग्रंथ. *

★

मायभूमीच्या मुक्ततेसाठी
सर्वस्व समर्पित करणाऱ्या देशभक्तांना
संतद्वयाच्या स्मृतिप्रीत्यर्थ

सादर – समर्पण

अभिनंदन !

—डॉ. श्री. मा. वर्णेकर डि. लिट्.

माझे स्नेही प्रा. डॉ. राम घोडे यांच्या 'समर्थ रामदास-संत तुकड्योजी' 'तौलनिक दर्शन' या ग्रंथाला अभिप्राय लिहिताना मला आनंद वाटतो. त्यांचे या मौलिक लेखनाप्रित्यर्थ हार्दिक अभिनंदन !

संत हे प्राधान्याने "ईश्वरनिष्ठ आणि आनुषंगिपणे साहित्यिक" होते ! ईश्वराची नवविद्या भक्ति करताना, दुष्ट-दुर्जनानी रंजले गांजलेले, अज्ञानामुळे अधर्मालाच धर्म म्हणून कवटाळून बसलेले, लोभ-मोहाने अंध होऊन आपत्तीच्या डोहाकडे धावत निघालेले किंवा कृतकर्मांच्या पश्चातापाने दग्ध होऊन सांत्वन करू शकणाऱ्याच्या शोधात असलेले जे असंख्य लोक त्यांना सभोवताली दिसत होते, त्यांच्या विषयीच्या आत्यंतिक कारूण्याने कळवळून संतांच्या अंतःकरणातून जे सहजोद्गार निघाले त्याचे नाव " संत साहित्य " !

श्रीमद् भगवद्गीतेच्या परिभाषेत सांगावयाचे झाल्यास "समग्र संत साहित्यात" ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, विभूतियोग आणि राजयोग यांचा अभावित समन्वय साधला आहे !

अलंकारशास्त्रदृष्टचा पाहू जाता संत साहित्यात अलंकारांचे शतावधि प्रकार दिसणार नाहीत; पण त्यामध्ये आलेल्या सहस्त्रावधि अपूर्व उपमा-दृष्टान्तांनी त्याची रमणीयता फारच चित्ताकर्षक झाली आहे यात संशय नाही. आपले हे विधान स्पष्ट करण्यासाठी भरपूर उदाहरणे माझ्या मनात गर्दी करीत आहेत; पण स्थल संकोचामुळे तो मोह मी आवरीत आहे.

मोक्ष हा परम पुरुषार्थ आहे, तो प्राप्त करण्याच्या कामी भक्ति आणि शांत हेच रस प्रामुख्याने साहाय्यक असल्याने तेच सर्व-रसांत श्रेष्ठ आहेत. विनोदप्रधान हास्य-रस हा तर टवाळांच्या आवडीचा विषय आहे, अशी नवीन रसव्यवस्था प्रस्थापित करण्याचे संपूर्ण श्रेय संत साहित्यालाच आहे ! तात्पर्य, भूतमात्रांच्या दयेने विव्हळ झालेल्या संतांच्या हृदयातून निघालेल्या सहजोद्गारातून ज्या साहित्य सोनियाच्या खाणी सर्वत्र निर्माण झाल्या, त्यामुळे बहुजन समाजाच्या भावविश्वात ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला आणि भक्तिरसाची सुरगंगा प्रवाहित होऊन शैत्यपावित्र्याचा मलयानिल सर्वत्र वाहू लागला ! प्रत्येक संताचे स्वतःचे असे आगळे वैशिष्टय त्याच्या साहित्यात ठळक

पणे दिसते. त्या आगळचा वैशिष्टयामुळे समग्र संतवाङ्मयामध्ये त्यांच्या व्यक्तित्वाचे आणि विचाराचे स्वतंत्रपण अभ्यासकाला जाणवते !

मराठी संतवाङ्मयात १७ व्या शतकातले " राष्ट्रगुरू " समर्थ रामदास आणि २० व्या शतकातले " राष्ट्रसन्त " श्री तुकडोजी महाराज यांच्या वाङ्मयात हे पृथगात्मत्व ठळकपणे जाणवते. या दोघांही सत्पुरूषांतील, इतर संतापासूनचे वेगळेपण व्यक्त करण्यासाठी सुजाण लोकांनी अनुक्रमे "राष्ट्रगुरू" आणि "राष्ट्रसन्त" या उपाधींनी त्यांचा गौरव केला आहे. श्री रामदासांच्या समकालीन लोकांनी 'समर्थ' उपाधीने, इतर संतांच्या साहित्यात न जाणवणारे त्यांच्या वाङ्मयातील सामर्थ्याच्या सन्देशाचे वैशिष्टय सूचित केलेच होते. या शतकात जेव्हा राष्ट्रभावना प्रखर होऊ लागली तेव्हा त्यांच्या वाङ्मयातील राष्ट्रशक्तीच्या सन्देशाचा आशय व्यक्त करण्यासाठी 'राष्ट्रगुरू' या उपाधीने त्यांच्या विषयीचा श्रद्धायुक्त आदरभाव व्यक्त केला गेला.

श्री तुकडोजी महाराज हे आधुनिक संत मंडळीमध्ये असेच एक आगळे संत होते. एक आत्मानुभवी जन्मसिद्ध सत्पुरुष म्हणून ते समाजामध्ये प्रकट झाले ते त्यांच्या अनुपम खंजिरी भजनामुळे. प्रारंभीच्या काळात त्यांच्या स्वयंस्फूर्त आणि समयोत्स्फूर्त भजनातून भगवद्भक्तीचा अपूर्व आवेश दिसत होता, लक्ष-लक्ष ग्रामीण श्रोत्यांची (किंबहुना प्रत्यक्ष महात्मा गांधीसारख्या थोर पुरूषांची) अंत:करणे हेलावून टाकण्याची शक्ति त्या भावावेशपूर्ण भजनगीतात होती. पण महाराज हे ज्वालाग्राही अंत:करणाचे संत होते. जनतेची भगवद्भक्ती आपल्या भजनाच्या माध्यमातून उद्दीपित करण्याच्या निमित्ताने हिंडताना त्यांना जे एकूण राष्ट्रीय अध:पतन सम्पूर्ण समाजात प्रत्यक्ष दिसले त्यातून त्यांच्या भजनाचा सूरच पालटला. देशभक्ति, समाजसुधारणा रूढीनिर्मूलन, दलितोद्धार, गोरक्षण, समाज संघटन, ग्रामोद्योग, शेती-सुधार, स्त्रीमुक्ति, बोवाबाजी-निखंदन, व्यायामाचे व शरीरश्रमाचे महत्त्व, व्यसन-मुक्ति, आणि सर्वांगीण स्वावलंबनात्मक ग्रामोद्धार या सारखे काही विचार त्यांच्या अद्भूत खंजिरी भजनातून दुमदुमू लागले. त्यांच्या सरळ सुबोध व नितांत प्रासादिक शैलीमुळे ते अशिक्षित बहुजन समाजाच्या थेट हृदयापर्यंत पोहोचू लागले. भजनातील या परिवर्तनामुळे आणि त्याचबरोबर त्यांनी उभारलेल्या विविध प्रकारच्या सुसंघटित विधायक कार्यामुळे एक महनीय राष्ट्र-कार्यकर्ता म्हणून समाजाला त्यांची ओळख पटली. समकालीन संत मंडळीमध्ये तुकडोजी हे एक थोर राष्ट्रीय पुढारी होते आणि राष्ट्रीय पुढारी मंडळीमध्ये ते एक वंदनीय संत होते. त्यांच्या व्यक्तित्वातील नव्हे विभूतिमत्त्वातील या द्वैधीभावामुळे " राष्ट्रसन्त " हो उपाधी त्यांना गुणग्राही लोकांनी दिली आणि तो त्यांना फार शोभून दिसली ! राष्ट्रसंतांचे प्रकाशित हिंदी-मराठी पद्यात्मक साहित्य फार मोठे आहे. प्रस्तुत ग्रंथात त्याची एकूण संख्या मराठी-२८+हिन्दी २८ म्हणजे एकूण ५६ इतकी दिली आहे. (पृ. १२७-२८)

यासर्व ग्रंथांमध्ये ४१ अध्यायांची (ओवीसंख्या–४६७५) त्यांची ग्रामगीता सर्वश्रेष्ठ आहे. संपूर्ण जुन्या आणि नव्या मराठीच नव्हे तर अन्य सर्व प्रादेशिक भाषीय संतवाङ्मयात ग्रामगीतेसारखा देशकाल परिस्थितीची मूलग्राही जाणीव ठेवून धम्मपदासारख्या सुबोध भाषेत लिहिलेला दुसरा ग्रंथ नाही असे विधान मी केले तर त्यात अत्युक्तिदोष येणार नाही !

राष्ट्रसंतांच्या अमृतोत्सवानिमित्त ग्रामगीतेचे संस्कृत रूपांतर करण्याच्या निमित्ताने मला जे या ग्रंथाचे पांक्त चिन्तन घडले त्या अनुभवाच्या आधारे मी वरील विधान केले आहे. ते केव्हाही खंडित झाले तर मला त्याचा आनंदच होईल. लोकांचे पारमार्थिक हित सांभाळणारी आमची संतमंडळी, तितक्याच प्रमाणात राष्ट्रीय हिताचा उपदेश संत तुकडोजी महाराजांचा आदर्श पुढे ठेवून करू लागली तर या समाजातले अवदशेचे तिमिर लोपून प्रत्येक ग्राम 'भूवैकुंठ' झाल्यावाचून राहणार नाही. राष्ट्रसंतांच्या व्यक्तित्वाचा आणि त्यांच्या ग्रामगीतेचा आदर्श संतमंडळीपुढे प्रथमच निर्माण झाला आहे, त्यांचा मागोवा घेत अनेक राष्ट्रनिष्ठ संत आणि त्यांच्या द्वारा ग्रामगीतेसारखे सिद्धप्रज्ञेच्या लाभातून दुभलेले सारस्वत निर्माण होवो हीच प्रार्थना आहे !

माझे स्नेही डॉ. राम घोडे हे राष्ट्रसंतांचा सहवास लाभलेले एक भाग्यवन्त प्राध्यापक आहेत. राष्ट्रसंतांच्या समग्र वाङ्मयाचे केवळ भाविकपणेच नव्हे तर चिकित्सापूर्ण चिन्तन करून त्यांनी लिहिलेल्या शोधप्रबंधामुळे त्यांना नागपूर विद्यापीठाची 'डॉक्टरेट' ची उपाधी प्राप्त झाली. राष्ट्रसंतांच्या समग्र साहित्यावर डॉक्टरेट मिळविणारे प्रा. घोडे हे पहिलेच प्राध्यापक आहेत. या उच्च उपाधीच्या लाभानंतरही त्यांचे अध्ययन स्थगित झाले नाही. प्राचीन मराठी संतवाङ्मयात त्यांना समर्थ रामदास स्वामींचे व्यक्तित्व आणि त्यांचा ग्रंथराज दासबोध यांच्याशी राष्ट्रसंत तुकडोजींचे व्यक्तित्व व त्यांची ग्रामगीता यामध्ये विलक्षण साधर्म्य आढळले ते त्यांनी मोठ्या साक्षेपीपणाने अभ्यासू मंडळींच्या पुढे, " समर्थ रामदास आणि संत तुकडोजी–तौलनिक दर्शन " या प्रस्तुत प्रबन्धात्मक ग्रंथाच्या रूपाने सादर केले आहे.

२१६ पृष्ठांच्या या प्रबंधात, एकूण १० प्रकरणांपैकी प्रारंभीच्या श्रीसमर्थ आणि राष्ट्रसन्त यांच्या व्यक्तित्वाचे साम्य दाखविताना त्यांची जीवनचरित्रे त्यांच्या जीवनकाळातली विशिष्ट परिस्थिति, त्यांची राष्ट्रनिष्ठ भूमिका आणि त्यांचे धर्मसुधारक व समाजोद्धारक कार्य याचे निवेदन केले आहे. ते करताना दोघांच्याही ग्रंथातील यथोचित अवतरणे ठायीठायी देऊन आपल्या विधानांची प्रामाणिकता डॉ. घोडे यांनी सिद्ध केली आहे.

तीन शतकांच्या अंतराने महाराष्ट्रात उदयास आलेल्या या दोन संतांचे साधर्म्य दाखवून त्याचा निष्कर्ष सांगताना डॉ. राम घोडे म्हणतात–"समर्थांच्या राष्ट्रीय भूमिकेतून एका शक्तिशाली शासनाचे ध्येयस्वप्न दिसते आणि तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रीय भूमिकेतून त्यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारसरणीचे दर्शन घडते. एकंदरीत समर्थ व राष्ट्रसन्त हे दोघेही टाळकुटे संत नव्हते, तत्कालीन धार्मिक सामाजिक व राजकीय परिस्थितीचे सूक्ष्मावलोकन करून व त्यासंबंधीचे चिन्तन करून समाजात राजकीय जागृति निर्माण करण्यासाठी दोघांनीही कालानुरूप निरनिराळे उपाय योजिलेले दिसतात. स्वराज्य व सुराज्य हे या दोन्ही संतांच्या राष्ट्रीय भूमिकेचे बीजस्थान आहे असे म्हणावयास हरकत नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे यथोचित भान ठेवलेल्या या दोन्ही संघटनकुशल संतांच्या राष्ट्रीय भूमिकेत बरेच साम्य आढळून येते!"

"रामदासांचे रामराज्य–तुकडोजींचे ग्रामराज्य;" "संतद्वय–साहित्य दृष्टि व सृष्टि;" तसेच "दासबोध व ग्रामगीता" या तीन अभ्यासपूर्ण प्रकरणांतून जे विवेचन झाले आहे, त्यातून इतर सर्व संतमंडळीहून समर्थ रामदास आणि राष्ट्रसन्त तुकडोजी महाराज यांचे वैशिष्टचपूर्ण व्यक्तित्व नीट लक्षात येते. आणि ते पाहून डॉ. राम घोडे यांनी प्रस्तुत प्रबन्धासाठी निवडलेल्या विषयाचे औचित्य सिद्ध होते.

गीतारहस्यामध्ये लो. टिळकांनी असे विधान केले आहे की कर्मयोगाचे स्वतंत्रपणे प्रतिपादन करणारा दासबोध हा एकमेव ग्रंथ मराठी वाङ्मयात आहे ! ग्रामगीतेचे आमूलाग्र पारायण करताना हेच जाणवते की, राष्ट्रजीवनाचा मूलभूत घटक जे ग्राम त्यामध्ये आजच्या इलेक्ट्रानिकच्या युगात ही नरकप्राय जीवन जगणारी नव्वद–टक्के अज्ञ, दीन, दरिद्री ग्रामीण जनता यांच्या सर्वांगीण उद्धाराचा मूलग्राही आणि तत्त्वस्पर्शी विचार देणारा दुसरा ग्रंथ नाही आणि असा विचार करणारा दुसरा संत आजवर झाला नाही !

डॉ. राम घोडे यांच्या प्रस्तुत प्रबंधाचे मी मनःपूर्वक अभिनन्दन करतो. या उत्तम ग्रंथासाठी प्रस्तावना लिहिण्याची सेवा मजकडून त्यांनी घेतली याबद्दल त्यांना धन्यवाद देतो–आणि राष्ट्रसंतांच्या प्रभावळीतील इतर संत पुरुषांच्या वाङ्मयाबरोबर तौलनिक अध्ययन करणारे आणखी काही उत्तम प्रबंध त्यांनी यापुढेही लिहावेत अशी अपेक्षा व्यक्त करतो !

रक्षाबन्धन
१९८८

–श्रीधर भास्कर वर्णेकर

पाठ-राखण

श्री बाबा मोहोड
'संपादक' श्रीगुरुदेव

नागपूरचे माझे मित्र, हिस्लॉप महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक, कुशल शिक्षक, प्रभावशाली वक्ते, अभ्यासू लेखक आणि राष्ट्रसंतांच्या विशाल परिवारातील व्यासंगी प्रबोधनकार डॉ. राम घोडे हे एक ललित नाट्य-लेखक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. 'संसारी सुरंग कांचनाचा' हे त्यांचे नाटक केव्हाच रसिकमान्य झाले आहे. डॉ. राम घोडे यांनी केवळ नाटक, कादंबरी, कथा या प्रकारांचे ललित लेखनच केले असते तर ते सुद्धा त्यांच्या व्यासंगाला आणि वातावरणाला अनुरूपच झाले असते. परंतु केवळ ललित-लेखन ही सर्वच लेखकांना मानवणारी चीज नाही. सामाजिक बांधीलकीशी जीवनातल्या मांगल्याशी, आचारातल्या शुचितेशी ज्यांनी नातेबंध जोडून घेतला आहे अशांना करमणुकीकडे वेडघासारखे धावत राहणारे ललित लेखन आणि त्यामागची नाजूक कलाकुसर भावणारी नसते. थोडा कलाहीनतेचा, सवंग लोकेषणेचा आरोप पत्करुनही त्यांचे लेखन प्रस्थापितांच्या करमणुकीपेक्षा विस्थापितांच्या प्रबोधनात स्वतःला धन्य मानत असते. ही धन्यता त्यांना पैसा देत नसते. फारशी प्रसिद्धीही देत नसते. मान-सन्मानसुद्धा कमीच देत असते. परंतु आत्मसमाधान त्यांना भरपूर देऊन जात असते.

अशा विरळच्या प्रवृत्तीशी एकरूप झालेले माझे मित्र डॉ. घोडे हे सुदैवाने राष्ट्रसंतांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावाने भारलेले आहेत. राष्ट्रसंतांच्या मानवनिष्ठ विचारांची पताका खांद्यावर घेऊन समाज-प्रबोधनाच्या पंढरीला निघालेले ते एक निष्ठावंत वारकरी आहेत. मीसुद्धा त्याच फडातला एक गडी. शिवाय पृथ्वीने माझ्यासाठी त्यांच्याहून काही फेऱ्या सूर्याभोवती अधिक मारलेल्या. त्यामुळे वडीलकीच्या आणि आदराच्या भावनेने ते माझ्याकडे पाहतात. त्यांच्या प्रत्येक वाङ्मयीन अपत्याला मी काहीतरी लिहावे अशी अपेक्षा ठेवतात. ही अपेक्षा हे त्यांचे थोरपण आहे. परंतु माझ्या मर्यादा मी उत्तमप्रकारे जाणतो. विद्वत्ता, व्यासंग, हुकमी लेखन या गोष्टींचा माझ्याजवळ अभाव आहे. शिवाय डॉ. घोडे यांच्यासारख्या व्यासंगी व्यक्तीच्या ग्रंथास माझ्यासारख्याने काहीतरी लिहावे हा विचारच मनाला प्रचंड ओझ्याखाली दडपून टाकणारा आहे.

डॉ. राम घोडे हे राष्ट्रसंतांचे पायिक. त्यांच्या विचारांचे चाहते. त्यांच्यामधल्या संतत्वाचे पूजक आणि उपासक. राष्ट्रसंतांशिवाय त्यांना वेगळे काही सुचतच नाही. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी ते राष्ट्रसंतांनाच पाहतात. त्यांच्या विचारांचा प्रसार करणे यालाच ते भक्ति मानतात. प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीमागेही त्यांची ही भक्ति-

भावनाच कारणीभूत झालेली आहे. मागे या भावनेच्या पूर्तीसाठी त्यांनी संत तुकाराम महाराजांना वेठीस धरले. यावेळी समर्थ रामदासांना त्यांनी उचलून आणले. या उभय संतांच्या जीवनातील आणि कार्यातील साम्यस्थळे शोधून त्यांच्या कर्तृत्वाशी व व्यक्तित्वाशी राष्ट्रसंतांच्या कार्य विस्ताराचा मेळ घालणे व एक अतूट नातेबंध निर्माण करून आपल्या आराध्य दैवताची इतर संतांच्या संदर्भात ओळख करून देणे हे कार्य त्यांनी आपल्या संत साहित्य निर्मितीतून उत्तमप्रकारे साधले आहे. राष्ट्रसंतांच्या अलौकिक कार्याला अपरिचित असलेल्या संत तुकारामांच्या व समर्थांच्या संप्रदायातील भक्तांना या निमित्ताने तरी राष्ट्रसंतांच्या कार्याची जवळून जाणीव व्हावी हा त्यांचा हेतू असावा असे वाटते.

वास्तविक विचार केला तर तुलना ही कधीच कुणाची कुणाशी होत नसते. आणि ती करावयाचीही नसते. तशात समर्थ रामदास आणि राष्ट्रसंत यांची तुलना करण्याचा विचार मनात येणे हेच मोठे धाडस आहे. कारण दोघांचा कालखंड हा सुमारे तीनशे वर्षाच्या अंतराने विभागला आहे. शिवाय समर्थ हे राजेशाहीचे पुरस्कर्ते होते, तर राष्ट्रसंत हे लोकशाहीचा कैवार घेणारे होते. चातुर्वर्ण्याची दुष्ट चौकट घट्ट पकडून समर्थांनी आपले कार्य सिद्ध केले, तर राष्ट्रसंतांनो ती चौकट कालबाह्य मानून कुस्करून टाकली. समर्थांनी जाति-श्रेष्ठत्वाचे स्तोम शिरोधार्य मानले तर राष्ट्रसंतांनो गुणकर्माचा आधार ग्राह्य मानला; समर्थांनी सांगितले–

"गुरु तो सकळाशी ब्राम्हण
जरी तो जाला क्रियाहीन
तरी तयाशीच शरण
अनन्यभावे असावे ॥"

तर राष्ट्रसंत म्हणाले–

"एक ब्राम्हण दुकानी बैसला
मास मच्छी विको लागला
त्याची पूजा कराया एक गेला.
शोभा देईल काय ते"
जेथे दिसती ब्राह्मणांचे गुण
त्यासी आदरे म्हणावे ब्राम्हण ..."

दोघांच्या विचारसरणीत असा हा भयंकर फरक. समर्थांनी हिंदूवर अन्याय-अत्याचार करणाऱ्या यवनांपुरते शत्रुत्व स्वीकारले होते तर राष्ट्र संतांनी हिंदु, मुस्लिम, शीख, ईसाई या सर्वांच्या एकात्म सलोख्यात भारताच्या वैभवाची संकल्पना स्वीका-

रली होती. समर्थांचे कार्याला ब्राह्मण, पूजा, मंदिर, स्नान, संध्या एवढाच आयाम होता, तर राष्ट्रसंतांचा कार्य-विस्तार या वर्तुळाबाहेरच्या विशाल परिघात साकार-लेला होता. म्हणून समर्थांचे मागणे स्नान संध्येसाठी उदंड पाणी आणि गो-ब्राम्हणांना संरक्षण एवढ्यापुरतेच मर्यादित होते, तर राष्ट्रसंतांचे पसायदान घराघरात उद्योग, शील आणि सौंदर्याची उधळण व्हावी यासाठी होते. याचा अर्थ श्रीसमर्थ राष्ट्रसंतांपेक्षा लहान ठरतात असा होत नाही. वास्तविक दोन तुल्यबळांचे साम्य-भेद दर्शन घडविणे हे केवढे व तेवढेच नाजुक काम आहे. परंतु डॉ. राम घोडे याबाबतीत अधिक सावध व दक्ष आहेत. म्हटले तर चाणाक्ष सुद्धा आहेत. त्यांनी दोघांच्या कर्तृत्वामधली साम्यस्थळे तेवढी स्वीकारली आणि आक्षेपक स्थळांचा कुठेही अधिक्षेप न करता आपला हेतु हळूवारपणे सिद्धीस नेला. राष्ट्रसंतांची वाङ्मयीन पूजा त्यांनी समर्थांना कुठेही उणेपणा न येऊ देता समर्थपणे बांधली. हाच तो त्यांचा चाणाक्षपणा. वाचकांनी आणि समर्थांच्या चाहत्यांनी याबद्दल डॉक्टरांना कितीही शाबासकी दिली तरी ती थोडीच होईल.

संतमंडळी आपला देव जगाला मिथ्या समजून गिरी-कंदरात शोधत नाहीत तर अखिल विश्वाला परमेश्वराची लीला, क्रीडा समजून विश्वाशी सख्य साधतात. दिसेल त्या भूतमात्राला भगवंत मानतात. आणि अशा प्रकारे आपला कार्यभाग साधतात. प्रत्येक जीवजंतू मग त्यांना परमेश्वराची प्रतिकृति वाटते. त्यांची सेवा होच मग त्यांच्यासाठी आपल्या इच्छित दैवताची भक्ति होते. देश हाच त्यांचा देव बनतो. हा भक्तिमार्गातला गहन पण लोकाभिमुख सिद्धान्त डॉ. घोडे यांनी राष्ट्रसंतांचे आणि समर्थांचे अंगोकृत कार्य तुलण्याचे निमित्त करून प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने अत्यंत सुलभ-पणे प्रगट केला आहे.

मित्रवर्य डॉ. राम घोडे यांनी संधी दिली आणि एका अति उत्तम पुण्यकार्यासाठी माझा उपयोग होऊ शकला याबद्दल खरे तर मीच डॉक्टरांचे ऋण मानले पाहिजे. परंतु त्यांना ते मान्य होणार नाही. प्रस्तुत ग्रंथाच्या अवतरणामुळे समर्थांची सांप्रदायिक भक्त मंडळी आणि राष्ट्रसंतांची चाहती व सेवक मंडळी डॉक्टरांना मनःपूर्वक दुवा देईलच. परंतु सर्व सामान्य वाचकसुद्धा या ग्रंथाच्या वाचनानंतर विधायक पौरूषाची व मानवधर्माची दीक्षा घेईल आणि ग्रंथाचे लेखक डॉ. राम घोडे यांना पुनःपुन्हा धन्यवाद देईल याबद्दल तिळमात्र शंका नाही.

मंगलधाम, माधान
नागपंचमी १६-८-८८

—बाबा मोहोड

अ भि प्रा य

श्री बाळासाहेब भारदे
माजी सभापती, (महाराष्ट्र राज्य)

नागपुरच्या हिस्लॉप कॉलेजातील मराठीचे प्राध्यापक डॉ. राम घोटे यांच्या **" समर्थ रामदास-संत तुकडोजी तौलनिक दर्शन "** या ग्रंथाला अभिप्राय लिहिण्याचा आनंदप्रद योग मला प्राप्त झाला हे मी माझे परमभाग्य मानतो. महाराष्ट्रातील हे दोन्ही संत म्हणजे खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत होत. आत्मोद्धार, लोकोद्धार आणि राष्ट्रोद्धार असा त्रिवेणी संगम साधण्याचे महद्कार्य या दोन्हीही संतांनी केले आहे. त्यादृष्ट्रीने डॉ. घोडे यांनी निवडलेला विषय हा अतिशय औचित्यपूर्ण आहे असे म्हणावे लागेल.

ब्रह्मानंद आणि सेवानंद या दोन्हींचा अखंड आनंद या दोन्ही संतांमध्ये अंतर्भूत होता. त्यांनी आध्यात्मिक मानवतावादी जीवदर्शनाचा साक्षात्कार जगास दाखविण्याचे अचाट कार्य आपापल्या काळात केले आहे.

संतमालिकेतील श्री समर्थ व श्री तुकडोजी हे महासंत तर आहेतच, परंतु त्याबरोबरच त्यांच्या अवतार कार्यात राष्ट्रीय प्रेरणा आणि राष्ट्रीय कार्याचे विशेष दर्शन होत असल्याने त्यांचे आगळे-वेगळे वैशिष्ट्य या संतपरंपरेत स्पष्टपणे उठून दिसते. समाजहिताच्या व भूतदयेच्या प्रेरणांच्या संदर्भात सामाजिक परिस्थितीचा वेध घ्यावाच लागतो. तो वेध त्या त्या काळाच्या परिस्थितीनुसार व स्वतःच्या तात्विक भूमिकेच्या संदर्भात या दोनही संतांनी कमी-अधिक प्रमाणात घेतलेला आहे.

समर्थांच्या व महाराजांच्या काळात जवळ जवळ तीनशे वर्षाचे अफाट अंतर आहे. समर्थांच्या काळात बादशाही आक्रमणाचे भयानक परिणाम स्पष्टपणे दिसत होते. औदासिन्य, दैववाद, विस्कळितपणा, भीरूता इत्यादी गोष्टींमुळे निर्माण झालेली असहायता हताशपणे लोक पाहात होते. म्हणून स्वराज्यासाठी राष्ट्रीय प्रेरणा आणि स्वधर्मासाठी अध्यात्मप्रेरणा या दोन्हीवर आधारलेल्या राष्ट्रीय व धार्मिक उत्थानाचा समर्थांनी अवलंब केला. समर्थांचा काळ हाच शिवप्रभूंचा काळ. समर्थांनी संस्कारित व प्रभावित केलेली ब्राम्हण-शक्ती आणि श्री शिवप्रभूंनी प्रेरित व संघटित केलेली क्षात्रशक्ति यांचा अभूतपूर्व संगम होऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.

तुकडोजी महाराजांचा काळ हा भारतातील परकीय राजवटीचा. त्यांच्या काळात गांधीजींच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष स्वातंत्र्य संग्रामच सुरू होता. महाराजांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाने व आपल्या राष्ट्रीय स्फूर्ति-गीतांनी या आंदोलनाला उधानही आणलेले होते. स्वराज्य प्राप्तीनंतरही जातीय ऐक्य, समाजविकास, ग्राम-स्वराज्य अशा अनेक कार्यांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. 'जन हेचि जनार्दन। एका जनार्दनी भजन' या नाथ वचनाचा महाराजांनी आपल्या भजनांनी क्रांतिकारक आविष्कार दाखविला. त्यांची खंजिरी अन्यायी सत्ताधीशाच्या पोटात जणु खंजीरच खुपसते आहे असे वाटावे इतकी धारदार होती. म्हणूनच राष्ट्रसंत ही सार्थ उपाधी त्यांना शोभून दिसते. अशाप्रकारे समर्थ रामदास आणि संत तुकडोजी या दोघांचेही राष्ट्रनिष्ठेच्या दृष्टीने आगळे-वेगळे वैशिष्टच आहे म्हणूनच खऱ्या अर्थाने ते दोघेही राष्ट्रसंत आहेत असे मी म्हणालो. या दोन राष्ट्रसंतांच्या जीवनदर्शनाच्या अनेकविध पैलूंचे व कार्याचे तौलनिक दर्शन घडवून डॉ. राम घोडे यांनी संत साहित्यात एक चांगली भर घातली असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. संतद्वयाचे जीवन दर्शन, संत-द्वयाची धार्मिक भूमिका, त्यांची राष्ट्रीय भूमिका, त्यांची साहित्य सृष्टि आणि दृष्टी, दासबोध आणि ग्रामगीता, समर्थांचे रामराज्य आणि महाराजांचे ग्रामराज्य' अशा विविध पैलूंचा विषयवार विचारविमर्श हे या ग्रंथाचे स्वरूप आहे. त्या त्या विषयांस अनुरूप अशी समर्थांची व महाराजांची यथोचित मार्मिक वचनेही उद्धृत करून सप्रमाण विवेचन करण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकाने केलेला आहे. साम्यभेद दर्शनामधूनही वर्णव्यवस्थेचा अपवाद सोडला तर हे भेद परिस्थितीवश आहेत, दार्शनिक नाहीत हेही या ग्रंथातून स्पष्टपणे दिसून येते.

एकंदरीत, धर्मकारण आणि राजकारण धार्मिकता आणि राष्ट्रीयता आध्यात्मिक शांती आणि सामाजिक क्रांती, वैयक्तिक सद्वर्तन आणि सामाजिक परिवर्तन यांचा समन्वय साधून नवधर्म संस्थापनेचे कार्य केले पाहिजे हाच समर्थ रामदास व संत तुकडोजी महाराज यांच्या जीवन दर्शनाचा संदेश आहे. हा संदेश या ग्रंथाच्याद्वारे बऱ्याच प्रमाणात जनमानसावर परिणाम करील असा मला भरवंसा वाटतो.

प्रा. डॉ. राम घोडे यांच्या या मौलिक साहित्य निर्मितीबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो व यापुढेही त्यांच्या हातून अशाच सरस साहित्यकृती निर्माण होवोत अशी अपेक्षा व्यक्त करतो.

दि. २८ ऑगष्ट १९८८ } बाळासाहेब भारदे

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
3299
दि. 27/12/86

लेखकाचे हृद्‌गत

प्रिय वाचकवृंद !

'समर्थ रामदास-संत तुकडोजी : तौलनिक दर्शन' हा ग्रंथ आपल्या सेवेशी सादर करताना मनाला अतीव समाधान लाभत आहे. ऑक्टोबर १९८३ मध्ये **'संत तुकाराम-संत तुकडोजी : तुलनात्मक दर्शन'** हा प्रबंधसंक्षेप ग्रंथ रूपाने प्रकाशित झाल्यावर समर्थांच्या व राष्ट्रसंतांच्या अनेक सद्‌भक्तांनी महाराष्ट्रात जनजागृतीचे व लोकशिक्षणाचे भरीव कार्य करणाऱ्या या दोन महान विभूतींचे तौलनिक दर्शन घडविणारा ग्रंथ मी लिहावा अशी इच्छा प्रगट केली होती. त्या सद्‌भक्तांच्या सदिच्छेमुळेच या दोन क्रांतिकारक संतांचे अमोल वैचारिक धन यथाशक्ती वेचून त्याचा ठेवा ग्रंथरूपाने आपल्या स्वाधीन करण्याचा संकल्प मी केला.

'सत्य संकल्पाचा दाता भगवान । करी सर्व पूर्ण मनोरथ ।'

याप्रमाणे आज माझा संकल्प माझ्या यथाशक्य साधनेने सिद्धीस जात आहे म्हणून मनाला हे अतीव समाधान.

खरे म्हणजे दोन महापुरुषांची तुलना करू नये या मताचा मी. परंतु माझ्या या पूर्वीच्या **'संत तुकाराम-संत तुकडोजी तुलनात्मक दर्शन'** या ग्रंथाला पुरस्कार लिहिताना संत वाङ्‌मयाचे गाढे अभ्यासक श्री. सुदामजी सावरकर म्हणतात त्याप्रमाणे "अशी तुलना जर आंतरिक एकत्वाचा मागोवा घेणारी नि सद्‌हेतुमूलक असेल तर त्यायोगे बुद्धीची सूक्ष्मता नि प्रगल्भता वाढून स्वहित मार्ग गवसण्यास मदतच होते." हा सद्‌हेतू दृष्टीपुढे ठेऊनच देशाला देव मानून त्याची मनोभावे पूजा करणाऱ्या व पारतंत्र्यात सुस्तावलेल्या समाजाला डोळस राष्ट्रभक्तीचे धडे देणाऱ्या या दोन महान विभूतीमत्वांचे तौलनिक दर्शन घडविण्याचे मी साहस करीत आहे.

महाराष्ट्रातील हे दोन्ही महान संत 'पीडिता हे जन' पाहून पोटतिडकीने त्यांचे दुःख निवारण्याचे महान कार्य करणारे आपापल्या काळातील जातिवंत समाजसुधारकच होत. त्यांचे समाज उभारणीचे व समाज उत्क्रांतीचे अमोल कार्य अविस्मरणीय आहे.

सतराव्या शतकातील समर्थांचा काळ म्हणजे महाराष्ट्रातील यावनी सत्तेचा निःपात आणि स्वातंत्र्याच्या अरुणोदयाचा आरंभ होता. ईश्वरभक्तीच्या व आत्मोद्धाराच्या माध्यमातून धार्मिक ऐक्य टिकविण्याचे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात जनतेला प्रोत्साहित करण्याचे महान कार्य समर्थांनी केले,

तसेच वीसाव्या शतकात परकीय आंग्लसत्तेचा विध्वंस करण्यासाठी 'गुलामी अब नहीं होना हमारे प्रिय भारत में' अशा गगनभेदी गर्जनेने सारा आसमंत निनादून सोडण्याचे आणि

'स्वातंत्र्य धराया करी । तू तोड उरीची सुरी । पडू दे प्राण प्रसंगावरी'

अशी आपल्या भारतवासियांना प्रेरणा देऊन पारतंत्र्य-निःपातासाठी पेटविण्याचे अमोल कार्य राष्ट्रसंतानीही केले आहे. तथापि हे तौलनिक दर्शन घडवित असताना कोणाही एकाला दुसऱ्यापेक्षा लहान वा महान ठरविण्याचा हेतू मुळीच नाही हे आवर्जून सांगावेसे वाटते.

या संतद्वयाच्या वैचारिक प्रबोधनाचे, त्यांच्या चरित्र्य-चारित्र्याचे व विशेषतः त्यांच्या डोळस राष्ट्रवादाचे दर्शन घडविताना त्यांच्या मूळ विचारांचा अधिक्षेप होऊ नये म्हणून समर्थांच्या 'दासबोध' व राष्ट्रसंतांच्या 'ग्रामगीते' मधील अवतरणांचा आवश्यक तेथे उपयोग केलेला आहे. तथापि या दोनही विभूतींचा काळ आणि त्यांच्या काळातील राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थिती यांची भिन्नता लक्षात घेऊन त्या दोनही संतांमध्ये जाणवणारे वेगळेपणही 'साम्य-भेद दर्शन' या स्वतंत्र प्रकरणात उध्दृत केलेले आहे. हे करीत असताना या वेगळेपणात वा भेददर्शनात एकाची दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ-कनिष्ठता शोधण्याचा संकुचित भाव कोणीही ठेवू नये ही नम्र प्रार्थना ! या दोनही संतांचे अमोल संस्कार-धन भावी पिढीपुढे यावे एवढाच लेखकांचा प्रांजळ हेतू आहे.

प्रस्तुत ग्रंथनिर्मितीमध्ये संत-सज्जनप्रेमी श्री. शंकरराव मुळे, माझे मित्र डॉ. ल. ग. चिंचोळकर, श्री. के. टी. खुबाळकर, श्री. त्र्यं. आ. वैरागडे, प्रा. रघुनाथ कडवे, गुरुदेव मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. किसनलालजी मुंदडा, व श्री वैभव प्रकाशनचे श्री. सुनील करदळे यांचे मोलिक सहकार्य कृतज्ञतापूर्वक उल्लेखनीय आहे. तसेच प्रस्तुत ग्रंथाला आत्मीयतेने अभिप्राय लिहिणाऱ्या, पाठराखण करणाऱ्या आणि प्रसन्नमनाने माझे अभिनंदन करणाऱ्या डॉ. श्री. भा. वर्णेकर, श्री. बाबासाहेब मोहोड व श्री. बाळासाहेब भारदे या मान्यवर त्रिमूर्तीचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

माझ्या ग्रंथलेखनाला सातत्याने प्रोत्साहित करणारी माझी पत्नी सौ. रेखा व माझ्या लेखनात यथाशक्य मदत करणारी माझा चि. राजीव व रूपाली ही मुले यांचाही या निमित्ताने निर्देश अप्रस्तुत ठरू नये. माझा प्रिय वाचकवृन्द या ग्रंथाचे प्रसन्न मनाने स्वागत करतील अशी आशा बाळगतो.

नागपूर, गणेश चतुर्थी
१५ सप्टें. १९८८

आपला विनम्र,
प्रा. डॉ. राम घोडे

अ नु क्र म णि का

★ अभिनंदन–डॉ. श्री. भा. वर्णेकर, नागपूर
★ पाठराखण–श्री बाबासाहेब मोहोड, माधान
★ अभिप्राय–श्री बाळासाहेब भारदे, पुणे
★ लेखकाचे हृदगत्–डॉ. राम घोडे, नागपूर

पृष्ठ ४ ते १६

★ अनुक्रमणिका

★ पार्श्वभूमी– (पृष्ठ १७ ते २८)

★ ★ संतद्वयाचे जीवन–दर्शन (पृष्ठ २९ ते ४६)

श्री. समर्थ रामदास, राष्ट्रसंत तुकडोजी संक्षिप्त जीवनदर्शन संतद्वय तुलनात्मक जीवनदर्शन.

★ ★ संतद्वय कालीन भिन्न परिस्थिती (पृष्ठ ४६ ते ५९)

श्री समर्थकालीन परिस्थिती (राजकीय, धार्मिक, सामाजिक) श्रीसंत तुकडोजीकालीन परिस्थिती (राजकीय धार्मिक व सामाजिक) स्वातंत्र्यपूर्व राजकीय परिस्थिती. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय परिस्थिती. तुलनात्मक कालदर्शन.

★ ★ संतद्वयाच्या समाज कार्याचा धार्मिक पैलू (पृष्ठ६० ते १२३)

समाजकार्याला धार्मिक अधिष्ठान, संतद्वय ईश्वरविषयक कल्पना, ईश्वर–नामस्मरण हे स्वानंद साधन, संतद्वय–प्रपंच–परमार्थ विचार, समर्थ रामदास, संत तुकडोजी, संतद्वय वैचारिक साम्य, समर्थ रामदासांचा उत्तम पुरूष, तुकडोजो महाराजांचा ' आदर्श प्रचारक, ' संतद्वय-स्त्री-विषयक दृष्टिकोन, प्रास्ताविक–समर्थ रामदास, संत तुकडोजी, रामदास–तुकडोजी स्त्री विषयक साम्य–भेद दर्शन, संतद्वय–प्रयत्न–प्रारब्धवाद, समर्थ रामदास–प्रयत्न–प्रारब्धवाद, संत तुकडोजी–प्रयत्न–प्रारब्धवाद,

संतद्वय–सद्‌गुण संवर्धन व दुर्गुण निर्मूलन, वर्ण–जाति विषयक, समर्थ रामदास, संत तुकडोजी.

★ ★ संतद्वयाचो राष्ट्रीय भूमिका (पृष्ठ १२४ ते १५०)

समर्थ रामदास, शक्तीने मिळती राज्ये, रामराज्य, समर्थांचे राजकारण, तुकडोजींची राष्ट्रीय भूमिका, १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील महाराजांचा सहभाग, विश्वशांती नामसप्ताह, स्वातंत्र्योत्तर काळ व महाराज, देश हाच देव, तौलनिक परामर्श.

★ ★ रामदासांचे रामराज्य–तुकडोजींचे ग्रामराज्य–
(पृष्ठ १५१ ते १६४)

रामदासांचे रामराज्य, तुकडोजींचे ग्रामराज्य. रामराज्य–ग्रामराज्य तौलनिक परीक्षण काळ व परिस्थितीच्या मर्यादा–

★ ★ संतद्वय–साहित्य दृष्टी व सृष्टी (पृष्ठ १६५ ते १८२)

समर्थांच्या मते कवी–काव्याचे विविध प्रकार, काव्य कसे असावे, समर्थांचे काव्य, काव्य निर्मितीचे श्रेय परमेश्वराला, तुकडोजी महाराज आणि साहित्य, शब्दशक्ती हे साहित्याचे वाहन, साहित्याला सत्याचे अधिष्ठान असावे, साहित्यिकांकडून अपेक्षा. संतद्वयाच्या साहित्याचे तौलनिक मूल्यमापन, समर्थ रामदासांचे प्रकाशित साहित्य (मराठी हिंदी) संत तुकडोजींचे प्रकाशित साहित्य (मराठी हिंदी)

★ ★ दासबोध आणि ग्रामगीता (पृष्ठ १८३ ते २०२)

★ ★ दासबोध–ग्रामगीता तौलनिक दर्शन

★ ★ संतद्वय साम्य–भेद–दर्शन (परस्पर–वेगळेपण)
(पृष्ठ २०३ ते २१४)

★ ★ समारोप (पृष्ठ २१५ ते २१६)

——

श्री समर्थ रामदासांची समाधी ‡सज्जनगड‡

श्री संत तुकडोजी महाराजांची समाधी ‡गुरूकुंज‡



श्री समर्थांचे हस्ताक्षर



श्री तुकडोजी महाराजांचे हस्ताक्षर



पार्श्वभूमी

महाभारतातील यक्षप्रश्न प्रकरणात 'कादिक ?' (दिशा कोणती ?) अर्थात सर्वसामान्य माणसाने कोणत्या दिशेने जावे असा प्रश्न करण्यात आलेला आहे आणि ' संतोदिक '–संत सांगतील त्याच दिशेने जावे असे त्याचे उत्तरही देण्यात आलेले आहे. अशाप्रकारे समाजाला दिशा दर्शविणारे आणि समाजाच्या उन्नतीसाठी व उन्नयनासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे ' संत ' हे सर्व काळात, सर्व देशात व सर्व धर्मात अवतरलेले असल्याचे दिसून येते. संत हे कोणत्याही काळातील असोत, कोणत्याही देशातील वा धर्मातील असोत–

' धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हासि ' ।

असाच त्यांचा बाणा होता. महाराष्ट्रात तर अशा संतांची एक आगळीच परंपरा अवतरलेली आहे. तेराव्या शतकातील ज्ञानाची महती गाणारे संत ज्ञानेश्वर आणि भक्तिमाहात्म्य प्रतिपादन करणारे संत नामदेव, पंधराव्या शतकातील आपला परमेश्वर रंजलेल्या–गांजलेल्यांच्या शरीरात शोधणारे आणि महाराच्या पोराला कडेवर उचलून घेणारे संत एकनाथ, तसेच समाजोन्नतीविषयीची उत्कट तळमळ बाळगून पाखंड–खंडनाचे महद्कार्य करणारे सतराव्या शतकातील संत–शिरोमणी तुकाराम महाराज आणि त्याच काळातील डोळस राष्ट्रवाद जागवून समाज–उभारणीचे व समाज उत्क्रांतीचे क्रांतिकार्य करणारे समर्थ रामदास हे वरवर पाहता जरी वेगवेगळे पुरुष भासत असले तरी समर्थांच्या वचनाप्रमाणे–

" साधु दिसती वेगळाले । परि ते स्वरुपी मिळाले ।
अवघे मिळोनि एकचि झाले । देहातीत वस्तु " ॥

किंवा–तुकडोजी महाराज म्हणतात त्याप्रमाणे–

" संत देहाने भिन्न दिसती । ध्येय धोरणाने अभिन्न स्थिती ।
साधने जरी नाना दिसती । तरी सिद्धान्तमती सारखी " ॥

याप्रमाणे त्यांचे अंतिम ध्येय आणि सिद्धान्त समानच असतात. या सर्व साधुसंतांचे कार्य त्या त्या काळातील परिस्थितीला अनुसरून समाजा-

भिमुख व समाजानुकूलच होते. आणि म्हणून संत हे कोणत्याही काळातील किंवा जातिधर्मातील असलेत आणि त्यांनी विभिन्न माध्यमांचा अवलंब केला असला तरी त्यांचे कार्य जवळजवळ सारख्याच स्वरुपाचे असल्याचे जाणवते. याचा अर्थच असा की, संत हे जाति–धर्म–पंथ निरपेक्ष असतात. संतांची जात एकच आणि ती म्हणजे 'संत' हीच. म्हणून आपल्याला ब्राम्हण जातीत जन्माला आलेले ज्ञानेश्वर–एकनाथ–रामदास, महार जातीत अवतरलेले चोखोबा, शिंपी जातीतील नामदेव, माळी जातीचे सावता, न्हावी जातीतील सेना, कुंभार जातीतील गोरा, कुणबी जातीतील तुकाराम आदि संतांविषयी आणि त्यांच्या कालोचित कार्याविषयी आदरच वाटतो; नव्हे; तो वाटायलाच हवा.

ह्या सर्व संत संप्रदायाने एकच धर्म जोपासला आणि तो म्हणजे 'मानवधर्म,' त्यांच्या ठायी **'भेदाभेद अमंगळ'** होते. **'कोणाही जीवाचा न घडो मत्सर'** अशीच माणुसकीची शिकवण ते समाजाला सारखे देत राहिले.

माणूस हा समाजाचा मूलाधार आहे. माणूस घडला की, समाज आपोआपच घडतो आणि माणसातील माणूस संपला की, समाजाचे अध:पतन अटळ ठरते असा आजवरचा इतिहास आहे. म्हणूनच सर्व संतांनी समाजोन्नतीसोबतच आत्मोद्धाराचा मार्ग शिकविला. कारण आत्मोद्धाराशिवाय 'माणूस' घडणे आणि 'माणूस' घडल्याशिवाय 'समाजाचे उन्नयन' अशक्यप्राय आहे हे ते जाणून होते. संतांनी समाज जीवनात सुसंस्काराचे बीजारोपण केले ते या हेतूनेच. कारण व्यक्तीची जडणघडण होते ती संस्कारातूनच. तुकडोजी महाराजांनी संस्काराचे महत्व सांगताना स्पष्टच म्हटले आहे की,–

'मानव पशुयोनीतूनि आला । नराचा नारायण होणे त्याला ।
यासाठी संस्कार देऊनी सावरिला । क्रमाक्रमाने" ॥

सुसंस्काराच्या अभावी माणूस–धर्मात अनेक धोके संभवतात. आणि मग माणसाच्या हातून अधर्माची असंख्य कृत्ये सहज घडून जातात. तुकडोजी महाराज तर अशा अवस्थेच्या संदर्भात स्पष्टच विचारतात–

" मानव मानवासाठी कष्टतो । दुसऱ्याच्या सुखी सुखावे श्रेष्ठ तो ।
परि मानवास मानव संहारतो । अधर्म याहूनि कोणता " ।।

या अधर्माचे मूळ जर कशात असेल तर अमानुषतेत, आणि ही अमानुषता येते ती सुसंस्काराच्या अभावाने. म्हणूनच माणूस सारखा चुकत चालला आहे. माणुसकीला कलंक लावणारे वर्तन त्याच्या हातून हरघडी घडत आहे. माणुसकीचा अवशेषही नामशेष होत आहे. संतांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विणलेले सुसंस्काराचे धागे कुजत चालले आहेत आणि त्याचा परिणाम म्हणजे माणसाचे पदोपदी पडणारे वाकडे पाऊल. अशा अवस्थेविषयी आपली व्यथा व्यक्त करताना समर्थ म्हणतात–

" पर्णाळी पाहून उचले । जीवसृष्टी विवेके चाले ।
माणूस होऊन चुकले । या काय म्हणावे " ।।

पानावरील अळी सुद्धा सावधानतेने पुढे सरकते, इतकेच काय पण संपूर्ण जीवसृष्टी ही देखील विवेकाच्या अधिष्ठानावर आपले व्यवहार करते. परंतु माणसासारखा बुद्धिमान प्राणी मात्र बुद्धीभ्रष्ट झाल्यागत समाजात वावरतो आणि आत्मनाशाबरोबरच समाज जीवनाचा विध्वंस घडविण्यासही कारणीभूत ठरतो. म्हणूनच महाराज आपल्या एका भजनात, म्हणतात–

' माणूस द्या, मज माणूस द्या । ही भीक मागता मज प्रभु दिसला ' ।

प्रत्यक्ष परमेश्वराने निर्मिलेल्या या जीवसृष्टीत त्यालाच साधा माणूस सापडू नये याला काय म्हणावे ? महाराज जेव्हा परमेश्वराला स्पष्टच विचारतात की–

' माणूस कसला हवा तुम्हाला । सांगा तरी मी शोध करी ' ।

तेव्हा परमेश्वर स्पष्टच सांगतो–

" जंबुक मेंढचा डुकरे बकरे, बहुत मिळे तरी काय करू ?
याना शाहाणे करण्यासाठी, हवा मला माणूस मला "

कोल्हचा-मेंढचांसारखी, डुकरे-बकऱ्यांसारखी स्वैर वावरणारी असंख्य माणसे समाजात आढळतात. अशी ही माणसे नसून ती हाडा-मासाची सजीव सांगाडे आहेत. म्हणूनच कवयित्री बहिणाबाई अशा सजीव सांगाडचाना स्पष्टच विचारतात-

" मानसा, मानसा, कधी होशील मानूस ?
लोभासाठी झाला मानसाचा रे कानूस ! "

कानूस म्हणजे जनावर. माणसाला जनावर जर कोणी केले असेल तर माणसाच्याच वाईट प्रवृत्तीने, त्याच्या अमानुष नियतीने. खरे म्हणजे माणसाची नियतच दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. माणसाची अशी पशुतुल्य अवस्था पाहून बहिणाबाई स्पष्टच सांगते-

" मानसा, मानसा, तुझी नियत बेकार
तुझ्याहुनि बरं गोठचातलं जनावर "

अशा गोठ्यातल्या जनावरांपेक्षाही भयंकर बनलेल्या हाडामासाच्या सजीव सांगाडचाला माणसात आणण्याचा प्रयत्न सातत्याने संतपरंपरेने केलेला आहे. या दृष्टीनेच ' संत ' हे भारतभूमीचे अमोल संस्कार-धन समजण्यात येतात. त्यांचा प्रेरणास्त्रोत समाजजीवनात अखंड सुरू आहे. परंतु संत कसे असावे ? ते दांभिक नसावेत. संतानीच अशा दांभिक संतांचे स्वरुप उलगडून दाखविले आहे. संत तुकाराम महाराज या संबंधी सांगतात-

" भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथे अनुभवाचा काय पंथ ।
वाढवूनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबू वेषा सहज स्थिती ॥
कोरोनिया भूमी करी मध्ये वास । तरी उंदरास काय वाणी ।
तुका म्हणे ऐसे कासया करावे । देहासी दंडावे वाउगेचि ॥

तुकडोजी महाराजांचेही दांभिक संतांच्या संदर्भातील विचार अशाच प्रकारचे आहेत.

" जंगलाच्या अस्वलीला मोठ्या मोठ्या जटा ।
कुत्र्याच्या अंगावर भगव्याची छटा ।
गाढवाच्या अंगी नाही भस्माचा तोटा " ॥

तात्पर्य असे की, केवळ भगवे वस्त्र परिधान केल्याने जर संतत्व येत असेल तर कुत्र्याचाही रंग भगवा असतो, किंवा जटा वाढविल्याने साधुत्व येत असेल, तर अस्वलीच्या अंगावर मोठमोठ्या जटा असतात; किंवा केवळ गुहा–गुंफात वास करण्याने साधुत्व अंगी येत असेल, तर उंदीर किंवा घुशीही जमीन कोरून, भूमी कोरून राहतातच ना ! किंवा कशाला ! भस्म अंगी लावल्याने संतत्वाची खूण पटत असती, तर गाढव सारखे राखेतच लोळत असते म्हणून त्याच्या अंगी काही साधुत्व येत नाही.

समर्थही अशा भोंदू साधूंविषयी स्पष्टच सांगतात की–

"नव्हे चेटकी चाळकु द्रव्यभोंदु । नव्हे निंदकु मछरू भक्तिमंदु ।
नव्हे उन्मत्तु वेसनी संगबांधु । जनी ज्ञानिया तोचि साधु अगाधु" ॥

तात्पर्य असे की, चेटूक करणारा, लोकांना फसवून पैसे उकळणारा निंदा–नालस्ती व द्वेष–मत्सर करणारा, भक्तीचे सोंग आणून भोंदुगिरी करणारा, उन्मत्तपणाने वागणारा, विविध व्यसनांच्या आहारी गेलेला आणि आपल्या वाईट संगतीने इतरांनाही बिघडविणारा साधू किंवा सन्त नव्हे. अर्थात प्रा. रा. द. रानडे म्हणतात त्याप्रमाणे **"जो संत समाजास नितांत उपयोगी पडत नाही तो खरोखर संतच नव्हे"** (मराठी संतवाङ्मयातील परमार्थ. मार्च–१९६५ पृ. २९) म्हणजेच साधुत्व वा संतत्व हे बाह्य उपचारांवरून ओळखता येत नाही. तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे–

"जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा" ॥

अशा रंजलेल्या–गांजलेल्या जीवांना जवळ करणाऱ्या माणसांच्या गळचात माळ असली काय नि नसली काय ?

"अंतरी निर्मळ वाणीचा रसाळ । त्याचे गळा माळ असो नसो" ।
तात्पर्य, "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती परोपकारे" ॥

हीच खऱ्या संतांची खूण होय असे संतच सांगतात.

समर्थ रामदास खऱ्या संतांचे स्वरूप समजावून सांगताना म्हणतात–

"करी वृत्ति जो संत तो संत जाणा ।
दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा ।
उपाधी देहबुधिते वाढवीते ।
परी सज्जना केवी बांधू शके ते" ॥

अशाप्रकारे आत्मस्वरूपात रममाण झालेला व मनाला सर्वांगाने आत्ममय करणारा तो संत होय. असा संत प्रपंचाच्या पसाऱ्यात अडकूनही अलिप्त असतो. तो त्यात आसक्त होत नाही. त्याला सुखदुःखाची बाधा होत नाही. संत म्हणजे प्रा. के. वि. बेलसरे (सार्थ मनाचे श्लोक) म्हणतात त्याप्रमाणे–"आत्मशक्तीने भरलेले मानवयंत्रच होत." त्यांच्या सहवासाने आपल्यातही आत्मशक्ती संचरते.

समर्थ रामदास आणि राष्ट्रसंत तुकडोजी अशाच निर्मळ अंतःकरणाचे, रसाळवाणीचे, अचाट शब्दशक्तीचे, रंजलेल्या गांजलेल्या जीवांना जवळ करून त्यांच्या उद्धाराचा मार्ग दर्शविणारे आणि आपल्या सहवासाने इतरांमध्ये आत्मशक्तीचा संचार करणारे खरेखुरे संत होते. त्यांच्यासारखेच संत समाजजीवनात चैतन्य व चारित्र्य निर्माण करतात, समाजातील विषमता, अज्ञान व न्यूनगंड दूर सारतात. समाजातील दैन्य, दारिद्र्य, दुर्गुण, दुःख व अज्ञान पाहून त्यांचे अंतःकरण सारखे तुटत असते. बुडत्या जनाचा उद्धार करण्याची त्यांना उत्कट तळमळ लागलेली असते. अशा उत्कट तळमळीपोटीच या संतद्वयाने आपले जीवन या समाजरुपी विराट पुरुषाला समर्पित केले.

हे दोन्ही पुरुष सहृदय–भगवद्भक्त, प्रज्ञावंत थोर साधक, स्वानुभव संपन्न श्रेष्ठ संत, प्रभावशाली थोर विवेचक, अनुसरणीय–स्पृहणीय, आदर्श उपासक व अधिकारवाणीने विभूषित असे समर्थ–संत होते. समाजविघातक विविध व्याधींनी जर्जर झालेल्या जुनाट समाज व्यवस्थेतून नवसमाज निर्मितीचे स्वप्न साकार करणारे ते क्रांतिवीर होते. त्यांनी आपल्या भक्तीमार्गाच्या माध्यमातून समाजात सशक्त संघटना

उभारण्याचा प्रयत्न केला. समर्थांची गावोगावची मठस्थापना आणि राष्ट्रसंतांची श्रीगुरुदेव सेवामंडळे–निर्मिती ही त्याचेच प्रतीके होत.

सतराव्या शतकातील धर्मग्लानीच्या काळात समर्थांनी समाज-जीवनात धर्मसंस्थापनेचे कार्य करून समाजमनात परमेश्वराच्या सत्य-स्वरूपाचे ज्ञान करून दिले. तेच कार्य विसाव्या शतकात तुकडोजी महाराजांनी केले. हे दोन्ही पुरुष समाजाचे सांस्कृतिक नेते होते. त्यांनी समाजोन्नतीच्या कार्याची ध्वजा आपल्या खांद्यावर वाहिली. समर्थांचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रापुरते आणि राष्ट्रसंताचे विदर्भापुरते सिमित दिसत असले, तरी त्यांच्या कार्य–कर्तृत्वाचे व आचार–विचारांचे पडसाद भारतात आसेतुहिमाचल पसरलेले होते हे विसरता येत नाही. यावनी सत्तेच्या परवशतेत समर्थांनी व ब्रिटीशांच्या राजवटीत राष्ट्रसंतांनी जन-जीवनाशी समरस होऊन राष्ट्रीय स्वातंत्र्याचे यथोचित भान ठेवले व एका संघटनकुशल नेतृत्वाची कामगिरी समर्थपणे वजाविली याची साक्ष इतिहास सातत्याने देत राहील.

संतांनी समाजात दैववादी प्रवृत्ती भिनवून व देवभक्तीचा भोळसट मार्ग दाखवून लोकांना निष्क्रीय व नेभळट बनविले, इतकेच नव्हे तर, ते निव्वळ निवृत्तीवादी व देशबुडवे होते असा गैरसमज काही विद्वानांनी समाजात पसरविण्याचा प्रयत्न केला असला, तरी आजवरच्या संतपरंपरेने आपल्या प्रखर पुरुषार्थाने समाजातील तो गैरसमज पूर्णतः पुसून टाकला आहे. समर्थ व राष्ट्रसंत हेही त्याला अपवाद नाहीत.

समर्थ रामदास हे सतराव्या शतकातील शीवकालीन संत आणि राष्ट्रसंत तुकडोजी हे विसाव्या शतकातील आंग्लकालीन संत. हे दोन्हीही संत महाराष्ट्रात अवतरले असले तरी त्यांच्या काळात जवळ जवळ तीनशे वर्षांचे अंतर आहे. अर्थातच काळाच्या एवढ्या अफाट अंतरामुळे दोघांच्याही काळातील सर्वच प्रकारच्या परिस्थितीत महद्‌तर आढळून येते. तथापि, दोघांनीही आपापल्यापरीने कालोचित कार्य करून समाज-जीवनाला नीट वळण लावण्याचा आणि त्याच बरोबर देशाला परकीय राजवटीच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी लोकांना प्रवृत्त करण्याचा केलेला प्रयत्न वैशिष्ठ्यपूर्ण म्हणावा लागेल.

केवळ भौतिक समृद्धीने समाज सुखी व समाधानी होऊ शकत नाही याची जाणीव ठेऊन या संतद्वयाने समाजाला अध्यात्माच्या चिंतनाचे महत्वही पटवून दिले. समर्थ तर स्पष्टच सांगतात–

"पहिले ते हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्वांविषयी ।।"

किंवा

"सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।"

समर्थ व राष्ट्रसंत हे आपापल्या काळातील युगपुरुष होते असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरू नये. अशा युगपुरुषाच्या नेत्रदीपक कर्तृत्वाने एक ठराविक कालखंड उजाळलेला असतो. स्वाभाविकच त्या कालखंडाचे संदर्भ त्या त्या युगपुरुषांच्या कर्तृत्वाला चिपकलेले असतात. समर्थांच्या व राष्ट्रसंतांच्या कर्तृत्वालाही त्यांच्या कालखंडाचे संदर्भ संलग्न झालेले आहेत. समर्थांच्या काळाचे सिंहावलोकन केले तर हे ठळकपणे जाणवते की, तो यवनी सत्तेचा काळ असून समाजजीवनात आत्यंतिक धर्मग्लानी निर्माण झाली होती. रूढी-परंपरांच्या प्रवाहात समाजजीवन पार बुडून गेले होते. समाज जीवनात पौरुष जागविण्याची धमक धर्मसंस्थेत, उरली नव्हती. कर्मठपणाचे अवास्तव स्तोम व स्वातंत्र्यविषयीची उदासिनता उत्कटत्वाने जाणवत होती. समाजजीवन विस्कळीत होऊन एक सशक्त संघटना उभारण्याच्या मार्गात अनेक अडथळे उत्पन्न होत होते. समाधान एवढेच होते की, शिवरायाच्या स्वराज्य–संस्थापनेच्या कार्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवल्या गेली होती व त्या कार्याच्या यशस्वितेसाठी जीवाची बाजी लावणारे बाजी प्रभु देशपांडे, तानाजी मालुसरे, शेलारमामा इ. सारखे काही वीरगडी सावलीसारखे शिवाजी महाराजांसोबत होते.

समर्थांच्या तुलनेत राष्ट्रसंतांचा काळ बराच भिन्न होता. देशाचे पारतंत्र्य आणि स्वातंत्र्य हे दोन्ही त्यांनी जवळून पाहिले. पारतंत्र्याच्या काळात आपल्या देशात लो. टिळक आणि म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संपादनाच्या चळवळीला बराच जोर चढत चालला होता. या

स्वातंत्र्य चळवळीकडे दुर्लक्ष व्हावे या हेतूने हिंदू–मुसलमानांमध्ये दंगे पेटविण्याचा प्रयत्न ब्रिटीश शासन करीत होते. ब्रिटीशांचा हा कावा ओळखून तुकडोजी महाराजांनी हिंदू–मुसलमानांमधील वैमनस्य दूर करण्याचा प्रयत्न केला व त्यांना संघटित करून पारतंत्र्याविरुद्ध लढा देण्याचे प्रोत्साहन दिले.

अशा प्रकारे समर्थांनी व राष्ट्रसंतांनी स्वातंत्र्य संपादनाच्या संदर्भात मोलाची कामगिरी बजावली आहे. हे दोघेही संत पोथीपुराण सांगणारे किंवा किर्तन–प्रवचन करणारे पुराणिक नव्हते. देशाची त्यांनी देवासारखी पूजा केली व वनवासाऐवजी जनवास पत्करून गढूळ समाजजीवनाचे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न केला.

समर्थ पूर्वकालीन महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती अतिशय अशांत व अस्थिर होती. अशा अस्थिर परिस्थितीचा परिणाम सामाजिक आणि धार्मिक वातावरणावर झाला. मुसलमानी सत्तेचा अमल महाराष्ट्रात होताच महाराष्ट्राचा आर्थिक व धार्मिक ऱ्हास सुरू झाला. परचक्रामुळे आणि आत्यंतिक दारिद्र्यामुळे संपूर्ण समाज पोखरून निघाला. त्याला दुर्बलता प्राप्त झाली. प्रतिकाराची क्षमता लोकांत उरली नव्हती. सर्वत्र अधर्माचे प्रस्थ माजले होते. ब्राम्हण आणि क्षत्रिय यांच्यात कसलीच अस्मिता उरली नव्हती. ते तेजोहीन बनले होते. परकीय सत्तेकडून हिंदूंची मंदिरे उद्धवस्त करण्यात येत होती. हिंदूंना बळजबरीने बाटवून व त्यांच्या स्त्रियांची अब्रू लुटण्याचे प्रकार सर्रास सुरू होते. बोके संन्यासी बोकाळले होते व दांभिक संत चमत्कार दाखवून लोकांना फसवित होते. समाजजीवनात देवदेवतांचे स्तोम बरेच माजले होते. कर्मकांडाच्या नावाखाली महाराष्ट्रातील खरा धर्म लोपला होता व सर्वत्र सर्रास फसवणूक सुरू होती. राष्ट्रसंताचा काळ यापेक्षा बराच भिन्न होता. पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चळवळी सुरू होत्या. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मात्र पक्षबाजी फोफावू लागली. सत्तासंपादनस्पर्धेत अनेक-पक्षोपपक्ष पुढे आले. त्यामुळे देशाचे हित दृष्टिआड झाले. या संतद्वयाने आपापल्या काळात अशाही अवस्थेत देशाला जगविण्याचो, जागविण्याची व

जोगासण्याची प्रेरणा दिली. देश जगला तर धर्म जगतो व धर्म जगला तरच देवता जगत असतात या भूमिकेतून त्यांनी देशाची देवासारखी सेवा केली. दोघाही संतांचे एकात्म व शक्तिशाली समाजनिर्मितीचे ध्येयस्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.

आज हे दोन्ही संत अनंतात विलीन झाले असले तरी, त्यांच्या सशक्त समाज उभारणीच्या समर्थ कर्तृत्वाने आणि त्यांच्या मौलिक वाङ्मयातून प्रसृत झालेल्या उद्‌बोधक विचारधनाने त्यांना अमरत्व प्राप्त झाले आहे. आयुष्यभऱ्याच्या त्यांच्या या अविश्रान्त परिश्रमातून आणि निर्भय विचार–प्रतिपादनातून भारताच्या गौरवशाली परंपरेची गाथाच उस्फूर्तपणे अवतरलेली आहे.

आज या महामानवांच्या इहलोकीच्या प्रस्थानानंतर देशाची परिस्थिती सर्वच दृष्टीने बरीच बदललेली आहे. नवा जमाना समाजजीवनाच्या काही समस्या सोडवून तर बऱ्याच नवीन समस्या घेऊन साकारला आहे. भौतिक दृष्टीने पाहता विज्ञानाने नेत्रदीपक प्रगती केली आहे खरी; परंतु समाजजीवनातील सुख, समाधान व शांती संपुष्ठात येत असल्याचो जाणीव मनाला सारखी जाळते आहे. चंद्रबिंबावर पोहचून आपल्या पावलाचो ठसे उमटविणारा, विमानाच्या साहाय्याने आकाशातून पक्ष्यांप्रमाणे उत्तुंग झेप घेणारा, इतकेच काय पण पाणबुडीच्या साहाह्याने समुद्राचे तळ गाठणारा माणूस आज माणसासारखा जमिनीवरून चालू शकत नाही, ही शोकांतिका आहे. माणूस माणसाशी माणसासारखा वागू शकत नाही, माणूसच माणसाचे लचके तोडायला टपलेला आहे, माणुसकीच रक्तबंबाळ झालेली आहे. लोकशाहीच्या नावावर आपल्या देशात लोकमतांचा व लोकप्रतिनिधींचा लिलाव होत आहे. राजकारणात कोणाचा नैतिक दरारा उरला नाही. समाजजीवनात सर्वत्र स्वार्थ, स्पर्धा, सत्ता, द्वेष, खोटेपणा, काळाबाजार, भ्रष्टाचार यांना ऊत आला आहे. राजकारण, राष्ट्रनिष्ठा, समाजसेवा, यांच्या नावाखाली कुटिलनीतीचा धुडगूस सतत सुरु आहे. ज्ञानदानाच्या पवित्र नावाखाली शिक्षणसंस्थांतही गल्लाभरू

प्रवृत्ती बळावली आहे. या वातावरणाचा परिणाम युवापिढीवर होऊन त्यातूनच गुंडागर्दीचे वातावरण वाढीस लागले आहे.

या वातावरणामुळेच युवापिढीची अनुचित आंदोलने विकृत वळण घेत आहेत. राष्ट्राचा आधारस्तंभ समजण्यात येणारी ही युवापिढी दिवसेंदिवस श्रद्धाहीन, निष्ठाहीन, ध्येयशून्य व स्वच्छंदी बनत चालली आहे. समाजातील धुरीणांचा आदर्श दृष्टीपुढे ठेऊन त्यांचा मार्ग अनुसरावा असे आदर्श धुरीण दिवसेंदिवस दृष्टीआड होत आहेत. त्यामुळे युवापिढी दिशाहीन बनली आहे. सांप्रत स्थितीतील सत्तेचे, संपत्तीचे व ब्राऊन शूगर किंवा दारू सारख्या व्यसनांचे मोहक जाळे त्यांना आपल्याकडे ओढत आहेत. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या प्रलोभनात गुंतला असून स्वार्थाशिवाय त्याला दुसरे काहीच सुचेनासे झाले आहे; अशा अवस्थेचे वर्णन करताना राष्ट्रसंत म्हणतात–

" व्यक्तिस्वार्थ बोकाळला । जो तो मनाचा राजा झाला ।
वेगवेगळ्या प्रलोभनी गुंतला । समाज सारा । "

अशी अवस्था दूर करून समर्थ समाजजीवन प्रस्थापित करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून समर्थांसारख्या व राष्ट्रसंतांसारख्या प्रज्ञावंत साधकांच्या स्फूर्तिप्रद साहित्यातून स्फुरलेल्या विचारांच्या चिंतनाची आज नितांत गरज आहे; नव्हे, ती एक सांप्रत काळाची निकड आहे.

समर्थ रामदास आणि राष्ट्रसंत तुकडोजी हे दोन्ही महापुरुष राष्ट्राचे चैतन्यमय जीवनच होते. त्यांनी आपल्या उक्तीतून व कृतीतून समाजामध्ये चैतन्य निर्माण केले. आपल्या उत्साहवर्धक, उत्तेजनपर, उत्कर्षकारक अशा दिव्य प्रेरणेने लोकशक्तीला उद्दीपित करून तिच्या उदात्त आकांक्षांना आवाहन व आव्हान केले. दृढ श्रद्धेचे, अविश्रान्त भगीरथ प्रयत्न करणारे साधक, आणि प्रामाणिक व जिद्दीचे कार्यकर्ते सर्व क्षेत्रात असण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. अशा कर्तृत्वाच्या व नेतृत्वाच्या अभावी आज लोकजीवन रसातळाला जात आहे हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. सांप्रत जीवनाची ही शोकांतिका संपुष्ठात

येईल तो आपण सुदिन समजू या. अन्यायाला, अत्याचाराला, अनाचाराला प्रतिकार करण्याचे सामाजिक सामर्थ्य नैतिक अधिष्ठानावर उभे व प्रभावी झाल्याशिवाय ऐहिक व पारमार्थिक लोकोद्धार प्रायः अशक्य असल्याची जाण त्या दोन्ही महापुरुषांना होती. म्हणूनच त्यांनी धर्मप्राण नीतीची चाड असणारी, श्रद्धेची बूज राखणारी, लोकशक्ती जागृत करून, समाज जीवनांत सबळ संघटना स्थापनेचे महद्कार्य केले. त्यांच्या मौलिक वाङमयीन निर्मिती इतकेच तेही मोलाचेच आहे.

या दोन्ही संत-पुरुषांचा ध्येयवाद व त्यांचे जीवनदर्शन समाजापर्यंत पोहचविण्याचे महान पुण्यकार्य प्रामुख्याने समर्थांच्या 'दासबोधा' ने आणि राष्ट्रसंतांच्या 'ग्रामगीते'ने स्वीकारले आहे. राजसत्ता कायद्याने जे करू शकत नाही, द्रव्यराशी खर्चून जे घडू शकत नाही, ते सद्धर्म प्रसाराचे कार्य असे समर्थ–संत स्वतःच्या उज्वल चारित्र्याने आणि तेजोमय त्यागाने, आपोआप घडवून आणू शकतात. अशा समर्पित जीवनाच्या कर्मयोग्यांचा सहवास सूर्यासारखा सतत संजीवनप्रद, प्रकाशमय, उत्साह-वर्धक व उत्कर्षकारक असतो देशातील अनाचार दुराचार, मिथ्याचार, अत्याचार यांचे वातावरण त्यावर टीका करून नष्ट होऊ शकत नाही. सदाचारसंपन्न लोकांची संख्या वृद्धिगत होत गेली, की सामाजिक अधःपतनाचा अंधार घालविण्यासाठी वेगळ्या प्रयत्नाचे प्रयोजन उरणार नाही. म्हणूनच अशा सदाचार–संपन्न प्रवृत्तीचा परिपोष करणाऱ्या संत–साहित्यातील सुवर्ण-कण समाजापुढे येणे अत्यावश्यक आहे. या जाणीवेतूनच समर्थ रामदासांच्या व राष्ट्रसंत तुकडोजींच्या चिंतनातून व विचारमंथनातून उस्फूर्तपणे उतरलेले सुवर्णस्वरुप शब्दांकण वेचून प्रस्तुत ग्रंथाद्वारे अतिशय जिव्हाळ्याने जिज्ञासू वाचकवृंदांच्या स्वाधीन करीत आहे. आपल्या अलौकिक कर्तृत्वाने 'समर्थ' व 'राष्ट्रसंत' हे नामाभिधान सार्थ करणाऱ्या या दोन्ही लोकोत्तर महान विभूतींना या निमित्ताने कोटिकोटि प्रणाम !

★ ★ ★

संतद्वयाचे जीवन-दर्शन

श्री समर्थ रामदास :

समर्थांचे समग्र जीवन-दर्शन तर प्रस्तुत प्रकरणात शक्य नाही परंतु त्यांच्या चरित्रातील काही महत्त्वाच्या घटनांद्वारे ते त्रोटक स्वरूपात घडविण्याचा हा प्रयत्न आहे. मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यात असलेल्या जांब नावाच्या लहानशा खेड्यात त्यांचा जन्म शके १५३० चैत्रशुद्ध नवमीस म्हणजेच इ. स. १६०८ साली झाला. महाराष्ट्रातील संत तुकारामांचाही जन्म इ. स. १६०८ चाच हे विशेष. योगायोग असा की, समर्थांच्या जन्माचा दिवस आणि वेळ रामजन्माची होती. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत, आईचे नाव राणूबाई आणि ठोसर हे त्यांचे आडनाव होते. समर्थांचे पाळण्यातील नाव होते नारायण. हे आई-वडिलांच्या पोटी जन्माला आलेले दुसरे अपत्य. पहिल्याचे नाव गंगाधर. सूर्याजीपंतांच्या घराण्यात सूर्योपासना आणि प्रभू रामचंद्रांची आराधना अखंड सुरू होती. स्वतः सूर्याजीपंत हे अतिशय कर्मनिष्ठ, धर्मनिष्ठ आणि सात्विक प्रवृत्तीचे पुरुष होते. आई राणूबाई देखील सच्छील, सदाचार-संपन्न व भगवद्भक्त बाई होती अशा सत्प्रवृत्त दांपत्याच्या पोटी नारायणाचा जन्म म्हणजे **' शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी '** असेच म्हणता येईल. सुदृढ शरीर, तीव्र बुद्धिमत्ता, दृढ संकल्प-सामर्थ्य, प्रखर वैराग्य आणि उत्कट भगवद्भक्ती लहानपणापासूनच नारायणाला लाभले होते. त्याचा स्वभाव सुरवातीपासूनच अतिशय हूड होता. डोहात डुबणे हा तर त्याचा आवडता छंद. मनावेगळे काही घडले की, नारायणाचा राग अनावर होई आणि मग घरातील सामानांची आदळ-आपट, रुसणे-फुगणे इत्यादी प्रकार चालत. अशाच काही कारणावरून एकदा आई-राणुबाई त्याच्यावर रागावली. त्याचा परिणाम असा झाला की, नारायण रुसून एका आडगळीत जाऊन बसला. बराच वेळ शोधाशोध झाल्यावर तो आईला तेथे दिसला; तेव्हा तिने विचारले-' हे रे काय बापा ! काय करतोसी येकांत स्थळी ? ' त्यावर नारायणाने तात्काळ उत्तर दिले-

'आई ! चिंता करितो विश्वाची.'

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात, त्याचा प्रत्यय येथे सहजच येतो.

इ. स. १६१५ मध्ये म्हणजे नारायण अवघा सात-आठ वर्षाचा असताना वडिल-सूर्याजीपंत-यांनी इहलोकाची यात्रा संपविली. घराण्यात पिढीजात चालत आलेल्या श्रीराम-आराधनेचे संस्कार नारायणाच्या मनावर लहानपणापासूनच बिंबले. त्याचा परिणाम असा झाला की, त्याने अगदी मनोमन व भक्तीभावाने श्रीरामचंद्र प्रभूची आराधना करण्याचा मार्ग आरंभिला. हळू हळू तो भक्तीमार्गाकडे ओढल्या गेला आणि प्रापंचिक जीवनाविषयी त्याच्या मनात उदासिनता निर्माण झाली. त्याकाळी लग्न लहानपणीच लावण्याची प्रथा होती. त्यानुसार नारायणाच्या लग्नाचा विचार निघाला की त्याला ते आवडत नसे.

परंतु काहीही झाले तरी आईचे हृदय होते ते. आपल्या मुलाने लग्न करून चार-चौघांसारखा संसार करावा असे इतर माता-पित्यांप्रमाणे तिला वाटणे स्वाभाविकच होते. म्हणूनच तिने त्याला लग्नाची गळ घातली आणि " अंतरपाट धरीपर्यंत तरी नकार देऊ नकोस ' असे बजावून सांगितले. नारायण लहानपणापासूनच मोठा चतुर व बुद्धिमान होता. आईच्या शब्दाचा मान राखण्यासाठी तो लग्नाच्या बोहल्यावर चढला आणि अंतरपाट पुढे येईपर्यंत स्वस्थ उभा राहिला. परंतु अंतरपाट पुढे धरून मंगलाष्टकांना सुरूवात होणार इतक्यात सावधान 'शब्दाने सावध' होऊन तो त्या बोहल्यावरून पळून गेला आणि नाशिकच्या पंचवटीस असलेल्या श्रीराम मंदिरात जाऊन बसला. त्यावेळी त्याचे वय होते अवघे बारा वर्षाचे.

एकांतवासाची त्याला लहानपणापासून ओढ असल्याने नाशिकसारखे गर्दीचे शहर सोडून तो जवळच्याच टाकळीला गेला आणि तेथे त्याने आपला मुक्काम ठोकला. तेथे तो जवळजवळ बारा वर्षे राहिला. त्या बारा वर्षाच्या काळात म्हणजे संपूर्ण एक तप त्याने तेथे घोर तपश्चर्या

केली. रोज दोन प्रहरपर्यंत गोदावरीमध्ये कंबरेइतक्या पाण्यात उभे राहून व मर्यादित स्वरुपात माधुकरी मागून तो आपला उदरनिर्वाह करीत असे. सायंकाळचा त्याचा वेळ तो विद्वानांच्या संगतीत व लेखन–वाचन आणि चिंतनात घालवी.

धैर्यालाही धाडसाचे धडे शिकवावे इतका तो लहानपणापासूनच धीट होता. 'भीती' हा शब्द त्याच्या जीवनकोशात नव्हता. असा हा निर्भय वृत्तीचा नारायण रानावनातून परिभ्रमण करू लागला. त्या परिसरात एका तपाचा काळ व्यतीत केल्यानंतर तो श्रीरामचंद्रप्रभूंच्या दृष्टांतानुसार तीर्थाटनास निघाला. त्याचे तीर्थाटन अंधश्रद्धेवर आधारित नव्हते. अतिशय डोळस बुद्धीने त्याने त्या काळात तीर्थाटन केले.

'तिर्था जाऊनिया त्वां काय केले ?
चर्म प्रक्षाळिले वरी वरी !'

अशी नारायणाची धारणा पूर्वीपासूनच नव्हती. त्यामुळे तीर्थाटनाचा त्याचा उद्देशच मुळी वेगळा होता. परमेश्वराने निर्माण केलेले सृष्टी सौंदर्य जवळून पाहावे, समाजजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करावे आणि अनुभवजन्य ज्ञान ग्रहण करावे. हाच त्यामागे नारायणाचा एकमेव हेतू होता. त्यानुसार त्याने या वारा वर्षांत भरत खंडातील आसेतुहिमाचल सर्व तीर्थस्थाने पाहिली आणि लोकस्थितीचे सूक्ष्म अवलोकन केले. ग्रंथपठणाची त्याला जात्याच आवड होती. त्यातच अनुभवजन्य ज्ञानाची भर पडली. आपल्या परिभ्रमणातून समाजजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करीत असताना नारायणला समाजातील अनेक अनिष्ट गोष्टी जवळून पाहावयास मिळाल्या. लोकांमधील अंधश्रद्धा, धर्मांधता, कर्तव्य–शून्यता, औदासिन्य, अन्याय, अनीती, अनाचार, अत्याचार, अपमान, असहाय्यता, अज्ञानदशा, स्त्रीत्वाची विटंबना, लाचारी, परकीय सत्तेकडून होणारा अमानुष छळ हे त्यांनी जवळून पाहिले आणि त्याचे मन प्रक्षुब्ध झाले. असल्या अनिष्ट प्रकारांमुळे त्याच्या मनात उपरती निर्माण झाली आणि त्याने **'बुडता हे जन न देखवे डोळा'** या तत्वाप्रमाणे अशा अवनत समाजाचा उद्धार करण्याचा संकल्प केला. म्हणतात ना !

' सत्य संकपाचा दाता भगवान ।
करी सर्व पूर्ण मनोरथ ॥'

अर्थात संकल्प सिद्धीस जाण्यासाठी कठोर साधनेची आवश्यकता असते. तो त्याच्याठायी होतीच. त्या साधनेच्या वळावरच तो पुढे सरकला. सारखी पायपीट करून लक्षावधी लोकांशी त्याने संपर्क साधला. त्यांचे विचार जाणून घेतले; त्यांच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण केले आणि त्यांना कालोचित उपदेश करून लोकशिक्षणाचे व जनजागृतीचे अतिशय महत्वपूर्ण कार्य नारायणाने त्या काळात केले.

पुढे याच नारायणाने हिमालयापर्यंत प्रस्थान केले–व नंतर आपल्या ' जांब ' गावास जाऊन आईची भेट घेतली. परंतु बोहल्यावरून पळून गेलेल्या बारा वर्षाच्या वाळ नारायणाची मूर्ती आता तिच्या डोळ्यापुढे नव्हतो. तो होता एक दाढी–जटाधारी सुदृढ तरूण. एक गोसावी. आईच्या भेटीनंतर नारायण इ. स. १६४४ साली कृष्णेच्या तीरावर चाफळखोऱ्यात आला. आणि तेथेच त्याने आपल्या भावी काळातील कर्तृत्वाची मुहूर्तमेढ रोवली.

' धर्म रक्षावयासाठी करणे आटी आम्हासी '

असाच जणु नारायणाचा बाणा होता. धर्मसंस्थापन कार्याला त्याने त्या पावन भूमीपासूनच प्रारंभ केला. लोकांचे लक्षही त्याच्या कार्याकडे येथूनच वेधले.

बालपणापासूनच बलोपासना त्याच्या मनात मूळ धरून होती. मारूती हे त्याचे बलोपासनेचे आराध्य दैवत शिवाय रामभक्त हनुमान आणि नारायणही रामभक्तच. म्हणून त्याने मसूर येथे मारूतीची स्थापना करून रामनवमीच्या उत्सवास सुरूवात केली. तशातच एक योगायोग घडून आला. तो असा की, अंगापूरच्या डोहातून रामाची मूर्ती मिळाली होती. तिची स्थापना इ. स. १६४७ ते ४८ च्या सुमारास चाफळ या गावी केली. तेव्हापासून ' चाफळ ' हेच नारायणाचे प्रमुख केंद्र बनले. इ. स. १६४५ ते १६५० या पाच वर्षात समर्थांनी स्वत:

११ मारूतींची स्थापना केली. हनुमान स्वामींच्या बखरीतील ७ व्या भागामध्ये या अकरा मारूतींच्या स्थळाविषयीची माहिती आलेली आहे ती अशी–

१) शहापूर २) मसूर उर्फ ब्रम्हपुरी ३) उंब्रज ४) शिरोळ ५) पाडळी ६) पारगाव ७) मानगाव ८) सिंधणवाडी गुहा ९) वाहे आणि १० व ११) चाफळला–२ असे एकूण अकरा.

प्रचंड शक्तीशाली रामभक्त हनुमानाचा एकनिष्ठ उपासक असलेल्या नारायणाने आता लोकांच्या सहकार्याने चाफळचे राममंदिरही उभे केले होते. येथूनच पुढे त्याच्या मठस्थापनेलाही सुरूवात झाली होती. मंदिर–मठांची स्थापना केली की, नारायण त्याची व्यवस्था तेथील प्रमुख मंडळीकडे सोपवीत असे व स्वत: तेथून पुढील कार्यासाठी निघून जाई. नारायण म्हणजे मोठी नियमनिष्ठ व्यक्ती; एक शिस्तबद्ध व्यक्तिमत्व. मंदिर असो वा मठ ! त्यातील कारभार हा शिस्तीने चालला पाहिजे यावर त्याचा कटाक्ष असे. त्यानुसार त्याने झाडण्यापासून, तर पालखी उचलण्यापर्यंतच्या कामाची लोकांमध्ये वाटणी करून दिली होती.

असा हा अचाट कर्तृत्ववान, कुशल लोकसंग्रहक, प्रबल वैराग्यशील आणि बाल ब्रम्हचारी पुरुष आता रामाचा भक्त म्हणून ' रामदास ' या नावाने लोकांमध्ये ओळखल्या जावू लागला.

त्यावेळी यवनी सत्तेचा अमल महाराष्ट्रात सुरू होता. स्वराज्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवण्याचा संकल्प करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कानावर रामदासांच्या (नारायणाच्या) कर्तृत्वाची कीर्ती गेली. रत्नपारख्याने रत्नाची पारख केली. महाराष्ट्रातील दोन नररत्ने परस्परांजवळ आले. त्यांच्या गाठी–भेटी झाल्या. शिवाजी महाराजांच्या इच्छेवरूनच रामदासाने सज्जनगडला आपला मुक्काम हलविला. शिवाजी महाराजांच्या मनात रामदासाविषयी अतिशय आदर होता. ते त्यांना समर्थ पुरुष या नात्याने आपले स्फूर्तिस्थान मानीत. आणि रामदासही शिवाजी महाराजांना आपल्या मनीचे स्वप्न साकार

करणारे एक प्रचंड शक्तिशाली व कर्तृत्ववान व्यक्तिमत्व मानीत. असे हे महाराष्ट्राचे दोन भाग्यविधाने परस्परांच्या प्रेमाने व विश्वासाने परस्परांशी बांधल्या गेले होते. महाराष्ट्रात स्वराज्य स्थापन करून तेथील अनाचाराला व अत्याचाराला आळा बसावा या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू होते.

छत्रपती शिवाजी महाराजांवर समर्थांचे निरतिशय प्रेम होते. त्यांच्या कर्तृत्वावर प्रचंड विश्वास होता. इ. स. १६८० साली शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले त्यावेळी समर्थांना अतिशय दुःख झाले. लागलीच दुसऱ्या वर्षी म्हणजे इ. स. १६८१ मध्ये ते रामनवमी उत्सवानिमित्ताने चाफळास गेले. उत्सव संपल्यावर नवमीच्या रात्री सर्व लोक निघून गेल्यावर ते राममूर्तीपुढे आसनस्थ झाले आणि देहाचा कंटाळा आल्यागत देवापुढे निवेदन करू लागले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र शंभू राजे यांना त्यांनी पत्र पाठवून महत्त्वपूर्ण उपदेश केला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांनी अन्न–पाणी वर्ज्य केले होते. बोलणे सोडले होते. जनसंपर्क ते टाळत होते. एकांतात बसून राहात. त्यामुळे त्यांची प्रकृती ढासळू लागली. तशातच त्यांचे शके १६०३ म्हणजे इ. स. १६८१ मध्ये श्री सज्जन गडावर निधन झाले.

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर अवघ्या एकाच वर्षात एक अमोघ वक्तृत्वाचा अफाट शब्द-शक्तीचा, प्रयत्नांनाच परमेश्वर मानणारा, निर्भय वृत्तीचा, वैराग्यशील, एक कुशल संघटक व स्वराज्याची प्रेरणा देणारा रामभक्त त्यागी पुरुष अनंतात विलीन झाला.

समर्थांनी ' समर्थ ' उपाधीचे लक्षण सांगताना म्हटले आहे की–

" बहुत जनांस चालवी । नाना मंडळे हालवी
ऐसी हे समर्थ पदवी । विवेके होते "

रामदासांच्या कर्तृत्वाच्या संदर्भात विचार करता त्यांनाच ' समर्थ ' ही उपाधी उचित ठरते. असे हे समर्थ आपले अवतारकार्य संपविताना लिहून ठेवतात–

" माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी ।
परी मी आहे जगज्जीवनी । निरंतर ॥
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।
असता न करावा हो खेद । भक्त जनी ॥"

अशाप्रकारे समर्थ आपल्यातून देहरूपाने गेले असले तरी **'मरावे परि किर्ती रूपे उरावे'** या न्यायाने आपल्या कर्तृत्वाने ते अमर झाले आहेत.

★ ★ ★

राष्ट्रसंत तुकडोजी

संक्षिप्त जीवन-दर्शन

सांप्रत विसाव्या शतकाच्या वैज्ञानिक युगात भक्तीमार्गाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे व समाजजागृतीचे महान कार्य करणाऱ्या तुकडोजींचा जन्म विदर्भातील अमरावती जिल्ह्यात असलेल्या 'यावली' या लहानशा खेड्यात झाला. गारा, वारा, पर्जन्यधारा यांचा सारखा मारा सुरू असताना एका चंद्रमौळीत दि. ३० एप्रील १९०९ रोजी हा महामानव अवतरला. त्याचे जन्म नाव 'माणिक' ठेवण्यात आले. हा माणिक नावाप्रमाणेच पुढे आपल्या कर्तृत्वाने माणिकासारखा मूल्यवान ठरला. त्यांचे पूर्ण नाव माणिक बंडोजी ठाकूर असे होते. वडील बंडोजी व माता मंजुळा या दांपत्याच्या पोटी माणिकचा जन्म म्हणजे कोळशाच्या खाणीत कोहिनूर. कोळशाची खाण याचा अर्थ अत्यंत हलाखीची स्थिती. कारण घरात अठराविश्वे दारिद्र्य पुढे बाळ माणिक मोठा झाल्यावर त्याला तुकडोजी महाराज म्हणून लोक ओळखू लागले. हे तुकडोजी महाराज स्वतःसंबंधी सांगताना म्हणतात–

" लहान ऐशा गावामाजी । मागासलेल्या जनसमाजी ।
उपासाचीच लाभे रोजी । ऐशा ठायी जन्मलो ।"
" घरी दारिद्र्याचे वरदान । परि भावभक्तीची नसे वाण ।
ऐकत सुसंस्काराचे गान । सोशित कष्ट वाढलो ।"

याचा अर्थच असा की, अत्यंत मागासलेली समजल्या जाणाऱ्या बहुजन समाजात, आणि उपासमार होत असलेल्या दरिद्री कुटुंबात त्यांचा जन्म झाला. परंतु आर्थिक दारिद्र्य असले तरी सुसंस्काराची श्रीमंती त्यांना लहानपणापासूनच लाभली होती. हे संस्कारधन त्यांनी लहानपणापासूनच जोपासले व आपल्या भावी आयुष्यात समाजासाठी त्याचा योग्य विनियोग केला.

वडिल बंडोजी जेवढे प्रखर तेवढीच मंजुळा माता प्रेमळ व सौम्य स्वभावाची बाई होती. बरेच दिवस मंजुळा मातेच्या पोटी अपत्य जन्माला आले नाही. परंतु तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे–

"तुका म्हणे तेथे न चाले तातडी । योग्य काळ घडी आल्याविणा"

योग्य काळघडी यावयाची होती. योग्य काळघडी प्राप्त होताच माणिकचे इहलोकी आगमन झाले. मंजुळा मातेच्या पोटी माणिकचा जन्म म्हणजे "नखाच्या चुंबळ्या बोटावरी" असणाऱ्या वरखेडच्या विदेही आडकोजी महाराजांचा कृपाप्रसादच होय असा समज आहे. माणिकला लहानपणापासूनच भजनाची आवड होती. तसा त्याचा आवाजही गोड होता. विशेषतः तो तुकाराम महाराजांची भजने गात असे. यावली जवळच वरखेडला माणिकचे मामा होते. त्या मामाकडे शिक्षणासाठी असताना विदेही आडकोजी महाराजांची गाठ पडली. आडकोजी माणिकला 'तुकड्या' या नावाने संबोधत. जेव्हा त्याच्या तोंडून 'तुका म्हणे' असे शब्द अभंगाच्या शेवटी ऐकले तेव्हा ते त्याला म्हणाले–तू का म्हणे रे ? तुकड्या का म्हणत नाहीस ? आणि तेव्हापासूनच माणिकला स्वयंस्फूर्त भजने रचण्याची प्रेरणा झाली आणि भजनाच्या शेवटी तो 'तुकड्यादास' हे नाव आळवू लागला. आपल्या 'तुकड्या' या नावासंबंधी महाराज स्वतःच सांगतात की–

"माझे जन्मनाव माणिक सांगती । परि माझी मती तैसी नाही ।
तुकड्या नावाने लोकी मी खेळलो । उजेडीया आलो तुकडे खाता ॥"

गावात भजने म्हणायची व भाकरीचा तुकडा मिळवून पोटात टाकायचा. यामुळेच आपले नाव 'तुकड्या' पडल्याची ग्वाही ते देतात.

वडील शिवणकाम व आई दळण–कांडण करून कसाबसा आपला उदरनिर्वाह करीत. आर्थिक स्थिती इतकी वाईट होती की अनेकदा त्यांच्यावर उपासमारीचाही प्रसंग येई. घर म्हणजे तर विचारूच नका. झोपण्यासाठी हाडे जमिनीला टेकवायची म्हणून त्या जागेला घर म्हणायचे. महाराज त्या घराचे वर्णन स्वत:च करतात–

"महालचंद्रमौळी, सर्प विंचू वरी । विसावली घारी झाडी तेथे ।
सूर्याचे दर्शन होये घरातून । रात्री तारांगण स्पष्ट दिसे ।
पडल्यास श्रिती थंड हवेसाठी । कमचियांची ताटी घरी लागे ।
पाणी येता स्नान होय घरामाजी । उन्ह येता राजी अंग होई ।
तरटाचे आसन मडके राजन । ताटे दोन-तीन-फुटके सारी ।
वारूळाचा वास घरापाठीमागे । खंडारे खुशरंगे कंचणाचे ।
तुकड्यादास म्हणे ऐसा मी गरीब । घरातील खांब मुजरे देती ।"

यापेक्षा आणखी काय दारिद्र्य असू शकेल ? लहानपणापासून दारिद्र्याची दोस्ती असलेल्या माणिकचा स्वभाव मात्र नारायणासारखाच (समर्थ रामदास) अत्यंत हूड होता. शाळेत त्याचे लक्ष लागत नसे. तो मुलांच्या खोड्या करी. झाडावर चढणे, पोहायला जाणे, ध्यान लावून बसणे या गोष्टी त्याच्या विशेष आवडीच्या. पोहण्याचा व तासनतास पाण्यात डुबून राहण्याचा नारायणाप्रमाणेच त्यालाही नाद होता. शाळेतील चार भींतीच्या आत शिकविल्या जाणाऱ्या पुस्तकी ज्ञानापेक्षा त्याचे मन भजन, किर्तन, आख्यानं यात जास्तच रमू लागले. विशेषत: त्याला पौराणिक गोष्टी फार आवडत. ते स्वत:च सांगतात––

"ऐकिले श्रवणी थोडे किर्तन । त्यावेळी होते आर्तपण ।
ध्रुव, प्रल्हादाचे आख्यान । मना वाटे ऐकावे ।"

मंजुळामाताही आपल्या मंजुळ आवाजाने बाळ माणिकला भजने ऐकवीत असे. योगायोगाने माणिकला श्री. सातळी कोतळीकर महाराजांचा सत्संमागम घडला आणि त्यांच्या प्रेरणेने तो भजनाकडे जास्तच वळला. समर्थांवर जशी रामरायाची कृपा झाली तसेच माणिकवर आडकोजी

महाराजांनी कृपा केली आणि त्यांना प्रतिभा प्रसन्न झाली याची साक्ष ते स्वतःच देतात. पहा--

"गुरुदेव सद्गुरु आडकोजीने कृपासिंचन किया ।
तुमभी भजन लिखते रहो आशिष यह मुझको दिया ।
तबसे भजन-लेखन बढा, इस हाथसे सम्हले नही ।
गंगा प्रवाहित वाक्यरचना, सहजही होती गयी ॥"

अशाप्रकारे 'शब्द पाहू अवतरे कृपा आधी' या गुरुकृपा-प्रसादप्राप्तीने गंगेच्या धबधब्यासारखी निर्मळ वाणी भजन-भाषणांच्या माध्यमातून माणिकच्या मुखातून बाहेर पडू लागली. नारायणासारखाच रानावनात हिंडण्याचा, वृक्षाखाली बसून ध्यान लावण्याचा किंवा मंदिरामध्ये जाऊन मूर्तिपूजा करण्याचा माणिकला ध्यास लागला. नंतर ते चंद्रपूर जिल्ह्यातील नेरी या गावी गेले. नेरीच्या परिसरात त्याकाळी घनदाट अरण्य होते. वाघ-सिंहासारखे हिंस्र पशु तेथे असत. त्या हिंस्रपशुच्या सान्निध्यात ते निर्भीड मनाने वावरत असत. जवळच चिमूरचे जंगल होते. तेथेही ते काही काळ राहिले. आता तो परिसर गोंदूडा या नावाने ओळखण्यात येतो. या गोंदूडच्याच्या घनदाट अरण्यात काही काळ घालविल्यावर लोकांना माणिकबद्दल कुतूहल वाटू लागले. अनेकांचा तर तो 'देवबाबा'च बनला.

चौदा वर्षाचा असताना माणिकने शिलाईमशीनचे काम करुन आई-वडिलांच्या मिळकतीत थोडीफार भर टाकण्याचा व त्यांच्या प्रपंचाला हातभार लावण्याचा प्रयत्न केला. अतिशय प्रामाणिकणे ते तो काम करी.

'दर्जी भया तो क्या हुआ ? क्या वह नही तर जायगा ?
बेशक वही तर जायगा, गर काटको नही खायगा ॥"

असे त्याचे विचार पुढे 'लहरकी वरखा' तून व्यक्त झाले आहेत. शिवणकामाबरोबर काव्यलेखनाचे आणि भजन-कीर्तनाचे काम चालूच होते. याच सुमारास एकदा दत्तजयंतीनिमित्ताने माणिकला रामटेकला

जाण्याचा योग आला. त्यावेळी त्याने समयस्फूर्त भजने गाऊन सर्व भाविकांना आश्चर्यचकित केले.

माणिकच्या वडिलांचा म्हणजेच बंडोजीचा स्वभाव थोडा विचित्र आणि तापट होता. त्याचे चटके आई–मंजुळाप्रमाणे त्याला स्वत:लाही सहन करावे लागे. अवती-भवतीचे काही टवाळखोर लोकही माणिकचा छळ करीत. विनाकारण त्रास देई. काही खोडकर मुलांनी तर माणिकचे काव्यही चोरून नेले होते. काहीवेळा मारपीटही केली. असेही घडले की, चिमूर मुक्कामी असताना एका अंधश्रद्धाळू व्यक्तीने आपल्या आजारी मुलाला वाचविण्यासाठी माणिकला विषाचा प्याला दिला. लहानपणापासूनच माणिकला ध्यानाची सवय होती. अगदी चटकन त्याला ध्यान लागे. त्याची ही ध्यानावस्था टवाळखोरांच्या चर्चेचा विषय होई. माणिकचं ध्यान थोतांड आहे अशी एका सोनार–बुवा नावाच्या साधूनी कंडीही पिकविली होती, माणिक ध्यानस्थ असताना त्याने त्याच्या मांडीवर कापूरवडी ठेऊन ती पेटवून दिली तरीपण माणिक आपल्या भावसमाधीतून जागा झाला नाही. अर्थात परीक्षा घेणाऱ्या टवाळखोरांचीच फजिती झाली. बाळ माणिकच्या जीवनातील ते छळ आणि त्या आपत्ती ह्या इष्टापत्तीच ठरल्या असे म्हणावयास हरकत नाही. पुढे हाच बाळ माणिक तुकडोजी महाराज म्हणून लोकांपुढे आल्यावर स्वत:च सांगतो की–

"बहु दुखावलो विपरीत लोके। परि ते कौतुके कळले आता।
तैसे जरि न होते, ऐसा मी न होतो। व्यवहारी लागतो प्रपंचाचे।
कसोटी लागता सुवर्ण उजळे। बाहेरील मळ दूर जाती।"

चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा नावाचे घनदाट–अरण्य आहे. तेथे माणिक आपल्या चिंतनाभ्यासात गढून गेला असताना लख्ख प्रकाश त्याच्या दृष्टीपुढं पसरत गेला आणि त्यात त्याच्या भावी जीवनाचा चित्रपटच जणू मूर्तिमंत दृष्टीपुढे उभा राहिला. परदास्यात अडकलेल्या मायभूमीला मुक्त करून भक्तीमार्गाच्या माध्यमातून भारताचा भाग्योदय घडवून आणला पाहिजे असा संकल्प त्याच्या हृदयात संचरू लागला.

त्याची अंतर्मुख वृत्ती आता हळूहळू समाजाभिमुख वनू लागली. 'देश हा देवचि पवित्र' हा मंत्र मनी धरून माणिकदेव आता त्या दिशेने पावले टाकू लागला. त्याच्या आध्यात्मिक भजनासोवतच आता अंगात देशभक्ती संचरणारी राष्ट्रीय–भजने तयार होऊ लागली.

इकडे माणिकच्या आई–वडिलांना मुलगा एकाएकी घरातून निघून गेल्यावद्दल चिंता लागली. बंडोजी त्याच्या शोधार्थ फिरत असताना तुकुम गावात माणिक दिसला. आई अतिशय आजारी असल्याचे सांगून बंडोजी माणिकला सोवत नेण्याचा प्रयत्न करू लागले. परंतु मी लवकरच येईन असे सांगून माणिक वडिलांसोवत त्यावेळी तरी गेला नाही. यावरून श्री सुदाम सावरकर आपल्या 'जीवनयोगी' खंड २ (पृष्ठ १८७) मध्ये सांगतात त्या प्रमाणे–

"पुत्रप्रेम काय गोड ? अवघे मायिक थोतांड ॥
पुत्रावरी प्रेम करी आपुल्याचे । परि ते पुत्राचे प्रेम नव्हे ॥
तुकड्यादास म्हणे आपुलियासाठी । पाडितो हा गाठी स्वार्थी नर"

असेच जणु माणिकला म्हणायचे होते. अशाप्रकारची अनासक्त वृत्ती लहानपणापासूनच होती. 'चिंता वाहतो विश्वाची' असे उस्फूर्तपणे उद्‌गार काढणाऱ्या 'नारायणा' ची या प्रसंगी आवर्जून आठवण होते.

माणिकची नारायणाप्रमाणेच मारुतीरायावर अतीव श्रद्धा होती. मारुती म्हणजे शक्तीची देवता असे तो म्हणे. म्हणून मारुतीचे मंदिर-बांधावे, त्याला लागूनच आखाडा असावा यासाठी तो लोकांमध्य प्रेरणा निर्माण करी. असेच एकदा मदनापूरच्या पाटलांनी माणिकला काल्यानिमित्ताने गावी नेले. तेथे मारुतीचे मंदिर नव्हते ते पाहून माणिक पाटलाला म्हणाला–'गावाचं अधिष्ठानच नाही,' आणि त्याने गावकऱ्यांच्या मदतीने मंदिर तयार केले व आखाड्याचे भूमिपूजनही माणिक हस्तेच झाले.

कार्तिक पौर्णिमेला वरखेड या गावी सद्‌गुरू आडकोजी महाराजांची पुण्यतिथी साजरी होत असे. अजूनही ती होते. त्यानिमित्ताने माणिकचे

वरखेडला आगमन झाले. जुन्या सवंगड्यांच्या गाठी–भेटी झाल्या. आता माणिक 'बुवा' बनला होता; तुकडोजी महाराज झाला होता.

महाराजांच्याच प्रेरणेने वरखेडला आडकोजी महाराजांचे मंदिर उभारण्याची योजना आखण्यात आली. महाराज देशभर कुठेही फिरत असले तरी त्यांची दृष्टी वरखेड येथील मंदिर निर्माणकार्याकडे लागलेली असे. ते मंदिर त्यांच्याच प्रयत्नांनी पुढे पूर्ण झाले.

महाराजांना वाचनांचा विशेष व्यासंग जरी नव्हता तरी त्यांच्या कितीतरी सूक्ष्मावलोकनातून आणि चिंतनातून स्फुरलेली कितीतरी विचार मौक्तिके त्यांच्या भजन–भाषणातून साकार होत असत. ज्ञानेश्वरी, गीता, दासबोध इत्यादी ग्रंथ त्यांना विशेषत्वाने आवडत. नेरीच्या जंगलांत वास्तव्य असताना त्यांना 'भोजपत्रावळी' हा जुना ग्रंथ वाचण्याचा योग आला होता. अशाप्रकारे त्यांचे विशेष वाचन नव्हते तरी त्यांच्या ठिकाणी समर्थांप्रमाणेच बहुश्रुतता फार होती. भजन, सप्ताह, यज्ञयाग, तीर्थाटन इत्यादी निमित्ताने देशाच्या कानाकोपऱ्यातून त्यांचे परिभ्रमण होई. या परिभ्रमणातच विविध क्षेत्रांतील अनेकांच्या भेटीगाठी झाल्या. अनेक साधुसंतांचे आश्रम, त्यांनी पाहिले. दऱ्याखोऱ्या न्याहाळल्या. बैलगाडीपासून तर विमानापर्यंत जवळ जवळ सर्व साधनांनी प्रवास करुन हा एकांतातील माणिक आता तुकडोजी महाराज म्हणून लोकांतात आला व त्यांनी समाजजीवनाचे अतिशय जवळून अवलोकन केले. सामान्य माणसांच्या सहवासात राहून सुखाचे झरे निर्माण करणाऱ्या या महाराजाने मात्र साधू–संतांच्या बाह्य अवडंबरांचा कधीच अंगीकार केला नाही. कारण ते ग्रामगीतेत स्वतःच सांगतात–

"परि तयाची ओळखण । बहिरंगावरोनि करील कोण ?
संत ओळखावा वृत्तीवरून । अथवा सद्गुण पाहोनिया"

तुकडोजी महाराजांचे जीवन–दर्शन घडवित असताना त्यांच्या व्यक्तित्वातील प्रमुख दोन पैलूंचा प्रत्यय प्रकर्षाने येतो. एक म्हणजे त्यांच्या आध्यात्मिक उत्क्रांतीचा आणि दुसरा त्यांनी पुढे अंगिकारलेल्या जन–जागरणाच्या, लोक शिक्षणाच्या प्रवृत्तीचा, अंतर्मुख वृत्तीचा. बाळ

माणिक हळू हळू बहिर्मुख होऊन आपल्या भजन–भाषणाच्या माध्यमातून जनजागृतीचे व लोकशिक्षणाचे कार्य करू लागला. १९३३ साली त्यांनी चिमूरला फार मोठा चातुर्मास घेऊन प्रार्थना, व्यायाम, भाषण, चर्चा, शंकासमाधान इ. विधायक कार्यक्रमांद्वारे लोकांना प्रबोधन केले. १९३४ मध्ये वर्धा जिल्ह्यातील आष्टी या गावी विविध विधायक कार्यक्रम घेऊन लोकांमध्ये स्वातंत्र्य प्राप्ती–विषयीची प्रेरणा निर्माण केली. त्यांनी आयोजिलेला १९३५ सालचा सालवर्डीचा महारुद्र-यज्ञ तर अविस्मरणीय राहील. त्याचवेळी त्यांनी नागपूर–अमरावती रोडवर 'मोझरी' या गावच्या परिसरात एका लहानशा झोपडीने 'गुरुकुंज' आश्रमाची स्थापना केली. आज त्याचेच विशाल स्वरुप झाले असून व्यायाम, ग्रामोद्योग, गोरक्षण, कृषी, शाळा, दवाखाना, प्रशिक्षण विद्यालये, वसतिगृहे, इत्यादी विविध विभाग सुरू आहे.

समयस्फूर्त भजने महाराजांना सहजच स्फुरत असत. पारतंत्र्याचा तो काळ होता. ब्रिटीशांची भरभक्कम पावले भारतभूमीत दीर्घ काळापासून खोलवर रुजली होती. भारतमातेला परदास्यातून मुक्त करण्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली चळवळ सुरू होती. तशातच १९४२ हे स्वातंत्र्य–लढ्याचे साल उजाडले. या लढ्यात समस्त भारतीय जनतेने सहभागी व्हावे म्हणून ते स्फूर्तिप्रद राष्ट्रभजने गाऊ लागले.

" अब काहेको धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे ।
आते है नाथ हमारे । "
" झाड झडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना ।
पत्थर सारे बॉम बनेंगे, नाव लगेगी किनारे । "

अशा प्रकारची त्या काळातील त्यांची काही भजने तर चिरस्मरणीय राहतील. अशा क्रांतिकारक भजनांमुळे महाराजांवर तुरुंगात जाण्याचाही प्रसंग आला. इ. स. १९४२ च्या ऑगष्ट महिन्यात ते काही महिने तुरुंगात होते. अशा चळवळी निमित्तानेच त्यांचा महात्मा गांधीशीही परिचय झाला व सेवाग्रामला त्यांच्या सहवासात राहण्याचाही योग आला. पुढे १५ ऑगष्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. आणि

त्याचे पाकिस्थान व भारत अशी दोन शकले पडली. ३० जानेवारी १९४८ ला म. गांधींचा खून करण्यात आला. त्यावेळी पुन्हा जातीय दंगली माजण्याचे वातावरण देशात निर्माण झाले. त्याहीवेळी महाराजांनी देशभर हिंडून सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

स्वराज्य आले परंतु स्वराज्याचे सुराज्य झाले पाहिजे; असे स्वप्न मनाशी बाळगून महाराजांनी अनेक विधायक योजना आखल्या व काही कार्यान्वितही केल्या आणि काही कार्यान्वित होत असताना कॅन्सरच्या आजाराने तुकडोजी महाराज ११ आक्टोबर १९६८ साली सायंकाळी ५ वाजता गुरुकुंज आश्रमात ब्रम्हलीन झाले. आज महाराज आपल्यात नसलेत तरी त्यांचे वाङ्मयीन, सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय कर्तृत्व आपल्यापुढे आहे. त्यापासून आपण स्फूर्ती घेऊ या व भारतमातेच्या या सुपुत्राचे स्वप्न साकार करण्यासाठी सज्ज होऊ या. तीच राष्ट्रसंतांना खरीखुरी श्रद्धांजली ठरणार आहे.

संतद्वय–तुलनात्मक जीवन–दर्शन

श्री समर्थ रामदास स्वामी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे दोन्ही राष्ट्रीय बाण्याचे संत. दोघेही बाल ब्रम्हचारी. त्या दोघांचाही जन्म महाराष्ट्रात झाला समर्थ औरंगाबाद जिल्ह्यातील 'जांब' या लहान खेड्यात आणि राष्ट्रसंत अमरावती जिल्ह्यातील 'यावली' या लहानशा खेड्यात जन्मास आले. समर्थांचा जन्मकाळ इ.स. १६०८ आणि राष्ट्रसंतांचा इ. स. १९०९ म्हणजे दोघांच्या काळात ३०१ वर्षाचे अंतर आहे. या दोन्ही संतांना परमेश्वर भक्तीचा वारसा वंश–परंपरेनेच प्राप्त झालेला दिसतो. समर्थांचे बंडिल सूर्याजीपंतांच्या घराण्यात सूर्योपासना व प्रभु रामचंद्राची आराधना पिढ्यान्पिढ्या सुरू होती. आणि–तुकडोजींचे आजोबा गणेशपंत हे विठ्ठलाचे परमभक्त होते. इतकेच नव्हे तर, त्यांची आई मंजुळादेवी–यांचे वडील म्हणजे तुकडोजींचे (आईकडील) आजोबा–तुकाराम बाबा वानखेडे हे देखील दत्ताचे एकनिष्ठ उपासक होते. यावरून या संतद्वयाच्या पाठीशी त्यांच्या पूर्वजांच्या पुण्याईचा पुरेशी पार्श्वभूमी असल्याचे प्रत्ययास येते.

हे दोघेही लहानपणीच घरातून निघून गेले. लहानपणी दोघांचाही स्वभाव अतिशय हूड. दोघांनाही बालवयात रानोरानी भटकण्याचा, पोहण्याचा व 'मंदिरी वसोनि ध्यान' लावण्याचा छंद होता. दोघांचा वेष मात्र भिन्न. समर्थांचा वेष म्हणजे लंगोटी आणि कफनी, देही असूनही विदेही अशाच स्वरूपाचा होता.

दोघांचेही समाजजीवनाचे अवलोकन अतिशय सूक्ष्म होते. दोघांनीही निसर्गाला गुरु मानून त्याच्या सान्निध्यात शिकता येईल तेवढे शिकण्याचा प्रयत्न केला. दोघेही रामभक्त व हनुमान भक्त होते. रामनामाचा जप दोघांनीही आत्यंतिक निष्ठेने केला. गावोगावी मारूतीच्या मंदिरांची स्थापनाही त्यांनी भक्तिभावाने केली. समर्थांना श्रीरामचंद्र प्रभुचा दृष्टांत झाला आणि तुकडोजी महाराजांवर सद्गुरु आडकोजी महाराजांनी कृपा केली. भक्तीमार्गाच्या माध्यमातून जनजागरणाचे व लोकशिक्षणाचे महद्कार्य या दोघांही महापुरुषांनी केले. दोघांचाही काळ पारतंत्र्याचा. समर्थांच्या काळात महाराष्ट्रात यावनी सत्तेचा अमल तर राष्ट्रसंतांचा कालखंड हा ब्रिटीशांच्या गुलामगिरीचा. दोघांनीही पारतंत्र्याविरूद्ध लढा पुकारला. समर्थांनी छत्रपती शिवाजी महाराजांना साथ व प्रेरणा दिली आणि राष्ट्रसंतांनी महात्मा गांधींच्या क्रांतीच्या ज्योतीला अधिक उग्र व प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला. दोघांनीही 'देशाला'च देव मानून अनन्यभावे त्याची पूजा केली. स्वतःच्या देशाविषयी दोघांचीही आसक्ती नव्हती. तथापि बलोपासनेचे महत्व दोघेही जाणून असल्याने त्यांना व्यायामाचा छंद लहानपणापासून होता. समाजाला सर्वतोपरी समर्थ करण्यासाठी, त्या दोघांनीही आपल्या साहित्यातून स्फूर्तिदायक संदेश दिलेला आहे. त्यादृष्टीने समर्थांचा '**दासबोध**' आणि राष्ट्रसंतांची '**ग्रामगीता**' हे दोन्ही ग्रंथ स्फूर्तिप्रद असून अक्षरवाङ्मयीन महत्व त्यांना प्राप्त झालेले आहे. दोन्हीही संतांनी प्रपंच सोडून परमार्थ साधण्याचा एकांगी सल्ला समाजाला दिलेला नाही. '**प्रपंच सोडूनी परमार्थ कराल। तेणे तुम्ही दुःखी कष्टी व्हाल**' असेच जणु दोघांनाही सांगावयाचे आहे. दोघांनी संतत्वाच्या बाबतीत बाह्य अवडंबराला महत्व दिले नसून साधनेला व सद्गुणाला महत्व दिलेले आहे. दोघांनीही

आपल्या आयुष्यात खडतर तपश्चर्या केली. 'एकान्त' आणि 'लोकान्त' उभयविध जीवनाचा अनुभव दोघांच्याही ठायी होता. नैतिक सदाचरण हा परमार्थाचा पाया असल्याचे दोघांनीही प्रतिपादन केले. दोघेही कुशल संघटक व अध्यात्माच्या अधिष्ठानावर समाजाची उभारणी करणारे समाजसुधारक होते. दोघेही द्रष्टे संत होते. त्यांनी भावी काळाची चाहूल कानी घेऊनच समाजाला सतर्क आणि सावध करण्याचा कालोचित प्रयत्न केला. समर्थांनी रामराज्याची आणि तुकडोजींनी ग्रामराज्याची अभिनव कल्पना आपल्यापुढे मांडली आहे. '**जय जय रघुवीर समर्थ**' हे समर्थांचे घोषवाक्य तर '**श्री गुरुदेवकी जय**' आणि '**जयगुरु**' हे राष्ट्रसंतांचे घोषवाक्य होते. आजही हया घोषणा या दोन्ही संतांच्या सेवक संप्रदायातील प्रत्येकाच्या तोंडी आहेत. धर्म व राष्ट्र जागृतीचा दीप प्रज्वलित करून तो समाजमानसात सतत तेवत राहावा ही या दोन्ही महापुरुषांची अंतरीची तळमळ होती.

एकंदरीत, प्रपंच–परमार्थ, व्यवहार आणि तत्वज्ञान, जनवास आणि वनवास, आचार आणि विचार, उक्ती आणि कृती, भावना आणि बुद्धी, ज्ञान आणि विज्ञान, प्रवृत्ती व निवृत्ती यांचा समतोल साधण्याचा या दोन्ही संतांनी प्रयत्न केलेला आहे.

नारायण बोहल्यावरून व माणिक घरातून पळाल्यापासून बाळ नारायणाचे 'समर्थ रामदास स्वामी'त आणि बाळ माणिकचे 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजां'मध्ये कसकसे परिवर्तन होत गेले ते आपण पाहिले. अशाप्रकारे श्री समर्थ रामदास स्वामी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनचरित्राचा सक्षिप्त आढावा घेण्याचा प्रस्तुत प्रकरणात प्रयत्न झालेला आहे. या दोन्ही महापुरुषांच्या जीवनामध्ये बरेचसे साम्य आणि काही भेद आढळतात. दोघांच्याही कालखंडात ३०१ वर्षाचे अंतर असल्याने तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवनाचा परिणाम त्यांच्या कार्यप्रणालीवर होणे स्वाभाविक आहे. दोघांच्याही काळातील सपत्र्यांच्या भिन्नत्वामुळे त्यांच्या कार्यपद्धतीत काहीसा फरक सहजच संभवतो. समर्थांनी यवनांचा मुकाबला करण्यासाठी व तुकडोजींनी

या देशातून ब्रिटीशांची राजवट संपुष्टात आणण्यासाठी सशक्त संघटना उभारण्याचा केलेला प्रयत्न हे त्यांच्या राष्ट्रीय बाण्याचे प्रतीक होय. हा राष्ट्रीय बाणा त्या दोघांही संतांच्या आध्यात्मिक उत्क्रांतीकार्याइतकाच महत्वपूर्ण आहे.

★ ★ ★

संतद्वयकालीन भिन्न परिस्थिती

श्री समर्थकालीन परिस्थिती–(राजकीय, धार्मिक, सामाजिक)

समर्थांचा जन्म इ. स. १६०८ साली झाला. त्यावेळी महाराष्ट्रात शिवाजी महाराज अवतारायचेच होते. शिवाजींचा जन्म हा इ. स. १६३० सालचा. त्यानंतर त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षापासून (इ. स. १६४६) महाराष्ट्रात स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न सुरू झाला होता. त्यावेळी महाराष्ट्रात मुसलमानी सत्ता प्रस्थापित होऊन शांतता व सुबत्ता नष्ट झाली होती. महाराष्ट्राचा आर्थिक व धार्मिक ऱ्हास सुरू झाला होता. त्याचाच परिणाम सामाजिक जीवनावर होऊन ते अत्यंत खिळखिळे झाले होते. स्वातंत्र्यप्राप्तीचा उत्साह लोकांमध्ये उरला नव्हता. आपसातील भेदभावाने हिंदूसमाज विस्कळीत झाला होता. त्यांच्यातील ऐक्य दुभंगले होते. इतरांपुढे आपल्या आचरणाचा आदर्श ठेवणारे व स्वत:ला उच्च समजणारे हिंदू लोक स्वत:च षड्रिपुंच्या आहारी जाऊन धर्मच्युत झाले होते. पोटाची खळगी भरण्यासाठी लाचार व स्वाभिमानशून्य बनले होते.

समर्थ या बाबींवर विदारक प्रकाश टाकताना म्हणतात–

"ब्राम्हण बुद्धोपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ।।"
कित्येक दावमलकास जाती । कित्येक पीरासच भजती ।
कित्येक तुरूक होती । आपल्या इच्छेने ।।"

इतकेच नव्हे तर, पुढे समर्थ तत्कालीन ब्राम्हणांच्या अवस्थेविषयी म्हणतात–

"राज्य नेले म्लेंच्छ क्षेत्री । गुरुत्व नेले कुपात्री ।
आपण अरत्री ना परत्री । काहीच नाही ।।"

समर्थांचा आणि संत तुकारामांचा काळ समान असल्यामुळे तुकारामांनी त्या काळाचे आपल्या अभंगातून रंगविलेले चित्रही लक्षात घेण्यासारखे आहे.

" टिळे लपविती पाताडी । लेती विजार कातडी ।
बैसोनिया तक्ता । अन्नेवीण पीडीती लोका ।। "

अशा प्रकारे परधर्मीयांची चाकरी करण्यासाठी कपाळावरील टिळा लपविणे व कातडयाची विजार चढवून मोठे पद पटकाविणे आणि पद पटकविल्यानंतर स्वकीयांना पीडा देणे हाच त्यांचा धर्म बनला होता. स्वजनांचा घात आणि स्वदेशाशी द्रोह हीच त्यांची नीती बनली होती.

' सांडुनी रामराम जाऊन म्हणती दोम दोम । '

समाजाचे बौद्धिक व सांस्कृतिक धूरिणत्व असलेल्या ब्राम्हणांची अशी अवस्था होती. आणि क्षत्रियांच्या बाबतीत सांगायचे म्हणजे.

' राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुश्चिनासी तोडी । '

याप्रमाणे परकीय सत्ता प्रजेला पीडा देत असे व क्षत्रिय प्रतिकारा-ऐवजी आपल्याच बेसावध लोकांना कापून काढीत असत. वास्तविक पाहता ब्राम्हण आणि क्षत्रिय हे तत्कालीन समाजातील पुढारलेले वर्ग. परंतु त्यांचेच वर्तन देशद्रोही आणि धर्मद्रोही होते. आपल्याच धर्मातील या देशद्रोही आणि धर्मद्रोही लोकांच्या या वर्चस्व-प्रवृत्तीमुळे बहुजन समाजातील दीन-दुबळे लोक परधर्माचा आश्रय घेत होते. परकीय सत्तेचे अमानुष अत्याचार आणि स्वधर्मीयांची वर्चस्व-प्रवृत्ती या दुहेरी कोंडीत बहुजनसमाज अतिशय दीनवाणे जीवन जगत होता. हिंदूंची मंदिरे भ्रष्ट करणे, हिंदूंना बळजबरीने वाटविणे, हिंदू स्त्रियांची अब्रू लुटणे; शेतकऱ्यांच्या पीकांची लुटालूट करणे इत्यादी प्रकार परकीय सत्तेकडून सर्रास सुरू होते. समर्थ त्यासंबंधी सांगतात-

" देश नासला नासला । उठे तोचि कुटी ।
पिके होताचि होताचि । होते लुटालुटी ।।
पीळ पेचाचा पेचाचा । प्रसंग पडतो ।
लोक उद्भवेना उद्भवेना । अवघाचि बडतो ।। "

हिंदूंच्या होणाऱ्या तत्कालीन पाशवी छळाचे चित्तथरारक वर्णन समर्थांनी दासबोधाच्या तिसऱ्या दशकातून व सातव्या समासातून केले आहे. विशेषतः चाबूकाचा मार देणे, अपानद्वारी मेखा टोकणे, कानाला खडे लावून कान पिरगाळणे, दगडांनी ठेचणे; नाकात चुण्याचे, गुळाचे, मीठाचे पाणी टाकणे, कान–नाक–हात–पाय–जीभ कापून काढणे, सुळी देणे, डोळे काढणे, नखांना सूया टोचणे इत्यादी पाशवी छळाचे विविध प्रकार त्या काळात चालत. महाराष्ट्र अशा प्रस्थापित परसत्तेच्या अमानुष जाचाच्या वरवंट्याखाली भरडून निघत होता. अशा अवस्थेत परकीय सत्तेच्या प्रतिकाराचा प्रयत्न तर होत नव्हताच, उलट हिंदू सरदार, जहागीरदार, वतनदार अशी बडी–बडी मंडळी स्वाभिमानशून्य बनून परकीय सत्तेची मर्जी संपादन करण्यात धन्यता मानत होते. परसत्तेचे सामर्थ्य आणि सैन्यसामुग्री अफाट असल्याने हिंदू विरोधी धोरणांचा प्रतिकार सहजशक्य नव्हता. हिंदूधर्मातील पराक्रमी पुरूषांना फितूर करून व चाकरीस ठेऊन आपली सत्ता बळकट करण्याचा मोगल बादशहाचा प्रयत्न सुरूच होता.

अशा राजकीय परिस्थितीचा परिणाम धार्मिक व सामाजिक परिस्थितीवर अपरिहार्यपणे होत असतो.

स्वार्थासाठी सत्तेपुढे लाचारी पत्करून लोटांगण घालणारे हे लोक मुसलमानांना मानाचा मुजरा करीत परंतु साधुसंतांचा मान ठेवीत नसत. नीतिमत्ता जवळजवळ नष्टच झाली होती. हिंदू समाजरचनेत सामावलेल्या विविध वंशखंडांच्या नानाविध क्षुद्र देवदेवतांनी समग्र समाज गजबजून गेला होता. बोके संन्यासी बोकाळले होते आणि दांभिक संत चमत्कार दाखवून भोळ्या जनतेला फसवित होते. समर्थांनी या स्थितीचे वर्णन दासबोधातून केले आहे. पहा–

"देव जाले उदंड । देवाचे माजले बंड ।
भूता देवतांचे थोतांड । एकचि जाले ॥
मुख्य देव तो कळेना । कशास काहीच मिळेना ।
येकास येक वळेना । अनावर ॥

शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला जाला ।
लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ।।
ऐसे अवघे नासले । सत्या सत्य हरपले ।
अवघे अनायक झाले । चहूकडे ।।
मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तेचि थोर ।।
कित्येक म्लेंछ होऊन गेले । कित्येक फिरंगणात आटले ।
देशभाषाने रूधिले । कितीयेक ।।"

अशाचप्रकारे लोकांमध्ये अंधश्रद्धेचे स्तोमही माजले होते. परमेश्वरावरील निष्ठा संपून ते भूताखेतांवर विश्वास ठेवीत. आणि त्यांना प्रसन्न करण्यासाठी कोंबड्या-बकऱ्यांचे बळी देत.

समर्थ सांगतात-

"वीर झोटींग नरसिंग वेडा । वेताळाच्या पूजिती खोडा ।
शेंदूर माखोनिया धोंडा । शेळी बोकड जीव बळी देती ।।"

यावरून त्या काळात कर्मकांडाचे आणि अंधश्रद्धांचे प्रस्थ कसे माजले होते हे लक्षात येते.

समर्थकालीन राजकीय परिस्थितीचा परिणाम जसा तत्कालीन धार्मिक परिस्थितीवर झाला तसाच धार्मिक परिस्थितीचा परिणाम तत्कालीन सामाजिक परिस्थितीवरही होणे स्वाभाविकच होते. औरंगजेबाच्या अतिरेकी अत्याचाराने हिंदू संस्कृतीला तडा जात होता. कर्मठ लोक आपला कर्मकांडाचा कडकपणा सोडावयास तयार नव्हते. चातुर्वर्ण्यपद्धतीच्या-अस्तित्वामुळे बहुजनसमाज वर्णाश्रमभेदाभेदात भरडून निघत होता. एकीकडे औरंगजबाचे अतिरेकी अत्याचार आणि दुसरीकडे आपल्याच धर्मातील लोकांचा कडक कर्मठपणा या दुहेरी आपत्तीत बहुसंख्य लोक होरपळून निघत होते. तशातच आसमानी संकटाचीही भर पडली. इ. स. १६३०-३१ चो दुर्दैवी घटना अशी सांगतात की- महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला होता. या दुष्काळात असंख्य

लोक अन्नान करीत मृत्युमुखी पडले. पोटासाठी बायका-मुलांना सुद्धा विकण्याची कित्येकांवर पाळी आली होती. समर्थांनी या भीषण परिस्थितीचे वर्णन करताना म्हटले आहे-

"पाऊस पडतो पडतो । उदंड पडतो ।
नाहीतर उघडतो उघडतो अवघाची उघडतो ।

धान्य महाग महाग तैसेही मिळेना ।
कैसे होईल होईल होईल कळेना ।

सुडके परकर परकर न मिळे पांघरायला ।
शक्ती नाही रे नाही रे कोंपट करायला ।

रांडा पोरांच्या पोरांच्या तारांबळा होती ।
मोलमजुरी भिकारी होऊन वाचती ॥"

अशाप्रकारे परचक्रामुळे आणि दुष्काळामुळे संपूर्ण समाज खिळखिळा झाला होता. प्रतिकाराची शक्ती मुळीच उरली नव्हती. कोणाला आधार द्यावा तर आधार घेणारेच लोक पुष्कळदा चोरी करून पळून जात. यासंबंधी समर्थ सांगतात-

"लोक भलेसे दिसती खेटरे चोरिती ।
वस्त्रे धोतरे पातरे लपवूनी पळती ॥

तत्कालीन अस्पृश्यतेचा इतिहासही मोठा हृदयद्रावक आहे. आपल्याच धर्मात सामावलेल्या एका वर्गावर शतकानुशतके कर्मठ लोकांनी जुलूम सुरू केला होता. त्यांच्या स्पर्शाचा विटाळ मानला होता. सार्वजनिक विहीरी, तळी, देवळे येथे त्यांना मज्जाव होता. परमेश्वराची भक्ती करण्याची सुद्धा त्यांना मनाई होती. ज्ञानाची कवाडेही त्यांच्यासाठी सदैव बंद ठेवण्यात आली होती. अशाप्रकारे शास्त्राच्या नावाखाली माणुसकीची मुस्कुटदाबी करणाऱ्या कर्मठांनी आपल्या कुजट कल्पनांनी संपूर्ण समाजजीवन स्पृश्य-अस्पृश्य भेदाने नासवून टाकले होते. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर समर्थांनी समाजोद्धाराचे केलेले कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

३२९९
विषय खुजरे
रजिस्टर

सतराव्या शतकातील विशेष उल्लेखनीय योगायोग म्हणजे समर्थ रामदास, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराज ही तीनही 'भव्य स्फुरणे' महाराष्ट्रात एकाच काळात अवतरली. इतकेच नव्हे तर, समर्थ रामदास आणि संत तुकाराम या दोघांचाही जन्म एकाच वर्षी म्हणजे इ. स. १९०८ साली झाला हा सुद्धा एक अलौकिक योगायोगच होय. समर्थकालीन महाराष्ट्रात अनेक जाती-पंथ अस्तित्वात असल्याचा उल्लेख आलेलाच आहे. अशाही स्थितीत शिवाजी महाराजांनी त्यांच्यातील भेदभाव मिटवून त्या सर्वांमध्ये ऐक्यभाव उत्पन्न केला होता. तसेच शिवाजी महाराज व समर्थ रामदास या दोन्ही थोरपुरुषांच्या प्रयत्नामुळे लोकांमध्ये देशाभिमान व देशप्रेम वाढीस लागले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील मरगळलेल्या समाजाला संजीवनी मिळाली. त्यात चैतन्य, जिवंतपणा निर्माण झाला. स्वतःच्या कर्तव्याची समाजाला जाणीव झाली आणि समग्र समाज महाराष्ट्राच्या संरक्षणासाठी सज्ज ठाकला.

संकटातच सामर्थ्य कसोटीस उतरत असते. महाराष्ट्रावर मोंगलाशी लढाई करण्याचे प्रसंग आल्यामुळे त्याच्यात कणखरपणा आला व राष्ट्रीय वृत्ती बळावू लागली होती. अर्थातच आपसात भेदभाव मानणारे लोक बंधुभावाने एकत्र येऊन सर्वकामे सहकाराच्या बळावर सहजरीतीने पार पाडण्याचा प्रयत्न करीत. एवढी मोठी प्रचंड मोगलसत्ता परंतु महाराष्ट्रापुढे तिचे काही चालेनासे झाले होते. याच काळात शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्याची स्थापना म्हणजे फार मोठे राजकीय स्थित्यंतरच म्हटले पाहिजे.

एकंदरीत, महाराष्ट्राचा हा काळ अतिशय धामधुमीचा व अशांतीचा होता तरी शिवाजी महाराजांच्या अविश्रान्त प्रयत्नांनी व अचाट कर्तृत्वाने हिंदू संस्कृतीचे पुनरूत्थान, देवळांचे जीर्णोद्धार आणि धर्मांतर करणाऱ्याचे शुद्धीकरण इत्यादी महत्वपूर्ण कार्ये याच काळात होऊ लागली होती.

तुकडोजीकालीन परिस्थिती (राजकीय, धार्मिक व सामाजिक)

तुकडोजी महाराजांच्या काळातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेताना प्रामुख्याने दोन कालखंड दृष्टीपुढे येतात. पहिला स्वातंत्र्यपूर्व

कालखंड आणि दुसरा स्वातंत्र्योत्तर कालखंड. अर्थातच या दोन्ही कालखंडातील राजकीय परिस्थिती भिन्न स्वरूपाची होती. तेव्हा त्या दोन्हीही कालखंडांना अनुसरून तत्कालीन राजकीय परिस्थितीचा परामर्ष घेणे अधिक समर्पक ठरेल.

स्वातंत्र्यपूर्व राजकीय परिस्थिती–

तुकडोजी महाराजांचा जन्म इ. स. १९०९ मध्ये झाला आणि भारत इ. स. १९४७ साली स्वतंत्र झाला. म्हणजे तुकडोजी महाराज जवळजवळ आपल्या आयुष्याचे ३८ वर्षे पारतंत्र्याच्या काळात वावरले. ते ज्या स्वातंत्र्यपूर्व काळात वावरले तो काळ 'आपल्या साम्राज्याचा सूर्य कदापि मावळणार नाही' अशी दर्पोक्ती करणाऱ्या ब्रिटीश राजवटीचा होता. ब्रिटीश साम्राज्याची पावले भारतभूमीत पक्की रूजल्या गेली होती. परंतु त्याचवेळी भारतात लो. टिळक आणि म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य प्राप्तीच्या चळवळीला जोर चढत चालला होता. त्याचवेळी देशात ठिकठिकाणी हिंदू–मुसलमानांचे दंगे पेटत चालले होते. या दंग्यामागे ब्रिटीशांचीही फूस होती. हिंदू–मुसलमान आपसात लढत राहिल्यास त्यांचे स्वातंत्र्य–चळवळीकडे दुर्लक्ष होईल हा त्यांचा कावा होता. परंतु लो. टिळक आणि म. गांधी या नेत्यांनी इंग्रजांचा हा कावा ओळखला आणि आणि समग्र भारतीयांमध्ये पारतंत्र्याविषयी असंतोषाची लाट पसरवून 'स्वदेशी' व 'बहिष्कार' अशा चळवळी सुरू केल्या. म. गांधीनी २३ मार्च १९१९ रोजी सविनय कायदेभंग करण्यात येईल अशी घोषणा केली. एकामागून एक घडणाऱ्या या घटनांनी ब्रिटीश सरकारचे माथे भडकले आणि २३ मार्च उजाडण्यापूर्वीच १३ मार्च १९१९ ला ब्रिटीश सरकारने जालीयनवाला बागेत शेकडो हिंदी लोकांचा बळी घेतला. याची तीव्र प्रतिक्रिया देशभर उमटली आणि साम्राज्य-विरोधी चळवळीचा वणवा भडकला. हिंदू-मुसलमान राष्ट्रीय चळवळीच्या दृष्टीने एक झाले.

संत तुकडोजी महाराजांनी या काळाचे वर्णन करताना म्हटले आहे–'एक रावण निघून गेला असला तरी दुसरा झाला हा' यावरून

ब्रिटीश शासनाच्या दुष्ट नि निर्दयी प्रवृत्तीचा प्रत्यय येतो. त्यांनी चहु-बाजुंनी देश दुर्बल केला होता.

"गुलामी सान थोराला । तयाचा धाक बहु मोठा ।
गांजितो फार जनतेसी ॥"

अशी इंग्रजी शासनाची अत्याचारी प्रवृत्ती त्या काळात बळावली होती. महाराजांच्या शब्दातून सांगायचे म्हणजे "**असुरी राज्य गिळले होते**' म. गांधींनी 'चलेजाव' ची चळवळ सुरू केली. १९४२ चे क्रांतिकारी साल उजाडले आणि त्याने स्वातंत्र्य आंदोलनाचे जहाल स्वरूप धारण केले. सारा भारत ब्रिटीशांच्या अमानुष अत्याचाराच्या प्रतिकाकारार्थ पेटून उठला. आणि शेवटी १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.

स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय परिस्थिती -

इ. स. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला आणि इ स. १९६८ साली तुकडोजी महाराजांचे निर्याण झाले. म्हणजे महाराज ,आपल्या आयुष्याचे जवळ जवळ २१ वर्षे या स्वातंत्र्योत्तर काळात वावरले. १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारताचे स्वतंत्र हे पाकीस्तान व भारत अशा शकलांतूनच अवतरले. विभक्त भारतात काँग्रेस पक्ष सत्तारूढ झाला आणि सत्तेची सूत्रे काँग्रेस पक्षाच्या हातात येत नाही तोच महात्मा गांधींचा इ. स. ३० जानेवारी १९४८ रोजी खून करण्यात आला. पुन्हा जातीय दंगली माजण्याचे वातावरण देशात निर्माण झाले. परंतु तुकडोजी महाराजांसारख्या संताच्या व पं जवाहरलाल नेहरूसारख्या राष्ट्रीय नेत्याच्या पुढाकाराने शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात सत्ता-स्पर्धा सुरू झाली. अनेक पक्षोपपक्ष राजकीय क्षेत्रात निर्माण झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय परिस्थितीचे वर्णन करताना तुकडोजी महाराज आपल्या लहरकी बरखा भाग २ (पृ. ७३) मध्ये म्हणतात-

"बस हद्द है इस कलहकी । नहि सभ्यता बाकी रही ।
सत्ताधिकारी लढते है । कुर्सी के लिये ।

धनको गमाकर मान पाने । वोट खुदको मांगते ।
क्या देशका होगा भला ? । सज्जन नही यह जानते ।।

अशाप्रकारे देशात सर्वत्र सत्तास्पर्धा निर्माण होऊन पक्षबाजीला ऊत आला होता. नवीन-नवीन राजकीय पक्ष निर्माण होत होते. निवडणुकींचे प्रस्थ माजले होते. या सर्व बाबींचा परिणाम समाज-जीवनावर होणे अपरिहार्यच होते.

समर्थकालीन समाज जीवनातही असंख्य अनिष्ठ रुढी रूजलेल्या होत्या. समाज डोळे मिटून परंपरांच्या रूळलेल्या वाटांवरुन चालत होता. समाजाची घडीच विस्कटून गेली होती. विस्कटलेल्या घडीचे वर्णन वेचक शब्दांतून करताना महाराज 'समाजसंजीवनी' (पृ. २८) मध्ये म्हणतात-

"बिघडली घडी, घडी समाजाची ।
कोण लावील वाट त्याची ।
कुणाला चिंता आहे जगताची ।
पाहतो वाट आम्ही त्याची ।।"

शिक्षण, शिस्त उद्योग, चारित्र्य, रुढी परंपरा या सर्वच बाबतीत समाज जीवनाला कीड लागलेली होती. अनीती, अश्रद्धा, दूराचार, दुर्व्यसने यांनी समाजजीवनात थैमान घातले होते; आणि भेसळ, भ्रष्टाचार, लाललुचपत, काळाबाजार, गुंडगिरी, इ. ना ऊत आला होता. कामचुकार, ऐदी, आळशी आणि व्यसनी पिढी पुढे येत होती. धनिकवर्ग गरिबांची पिळवणूक करीत होता आणि श्रमजीवी वर्गाला घाम गाळूनही घासभर अन्न समाधानाने मिळत नव्हते. दिवसरात्र शेतात रावणाऱ्या कष्टकरी-शेतकऱ्यांची अवस्थाही मोठी दयनीय होती. जातीयतेचा विषारीवृक्ष फोफावला होता आणि समाजातील प्रतिष्ठा पैसा व सत्ता या मापाने मोजण्यात येत होती. चित्रपटाचाही समाजजीवनावर विकृत परिणाम झाला होता. फॅशनचे भलतेच स्तोम समाजात माजले होते. एकंदरीत, निरक्षर समाजावर जुन्या-रुढी-परंपरांचा पगडा बसला होता आणि सुशिक्षित समाजावर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडला होता. जुन्या

रूढि–परंपरांच्या पगडचामुळे सर्व सामान्य जनता जुन्याच जीवन-मूल्यांना चिकटून राहिली आणि पाश्चात्य संस्कृतीच्या व शिक्षणाच्या प्रभावाने नवीन पिढीने आपली नवीन जीवनमूल्ये निर्माण केली. अशाप्रकारे जुन्या नव्याच्या अतिरेकीपणामुळे समाजजीवनात अत्यंत अस्थिरता निर्माण झाली.

तसेच समाजजीवनातील वैवाहिक संबंधात हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथा प्रस्थापित होऊ लागल्या. विवाहाच्या बाबतीत जातीय बंधनेही जुन्या काळासारखीच होती. एखाद्याने आंतरजातीय विवाह केला तर तो मोठ्या कुतूहलाचा विषय होई. बालविवाहाची पद्धतही समाजात बोकाळली होती. विधवा पुनर्विवाहाला समाजाने बंदी घातली होती. कोंबडचाच्या झुंजी, बैलांचे पट, जलसे-तमाशे, जुगार, व्यभिचार, दारू इत्यादी प्रकारही सर्रास सुरू होते. महाराज या परिस्थितीवर प्रकाश टाकताना ग्रामगीतेतून सांगतात–

"कोणी दंढारी, तमाशे करी । कोणी दारू पिऊन शिव्या उच्चारी ।
कोणी कोणा न माने तिळभरी । लहान, थोर स्वैर झाले ॥"
"व्यभिचाऱ्यांची झाली दाटी । गंजिफा खेळतो पैशासाठी ।
मुले करिती चोरी चपाटी । काढती भट्टी घरोघरी ॥"
"मांस खाण्याचे वाढले व्यसन । चैन न पडे मद्यावाचून ।
अनेक रोग मांस मद्यातून । वाढले गावी ॥"

लहान मुलेही बिघडली होती. त्यांनाही लहानपणीच सिगारेट–पान इत्यादीचे व्यसन लागले होते.

"मुले तेल लावून बाल फिरविती । पान चावून कोठेही थुंकती ।
सिगारेट ओढुनि धूर सोडिती । धाकचि नाही कोणाचा ॥"

समाजजीवनात पैसा हाच परमेश्वर बनला होता. महाराज स्पष्टच सांगतात–

"आज पैसे खर्च करिता सर्व मिळते । न्याय मिळते, सत्ताही मिळते ।
किर्ती, सन्मान, थोरपण मिळते । ऐसा अनुभव सर्वांचा ॥"
"कोणी खाती लाच लुचपती । कोणी उघडचि डाके देती ।
अन्याय–अत्याचार वाढती । पैशासाठी ॥"

तुकडोजी महाराज ज्या काळात वावरले त्याला 'वैज्ञानिक युग' म्हणता येईल. या वैज्ञानिक युगाचा सामाजिक परिस्थितीप्रमाणेच धार्मिक परिस्थितीवरही बराच परिणाम झाला. समाजजीवनातून धर्माविषयीची श्रद्धा सारखी ढळत चालली होती. पूजा-अर्चा, यज्ञयाग, ध्यान-धारणा इत्यादी विषयी लोकांमध्ये फारशी आस्था राहिली नव्हती. या विज्ञानयुगाची विशेष स्थिती वेचक शब्दांतून वर्णन करताना महाराज आपल्या लहरकी बरखा भाग २ (पृ. ५६) मध्ये म्हणतात-

"लिख तो रहा हूं गीत पर। बातें पुरानी हो गयी।
विज्ञानका युग लग गया। अब धर्म समझे ना कोई।
अब तो चलेंगे ट्रक-ट्रॅक्टर। बम तथा रॉकेट है।
संहार की खेती पकेगी। वक्त नही अब लेट है॥"

मंदिरासारख्या पवित्र स्थळाला कशी अवकळा आली होती आणि पूजाऱ्याची प्रवृत्तीही कशी विघडली होती हे सांगताना महाराज म्हणतात-

"मंदिराचा भव्य वाडा। झाला गुंडांचा आखाडा।
धाक पडे घालाया मोडा। सज्जनांसि॥"
"मंदिरी बांधती म्हशी-गाई। घाण दिसे ठायी ठायी।
कसली पूजा, धूपदीपहि। सारा धुव्वा तंबाखुचा॥"
"देवळासाठी पुजारी ठेवला। तो देऊळ ग्रासून बसला।
बायका पोरांसाठीही केला। उपयोग त्याने देवळाचा॥"
"पुजारी खेळती चौसरी। वेश्यादिकांचे गाणे मंदिरी।
होती तमाशे-दंढारी। परोपरी देवळामाजी॥"

समर्थ-काळाप्रमाणेच याही काळात बुवाबाजीचे प्रस्थ बोकाळले होते आणि कनिष्ठ देवदेवतांच्या पूजाचे अवास्तव स्तोमही माजले होते. यासंबंधी महाराज सांगतात-

"ही बुवाबाजी भुलवी जना। भ्रष्ट करी ग्रामजीवना।
फसवोनि भोळ्या-बापडयांना। भलत्या छंदा लावितो॥

तसेच–कोणी म्हणती देवी मोठ्या । कोणी पूजिती मानविणी नरोट्या ।
कोणी म्हसोबा–बहिरम सोट्या । थोर म्हणोनि तंडती ॥"

"कोणी अल्ला बडा की राम बडा । हेचि वितंडिती धरिती नरडा ।
फोडितांती कडाकडा । मूर्ति हाती धरोनिया ॥"

इतकेच नव्हे तर अंधश्रद्धांनाही ऊत आला होता.

पहा–

काही देवासि बलिदान देती । देवीच्या मिसे मांस खाती ।
तीर्थ म्हणोनि मद्य पिती । पिसाळलेले ॥

अशाप्रकारे तुकडोजी महाराज कालीन समाजजीवन देव–धर्माच्या नावाखाली अनावश्यक, अज्ञानमूलक अवडंबरांनी ग्रासलेले होते. या ग्रासलेल्या जीवनाला उजाळा देऊन समाजाच्या मनःपटलावर असलेला अज्ञानाचा पडदा दूर सारण्याचे क्रांतिकार्य राष्ट्रसंतांनी केले आहे.

तुलनात्मक कालदर्शन

समर्थ रामदासांच्या सतराव्या शतकातील आणि संत तुकडोजींच्या विसाव्या शतकातील राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीच्या संदर्भात विचार करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे संतद्वयकालीन समाजजीवनात आत्यंतिक अस्थैर्य व अशांती निर्माण झाली होती. दोन्ही संतांच्या काळात देश हा परकीय साम्राज्याच्याच अधिपत्याखाली होता. फरक एवढाच की, समर्थकालीन महाराष्ट्र हा विजापूरचा आदिलशहा आणि मोगल साम्राज्य यांच्या अमलाखाली होता, तर तुकडोजींच्या काळात संपूर्ण भारत इ. स. १९४७ सालापर्यंत इंग्रजांच्या अधिपत्याखाली होता. समर्थ सन १६४४ मध्ये चाफळला आले. त्यापूर्वीच शिवाजींच्या स्वातंत्र्यनिर्मितीच्या कार्याला सुरुवात झाली होती. पुढे त्यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात स्वराज्याची मूहूर्तमेढ रोवण्यात आली आणि तुकडोजींच्या काळात म. गांधी, सुभाषचंद्र बोस, पं. जवाहरलाल नेहरू इत्यादी नेत्यांच्या प्रयत्नांमुळे भारताला स्वराज्य मिळाले.

या संतद्वयाच्या काळातील धार्मिक समस्या जवळ जवळ सारख्याच स्वरूपाच्या होत्या. दोघांच्याही काळातील समाजजीवनात नानाविध क्षुद्र-देवदेवतांचे प्रस्थ, वर्णभेद, नवसादिसंकल्प, बुवाबाजी, अंधश्रद्धा, रूढि-परंपरांचे प्राबल्य, पंडे-पुजाऱ्यांचे थोतांड इत्यादी बाबतीत बरेच साम्य दिसून येते. दोघांच्याही काळात हिंदूंची जीवनपद्धती परंपरागत शास्त्रानुसार चालत होती. मात्र कर्मठ लोकांचा कडकपणा समर्थांच्या काळाप्रमाणे तुकडोजींच्या काळात नव्हता. तुकडोजींच्या काळातील सामाजिक समस्या समर्थांच्या काळापेक्षा बऱ्याच बाबतीत भिन्न स्वरुपाच्या होत्या. हा काळाचा व वैज्ञानिक युगाचाच परिणाम म्हणावा लागेल. विशेषत: शिक्षण, शेती, उद्योग, राजकारण, ग्रामजीवन, स्त्रीवर्ग, विवाह-पद्धती इत्यादी बाबतीत समर्थांच्या काळापेक्षा तुकडोजींच्या काळात बरेच परिवर्तन घडले होते. उदाहरणच द्यायचे तर असे सांगता येईल की, शिक्षण क्षेत्रात बरीच प्रगती होऊन साक्षरतेचे प्रमाण वाढले होते. शेतीमध्ये बऱ्याच सुधारणा होऊन ती प्रगतीच्या मार्गावर होती. उद्योग-धंद्यांचा फारमोठ्या प्रमाणात विकास झाला होता. राजकीय क्षेत्रात प्रचंड प्रमाणात जागृती निर्माण झाली होती. ग्रामीण जीवनाचा संपूर्ण ढाचाच बदलू लागला होता. समर्थकालीन स्त्रियांपेक्षा तुकडोजींच्या काळातील स्त्रियांना आपला सर्वांगीण विकास करून घ्यायला वराच वाव मिळाला होता. 'चूल आणि मूल' हे त्यांचे संकुचित क्षेत्र आता बरेच कमी झाले होते. तथापि, समर्थांच्या काळापेक्षा तुकडोजीकालीन समाजजीवनाचे बऱ्याच बाबतीत अधःपतन झाले होते. पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाने आणि चित्रपट व अश्लील साहित्याने बहुतांशी युवापिढी बिघडत चालली होती. साधुसंतांनी विणलेले सुसंस्काराचे धागे कुजत चालले होते. शिक्षण क्षेत्रात पुस्तकी विद्येला महत्त्व प्राप्त होऊन सदाचार, सत्प्रवृत्तीचे महत्व कमी झाले होते. नानाविध व्यसनांनी समाजजीवन ग्रासले होते. दारु सारख्या भयंकर व्यसनाने समाजात कहर माजविला होता. फॅशनच्या नावाखाली उत्तान शृंगारता विकोपास गेली होती. विवाह पद्धतीत हुंड्याचे प्रस्थ वळावले होते. प्रतिष्ठेची मूल्ये बदलली होती. माणुसकीला कलंक लावणारे वर्तन सर्रास घडत होते.

सत्तापिपासू प्रवृत्ती फोफावत होती. लोकसंख्या सारखी बाढत होती आणि माणसे मात्र कमी होत होती. **'माणूस द्या मज माणूस द्या, ही भीक मागता प्रभू दिसला'** हे या संदर्भातील महाराजांचे भजन लक्षात घेण्यासारखे आहे. बेकारीचा 'भस्मासूर' 'आ' वासून पुढे उभा होता. न्याय, नीती, सत्य, धर्म यांची फारशी चाड कुणाला राहिली नव्हती. स्वैराचारी प्रवृत्ती समाजात वळावत होती. ऐतखाऊपणा, ऐदीपणा, आळशीपणा, कामचुकार प्रवृत्ती सारखी वाढत होती. विज्ञानाने जग जवळ आले तरी माणूस माणसापासून दूर जात होता. समाजाच्या प्रत्येक थरामध्ये नीतीचा ऱ्हास होत होता व गुणांचा 'कस' संपत होता. थोडक्यात महाराजांच्या शब्दात सांगायचे म्हणजे–

"ये धर्मगुंडे, राजगुंडे, लोकगुंडे बढ गये ।
घुसखोर गुंडे, चोरगुंडे, साधगुंडे चढ गये ।
बेपारगुंडे, प्यारगुंडे, बातगुंडे अड गये ।
सब जगह गुंडागर्दी से, राज ठंडे पड गये ॥"

अशा प्रकारचो परिस्थिती सर्वच क्षेत्रांत निर्माण झाली होती. समर्थांच्या तुलनेत तुकडोजींचा काळ आपल्या अधिक जवळचा आहे त्यामुळे त्या सर्व परिस्थितीचा आपल्याला जवळून परिचय आहे. त्यांच्या काळातील ३०० वर्षाचे अंतर लक्षात घेता काळानुसार संतद्वयाच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीत बरीच तफावत जाणवणे स्वाभाविक आहे.

समर्थकालीन महाराष्ट्र हा परकीय सत्तेच्या वरवंटाखाली सारखा भरडून निघत असताना छत्रपती शिवाजी महाराज सोडले, तर अत्याचाराच्या प्रतिकाराची हिंमत कोणीच करीत नव्हते; उलट तुकडोजींच्या काळात भारतामध्ये सर्वसामान्य माणूसही अत्याचाराच्या व पारतंत्र्यांच्या प्रतिकारार्थ पेटून उठला होता. स्वातंत्र्यासाठी आंदोलन उभारण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या अनेक देशभक्तांनी देशासाठी प्राण पणाला लावले होते.

★★★

संतद्वयाच्या समाजकार्याचा धार्मिक पैलू

भारतीय समाजरचना धर्मनियंत्रित असल्यामुळे नीतियुक्त वागणुकीचा पुरस्कार करण्यात आलेला आहे. नीती म्हणजे जीवन जगण्याची रीती. ही जीवन जगण्याची रीती समाजधारणेला पोषक असावी लागते. ती पोषक नसेल तर ती अनीती होईल आणि अशी अनीतीची वागणूक म्हणजे सामाजिक गुन्हा समजण्यात आलेला आहे. अशा प्रकारचा सामाजिक गुन्हा केलेला गुन्हेगार साक्ष-पुराव्याच्या अभावी कायद्याच्या कचाट्यातून सुटला तरी देवाच्या दरबारात तो शिक्षापात्र ठरतो अशा प्रकारचे समाजोपयोगी धार्मिक मूल्य समाजजीवनात रुजविण्याचे व समाजस्वास्थ्य टिकविण्याचे मोलाचे कार्य समर्थ रामदास आणि संत तुकडोजी यांनी आपापल्या काळात केले आहे. देवाधर्माच्या नावाखाली समाजात दंभाचे माजलेले स्तोम पाहून या संतद्वयाने समाजाला भोंदू साधूंपासून व भोंगळ विचारापासून अतिशय तळमळीने परावृत्त केले आणि परमार्थमय प्रपंच कसा करावा हे लोकांना शिकविले.

समाजकार्याला धार्मिक अधिष्ठान

भारतीय संस्कृती ही अध्यात्मप्रधान आहे. समर्थ व राष्ट्रसंत हे दोघेही महापुरुष या अध्यात्मप्रधान भारतीय संस्कृतीचे संस्कारधन जोपासणारे वारस होत. ते दोघेही अध्यात्मनिष्ठ पण समाजाभिमुख असे कर्तृत्ववान संत होते. त्यांच्या अध्यात्मनिष्ठ व समाजाभिमुख प्रवृत्तीमुळेच समग्र विश्वाला सामावून घेणारी विशालदृष्टी त्यांना प्राप्त झाली. त्यांचे अंतःकरण उपजतच परमात्म्याच्या प्रेमाने आणि भक्तीने भरुन गेले होते, तरी त्या भक्तीमुळे ते समाजविन्मुख बनले नाहीत. त्यांच्या अंतरीची ओढ समाजाकडे आपोआपच त्यांना धाव घ्यायला लावी. म्हणूनच ईश्वरभक्तीने प्रेरित झालेल्या या प्रेषितांनी सातत्याने समाजजीवनाचे चिंतन करुन संपूर्ण मानव समाजाला शाश्वत मूल्यांची ओळख करुन दिली आणि पोथीनिष्ठ धर्मांधता दूर सारुन देवाला समष्टि स्वरुप बनविले.

अध्यात्म किंवा धर्म हा चर्चेचा विषय नाही. तो चिंतन करून आचरणात उतरविण्याचा विषय आहे. अध्यात्म मनुष्याला देवाच्या जवळ नेऊन वसविते आणि धर्म मनुष्याला 'माणुसकी' शिकविते. अध्यात्मामुळे आणि धर्मामुळे माणसात मूलगामी बदल घडत असतो. त्याच्या आचार–विचारात परिवर्तन होत असते. स्वत:कडे व समाजाकडे पाहण्याची त्याची दृष्टी पूर्णत: बदलत असते. समर्थांच्या व तुकडोजी महाराजांच्या उपजत अध्यात्मिक प्रवृत्तीमुळे जगाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी त्यांना लाभली होती. म्हणूनच अध्यात्माच्या अधिष्ठानावर एक समृद्ध समाज व समर्थ राष्ट्र उभारणीचे महद्कार्य हे महापुरुष हाती घेऊ शकले.

अनेकदा धर्मांधतेमुळे समाजजीवनात नानाप्रकारचे गोंधळ निर्माण होतात आणि मग दगडालाच देव मानून लोक छंदिष्ट बनतात. अशा छंदिष्ट लोकांना समष्टिस्वरुप परमात्म्याचे दर्शन घडविण्याचा या संतद्वयाने केलेला प्रयत्न अतिशय मोलाचा मानावा लागेल.

प्रस्तुत प्रकरणातील समर्थांच्या समाजकार्याच्या धार्मिक पैलूंवर प्रकाश टाकताना त्यांच्या या संदर्भातील काही वचनांची आवर्जून आठवण होते. देवाची भक्ती व समाजातील व्यवहार यांचा समन्वय साधताना 'मनाचे श्लोक' मध्ये समर्थ म्हणतात–

"मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ।
जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।
जनी वंद्य ते सर्व भावे करावे ॥"

अशा प्रकारे भक्तिमार्गाच्या माध्यमातून परमेश्वराचा साक्षात्कार घडावा आणि समाज विघातक सर्व कर्मांचा त्याग करून समाज हिताचीच सर्व कर्मे मनुष्याच्या हातून घडावीत असे सांगून भगवद्भक्तीच्या आस्वादासाठी देहाच्या शुद्ध व पवित्र कर्मावर ते विशेष भर देतात. जगातील संपूर्ण अनीतीचे आणि अधर्माचे मूळ जर कशात असेल तर ते मनुष्याच्या दुष्ट वासनेत आणि पापबुद्धीत. म्हणून समर्थ सांगतात–

"मना वासना दुष्ट कामा नये रे।
मना सर्वथा पापबुद्धि नको रे।
मना सर्वथा नीति सोडू नको हो।
मना अंतरी सार विचार राहो॥"

जीवनात जे मंगलमय आहे, आदर्शवत आहे त्याचाच विचार आणि आचार मनुष्याने केला पाहिजे.

क्रोध, काम, द्वेष, मत्सर, दंभ, लोभ इत्यादी विकार हे भक्तीमार्गात जबरदस्त अडथळे निर्माण करतात आणि शेवटी मनुष्याच्या विनाशास कारणीभूत ठरतात. इंद्रियसुखाच्या लालसेनेही मनुष्य आपली फजिती करून घेत असतो म्हणून समर्थ म्हणतात–

"मना कल्पना ते नको विषयांची।
विकारे घडे हो, जनीं सर्व छी छी॥"

तसेच मृत्यूनंतरही लोक आपले नाव घेतील असेच आपले आचरण असले पाहिजे आणि चंदनाप्रमाणे आपले शरीर झिजवून लोकोपयुक्त कार्य आपल्या हातून घडले पाहिजे. या संदर्भात समर्थ सांगतात–

"देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी।
मना सज्जना हेचि क्रिया धरावी।
मना चंदनाचे परि त्वां झिजावे।
परी अंतरी सज्जना निववावे॥"

संतद्वय–ईश्वर विषयक कल्पना

समर्थ रामदास–

समर्थांना अभिप्रेत असलेला ईश्वर हा केवळ निराकार, आणि अव्यक्त नाही. सृष्टीच्या आणि जगाच्या घडामोडीमध्ये त्याचा सतत सहभाग असतो. तो जगनियंता असून सर्व प्राणी–मात्रांमध्ये त्याचे अस्तित्व आहे. 'सकलकर्ता' हे त्याचे नाव निरंतर चालले आहे. त्यानेच

मेघांच्या माळा उत्पन्न केल्या, चंद्रबिंबाच्या ठिकाणी अमृताच्या कळा ठेवल्या आणि सूर्यमंडळाला तेज दिले. त्यानेच समुद्राला मर्यादा घालून दिली आणि शेषाची स्थापना केली. अंडज, जारज, स्वेदज, व उद्भिज अशा चार खाणी आणि परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी अशा चार वाणी त्यांनीच निर्माण केल्या. ब्रह्मा, विष्णु व शंकर हे त्याचेच अवतार आहेत, तो अनादि व अनंत आहे. असा हा सृष्टिकर्ता सृष्टीपलीकडचा आहे. तो सर्वांमध्ये असून सर्वांहून वेगळा आहे.

" सकळ जगाचा ईश्वरू । म्हणोनी नामे जगदीश्वरू ।
तयापासून विस्तारू । विस्तारला । "

याप्रमाणे तो सर्व जगाचा ईश्वर असून त्याच्यापासूनच सर्व सृष्टीचा विस्तार झालेला आहे. म्हणूनच त्याला जगदीश्वर असेही म्हणतात. हा जगदीश्वर विविध धातू, पाषाण किंवा पाषाणमूर्तीत बंदिस्त नाही. कितीही प्रयत्न केला तरी त्या मूर्तीमध्ये सांपडणे तो शक्य नाही. मात्र उत्कट भक्तीच्या माध्यमातून त्याची ओळख सहजच पटू शकते. या उत्कट भक्तीच्या आधारेच समर्थांना ईश्वराचे अनेक साक्षात्कार झाले. या साक्षात्कारांतूनच त्यांना समग्र विश्वाचे व विश्वनिर्मात्या ईश्वराचे स्वरुप आकलन झाले.

" अलभ्याचा लाभ अकस्मात जाला । देव हा बोलला येकायेकी ।
चहूंकडे मन देवाचे स्वरुप । तेथे माझे रूप हारपले ॥ "

असा त्यांचा अनुभव आहे.समर्थांच्या मते सृष्टीचा निर्माणकर्ता–ईश्वर संपूर्ण सृष्टीमध्ये व्यापलेला असल्याने सर्व–जीवमात्रांची सेवा हीच खरी ईश्वर पूजा होय.

संत तुकडोजी–

तुकडोजी महाराजांचीही ईश्वर विषयक भूमिका समर्थांच्या ईश्वर-विषयक भूमिकेशी मिळती जुळतीच आहे. ग्रामगीतेच्या पहिल्या अध्यायाच्या आरंभीच महाराज म्हणतात–

" ॐ नमोजी विश्वचालका । जगद्वंद्या ब्रह्मांड नायका ।
एकचि असोनि अनेका । भासशी विश्वरूपी ॥ "

आपचि झाला धराधर । उरला मरोनि महीवर ।
अणुरेणूंतूति करिशी संचार । विश्वनाटक नटावया ॥"
आपणचि मंदिर, मुर्ति पूजारी । आपणचि पुष्पे होऊनि पूजा करी ।
आपणचि देवरूप अंतरी । पावे भक्तां ॥"

अशा प्रकारे महाराजांच्या मते ईश्वर केवळ मूर्तीत नसून तो विश्व-व्यापक आहे; सर्व प्राणीमात्रात आहे. मूर्ती ही केवळ त्यांच्या दृष्टि-कोनातून चराचरात वास करणाऱ्या विश्वव्यापक परमेश्वराचे प्रतीक होय. अशा विश्वव्यापक देवाचे दर्शन घडताच आत्मा परमात्म्याशी तादात्म्य पावतो (जीव–शीवाचे मीलन होते) आणि मग–अद्वैत स्थिती प्राप्त होते.

महाराज या संबंधी स्पष्टच सांगतात–

" जेव्हा तुझे दर्शन घडे । उघडती विशाल ज्ञानाची कवाडे ।
मग मी–तू–पणाचे पोवाडे । कोठचे तेथे ?

तात्पर्य असे की, महाराजांना–

' मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी '

म्हणूनच ते ठामपणे सांगतात–

" मंदर मंदर क्या घुमता है । पहिले सेवा कर गरिबोंकी । "

एकंदरीत, दीन–दु:खितांच्या देहात देव शोधून त्यांची निरपेक्ष सेवा हीच त्यांनी खरी ' देवभक्ती ' मानली, आणि याच दृष्टिकोनातून त्यांनी मंदिरात देव शोधणाऱ्या व दीन दु:खितांना दूर लोटणाऱ्या दांभिक भक्तांची कानउघाडणी करताना त्यांना स्पष्ट बजावले की–

" मंदिर में क्या कर रहा । आँखो लगाकर देखता ।
घंटी हलाकर देखता । मुंडी झुकाकर देखता ।
क्या है वहाँ पानी–पत्थर । भगदान उसमें है नही ।
वह भक्त के घर रब रहा । कर दीनकी सेवा तुही ॥"

याचा अर्थ महाराजांना मूर्तिपूजा मान्य नव्हती असे नाही. समर्थ रामदास व संत तुकडोजी या दोनही संतांनी मूर्तीपूजेला मान्यता दिली. समर्थ तर रामाच्या व हनुमानाच्या प्रतिमेची आत्यंतिक निष्ठेने पूजा करीत असत. असे असले तरी या दोनही संतांनी दगड म्हणजेच देव असे मात्र मानले नाही. मूर्तीपूजा वैदिक काळापासून भारतात रूढ आहे. दगडो मूर्तीचे ठायी विशिष्ट देवतेला आवाहन केल्यानंतरच देवत्व येते ही प्राचीन वैदिक धर्माची दृष्टी होती. या दोनही संतांनी मूर्तिपूजेला मान्यता देताना दगड म्हणजे देव नव्हे याची जाणीव सतत जागृत ठेवलेली आहे. तुकडोजी महाराज यासंबंधी स्पष्टच सांगतात–

"याचे ऐकावे उत्तर । प्रेम निर्मावे एका मूर्तीवर ।
तेचि क्रमाने करावे विश्वाकार । हाच हेतु पूजनाचा ।।"

इतकेच नव्हे तर पुढे म्हणतात–

"मनास पाहिजे काही आधार । म्हणोनि आरंभी मानिले साकार ।
देव व्यापिले चराचर । तेथे मूर्ति तद्रूपचि ।।"

मूर्तिपूजेमुळे सदाचाराची व सेवेची स्फूर्ती मिळते आणि विश्व-व्यापक परमेश्वराच्या साक्षात्काराची अनुभूती समाजजीवनात सहजच येते. थोडक्यात म्हणजे केवळ पूजा–अर्चा, व्रत-वैकल्ये करावयास लावणारा किंवा पोथीपुराणाचे पारायण करण्यास सांगणारा देव–धर्म या संत-द्वयाला अभिप्रेत नव्हता म्हणूनच त्यांनी आपला देव हा देवळाच्या चार भितीत बंदिस्त न ठेवता 'देव आहे जगदांतरे' या उदात्त भावनेने प्रेरित होऊन **'देवळीचा देव मेला । अंतरीचा जागवा रे ।'** या वचनाप्रमाणे अंतरीचा देव जागवून त्या देवाला समष्टिस्वरूप दिले. अशाप्रकारे अंतरीचा देव जागवून त्या देवाला समष्टिस्वरूप देणे हाच या संतद्वयाच्या समाज-कार्याचा धार्मिक पैलू होय. या संदर्भातील महाराजांची खालील ओवी लक्षात घेण्यासारखी आहे.

"मंदिरी बैसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गाचे काटे उचलावे ।
दुःखितांशी प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थस्नानाहुनी ।।"

तद्वतच् आपल्या 'धर्म' विषयक कल्पनेचे विश्लेषण करताना महाराज म्हणतात–

" धर्म नही कहता है किसिके बहुबेटीपर निगा करो ।
धर्म नही कहता है किसिके घर लूटो बरबाद करो ।
धर्म नही कहता है किसिके मजहबपर आघात करो ।
धर्म नही कहता है कोईभी जीवोंपर हथियार धरो ॥ "

वरील संपूर्ण विवेचनावरून समर्थ रामदास व संत तुकडोजी या दोन्ही संतांच्या देव व धर्मनिष्ठ विचारांना लौकिक व्यवहाराचे फार मोठे अधिष्ठान असल्याचे दिसून येते. देव–धर्मनिष्ठ विचार आणि लौकिक व्यवहार यांचा सुंदर समन्वय साधून या संतद्वयाने फार मोठे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे मौलिक कार्य आपापल्या काळात केले आहे.

ईश्वर–नाम स्मरण हे स्वानंद–साधन–

ईश्वर–नामाचे महत्त्व दोनही संतांनी विशद केले आहे. समर्थ या संबंधी सांगतात–

" **जयाचेनि नामे महादोष जाती । जयाचेनि नामे गती पाविजे ती ।**
जयाचेनि नामे घडे पुण्य ठेवा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ "

परमेश्वराच्या नामस्मरणाने पापाचे पर्वत देखील उन्मळून पडतात. म्हणून तुकोबांसारखं संतही– " **नाम संकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीचे ।** " असे स्पष्टच सांगतात. तद्वतच् तुकडोजी महाराज देखील ' **मंगलमय नाम तुझे सतत गावू दे** ' अशी ईश्वराजवळ प्रार्थना करतात. ईश्वर–नाम–स्मरणाप्रमाणेच पावित्र्यावर आणि सदाचरणावरही या संतांनी विशेष भर दिलेला आहे. असत्य, चौर्य, दारू, हिंसा, व्यभिचार यामुळे अंतःकरणाचे पावित्र्य भंगत असते म्हणूनच त्या सर्व गोष्टी त्यांनी निषिद्ध मानल्या आणि माणसाच्या मनातील मळ नाहिसा करण्याचे सामर्थ्य फक्त आणि फक्तच ' नामस्मरणा ' त आहे असा शेवटी निर्वाळा दिला.

समर्थ म्हणतात त्याप्रमाणे–

" वेचे कदा ग्रंथिचे अर्थ काही । मुखे नाम उच्चारिता कष्ट नाही ।। "

याप्रमाणे ईश्वर नाम स्मरणासाठी जवळचा पैसाही खर्च होत नाही किंवा देहाला कष्टही पडत नाही. तात्पर्य असे की, या संतांच्या मते नामस्मरणाइतके दुसरे कोणतेच साधन सोपे वा स्वस्त नाही. नामस्मरणाने विकाराकडे वळलेले मन आपोआपच नियंत्रित होते. व अंत:करणाला उच्च स्वरुपाचा आनंद प्राप्त होतो. या दृष्टीने नामस्मरण हे स्वानंद साधन समजावयास हरकत नाही. म्हणूनच **' हरेराम हा मंत्र सोपा जपा रे '** असा संदेश समर्थ वारंवार देतात आणि **" हरी नाम हे फुकाचे । जप मानवा तू वाचे "** असे तुकडोजी महाराज लोकांना पुन्हा–पुन्हा सांगतात.

संतद्वय–प्रपंच–परमार्थ विचार

समर्थ रामदास

परमार्थ हेच समर्थांचे मुख्य ध्येय असले तरी त्यांनी **" आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका । "** असे स्पष्ट म्हटले आहे. यावरून आधी प्रपंच नीट करूनच नंतर परमार्थ साधावा असे त्यांचे स्पष्ट मत दिसते. समर्थांच्या मते प्रपंच हा इंद्रियजन्य अनुभवाच्या कक्षेत असून परमार्थ हा इंद्रियजन्य अनुभवातीत असलेल्या सत्याची प्रचीती होय. प्रपंचाला पूर्ण सत्य मानून त्याच्या उपाधीत अडकून पडणाऱ्या प्रापंचिक पुरूषाला परमार्थ साधणे कठीण आहे. परंतु प्रपंच हे पूर्ण सत्य नव्हे असे मानून त्याच्या पलीकडे असणाऱ्या शाश्वताचा शोध घेणाऱ्या प्रापंचिक पुरूषालाही परमार्थ सहजच साधता येतो. असा परमार्थ साधण्यासाठी प्रपंचाचा त्याग करण्याची मुळीच गरज नाही; किंवहुना प्रपंचाचा त्याग करून जर कोणी परमार्थ साधण्याचा प्रयत्न करतील तर ते दु:खी होतील असे समर्थांचे स्पष्ट मत आहे–

" प्रपंच सोडून परमार्थ कराल । तेणे तुम्ही कष्टी व्हाल ।
प्रपंच-परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ।।

प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंटचाला । परमार्थ कैचा ? ॥"

प्रपंच हा अशाश्वत असून परमार्थाचे स्वरूप मात्र 'ना आदि, ना अंत' अशा शाश्वत स्वरूपाचे आहे. प्रपंचाची ही अशाश्वती व परमार्थाची शाश्वती ओळखूनच समर्थांनी प्रपंचाच्या आसक्तीपासून अलिप्त राहण्याचा व परमार्थ योग साधण्याचा उपदेश केलेला आहे.

समर्थ म्हणतात "**विधीने विषयो घ्यावा । अविधि नसता बरे ।**" प्रपंचाच्या उपाधीत आसक्त न होता विधिपूर्वक विषयोपभोग घेणे हे परमार्थाच्या आड न येता परमार्थाला पूरकच ठरतात. म्हणून त्यांनी सांगितलेला 'नेटका प्रपंच' म्हणजे स्त्री, संपत्ती, सत्ता इत्यादी विविध विषयोपभोगांच्या आहारी न जाता व त्यात आसक्त न होता त्यांचा संयमित स्वरुपात उपभोग घेणे होय. त्यालाच ते अनासक्तीचा प्रपंच म्हणतात. असा अनासक्तीचा प्रपंच करून परमार्थमार्ग सहज सुलभ करता येतो. उलट आसक्तीच्या प्रपंचामुळे मनुष्य परमार्थाला दुरावतो. समर्थ स्पष्टच सांगतात–

"प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥"

जो मनुष्य आपली प्रापंचिक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत नाही, तो परमार्थ–मार्गातही बेजबाबदारच असणार ! राष्ट्रसंतही सांगतात– '**व्यवहार न कळला ज्याला । परमार्थ कशाला त्याला ?**' अर्थात–परमार्थ प्राप्तीसाठी संसार सोडण्याची वा संन्यास घेण्याचीकिंवा गिरीकंदरात जाऊन ध्यान लावून बसण्याची गरज नाही. नेटका प्रपंच करूनही परमार्थ साधता येतो. तो नेटका प्रपंच मात्र अनासक्तीचा व परोपकाराचा असावा एवढेच समर्थांचे सांगणे आहे. असा अनासक्ती व परोपकारी मनुष्य प्रपंचाच्या उपाधीत स्वतःला अडकवून न घेता मुक्त असतो आणि स्वतः बरोबरच तो समाजाचा, राष्ट्राचा, विश्वाचा, ईश्वराचा व अंतिम सत्याचा विचार करीत असतो. आपल्या एकवीस समासी जुन्या दासबोध ग्रंथात समर्थ म्हणतात–

" अरे जयासी परमार्थ व्हावा । तेणे प्रपंच त्यजावा ।
प्रपंची परमार्थ करावा । तो ठाकेना सर्वथा ॥ "

अरे ! ज्याला परमार्थ हवा असेल त्याने प्रपंचाचा त्याग करावा, प्रपंचात राहून परमार्थ साधणे शक्य नाही. संत तुकारामांचेही या संदर्भातील असेच विचार आहेत. ते म्हणतात–

" प्रपंच–परमार्थ संपादीन दोन्ही । एकही निदानी न घडे त्यासी ।
दोन्ही पेवावरी ठेवू जाता हात । होय अपघात शरीराचा ॥ "

अर्थात या दोन्ही संतांच्या ' प्रपंच ' या शब्दाचा अर्थ प्रपंचाची आसक्ती असाच आहे. म्हणजेच परमार्थासाठी प्रपंचाचा त्याग अभिप्रेत नसून प्रपंचातील आसक्तीचा त्याग अभिप्रेत आहे. जोपर्यंत मन प्रपंचातील आसक्तीने भरून आहे, तोपर्यंत त्या मनात परमार्थ प्रवेश करूच शकणार नाही. म्हणून परमार्थासाठी मनातील प्रपंचाची आसक्ती काढून टाकली पाहिजे. ज्याला या प्रपंचाच्या आसक्तीचा त्याग शक्य नाही, तो परमार्थापासून दूरच राहणार ! अर्थात मनातील ही प्रपंचाची आसक्ती काढून टाकणे अवघड असले तरी अशक्य नाही. समर्थ यासाठी उपाय सुचवितात–

" गृहासी आग लागली । देखोनि का बोंब केली ।
लोकांची मान्दी मिळविली । आगी विझवाया कारणे ॥
तैसी परमार्थी बोंब मारावी । काही काढाकाढी करावी ।
हळू हळू सोडवावी । मिठी प्रपंचाची ॥ "

अशाप्रकारे सर्वसंग परित्यागाने परमार्थ प्राप्तीच्या भानगडीत पडण्या-ऐवजी प्रपंचाविषयीची मनातील आसक्ती हळू हळू कमी करीत न्यावी म्हणजेच प्रपंच परमार्थमय होतो आणि असा परमार्थमय प्रपंच हा आपल्या जन्माचे सार्थक करतो.

परमार्थमय जीवनाचे महत्व विशद करताना समर्थ म्हणतात–

" परमार्थी जो राज्यधारी । परमार्थी नाही तो भिकारी । "

समर्थांच्या मते असा हा परमार्थ–मार्ग गरीब-श्रीमंत, स्त्री–पुरुष, गृहस्थाश्रमी–संन्याशी, वृद्ध–तरूण या सर्वांसाठीच मोकळा आहे–

"प्रवृत्ती आणि निवृत्ती । प्रपंची आणि परमार्थी ।
गृहस्थाश्रमी वान प्रहस्ती । संन्यासादिक ।।
वृद्ध, तरूण आणि बाळ । पुरूषस्त्रियादिक सकल ।
अखंड ध्याति तमाळनिळ । अंतर्यामी ।।"

एकंदरीत, समर्थांच्या मते परमार्थासाठी प्रपंचाचा त्याग आवश्यक नसून निवृत्तीचा प्रपंच परमार्थाला पूरकच ठरतो. म्हणून प्रपंचाच्या उपाधीत गुंतून न पडता त्याचा विशुद्धपणे उपभोग घेत असतानाच इंद्रियजन्य अनुभवातीत शाश्वताची–सत्याची–ईश्वराची प्रचीती घ्यावी असे ते सुचवितात. अशी ही समर्थांची प्रपंच–परमार्थ समन्वयात्मक भूमिका आहे.

संत तुकडोजी

समर्थ रामदासांप्रमाणेच संत तुकडोजींचीही प्रपंच–परमार्थ-विषयक समन्वयात्मक भूमिका आहे. अनासक्त वासनारहित परोपकारी वृत्तीने केलेला प्रपंच म्हणजेच परमार्थ मार्ग होय असा समर्थांप्रमाणेच त्यांचाही दृष्टिकोन आहे.

"वासना हाचि भवसागर । आसक्ति हाचि खरा संसार ।
ज्ञाने त्यांचा पावणे पार । हाचि मोक्ष ।।"

असे संसाराचे स्वरुप स्पष्ट करून–

"झाला वासनेचा नाश । त्यासीच नाम असे संन्यास ।"

असा संन्यासाचाही अर्थ ते सांगून टाकतात. त्यांच्यामते परमार्थासाठी संन्यास स्वीकारण्याची आवश्यकता नाही. प्रपंचात राहूनही मनुष्याला परमार्थ साधता येतो असा इतर संतांचाही दृष्टिकोन असल्याचा निर्वाळा ते देतात–

"ते संतजनांनी जाणले । म्हणोनीच कळवळोनि सांगितले ।
रांडापोरे सोडू नका बोलिले । परमार्थासाठी ।।"

समर्थांप्रमाणेच तेही समृद्धीचा संसार करायला सांगतात. परंतु हा समृद्धीचा संसार मात्र त्यांच्या मते उत्तम आदर्शांच्या अधिष्ठानावर उभा असावा. यासंबंधी ते म्हणतात–

"करावे सुखाने संसार । करावा अतिथींचा सत्कार ।
बांधा सोपे, माडया घर । उत्तम वेव्हारे धन जोडा ॥"

तसेच वैराग्याविषयी ते सांगतात–

बायका मुलांची चिंता लागली । म्हणोनि वैराग्याची दीक्षा घेतली ।
ते वैराग्य नव्हे कुचराई केली । सोंग घेऊन वैराग्याचे ॥

याप्रमाणे बायका मुलांच्या कटकटीमुळे पत्करलेले वैराग्य हे खरे वैराग्य नसून तो वैताग आहे. वैताग हा क्षणजीवी असतो. प्रतिकूल परिस्थिती निवळली की, असा मनुष्य पुन्हा प्रपंचात आसक्त होतो. अशा वैतागातून उद्भवलेल्या वैराग्याविषयी समर्थांप्रमाणेच महाराजही एक गमतीदार गोष्ट ग्रामगीतेतून सांगतात. प्रपंचाचा वीट आल्याने वैराग्य पत्करणारा मनुष्य शेवटी आसक्तीमुळे प्रपंचातच गुंततो असा गोष्टीचा सार सांगून महाराज म्हणतात–

"कोणी तुज बोध दिला एकदेशी । "त्याग संसाराशी" म्हणोनीया ।
बहू त्यागियेला संसार आपुला । दुजियांचा केला नाश त्यांनी ।
लंगोटी लावली वासना ना गेली । अपकीर्ती केली लोकामाजी ।
तुकडयादास म्हणे नको सोडू घर । मन हे जोवर स्थिर नाही ॥"

प्रपंचात राहून परमेश्वराचे चिंतन करावे म्हणजे त्या चिंतनातूनच मनुष्याच्या हातून सेवा, परोपकार, भक्ती इत्यादी सदाचाराच्या गोष्टी घडू लागतात. असा सदाचार–संपन्न व अनासक्तवृत्तीने घडणारा प्रपंच शेवटी परमार्थरूप होतो.

"नेटका ऐसा प्रपंच झाला । तरि परमार्थ त्यातचि साधला ।"

असे ते स्पष्टच सांगतात. समर्थांप्रमाणेच महाराजांच्या मतेही **'नेटका प्रपंच'** म्हणजे प्रत्येकाने आपले कर्तव्य निष्ठेने निरपेक्षतेने, अनासक्तीने व प्रामाणिकपणे पार पाडणे होय. आपण ज्या समाजात

वावरतो, वाढतो त्या समाजाची प्रतारणा आपल्या हातून घडू नये, आणि **"जनता ज्याला देवरूप कळली । त्याचीच भक्ती देवा पावली ॥"** या भावनेने त्या समाजाला परमेश्वरस्वरूप मानून त्याची निरपेक्ष सेवा आपल्या हातून घडावी व अंतिम सत्याचा शोध घेता यावा एवढाच त्यांच्या मते परमार्थाचा खरा अर्थ आहे. हा परमार्थ साधण्यासाठी प्रपंचाचा त्याग करण्याची मुळीच आवश्यकता नाही असे महाराज सांगतात. उलट एखादा मनुष्य प्रपंचाचा त्याग करून देवाचा पुजारी वनला असेल, परंतु त्याचे वर्तन व व्यवहार जर चांगले नसतील तर त्याला परमार्थ प्राप्त होऊ शकत नाही. म्हणून महाराज सांगतात की–

"प्रामाणिकतेने करणे काम । हेचि आमुचे ईश्वर नाम ।
सर्व जीवमात्रासी ऐक्य प्रेम । धर्म हा आमुचा ॥"

भगवद्गीतेत कर्तव्यबुद्धीने प्रामाणिकपणे कर्माचरण करणे हीच जीवनाची इतिकर्तव्यता मानलेली आहे. हाच विचार ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास आणि आपल्या काळातील तुकडोजी या सर्व संत-मंडळींनी सांगितला आहे.

एकंदरीत, परमेश्वरप्राप्तीसाठी रानावनात जाण्याची किंवा परमार्थासाठी प्रपंच सोडण्याची गरज नाही. प्रपंचात राहूनही केवळ प्रामाणिकपणे व वासनाविरहित वृत्तीने आपले कर्तव्य पार पाडल्याने परमार्थ प्राप्त होऊ शकतो–असेच समर्थांप्रमाणे महाराजांचे विचार आहेत. प्रपंचाविषयीची आसक्तीच मनुष्याच्या दुःखाला कारणीभूत ठरते म्हणून या आसक्तीपासून अलिप्त राहूनच प्रपंच करावा म्हणजे प्रपंचाचे गुणदोष चिकटत नाही असे ते म्हणतात. प्रपंचाची आसक्ती मनुष्याच्या मनात असेल, तोपर्यंत त्या मनात परमार्थवृत्ती उद्भवणार नाही. पोटात अन्न भरण्यासाठी आधी जसे पोट रिकामे असावे लागते, तसेच मनात परमार्थाचे विचार प्रवेशण्यासाठी मनही आसक्तीपासून अलिप्त असणे आवश्यक असते. तात्पर्य हेच की, प्रपंच परमार्थमय करण्यासाठी त्या प्रपंचातील आसक्ती नाहिशी व्हावी लागते. त्याशिवाय त्या आसक्तीपूर्ण प्रापंचिक जीवनात परमार्थ प्रवेश करूच शकत नाही. अशाप्रकारे सर्वसंग

परित्यागानेच परमार्थ प्राप्ती होते हा समज चुकीचा असून प्रपंचाच्या आसक्तीतून मन अलिप्त ठेवणाऱ्या व यमनियमाने वागणाऱ्या प्रापंचिक व्यक्तिचेही जीवन परमार्थमय होऊ शकते असेच समर्थांप्रमाणे राष्ट्र-संतांचेही विचार आहेत.

गोरा कुंभार, सावता माळी, सेना न्हावी, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम या संतांनी अनासक्त वृत्तीने व परोपकार प्रवृत्तीने प्रपंच केला म्हणूनच त्यांचा प्रपंच परमार्थरुप झाला.

संतद्वय-वैचारिक साम्य

दोन्ही संतांची प्रपंच-परमार्थ विषयक समन्वयात्मक भूमिका सारख्याच स्वरूपाची आहे. परमार्थासाठी प्रपंच-त्यागाची आवश्यकता नसून आपल्या इंद्रियजन्य अनुभवातीत सत्याची प्रचीती घेताना प्रपंचातच परमार्थ साधता येतो असे दोन्ही संतांचे विचार आहेत. काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, अहंकार या षड्रिपुंनी ग्रासलेल्या मानवी मनात प्रपंचाविषयीची निर्माण झालेली आसक्तीच मनुष्याच्या दुःखाला कारण ठरत असून ती त्याला परमार्थापासून परावृत्त करीत असते असे समर्थांप्रमाणेच तुकडोजी महाराजांचेही मत आहे.

षड्रिपूंच्या विवेचनात काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ या पाच रिपूनंतर **'प्रपंच सहावा वैरी । परम अंतरी दूरी'** असे समर्थ स्पष्टच सांगतात; **'प्रपंच सहावा वैरी'** याचा अर्थ समर्थांच्या मते 'नेटका प्रपंच' हा सहावा वैरी नसून प्रपंचातील आसक्ती किंवा वासनांना उद्देशून त्यांनी असे उद्‌गार काढलेले आहेत. तुकडोजी महाराजांचेही या संबंधी असेच विचार आहेत. म्हणूनच ते-

"मुक्त तो वासनेतुनि मोकळा । कोठे नाही आसक्तीचा लळा ।
ओळखुनी आत्मस्वरुपी सकळा । विलीन होई ।।"

असे सांगतात. दोन्ही संतांनी निवृत्तीपर प्रपंचाचा पुरस्कारच केलेला आहे. त्यांच्या मते हा निवृत्तीपर प्रपंच परमार्थाला बाधक न ठरता पूरकच ठरतो. माणूस संन्याशी असो वा संसारी (गृहस्थाश्रमी) प्रत्येकाला

प्रपंच हा लागलेलाच आहे; त्यातून कोणाचीही सुटका नाही. म्हणून प्रपंचात आसक्त न होता तो निवृत्तीपर वृत्तीने करावा असेच दोघांनाही सांगायचे आहे. यासंबंधी समर्थ म्हणतात–

"प्रवृत्तीचा केला त्याग । सुहृदांचा सोडिला संग ।
निवृत्तीपथे ज्ञानयोग । साधिता झाला ॥"

तुकडोजी महाराजांचेही या संदर्भातील विचार लक्षात घेण्यासारखे आहेत.

"प्रवृत्ति सब निवृत्ती हो, वही सही निवृत्ती है ।
घडी पल बने प्रवृत्ति ओ, निवृत्ती वह अतृप्ती है ।
विषयांध यदि इंद्रियरहित, होगा तभि अनासक्त है ।
आसक्ती जब पूरी छुटें, तब ग्यानि होता मुक्त है ।

अशाप्रकारे दोन्ही संतांनी निवृत्तीनिष्ठ प्रवृत्तीचा पुरस्कारच केलेला आहे. दोन्ही संतांच्या मते निवृत्ती म्हणजे सर्वसंगपरित्याग नसून **'जैसे जळी जळे न लिपे पद्मपत्र'** याप्रमाणे अलिप्ततेची व अनासक्तीची वागणूक होय. अशाप्रकारे दोन्ही संतांनी निष्काम कर्मयोगाचा सक्रीय पुरस्कार करून प्रपंचातच परमार्थ साधण्याचा मार्ग सांगितला आहे. केवळ इंद्रियजन्य अनुभवाने मिळणारे सुख हे क्षणभंगुर असल्याने कर्म, ज्ञान आणि भक्ती यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या शाश्वत सुखाचाच दोन्ही संत पुरस्कार करतात. परंतु त्या शाश्वत सुखप्राप्तीसाठी प्रपंच त्यागाचा आग्रह ते करीत नसून अनासक्त वृत्तीने प्रपंच करावा एवढेच ते वारंवार सुचवितात. अनासक्तवृत्तीने प्रपंच हीच त्यांच्यामते निवृत्ती होय. निवृत्तीमार्ग हा शाश्वताचा शोध घेत असतो. प्रपंचातून–ऐहिकातून निवृत्त होणे म्हणजे निवृत्ती.

'झाला वासनेचा नाश । त्यासचि नाम असे संन्यास'।

याप्रमाणे संन्यास घेण्यासाठी संसार सोडण्याची व भगवे कपडे परिधान करण्याची गरज नसून संसारात राहूनही अनासक्त व वासना-विरहित वृत्तीने वागून आपला प्रपंच परमार्थमय करता येतो.

प्रपंचासाठी पैसा आवश्यक आहे परंतु तो कष्टाने व प्रामाणिकपणे मिळविला पाहिजे यावर दोन्ही संत विशेष भर देतात. समर्थ म्हणतात–

"द्रव्य पाहिजे वस्त्राला । द्रव्य पाहिजे खर्चाला ।
द्रव्य पाहिजे लग्नाला ।"

असे जर आहे तर मग ते "कष्ट करोनी मिळवावे । का जोगी होऊनी जावे ?" । तुकडोजी महाराजही यासंबंधी सांगतात–

"कोण म्हणे धन करू नये गाठी । हिंडावे कपाटी हाटी सारे ।
मागोनिया भीक कोण पुरवील ? संसार होईल कैसा याने ? ।
शेत बागाईत कशाने करावे ? । धनाविण व्हावे फकीरचि ।
तुकड्यादास म्हणे धन-जोड करा । सत्याच्या व्यापारा करोनिया ।।"

अशाप्रकारे प्रपंच–परमार्थ समन्वयात्मक भूमिका स्वीकारून दोन्ही संतांनी कष्टाचा, प्रामाणिकपणाचा, परोपकाराचा, सावधानतेचा, जवाबदारीचा, अनासक्तीचा आणि अंतिम सत्याच्या किंवा शाश्वताच्या प्रचीतीचा 'नेटका प्रपंच' करण्याचा पुरस्कार केलेला आहे.

समर्थ रामदासांचा 'उत्तम पुरुष'

समर्थांनी वर्णिलेली उत्तम–पुरुष लक्षणे दासबोधाच्या काही दशकांमध्ये आलेली आहेत. अभ्यासयोग्य अशा उत्तम गुणांचे वर्णन करताना वाराव्या दशकाच्या दहाव्या समासातील ओवी १ ते ३७ मध्ये समर्थ सांगतात–

आपण स्वत: पोटभर जेवतो आणि अन्नाचे महत्त्व जाणून ते वाया न घालविता उरलेले अन्न इतरांना वाटून देतो त्याप्रमाणे उत्तम पुरुष हा प्रथम स्वत: ज्ञानाने तृप्त होतो आणि मगच तो ज्ञानदानाचे कार्य अंगिकारतो. इतरांना ज्ञान सांगून त्यांनाही ज्ञानी बनविण्याचा प्रयत्न करतो. 'बोले तैसा चाले' अशी त्याची वागणूक असल्याने सर्व लोक त्याचा आधार करतात. जेवढे म्हणून काही उत्तम गुण असतील त्या सर्व गुणांना अंगी बाणण्याचा त्याचा प्रयत्न असतो. 'लोकांसांगे ब्रम्हज्ञान । स्वत: कोरडे पाषाण' अशी त्याची विसंगत वागणूक नसते. स्वत: आचरणात आणल्याशिवाय तो दुसऱ्याला शहाणपणा शिकविण्याच्या भानगडीत पडत नाही. स्नानसंध्या, देवपूजा, जपजाप्य, ध्यान ही सर्व

उपासना तो अत्यंत एकाग्र चित्ताने करतो. परोपकार हाच त्याचा धर्म असतो.

'शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे ।
उणे पडो नेदावे । कोणि येकाचे "

असेच व्रत जणु त्याने स्वीकारलेले असते. समर्थ बऱ्याचदा बहुतांचे असा शब्दप्रयोग करतात. उदा. प्रस्तुत ओवीत बहुतांच्या कार्यास यावे असे ते म्हणतात. 'सर्वांच्या' कार्यास यावे असे म्हणत नाही. कारण सर्वांच्या म्हटले की, त्यात वाईट काम करणाऱ्याचाही अंतर्भाव होऊ शकेल. म्हणून चांगले काम करणाऱ्यालाच आपण सहकार्य करावे असेच समर्थांना अभिप्रेत आहे. यावरून समर्थ शब्द किती काळजीपूर्वक योजतात हे दिसून येते.

उत्तम पुरुष हा अडलेल्यांच्या किंवा गांजलेल्यांच्या अडचणी लक्षात घेऊन यथाशक्ती त्यांच्या उपयोगी पडतो. कटु शब्द बोलून तो कधी कोणाचे अंतःकरण दुखवीत नाही, उलट मृदू भाषणाने सर्वांना संतुष्ट ठेवतो. तो दुसऱ्याच्या दुःखाने स्वतः दुःखी होतो आणि दुसऱ्याचा संतोष पाहून स्वतः संतोष पावतो. समाजात दुसऱ्यांचे दुःख पाहून आनंद मानणारे आणि त्यांचा उत्कर्ष पाहून जळणारे अनेक असतात. या प्रवृत्तीच्या संदर्भात समर्थांचे प्रस्तुत वचन अत्यंत उद्‌बोधक ठरावे असे आहे. सर्वांनाच त्यांच्या अपराधाविषयी क्षमा करणे शक्यही नसते आणि उपयुक्तही नसते. याची जाणीव ठेऊन व्यक्ती, प्रसंग व त्याचा अपराध पाहून सदैव क्षमाशील वृत्ती तो बाळगतो. स्वजनांप्रमाणेच परक्यांनाही तो आपल्या प्रेमळवृत्तीने आपलेसे करून घेतो. दुसऱ्याच्या अंतःकरणाचा वेध घेऊन व त्याचे मनोगत जाणूनच वागत असतो. लोकांची अनेकविधप्रकारे तो परीक्षा पाहात असतो. वायफळ बडबड त्याला आवडत नाही. कामाचे व मुद्याचेच तो बोलतो. संताप हा तर त्याच्या सावलीला देखील उभा राहात नाही. तो सदैव उद्योगी असतो. आळस त्याला ठाऊकच नसतो. आपल्या स्वतःच्या संसारात तो अतिशय सावध असतो, अतिशय जबाबदारीने वागतो. 'मरण' हे अटळ आहे. आणि आपण एक-दिवस मरणार याची सतत

जाणीव दृष्टीपुढे ठेऊन तो मरणोत्तर काळात आपली सर्वत्र कीर्ती पसरेल अशीच आपली वागणूक ठेवतो. मरणाचे सदोदित स्मरण ठेऊन हरी-भजनी तो नेहमी तत्पर असतो. 'नियमितपणा' हा त्याचा बाणा असतो. त्याच्या नियमितपणामुळे लोकांच्या आदरासही तो पात्र ठरतो. अशा उत्तम-पुरुषाच्या भक्तीने साक्षात भगवंत देखील संतुष्ट पावतो. लोकांनी निंदा केली काय किंवा स्तुती केली काय, त्याचा त्याच्यावर लवलेशही परिणाम होत नाही. निंदा-स्तुतीच्या तो पलीकडे गेलेला असतो. दुर्जना-पासून दोन हात दूर राहण्यापेक्षा प्रसंगी त्याच्याशी मिळून त्याच्यात परिवर्तन घडविण्याचा तो निरंतर प्रयत्न करीत असतो. ज्ञान आणि वैराग्य हेच त्याचे वैभव. स्वतःच्या कष्टाने तो इतराना सुखावत असतो.

'कीर्ती पाहो जाता सुख नाही । सुख पाहता कीर्ती नाही'

याची सतत जाणीव त्याला असते. म्हणूनच तो इतरांनाही कष्ट करीत राहण्याची प्रेरणा देत असतो. सदैव विवेक जागृत ठेऊन वागतो. किंबहुना विवेक हेच त्याचे वैभव असते. कधीही कोणाचे अंतःकरण दुखवत नाही. काम स्वतःचे असो की दुसऱ्यांचे, ते तो त्यात जीव ओतून करीत असतो. स्वतःहून दुसऱ्याची जाणीव करतो म्हणूनच त्याच्या हातून सहसा अनिष्ट कार्य घडत नाही. म्हणजेच तो सर्वांना आत्मवत पाहतो. आपणास कोणी दुखविले किंवा नुकसान केले तर जसे वाईट वाटते, तसेच इतरांच्या बाबतीत असते याची तो नेहमी जाणीव ठेऊन वागतो शब्दांना तो फारच जपतो. शब्द हे शस्त्र आहे. त्यामुळे कोणालाही इजा होईल असे शब्द तो उच्चारत नाही. दुसऱ्याला दुःख देणारी वाणी ही अपवित्र होय असेच तो समजतो. अशी अपवित्र वाणी एखादेवेळी आपला स्वतःचाच घात करण्यास कारणीभूत ठरू शकते. जसे आपण पेरतो तसेच पुढे उगवते याची निरंतर जाणीव ठेऊन तो वागतो. आपल्या क्रियेची प्रतिक्रिया किंवा आघाताचा प्रत्याघात होतो याची पूर्ण कल्पना त्याला असते. उत्तराला प्रत्युत्तर स्वाभाविकच म्हणून तो कोणाशी कधी कठोर बोलत नाही. आपल्या कर्तृत्वाने अनेकांना सुखी करण्यातच तो आपल्या जीविताची इतिकर्तव्यता मानतो. परपोडा देणे ही त्याच्या दृष्टीने राक्षसी कृती असते. दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोर वचने या सर्वांपासून तो स्वतः अलिप्त

असतो. गुण कोठेही आढळो, त्याचा तो स्वीकार करतो. स्वत:प्रमाणेच इतरांनाही सन्मार्गाला लावून व अशा सद्‌गुणी लोकांची संघटना उभारून तो आपल्यानंतरही ते कार्य सातत्याने सुरू असावे याची खबरदारी घेतो. लोकांची सशक्त संघटना निर्माण व्हावी व तिच्या सामर्थ्याचा समाजाला सदुपयोग व्हावा म्हणून तो समुदाय जमवून मोठेमोठे उत्सव आयोजित करतो.

उत्तम पुरुषाची काही लक्षणे दासबोधाच्या अठराव्या दशकातही आलेली आहेत. वस्त्रालंकाराने लोक आपले शरीर भूषवितात त्याप्रमाणे उत्तम पुरुष हा विचार, विवेक व राजकारण यांनी आपले अंत:करण सुशोभित करीत असतो. शरीर कितीही सुंदर, तेज:पुंज आणि नानाविध वस्त्राअलंकारने विभूषित असेल, परंतू अंत:करणात चातुर्यच नसेल तर त्याचा काय उपयोग याची जाणीव ठेऊन तो सतत वागत असतो. तो कधीही एकटोकी भूमिका घेत नाही व दृढनिग्रही भूमिका स्वीकारीत नाही. समर्थ स्पष्टच सांगतात–

" अति सर्वत्र वर्जावे । प्रसंग पाहोन चालावे ।
हटनिग्रही न पडावे । विवेकी पुरुषे ॥ "

कारण अशा हट्टी व एकटोकी भूमिकेमुळे तट पडतात व कार्य सिद्धीस जात नाही.

अशा गुणांनी युक्त असणारा उत्तम पुरुष सर्वांना हवाहवासा वाटतो. सर्व लोक त्याच्यावर अंत:करणापासून प्रेम करतात. सुंदर अक्षर, शुद्ध वाचन, या सर्व गोष्टी त्यांच्या ठायी असतात. नेहमी सत्संगतीत राहणेच त्याला आवडते. तो जेथे जेथे जातो तेथे तेथे पूर्वी अनेकदा येऊन गेला असला तरी नवीनच आल्याप्रमाणे त्याचा सत्कार होतो. मूर्ख-पणाच्या संशयकल्लोळाला त्याच्या मनात मुळीच थारा नसतो. मुर्खत्वाच्या गुंत्यात तो कधीच अडकत नाही. अशा उत्तमपुरूषांची कीर्ती त्याच्या कार्य–कर्तृत्वाने सर्वत्र पसरते. त्याच्या या उत्तम गुणांमुळे तो जगमित्र बनतो. सदैव नीटनेटका व व्यवस्थित वागतो. तो ' लोकमान्य ' झाला असल्याने लोक त्याला दोष लावीत नाहीत. अशा प्रकारे हा उत्तम पुरुष म्हणजे एकप्रकारचा धगधगीत पुण्यदायी असा महात्माच असतो.

नित्य परोपकार हाच त्याचा बाणा असल्याने त्याला जगात कोणत्याच गोष्टीची कमी पडत नाही. अध्यात्मविद्येविषयी त्याला उपजतच आवड असते. सर्वांशी तो नम्रतेने वागतो व मनोगत राखून बोलतो. कोणाचे कधीही कमी पडू देत नाही. सदैव न्यायनीतीने व मर्यादेने वागून भजना-पूजनादि सत्कर्मात आपला वेळ सार्थकी लावतो. अशा उत्तम गुणांनी युक्त पुरूषाच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब समाजजीवनात पडून तो समाजात सूर्यासारखा साजरा संजीवनप्रद, प्रकाशमय, उत्साहवर्धक व उत्कर्षकारक ठरतो. कर्म उपासना, ज्ञान, वैराग्य हे सर्व विधिपूर्वक कसे करावे हे त्याला माहीत असल्याने त्याची बुद्धी कधीही विचलित होत नाही. अशाप्रकारे– समर्थ अशा उत्तम पुरुषाविषयी म्हणतात–

" पाहतां अवघे उत्तम गुण । तयास वाईट म्हणेल कोण ?
जैसा आत्मा संपूर्ण । सर्वांघटी । "

सर्वांघटी आत्माराम (ईश्वर) नांदतो त्याप्रमाणे तो सर्वांतर्यामीं प्रिय होऊन बसतो. त्याचा प्रत्येक गुण हा उत्तमच वाटतो. तो सदासर्व-काळ दुसऱ्यांच्या सुखाचीच चिंता वाहत असतो.

समर्थांनी उत्तम पुरुषाची जी लक्षणे सांगितली आहेत. ती समर्थांचीच लक्षणे असावीत असे वाटते. 'आई चिंता वाहातो विश्वाची' असे अगदी लहानपणी आईला सांगणारा नारायण ज्ञानेश्वरांच्या 'हे विश्वचि माझे घर' अशा विशाल वृत्ती प्रमाणे मनुष्याने वागावे म्हणजे तो उत्तम पुरुष ठरून सर्वांच्या आदरास पात्र ठरतो असे सांगतात. अशा उत्तम पुरुषाची वासना निर्लोभ न निष्कांचन असते.

" मना कल्पना ते नको विषयांची
विकारे घडे हो जनी सर्व छी छी "

याची सतत जाणीव बाळगून तो जगात वावरतो. एकंदरीत–

' देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी । मना सज्जना हेचि क्रिया धरावी ।
मना चंदनाचे परि त्वां झिजावे । परी अंतरी सज्जना निववावे ' ।

अशी उत्तम पुरुषाची वर्तणूक असते. म्हणूनच मृत्यू नंतरही अशा उत्तम पुरुषाचे लोक नाव घेतात. अशा प्रकारे ज्ञान, वैराग्य, परोपकार, सामर्थ्य यांचा साक्षात्कार उत्तम पुरुषाच्या स्वभावात आढळून येतो.

तुकडोजी महाराजांचा ' आदर्श प्रचारक '

समर्थ रामदासांनी ' दासबोधा ' तून उत्तम पुरुषाची लक्षणे वर्णन करून ती लक्षणे आत्मसात करण्याचा लोकांना जसा उपदेश केलेला आहे तसाच आदर्श प्रचारक बनून आत्मोन्नती व समाजोद्धार करण्याचा उपदेश तुकडोजी महाराजांनीही आपल्या ग्रामगीतेतून केलेला आहे.

महाराजांच्या मते आदर्श प्रचारकाचा सर्वश्रेष्ठ गुण म्हणजे ' सेवाभाव ' हा होय. आपल्या सेवाभावी वृत्तीने तो लोकांची मने जिंकून घेतो. त्याचे वर्णन वेचक शब्दांत करताना महाराज म्हणतात–

" दिसे बिचारा साधामोळा । परि हृदयी कार्याचा जिव्हाळा ।
हवा-हवाच वाटे सकळा । सेवागुणे ॥ "

आदर्श प्रचारकाच्या हाती सदैव काम व मुखी नाम असते. त्याच्या सेवाभावामुळे व कार्यामुळे लोक आपोआपच प्रभावित होतात. त्याच्याजवळ वाक्चातुर्य नसेल, दुसऱ्याचे मुद्दे खोडून काढण्याचे पांडित्यही नसेल, परंतु त्याची सेवा ही शब्दापेक्षाही जास्त बोलकी असते. असे आदर्श सेवाभावी प्रचारक आपल्या अंगच्या गुणांमुळे देशाचे नाव उज्ज्वल करीत असतात. असे आदर्श प्रचारक म्हणजे 'मूर्तिमंत त्यागाचे प्रतीक' ! त्याग आणि सेवा या गुणांमुळे त्याला सामर्थ्य प्राप्त होते आणि मग लोक तो सांगेल तसे वागू लागतात.

लोकोद्धारासाठी हे आदर्श प्रचारक साधू संतांप्रमाणे प्रेमाचाच मार्ग अवलंबितात. सद्धर्म प्रसाराचे व लोकोद्धाराचे कार्य तो आपल्या उज्ज्वल चारित्र्याने व अविश्रान्त परिश्रमाने आपोआप घडवून आणू शकतात. आपल्या प्रेमळ स्वभावाने व सेवाभावी वृत्तीने 'लोकशक्ती' ला उद्दीपित करून त्यांच्या उदात्त आकांक्षांना आवाहन व आव्हान देणारे उद्‌बोधन असे प्रचारक करीत असतात.

लोकशक्तीला संघटित करून तिच्या सुप्त सामर्थ्याची जाणीव करून देण्याचे महान कार्य गौतमबुद्धासारखे प्रभावी प्रचारकच करू शकतात. हातात तलवार धारण न करताही बुद्धाने संपूर्ण जगावर आपला प्रभाव प्रस्थापित केला. असे आदर्श प्रचारक प्रेतातही प्राण ओततात आणि दुर्बलालाही कर्तृत्ववान बनवितात.

असा आदर्श प्रचारक महाराजांच्या मते शीलवान, सत्यनिष्ठ, नम्र व सामर्थ्यवान असावा. त्याला सत्तेची अभिलाषा किंवा धनाचा मोह नसावा. त्याच्या अंतःकरणातून प्रेमाचा प्रवाह अखंड वाहत असला पाहिजे. तो सरळ स्वभावाचा, निर्मळ अंतःकरणाचा, अहिंसक प्रवृत्तीचा, निर्भय वृत्तीचा आणि आदर्श वागणुकीचा असावा. वाईट गोष्टी व दुर्व्यसने त्याला कर्दनकाळ वाटावीत. त्याच्या डोळ्यात सात्विक तेज, बोलण्यात ओज आणि राहणीत वैराग्य असावे. इंद्रिय सुखाच्या आसक्तीचा अवशेषही त्याच्या आचरणात नसावा. सदैव स्मितमुखी राहून तो सेवेसाठी तत्पर असावा. सेवेच्या स्फूर्तीचा झरा त्याच्या अंगातून अखंड वाहत राहिला पाहिजे. 'हे विश्वचि माझे घर' अशी त्याची विशालदृष्टी असावी.

आदर्श प्रचारकाच्या प्रचारात वाऱ्याचा वेग व मेघाचे औदार्य असावे. फाटका असो, तुटका असो, गरीब असो–श्रीमंत असो, विद्वान असो, अडाणी असो, कोणी कोणत्याही पंथाचा असो त्याच्या प्रचारात खंड पडता कामा नये. त्याच्या प्रचारांचा प्रवाह समाजजीवनातील वैगुण्याचे खळगे भरीत पुढेच सरकत राहिला पाहिजे. अशा आदर्श प्रचारकाच्या मार्गात अडथळे उत्पन्न करणारे काही विघ्नसंतोषी लोक असतात. परंतु तो कोणाशीही वितंडवाद न घालता सहनशील वृत्तीने ते सारे सहन करतो. कोणी शिव्या दिल्या तरी त्याच्याशी गोड बोलून व त्याला प्रेमाने समजावून त्याचे हृदय परिवर्तन करण्याचा प्रयत्न करीत असतो.

अशा प्रचारकाजवळ प्रचाराच्या अनेक कला असतात. भजन, प्रार्थना, कथा, कीर्तन, प्रवचन, तुंबडी, पोवाडे इत्यादी. तसेच यात्रा,

उत्सव, मनोरंजन, जन्मतिथि, पुण्यतिथि इत्यादी प्रसंगीही त्याचा प्रचार सुरूच असतो. स्थळ-काळाचे बंधन न ठेवता आपल्या प्रचार कार्याचा प्रेरणास्रोत तो निरंतर प्रवाही ठेवतो.

असे आदर्श प्रचारक ज्या गावात जातात त्या गावात ते तेथे पंढरपुरा-सारखे पावनक्षेत्रच निर्माण करतात. तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतील आठव्या अध्यायात गौतम बुद्धाचे अवतरण उध्दृत केले आहे. गौतमबुद्ध म्हणतात. "भिक्षूनो ! धर्म वादविवादात नाही. तो प्रत्यक्ष वागणुकीत आहे. आधी स्वत: त्याचा आचार करा आणि मग लोकांत त्याचा प्रचार करा सगळीकडे एक सुखशांतीची लाट पसरून जाऊ द्या."

आदर्श प्रचारक सेवेमुळेच सर्वांना हवाहवासा वाटतो. वनपुष्पाप्रमाणे दृष्टिआड राहूनच त्याच्या सेवेचा सुगंध सर्वत्र दरवळत असतो. एखाद्या उत्तुंग इमारतीचे अधिष्ठान हे तिच्या पायातील मजबूत दगडांवरच जसे उभे असते, तसे पायाभरणीत दगडासारखे आदर्श प्रचारकाचे कार्य असते.

आदर्श प्रचारकाची सेवा ही सूर्यासारखी उपकारक व वृक्षासारखी निःपृह आणि निःस्वार्थ असते. सूर्य सर्वांना प्रकाश देतो. परंतु परतफेडीची त्याची अपेक्षा नसते किंवा वृक्ष सर्वांना सावली, फळे व फुले देतो परंतु कोणताही मोबदला मिळावा म्हणून तो हे करीत नसतो, तद्वतच समाजोद्धारासाठी, राष्ट्रोद्धारासाठी असे निरपेक्ष, निःस्वार्थ, वृत्तीचे व निर्मळ अंत:करणाचे आदर्श प्रचारक निर्माण झाले पाहिजे असे महाराज म्हणतात.

एकंदरीत, समर्थांनी व महाराजांनी आपापल्या काळातील परिस्थितीच्या संदर्भात उत्तम पुरुष व आदर्श प्रचारक कसा असावा व लोकोद्धाराचे आणि राष्ट्रोन्नतीचे कार्य त्यांच्या हातून कसे घडावे यासंबंधीचे विस्तृत विवेचन केलेले आहे. या विवेचनावरून उत्तम पुरुष आणि आदर्श प्रचारक या दोहोंचीही लक्षणे समर्थ रामदास व तुकडोजी महाराज या दोघांमध्येही दिसून येतात. 'आधी केले मग सांगितले' या न्यायाने त्या दोन्ही संतांनी उत्तम पुरुषाची व आदर्श प्रचारकाची सर्व लक्षणे आत्मसात केलेली होती. त्यांच्या चरित्र-चारित्र्यावरून व कार्य-कर्तृत्वावरून

उत्तम-पुरुष व आदर्श प्रचारक हा त्यांच्या ठायी पुरेपूर भिनला असल्याचा प्रत्यय येतो.

समर्थांच्या उत्तम पुरुषांची व तुकडोजींच्या आदर्श प्रचारकांची संख्या जर समाजात वाढली तर समाजातील गढूळ वातावरण आपोआपच नष्ट होऊन समाजजीवनात सुख-समृद्धीचे वातावरण सहजच निर्माण होऊ शकेल.

संतद्वय-स्त्रीविषयक दृष्टिकोन

प्रास्ताविक-'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' मनुस्मृतीतील हे संस्कृत सुभाषित स्त्रियांच्या पारतंत्र्याची स्पष्टच साक्ष देते. बालपणी पित्याच्या, तारुण्यात पतीच्या व वार्धक्यात पुत्राच्या नियंत्रणाखाली स्त्रीने राहिले पाहिजे असे हे सुभाषित सांगते.

स्मृतिकारांनी "**पतिरेव गुरुः स्त्रीणाम्**" असे म्हटले आहे आणि मनु तर स्पष्टच सांगतात की-

"नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषितम् ।
पतिः शुश्रूष्यते येन तेन स्वर्गे महीयते ॥"

(मनुस्मृति ५-१५४)

या शास्त्रवचनांचा आधार घेऊन हिंदु संस्कृतीत स्त्रीला पुरुषापेक्षा कनिष्ठ स्थान देण्यात आले आहे. अन्य संस्कृतीतही यापेक्षा विशेष वेगळा प्रकार आढळत नाही. स्त्रीला आत्मा नसतो असे एक संस्कृती म्हणते तर "स्त्री ही पुरुषाच्या सुखासाठी परमेश्वराने निर्माण केलेले एक साधन होय" असे दुसऱ्या संस्कृतीला वाटते. एकंदरीत, पुरुषाच्या इच्छा-आकांक्षाची पूर्ती करणे हेच स्त्रीचे कर्तव्य होय, तिला स्वतंत्र असे अस्तित्व नाही अशीच भूमिका जगात सर्वत्र प्रचलित असल्याचे प्रत्ययास येते. विशेषतः सरंजामी जोखन-पद्धतीत स्त्रीला पुरुषाची गुलाम म्हणूनच आयुष्य कंठावे लागत असे असा निर्वाळा आहे. तात्पर्य असे की, 'चूल आणि मूल' हेच स्त्रीयांचे संकुचित कार्यक्षेत्र ठरून गेले होते आणि समाजामध्ये स्त्रीयांना बंधनात ठेवण्याची एक सर्वसाधारण प्रवृत्ती निर्माण

झाली होती. अर्थातच चार भींतीच्या आत स्त्रीचे जीवन बंदिस्त झाले होते. **'जिचे हाती पाळण्याची दोरी । ती जगाते उद्धारी'** किंवा **'गृहिणी गृहमुच्यते'** असा जिचा गौरव केला जातो ती स्त्री सामाजिक रुढि-परंपरांच्या शृंखलांनी जखडून तिच्या व्यक्तित्व-विकासाच्या मार्गात अनेक अडथळे उत्पन्न होत होते. भारतीय स्त्री-जीवनावर याचा विशेषच परिणाम झाला.

भारतीय स्त्री म्हणजे संयम, सेवा, प्रेम व त्याग यांचे प्रतीक मानण्यात येऊ लागले. आपल्या अविश्रान्त परिश्रमाने तिने संसाराची बाग फुलवावी व प्रेमाच्या जलसिंचनाने त्याचे संवर्धन करावे अशी तिच्याकडून अपेक्षा करण्यात येऊ लागली.

भारतीय स्त्रीचा आदर्श सीता-सावित्री, द्रौपदी-गांधारी या महान स्त्रिया असाव्यात आणि दुर्गुणी व दुराचारी पतींची सेवा करण्यातही तिने धन्यता मानावी अशी सामाजिक बंधने तिच्यावर लादण्यात येऊ लागली.

सामान्यपणे जगात सर्वच देशात पुरुष प्रधान समाजपद्धती अस्तित्वात असल्याने समाज जीवनाचे नियंत्रण करणाऱ्या पुरुषांनी आपल्या स्वार्था-साठी स्त्रीला नाना प्रकारच्या बंधनानी जखडून टाकले होते. शारीरिक-दृष्टया पुरुष हा स्त्रीपेक्षा बलवान असल्यामुळे स्त्रीवर वर्चस्व प्रस्थापित करणे त्याला सहज शक्य झाले. पुरुषाने स्वतःचाच सुखाचा प्राधान्याने विचार करून सामाजिक नियम तयार केले होते. स्त्रीने खावे काय, नेसावे काय, वागावे-बोलावे कसे इत्यादी बाबींवर पुरुषाने नियंत्रण ठेवले होते. परंतु सुदैवाने स्त्री जातीचे भाग्य उदयास आले. युरोपातील औद्योगिक क्रांतीमुळे परंपरागत समाजजीवन ढवळून निघाले. जुन्या कल्पना पत्यांच्या बंगल्याप्रमाणे या नवीन विचारांच्या झंझावातात उडून गेल्या. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन जीवनमुल्यांचे अमृत फ्रेंच राज्यक्रांतीच्या समुद्रमंथनातून प्रकट झाले. पुरुष आणि स्त्री यांच्यात निसर्गनिर्मित शारीरिकतेचा बाब सोडल्यास काहीच भेद नाही असा विचार मांडल्या जावू लागला. विशेषतः शिक्षणाची वीज स्त्रीच्या अंतः

करणात प्रविष्ट होताच तिचे सारेच जीवन उजळून निघाले व तिच्या चैतन्यमय व्यक्तिमत्वाचा प्रभावी आविष्कार समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रात होऊ लागला. राजकारण, समाजकारण, साहित्य इत्यादी क्षेत्रांतही स्त्रीया आता पुरुषांच्या बरोबरीने पुढे जात आहेत. स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीला आलेले हे अमृतमय फळ पाहून स्त्री स्वातंत्र्याचा कैवार घेणाऱ्या आद्य समाजसुधारकांना धन्यता वाटावी असाच काळ आज निर्माण झाला आहे.

परंतु प्रत्येक स्वातंत्र्याला उत्तरदायित्वांची मर्यादा असतेच. स्त्री–स्वातंत्र्यालाही स्त्री उत्तरदायित्वाची ती मर्यादा आहेच. पुरुषाने आक्रमिलेली सर्व क्षेत्रे आपण आक्रमावी व पुरुषाशी स्पर्धा करून आपण त्याच्यापेक्षा कमी नाही हे जगाला दाखवून द्यावे ही इच्छा कितीही स्पृहणीय असली तरी या स्पर्धेच्या नादी लागून स्त्रीने पुरुषी व्हावे हे कधीच योग्य ठरणार नाही. आज स्त्रीस्वातंत्र्याच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचे बंधन स्वीकारण्यास स्त्री तयार नाही. परंतु ही स्त्रीची फार मोठी चूक आहे. स्त्री व पुरुष हा भेद निसर्गानेच केलेला आहे. म्हणूनच त्यांच्या जीवनपद्धतीतही काही फरक पडणे अपरिहार्यच आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, हे ध्यानात घेऊन व आपल्या नैसर्गिक जबाबदारीची जाणीव ठेवून स्त्री आपल्या कर्तृत्वाचा विवेकाने वापर करील तर प्रगतीच्या दाही दिशा तिला मोकळ्या आहेत. जुन्या घातकी रूढींपासून मुक्ती मिळविणे हा जसा स्वातंत्र्याचा अर्थ आहे, त्याचप्रमाणे दिशाभूल करणाऱ्या नव्या घातक विचारांची गुलामी न पत्करणे हाही स्वातंत्र्याचा अर्थ आहे. स्त्री स्वातंत्र्याचा हा अर्थ स्त्रीवर्गाने ध्यानात घेतला तरच खऱ्या अर्थाने ती स्वतंत्र झाली असे म्हणता येईल.

आता आपण या स्त्री विषयक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर समर्थ रामदासांचा व संत तुकडोजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण काय आहे ते पाहू.

समर्थ रामदास–समर्थांची स्त्रीविषयक भूमिका अतिशय उदार व व्यापक स्वरुपाची आहे. त्यांच्यामते स्त्री आणि पुरुष हे दोन भेद केवळ मूळमाया आदिशक्ती हिच्यामुळे निर्माण झाले आहेत. स्त्री ही समर्थांच्या

मते आदिशक्तीचे प्रतीक आहे आणि या आदिशक्तीपासूनच स्त्री व पुरुष यांची निर्मिती झाली आहे. या संबंधी ते म्हणतात–

"नर नारी दोनी भेद । पिंडी दिसती प्रसिद्ध ।
मुळी नस्तां विशव । होतील कैसी ।
नाना पुरुषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव ।
येकचि परी देवस्वभाव । वेगळाले ।
नरनारीचे बीजकारण । शीवशक्तीमधे जाण ।
देह धरितां प्रमाण । कळों आले ।
मुळ शिवशक्ती खरे । पुढे जाती वधूवर ।
चौऱ्यासि लक्ष विस्तारे । विस्तारली जे ।।

अशाप्रकारे समर्थांच्या मते सृष्टीची निर्मिती प्रकृती आणि पुरुष या दोहोंमुळे आहे.

समर्थांच्या भक्तगणांमध्ये स्त्री–पुरुष या दोहोंचाही समावेश होता. तत्कालीन सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर समर्थांचा स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोण अगदीच भिन्न होता. ते स्त्रियांना कोणत्याच प्रकारे कमी लेखत नसत. इतकेच नव्हे तर, जे लोक स्त्रियांना कमी लेखून त्यांची निंदा करीत अशांचा समर्थांनी चांगलाच समाचार घेतलेला आहे. आई आपल्या अपत्यासाठी किती खस्ता खाते, किती कष्ट सोसते, केवढा त्याग करते हे एका स्त्री–निंदकाला सांगताना समर्थ करूणाष्टकेमध्ये म्हणतात–

"बहुतां दिसांच्या वयोवृद्ध मूला ।
जनी बायकोच्या गुणे जन्म तुला ।
तया जननीच्या कुळा निंदितोसी ।
वृथा पुष्ट तू मानवांमाजि होसी ।। १ ।।

बहु जन्ननीने तुझे कष्ट केले ।
बरे वोखटे सर्व साहोनि नेले ।
मनामाजि मागील का आठवेना ।
बेहे पुष्ट हा वेर्थ तुझा शिजेना ।। ४ ।।

मुढा वोंगळा वोंगळी जन्मलासी ।
तुझी जन्मनी ते तुझे कष्ट सोसी ॥
जनी पाळिती सर्व नारी नरांला ।
तया निंदिती शुधि नाही खराला ॥ ५ ॥

समर्थांच्या स्त्री शिष्यांमध्ये वेणाबाई व आक्काबाई या दोन प्रमुख शिष्या होत्या. वेणाबाईला अकाली वैधव्य आल्यावर त्या आपला वेळ वाचनात व उपासनेत व्यतीत करू लागल्या. त्या कीर्तनही उत्तम करीत. त्यांची परमार्थ मार्गातील प्रगती पाहून समर्थांनी त्यांना मिरजेच्या मठाचे महंत केले होते. वेणाबाई राम भजनात किती तल्लीन झाल्या होत्या हे त्यांनी लिहिलेल्या 'सीता स्वयंवर' या खंड काव्यातील आलेखावरून दिसून येते.

त्या म्हणतात–

"राम पूजावा विलासी । राम ध्यावा अहर्निशी ।
रामा वेगळे मनासी । काही नावडे ॥"

(वेणाबाई–सीता स्वयंवर–
शके. १८३५–अध्याय १–१४)

पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनीही कथा–कीर्तनात भाग घ्यावा असे समर्थांचे विचार होते. त्यांनी समाजातील अत्यंत उपेक्षित असलेल्या स्त्री जातीचा उद्धार करण्याचा प्रयत्न केला. अध्यात्माचा अधिकार स्त्रियांना बहाल करून त्यांच्यातील सद्‌गुण–संवर्धनाकडे विशेष लक्ष दिले.

महाराष्ट्रामध्ये धर्म जागृतीचे कार्य करणारांमध्ये समर्थांना स्त्रियांचा सहभाग जास्त दिसल्यामुळे त्यांनी स्त्रियांना दीक्षा दिली. परमार्थमय जीवन जगण्यासाठी आणि जीवनात आध्यात्मिक उन्नती करण्यासाठी समर्थांनी स्त्रियांना बरेच साहाय्य करून त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले. तसेच त्यांच्यातील सुप्त शक्ती व त्याग, सेवा, इत्यादी गुण ओळखून आपल्या महाराष्ट्र–धर्म जागृतीच्या कार्यांत त्यांचा पुरेपूर उपयोग करून घेतला.

एकंदरीत–समर्थांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा व कार्याचा परामर्श घेताना समारोपादाखल एवढेच म्हणता येईल की, स्त्री ही पुरुषापेक्षा कोणत्याच बाबतीत कमी नसून तिच्या सुप्त शक्तीचा व उपजत त्याग, सेवा, प्रेम, जिद्द–इत्यादी गुणांचा योग्य उपयोग करून घतल्यास राष्ट्र उभारणीचे व नवराष्ट्र निर्मितीचे अवघड कार्य अधिक सुलभ होऊ शकेल. त्यादृष्टीनेच समर्थांनी अनाथ अबलांना अत्यंत आत्मीयतेने आधार देऊन त्यांना समाज जीवनात सन्मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

त्यांच्या मते स्त्री ही भोगवस्तू नव्हे. तिला समाजात पुरुषाच्या बरोबरीने स्थान मिळाले पाहिजे. स्त्री विषयक सन्मान्य भूमिकेमुळेच समर्थांना समाजाकडून भरीव सहकार्य मिळू शकले व त्यांची संघटन-शक्ती प्रबळ होऊ शकली.

संत तुकडोजी

भारतातील जवळ जवळ सर्वच संतांनी स्त्रियांच्या उद्धाराविषयीची उत्कट तळमळ आपल्या आचार–विचारांतून व्यक्त केलेली आहे. शुद्रा-प्रमाणेच स्त्रियांवरही उपेक्षितपणाचे शिक्कामोर्तब झाले होते आणि म्हणूनच या संत मंडळींनी आपापल्या काळात स्त्री–मुक्ती आंदोलनाची चळवळ आपल्या वाङ्मयातून उभारलेली दिसते. इतर संतांच्या व विशेषतः समर्थ रामदासांच्या तुलनेत तुकडोजींचा स्त्रीविषय दृष्टिकोण अत्यंत प्रागतिक व पुरोगामी स्वरुपाचा दिसतो. अर्थात हा काळाचा परिणाम म्हणावा लागेल. कारण तुकडोजींचा कालखंड हा वैज्ञानिक युगातील असून ते समर्थांपेक्षा जवळ जवळ तीनशे वर्षे पुढे आहेत.

स्त्रीचे समाजात स्थान कसे आहे व कसे असावे याचे शास्त्रशुद्ध विश्लेषण त्यांच्या ग्रामगीतेतील 'महिलोन्नती' या अध्यायातून करण्यात आले आहे. त्यांच्या मते स्त्री ही पुरुषाप्रमाणेच समाज जीवनातील एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. तिला पुरुषाप्रमाणेच स्वतंत्र अस्तित्व व एक वेगळे व्यक्तित्व आहे.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी । तीच जगाते उद्धारी ।
ऐसी वर्णिली मातेची थोरी । शेकडो गुरूहुनिही ॥

मातेच्या स्वभावे पुत्राची घडण। त्यास उज्ज्वल ठेवी तिचे वर्तन ।
स्त्रीच्या तेजावरीच पुरुषाचे मोठे पण। ऐसे आहे ॥ "

असा स्त्रीकडे पाहण्याचा त्यांचा विशाल व उदार दृष्टिकोण आहे. समर्थांप्रमाणेच तेही स्त्रीला भोगवस्तू मानत नाहीत. किंबहुना तिला 'भोगवस्तू' किंवा 'गुलाम' मानणाऱ्या लोकांना ते रोखठोक उत्तर देतात व स्त्रियांची महती पटविताना ते म्हणतात–

"काय देवे देवता भिन्न केल्या ?। काय ऋषि पत्न्या नव्हत्या सांभाळिल्या ।
काय महिलात साध्वी नाही झाल्या। पहा पुराणी मागच्या ।
काय स्त्रियांनी नाही लिहिले वेद ! नाही केला ब्रह्मवाद ।
नाना विद्या – कला – भेद । यात प्रवीण किती तरी ॥
काय स्त्रियांनी युद्ध नाही केले ? पति–पुत्रांनाही प्रोत्साहन दिले ।
काय स्त्रियांनी प्राण नाही अर्पिले। ब्रीदासाठी ? "

अशा प्रकारे स्त्रियांच्या कर्तृत्वाचा गौरव करून त्यांच्या स्वभाव-वैशिष्ट्याचे वर्णन वेचक शब्दांतून करताना महाराज म्हणतात–

" स्त्रियेसारखी मोहिनी नाही। स्त्रियेसारखी वैरागिणी नाही ।
स्त्रियेसारखी मुलायम नाही। आणि कठोर रणचंडिका ॥ "

अशा वैशिष्टपूर्ण व्यक्तिमत्व असलेल्या स्त्रीच्या सर्वांगीण विकासाच्या वाटा मोकळ्या असल्या पाहिजेत असे महाराज सांगतात–

" समाजी जो पुरुषासि आदर। तैसाचि महिलांशी असावा व्यवहार ।
किंबहुना अधिक त्यांचा विचार ? झाला पाहिजे समाजी ॥ "

समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने काम करण्याची संधी तिला मिळाली पाहिजे. स्त्री ही पुरुषाची सहधर्मचारिणी समजून उभयतांनी परस्परांच्या सुख–दुःखाचे वाटेकरी म्हणून जीवनात वागले पाहिजे असे ते म्हणतात. त्यांच्या मते स्त्री ही अबला नसून सबला आहे.

" का म्हणा अबला तिला। ती शक्तिशाली नाही का ?
काय कमी देवे केले । तिज मानवाहुनि सांगना ? "

इतकेच नव्हे तर, पुरुषापेक्षा तिच्यात चातुर्य लक्षणे अधिक दिसल्याचेही ते कथन करतात–

" निरीक्षोनि जी जी घरे पाहिली ? तेथे सरसता अनुभवा आली ।
चातुर्य लक्षणे अधिक दिसली । महिलामांजी ॥ "

' स्त्री–महिमा ' कथन करताना महाराज म्हणतात–

" स्त्रीलाच भक्ति, स्त्रीलाच ज्ञान । तिलाच संयम–शहाणपण ।
तिच्यानेच हालती वाटे संपूर्ण । संसार चक्र ॥ "

असे असूनही काही कुटील लोक स्त्रीला पुरुषापेक्षा कमी लेखून तिची उपेक्षा करतात. अशा लोकांना महाराज विचारतात–

" अरे ! तुझ्याहूनि ती उत्तम वागते । समाजी उत्तम भाषण देते ।
तुलाहि शहाणपण शिकवू जाणते । मग ती मागे कशाने ? "

सांप्रत काळातील स्त्रियांची सर्वच क्षेत्रातील नेत्रदीपक प्रगती पाहिली, तर महाराजांच्या प्रस्तुत विचारांचा प्रत्यय सहजच येतो.

तसेच मुलींच्या शक्तीसंवर्धनाचे व त्यांच्या सबळ संघटनांचे महाराज समर्थन करतात.

" काही मुली शक्ति–शिक्षण घेती । मुलांपेक्षाही धीट असती ।
नाही गुंडांचीही छाती ? हात घालील त्यावरी ॥ "

अशाप्रकारे स्त्रियांना बलवान बनवून त्यांच्या मनातील गुंडांविषयीची भीती नष्ट करण्याची आवश्यकता महाराज दर्शवितात. तद्वतच

" जैसी मुलांची संघटित सेना ? तैसी स्त्रियांची असावी संघटना "

अशाप्रकारे स्त्री संघटनेवर ही ते भर देतात. समर्थांप्रमाणेच महाराजांच्याही मते कोणताही देश वा राष्ट्र स्त्री जातीला मागे ठेऊन पुढे जाऊ शकत नाही. म्हणून ते सांगतात–

" मिळो बहुमान मातांना । जसा देशात पुरुषाला "

आज कालमानानुसार परिस्थितीत बरेच परिवर्तन घडले आहे. त्याचा परिणाम स्त्री जीवनावरही झालेला आहे. तिने आपल्या कर्तृत्वाने

राजकारण, समाजकारण, शिक्षण, साहित्य, व्यवसाय, नोकरी इत्यादी नानाविध क्षेत्रांत नावलौकिक मिळविला आहे. हुंडाविरोधी आंदोलन, स्त्री–अत्याचारांविरुद्ध चळवळ इत्यादी आघाड्यांवर तिचे नेतृत्व आज तळपू लागले आहे. नवी स्त्री घडली आहे; घडत आहे.

रामदास–तुकडोजी स्त्रीविषयक साम्य–भेद दर्शन

या दोनही संतांचा अट्टाहास एक नवीन समाज निर्माण करण्याचा होता. त्यांना स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये श्रेष्ठ–कनिष्ठत्व दिसले नाही. नव्या एकात्म आणि समर्थ समाजाच्या उभारणीसाठी स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही कर्तृत्वाला त्यांनी आवाहन केलेले आहे. त्याच दृष्टीने या दोन्ही संत–पुरुषांनी स्त्री संघटनांवर विशेष भर देऊन आध्यात्मिक उन्नतीचा मार्गही त्यांना मोकळा करून दिला. समर्थांच्या काळात समाजव्यवस्थेची घडी आजच्या तुलनेत वरीच वेगळी होती. आजची समाज व्यवस्था व्यामिश्र व संकुल अशी आहे. आजच्या समाज-व्यवस्थेवर साम्यवाद, भांडवलशाही, विज्ञान, लोकशाही इत्यादी गोष्टींचा दूरगामी प्रभाव पडलेला आहे. समर्थकालीन समाज-व्यवस्थेत हे घटक नव्हते. तेव्हा राजकारण असले तरी खऱ्या अर्थाने ते राज्य-कारण होते आणि दैनंदिन लोकजीवनात त्याचा नाममात्रही प्रवेश झालेला नव्हता.

वर्णाश्रमधर्माची पकड समाज जीवनावर अधिक पक्की होती. ओघानेच राज्यकारणापासून दूर राहिलेल्या समाजजीवनात कुटुंब संस्थेला आणि ग्रामसंस्थेला मध्यवर्ती महत्व होते. स्त्री आणि पुरुष यांचे संबंध म्हणजे कुटुंबव्यवस्थेची आधारशिलाच होय. त्याचप्रमाणे कुटुंब-संस्था ही समाजव्यवस्थेची आधारशिला होती. समर्थांसमोर अशी परिस्थिती असल्यामुळे त्यांनी कुटुंबसंस्था निरोगी राहावी आणि निरोगी कुटुंबव्यवस्थेतून सामाजिक स्वास्थ्य टिकावे या भूमिकेतून प्रबोधन केले आहे. रूळलेल्या चाकोरीतूनच समर्थ पुढे सरकत राहिले परंतु तुकडोजी महाराजांनी मात्र स्त्रीसुधारणांसंबंधी व त्यांचे प्रश्न सोडविण्यासंबंधी कालोचित मार्गदर्शन केले आहे. तथापि समाजजीवनाच्या विकासात

स्त्रियांचाही समान वाटा असल्याचे दोन्ही संत मान्य करतात. दोघांनाही निराधार स्त्रियांविषयी विशेष सहानुभूती असून त्यांच्या उन्नतीचा मार्ग ते उत्कट तळमळीने शोधतात.

एलीस हॅवलॉक यासारख्या जागतिक कीर्तीच्या मानसशास्त्रज्ञाने स्त्री आणि पुरुष ह्या दोन्हीही शक्ती परस्पर विरोधी नसून परस्पर पोषक आहेत; एवढेच नव्हे तर, जीवनात मूलभूत असणाऱ्या एका विज्ञान शक्तीचे हे दोन परस्पर पोषक आणि आवश्यक असे घटक आहेत हे सिद्ध करून दाखविले. समर्थ व तुकडोजी या दोन्ही संतांचे विचार, हॅवलॉकच्या या विचारांशी तंतोतंत जुळण्यासारखे आहेत. समर्थ व तुकडोजी महाराजांसारख्या संतांच्या विचारसरणीचा स्त्रीयांकडे पाहणाऱ्या पुरुषी दृष्टिकोणावर जास्तच परिणाम झाला आणि नव्या बुद्धिमान्य ठरू पाहणाऱ्या विचार-वादाच्या व्यासपीठावर स्त्रीचे महत्व आणि अस्तित्व अधिक प्रमाणात प्रस्थापित झाले.

संतद्वय-प्रयत्न-प्रारब्धवाद

सामान्यतः समाजाचा कल दैववादी प्रवृत्तीकडे जास्त झुकलेला असतो. परंतु ही दैववादी प्रवृत्ती मनुष्याला कर्तृत्वहीन व पांगळे बनविते. म्हणूनच समर्थ रामदास व संत तुकडोजी या दोन्ही क्रांतिकारी पुरुषांनी प्रारब्धवादाचे खंडन करून प्रयत्नवादाचा पुरस्कार केलेला आहे. आपल्या आयुष्यात अविश्रान्त परिश्रमाशिवाय यशाचे शिखर गाठता येणे शक्य नाही असे दोघांचेही स्पष्ट मत होते.

'मानवी जीवन सुख-दुःखाच्या उभ्या आणि आडव्या धाग्यांनी विणलेले एक वस्त्र आहे' असे म्हणतात. परंतु मनुष्याच्या दुर्दैवाने त्या वस्त्रात शंभर धागे दुःखाचे आणि असलाच तर अपवादादाखल एखादा धागा सुखाचा आढळतो. केवळ आपल्या दुर्दैवाने दुःखे निर्माण झाली असा गैरसमज करून घेऊन मनुष्य जर मुळमुळू रडत बसला व त्याने कर्तृत्वहीन बनून देवावर किंवा दैवावर बोल ठेवला तर ते योग्य होणार नाही.

प्रारब्धानुसार प्राप्त झालेल्या दु:खांना पचवित आपला वांच्छित मार्ग यथाशक्य आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करीत राहणे हीच मानवी जीवनाची इतिकर्तव्यता होय.

याच भूमिकेतून दोन्ही संतांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार करून प्रारब्धवादाशी त्याची समर्पक सांगड घातलेली आहे.

समर्थ रामदास–प्रयत्न–प्रारब्धवाद

" आळसाचे फळ रोकडे । जांभया देऊन निद्रा पडे ।
सुख म्हणोन आवडे । आळस लोका ॥ "

जांभया देऊन लोळत पडणाऱ्या लोकांना 'आळस' हेच सुख वाटत असले, तरी ते खरे सुख नव्हे असे सांगून समर्थांनी प्रयत्नवादाचा जोरदार पुरस्कार केला आहे. आळसाला मुख्य शत्रू मानून आळससंबंधी ते स्पष्टच सांगतात की–

" आळस उदास नागवणा । आळस प्रेत्न बुडवणा ।
आळसे करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥ "

अशाप्रकारे आळसामुळे उदासिनता प्राप्त होऊन फजिती होते. आळस हा प्रयत्नाला बुडविणारा असून त्यामुळे करंटेपणाची चिन्हे प्रकट होतात. थोडक्यात म्हणजे आळस हा मनुष्याच्या प्रगतीच्या मार्गातील जबरदस्त शत्रु होय. त्याचा नि:पात करून जो पुढे जाण्याचा प्रयत्न करतो, तोच शेवटी समाधान पावतो. या संदर्भात समर्थ सांगतात–

" म्हणोन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अरत्री परत्री जीवा । समाधान ॥ "

प्रारब्धाला पुढे करून आळसाच्या आहारी जाणाऱ्या मनुष्याला समर्थ स्पष्टच सांगतात की–

" रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
डोळे झांकती करावी ते । काय निमित्य ॥ "

कागदावरील, पाटीवरील, किंवा भींतीवरील रेषा पुसून टाकणे जर मनुष्याला सहज शक्य आहे, तर ललाटरेषा पुसून काढणे त्याला मुळीच कठीण नाही. ' दे गा हरी पलंगावरी ' अशा आळशी प्रवृत्तीच्या व्यक्तीचा तुकाराम महाराजानीही चांगलाच खरपूस समाचार घेतला आहे.

" अळासियाचे अंतर कुडे । जैसे मढे निष्काम । "

इच्छाशून्य मढ्याप्रमाणे आळशी व्यक्तीही प्रगतीच्या बाबतीत निरिच्छ असते म्हणूनच–

" असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥ "

असा प्रयत्नवादाचा पुरस्कार ते करतात. इतकेच नव्हे तर–

ओले मूळमेदी खडकाचे अंग । अभ्यासासी सांग कार्य सिद्धी ।
नव्हे ऐसे नाही काही अवघड । नाही कइवाड तोचि परि ॥

झाडाच्या ओल्या मुळ्यांमध्ये खडकाला फोडण्याची शक्ती निर्माण होते किंवा दोरखंडाच्या घर्षणाने दगड देखील कापला जातो, अशा प्रकारचे समर्पक दृष्टान्त देऊन ते प्रयत्नवादाचा पुरस्कार व आळशी प्रवृत्तीचा तिरस्कार करतात.

" तुका म्हणे आळस । तोचि कारणाचा नास । "

आळस हा आपल्या अंगीकृत कार्याचा बोजवारा उडवितो. आळसाच्या कीडीने समाजजीवन पोखरून जाते. समाजव्यवस्था शिथील होते. लोकजीवन ध्येयहीन व निष्क्रीय बनते आणि मग अशा अवस्थेत समाजाचे अधःपतन अटळ ठरून तो रसातळाला जातो. समाजाची अशी अवस्था होऊ नये म्हणून माणसाने दैवावर विसंबून न राहता सतत प्रयत्नशील असले पाहिजे असे समर्थ सांगतात. प्रयत्नशील व कर्तृत्ववान मनुष्याला जगात अशक्य असे काहीच नाही. फक्त कष्ट करण्याची त्याची तयारी पाहिजे.

" केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरे ॥ "

अशा प्रकारे प्रयत्नालाच परमेश्वर मानून प्रयत्नाच्या पराकाष्ठेने दुर्बल समाजाचे परिवर्तन देखील प्रबळ राष्ट्रामध्ये सहजच होऊ शकते असे पुरुषार्थाचे धडे समर्थांनी समाजाला शिकविले. परंतु हे शिकवित असताना त्यांचा प्रयत्नवाद केवळ समाजाच्या ऐहिक वाबींपुरताच सिमित राहिला नाही; तर आध्यात्मिक उन्नतीसाठीसुद्धा निरंतर कष्टाची आवश्यकता असल्याचेही ते प्रतिपादन करतात. अशाप्रकारे प्रयत्नवादाची शिकवण समर्थ अगदी स्पष्टपणे देतात.

त्यांच्यामते ज्याला आपण प्रारब्ध किंवा दैव समजतो, ते दुसरे–तिसरे काहीही नसून आपल्याच पूर्व–जन्मीच्या कर्माचा परिपाक आहे. मनुष्य पूर्वजीवनात वा जन्मात जी बरेवाईट कर्मे करतो त्याच्या साठलेल्या संस्कारातूनच पुढील गोष्टी निर्माण होत असतात. अशा साठलेल्या संस्कारांना संचित असे म्हणतात. या संचितानुसारच मनुष्याच्या वाटचाला सुखदुःखे येतात.

"मना त्वांचिरे पूर्व संचित केले ।
तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ॥"

म्हणून मनुष्याने नेहमी चांगल्या कर्माचा किंवा संस्कारांचा संचय करीत जावे असे ते सांगतात. परमेश्वर हा पक्षपाती वृत्तीचा किंवा दुष्ट बुद्धीचा नाही. तो मुद्दामच कोणाच्या वाटचाला दुःखे देत नाही. मनुष्याने आपली सुख–दुःख स्वतःच निर्माण केलेली आहेत. तो जे काही बरे-वाईट कर्म करतो, त्याचे तसेच फळ त्याला मिळण्याची व्यवस्था परमेश्वराने केलेली आहे. प्रारब्धाचे भोग कुणालाच चुकत नाही, म्हणून मनुष्याने प्रारब्धाधीन होऊन स्वस्थ बसावे असा याचा अर्थ नाही. प्रयत्नाने प्रारब्धाचे भोग चुकविता येत नसले, तरी ते सौम्य निश्चितच करता येतात व भावी काळासाठी मनुष्याला आपल्या सोयीची तयारीही करून ठेवता येते. म्हणून संमर्थ वारंवार प्रयत्नवादाचा पुरस्कार करतात. प्रयत्नाच्या बळावर केवळ स्वतःच्याच जीवनाचा नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राचाही उद्धार करण्यासाठी ते प्रोत्साहन देतात. कर्म हे कुणालाही सुटलेले नाही. लहान–मोठे काम प्रत्येकालाच करावे लागते. त्यावाचून काही व्हावयाचे नाही.

"लहानथोर काम काही । केल्यावेगळे होत नाही ।
करंटया सावध पाही । सदैव होसी ॥"

करंटयाला भाग्यही पुरेशा कष्टामुळेच प्राप्त होऊ शकते. परंतु कष्टाअभावी करंटा जन्मभर करंटाच राहतो, त्याला सुखसंतोष प्राप्त होऊ शकत नाही असे समर्थ म्हणतात. पहा–

"अंतरी नाही सावधानता । येत्न ठाकेना पुरता ।
सुखसंतोषाची वार्ता । तेथे कैंची ॥"

यादृष्टीनेच पुढे ते सांगतात–

"म्हणोन आळस सोडावा । यत्न साक्षेपे जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळे ॥"

अशाप्रकारे आळसाला टाकून देऊन मोठया तत्परतेने प्रयत्न करावा व दुश्चितपणाचा बीमोड करून टाकावा. आळसाचा त्याग आणि कष्टिक प्रवृत्ती अनेकांना आवडत नाही हे खरे. परंतु काही काळ जर आपण आळसापासून अलिप्त राहिलो आणि सतत कष्टाची तयारी ठेवली तर पुढे सुखाचे दिवस निश्चितच येतात.

"व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती ।
तेणे प्राणी सदैव होती । देख देखता ॥"

उद्योगी, साहसी आणि टक्केटोणपे सोसणाऱ्यांचे भाग्य आपोआपच उदयास येते असे समर्थांचे सांगणे आहे.

समर्थ म्हणतात–शंभर वर्षाचे आयुष्य ठरलेले आहे. त्यापैकी बाळपण अज्ञानात जाते. तारुण्य विषयोपभोगात खर्च होते. वार्धक्यात विविध व्याधींनी शरीर जर्जर होते. म्हणून मनुष्याने विवेकाने वागून व प्रयत्नशील राहून इहपर साधावे. समर्थ प्रयत्नवादाच्या बैठकीला विवेकाचीही जोड देतात.

एकंदरीत, मनुष्याने निव्वळ देवावर किंवा दैवावर विसंबून राहता कामा नये व आपल्या अविश्रान्त प्रयत्नाच्या बळावर आपले वांच्छित कार्य सफल करावे असेच समर्थांना प्रयत्न–प्रारब्धवादाच्या संदर्भात

सांगावयाचे आहे. अनेकदा उदात्त हेतूने उभारलेल्या कार्यातही अपयश आल्याचे अनुभवास येते परंतु अशावेळी दैवाला दोष न देता किंवा प्रारब्धाला पुढे न करता अखंड प्रयत्न सुरू ठेवावेत असे सांगून अपयशाचे कारण स्पष्ट करताना समर्थ म्हणतात–

"अचूक यत्न करवेना, म्हणून केले ते साजेना
आपला अवगुण जाणवेना, काही केल्या"

आपल्या अचूक यत्नांअभावी अपयश पदरी पडल्याची जाण ठेऊन प्रयत्न पुरेसे व योग्यदिशेने करण्याची तयारी ठेवली की, निराश होण्याची व प्रारब्धावर बोल ठेवण्याची पाळी मनुष्यावर सहसा येत नाही. **'यत्न तो देव जाणावा'** हा यत्न म्हणजे समर्थांच्या मते अचूक यत्न होय. थोडक्यात म्हणजे–**"आपुल्या दैवाचा बिधाता आपणचि आहे"** हेच प्रामुख्याने समर्थांना लोकांच्या मनावर बिंबवायचे होते व त्यासाठी त्यांनी पुरुषार्थाचा पुरस्कार करून समाजजीवनातील प्रारब्धवादाचा पांगुळगाडा मोडून टाकला आणि स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवणाऱ्या एका समर्थ समाज उभारणीचे महद् कार्य केले.

संत तुकडोजी (प्रयत्न-प्रारब्धवाद)

संत तुकडोजी महाराजांचे यासंबंधीचे विचार समर्थ रामदासांच्या विचारांसारखेच आहेत. तेही समर्थांप्रमाणेच समाजाला आळस सोडून प्रयत्नवादी बनण्याचाच उपदेश करतात.

"भाग्याकरिता संकल्प करावे । दृढ निश्चया वाढवित जावे ।
तैसेचि प्रयत्न करीत राहावे । आळस सोडोनि ॥"

असे सांगून समर्थांप्रमाणेच **'केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे'** असे तत्त्व प्रतिपादन करतात. पहा–

"केल्यानेच भाग्य फळते । केल्यानेच स्वर्गसुख मिळते ।
केल्यानेच सर्व काही होते । मानवाचे ॥"

भाग्यश्री नेहमी प्रयत्नवादाच्याच गळ्यात माळ टाकते आणि आळशी माणूस आलेली संधी वाया घालवून शेवटी हात चोळीत बसतो. म्हणून महाराज सांगतात–

"माणूस बसता, भाग्य झोपते । चालता पुढेच घेई झेप ते ।
प्रयत्नांचेचि रूपांतर होते । भाग्यामाजी निश्चयाने ।।"

म्हणून 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय ।' या वचनानुसार महाराज म्हणतात–

"क्रियेविण मार्गचि नाही । कर्तव्य नरा देवपण देई ।
तुकडचा म्हणे बना निश्चयी । प्रयत्नवादी ।।"

'आधी कष्ट मग फळ । नाही कष्टचि ते निर्फळ' या तत्वाप्रमाणे मनुष्याचे कष्ट कधीच व्यर्थ जात नसतात. योग्यवेळी त्याचे फळ मनुष्याला प्राप्त होतच असते. परंतु त्यासाठी प्रयत्न योग्य दिशेने व पुरेसे असायला पाहिजे. अपुऱ्या व अयोग्य दिशेने केलेल्या प्रयत्नांनी यशाची निश्चिती सांगता येत नाही. म्हणून महाराज म्हणतात–

"आपुले प्रयत्नचि सरस करावे । केले तरी करीतचि राहावे ।
थोडे उणे होऊ न द्यावे । प्रयत्नांमध्ये ।।"
"क्षण एक चुको न द्यावे । प्रयत्नासि दूर दृष्टीने जपावे ।
प्रयत्नहि सर्वांगीण व्हावे । सर्व सुखे भोगावया ।।"

अशा प्रकारे तुकडोजी महाराजांनीही समर्थांप्रमाणेच जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी अविश्रान्त परिश्रमाचाच पुरस्कार केलेला आहे.

प्रयत्न किंवा कर्म जसे असतील तसेच त्याचे फळ प्राप्त होईल हा कर्मसिद्धांत महाराज मार्मिक दृष्टातांद्वारे पटवून देतात. पहा–

"वाफ्यात मिरची–उस लाविले । तिखट गोड फळ नशिबी आले ।
तेथे पाण्याने काय केले ? । दिले फळ जैसे तैसे ।।"
"आपण बरे–वाईट बी पेरले । ते त्या ऋतुत उदया आले ।
तेथे काळाने काय केले ? साहच दिले उदय होण्या ।।"

'पेराल तेच उगवेल' या वचनाप्रमाणे महाराज म्हणतात–

"परि नारळीस न येती रुई–फळे । पेरिले तेचि उगवते बळे ।
त्यासि फक्त साहचचि दिसे जळे । तैसा देव साहच करी ।।"

म्हणजेच 'आपले भाग्यविधाते आपणच आहोत' असे समर्थांप्रमाणे महाराजांचेही मत आहे. समर्थांप्रमाणेच प्रयत्नवादाचा जोरदार पुरस्कार करताना महाराज म्हणतात–

" मित्रा ! म्हणोनि प्रयत्नशील व्हावे । प्रारब्धाचे थोरपण मानावे ।
कर्तव्याने चमकून उठावे । भूमंडळी उत्साहे ॥ "

प्रयत्न न करता केवळ दैवावर व देवावर हवाला ठेऊन निष्क्रीय बनलेली मनोवृत्ती महाराजांना मुळीच मान्य नाही.

" अमका प्रारब्धे श्रीमंत झाला । अमका पुण्य करिता दैवे गिळिला ।
अमका " देव – देव " म्हणता तरला । प्रयत्नाविण ॥ "

अशाप्रकारचा विचार त्यांना अजाणपणाचा वाटतो.

यश आपल्या प्रयत्नाने प्राप्त झाले असले तरी अहंकाराचा वारा लागू नये म्हणून त्याचे श्रेय देवाला द्यावे असे महाराज सांगतात–

" यासाठी प्रयत्न करावे आपण । मिरवावे देवाचे थोरपण ।
अंगा येईल अहंकार म्हणोन । देव मध्यस्थी घालावा ॥ "

सुजाण मनुष्याने निव्वळ देवावर किंवा दैवावर विसंबून राहून प्रयत्नपराङ्मुख होऊ नये. प्रयत्नवादी पुरुषालाच परमेश्वर मदत करतो आणि दुर्बलांना तो दूर ठेवतो–

" देव असे ना दैव असे । दुर्बल लोकांना साथ करी ॥ "

म्हणून समर्थांप्रमाणे ' **यत्न तोचि देव जाणावा** ' असा रास्त सल्ला ते देतात.

यासंदर्भात एका सुप्रसिद्ध मराठी कवीच्या कवितेतील खालील ओळी उल्लेखनीय वाटतात.

" घणाचे घाव घालावे, गळावा घाम अंगीचा
यशोदेवी तयासाठी, करी घे हार पुष्पाचा
मनोरे मानसी ज्यांच्या, जयांना लोड आधार
तयांचा ऐकानि टाहो, दया देवा न येणार ! "

रामदास व तुकडोजी या दोन्ही संतकवींच्या प्रयत्न-प्रारब्ध वादाच्या विचारांच्या संदर्भांशी प्रस्तुत ओळीतील विचार तंतोतंत जुळण्यासारखे वाटले म्हणून त्यांची आवर्जून आठवण झाली. समर्थांप्रमाणेच महाराजही संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध यांना मानतात. संचित म्हणजे त्यांच्या मते अनेक जन्मातील कर्मांचा संचय. त्या कर्मसंचयाच्या संस्कारामुळे सांप्रतकाळी जी कर्मफळे भोगावी लागतात ते प्रारब्ध होय. आणि आपण सध्या करीत असलेली चांगली-वाईट कर्मे म्हणजे क्रियमाण समजावे.

हरिश्चंद्र राजाला डोंवा घरी पाणी वाहावे लागले, पांडवांना अज्ञातवासात आणि रामराजाला वनवासांत दिवस काढावे लागले हे केवळ त्यांच्या प्रारब्धामुळेच. तथापि प्रारब्धाचे भोग भोगताना देखील मनुष्याने सतत कर्मरत् राहिले पाहिजे असे महाराज सांगतात. प्रत्येकाला त्याच्या कर्माप्रमाणे फळ मिळत असते. पाऊस आपल्या स्वभावाप्रमाणे सर्वत्र पडतो. परंतु भूमी मात्र आपल्या दैवाप्रमाणे पिकते, बीजाप्रमाणे फळ येते व लाभ-नुकसान ज्याचे त्याला होते. यात देवाचा काही संबंध नाही. दिव्याच्या अंगी जसा दूजा भाव नाही, तसा देवाच्या ठायीही दूजाभाव नसतो. मनुष्याला त्यांच्या कर्माचे फळ मिळते म्हणूनच मनुष्याने नेहमी चांगले कर्म करीत राहावे असे समर्थांप्रमाणेच महाराजही सुचवितात.

दोनही संतांच्या मते भाग्याचे वा दुर्भाग्याचे फळ प्राप्त होण्यासाठी कधी या जन्मीचे तर कधी पूर्व-जन्मीचे संस्कार किंवा प्रयत्न कारणीभूत ठरत असतात. तुकडोजी महाराज तर आपल्या ग्रामगीतेतून यासंबंधीचा बालांध गुलाबराव महाराजांचा दाखला देतात आणि पूर्व संचितानुसारच गुलाबराव महाराजांच्या जीभेवर शास्त्र व वेद खेळत होते असे सांगतात-

" संत गुलाबराव बालांध । त्यांच्या जिव्हाग्री शास्त्र, वेद ।
हे पूर्वजन्मीचे संचितचि सिद्ध । नव्हे प्रारब्ध फुकाचे ।। "

तात्पर्य असे की, प्रारब्धाला देखील मनुष्याचे कर्मच कारणीभूत ठरत असतात म्हणून महाराज समर्थांप्रमाणेच पुन्हा पुन्हा सांगतात की-



" म्हणोनि म्हणतो प्रयत्न करा । आपापले जीवन सुधारा ।
भाग्यहीन म्हणण्याचा प्रसंग सारा । टाळा मागे ॥ "

एकंदरीत, दोनही संतांचे प्रयत्न–प्रारब्धवादाविषयाचे विचार स्वच्छ व स्पष्ट आहेत. प्रारब्धवादाचा विचार त्यांनी प्रयत्नवादाला पोषक ठरेल अशाच दृष्टीने केलेला दिसते, त्यांचा प्रारब्धवाद कर्म-फळावर आधारलेला असल्याने सत्कर्म करण्यास ते समाजाला प्रोत्साहित करतात. मानवी दुःख मानवाच्या कर्माचाच परिपाक असल्याने कोणा-लाही दोष न देता ते निमूटपणे सहन करीत करीतच जीवन प्रवासाची वाटचाल करावी लागते. ही प्रारब्धवादाकडे पाहण्याची दोनही संतांची दृष्टी आहे. तथापि आळस हा मनुष्याच्या भौतिक व आध्यात्मिक उन्नत्तीचा शत्रू आहे असे सांगून जीवनाला प्रयत्नवादच सुखी व उन्नत करु शकतो याविषयी दोनही संतांच्या मनात संशय नव्हता. तात्पर्य असे की, समाज मनात रूळलेल्या प्रारब्धवादाचा प्रभाव कमी करून समा-जाला प्रयत्नवादी बनविणारी व समाज जीवनाला पुरुषार्थाकडे नेणारी विचारसरणी दोन्ही संतांची असल्याचे दिसून येते. प्रयत्नातूनच पुरुषार्थ साधता येतो हे दोघांच्याही विचारांचे केंद्रस्थान आहे. प्रयत्नवाद हा लोकांच्या मनात व वर्तनात भिनावा अशी या संतद्वयाची भूमिका होती.

संतद्वय–सद्गुण संवर्धन व दुर्गुण निर्मूलन

समर्थ रामदास व संत तुकडोजी यांच्या सामाजिक तत्त्वबोधाचे स्वरूप अत्यंत साधे व स्पष्ट आहे. त्यांचा संपूर्ण भर अंतःकरण शुद्धी आणि बाह्य आचारावर आहे. संन्यास किंवा वैराग्यापेक्षा अनासक्त वृत्तीने व्यवहार करण्यावरच ते अधिक भर देतात. परावृत्तीपेक्षा मनोनिग्रह ते श्रेष्ठ मानतात. संसारातील स्वार्थ, अहंकार, मत्सर, काम, क्रोध, या उपाधीच मनुष्याच्या मार्गात अडचणी उभ्या करतात म्हणून त्यांचे निर्मूलन मोठ्या चतुराईने करण्याचे उपाय ते सुचवितात. या दोनही संतांचा सामाजिक तत्त्वबोध अत्यंत प्रगमनशील स्वरूपाचा आहे. म्हणूनच तो समाजाला मानवला.

मनुष्याचे सामाजिक जीवन सुख–समाधानाचे व नियमबद्ध राहण्यावरच समाजस्वास्थ्य अवलंबून असते. त्या समाजस्वास्थ्यासाठीच हे दोनही संत–सद्‌गुणसंवर्धनाची व दुर्गुण निर्मूलनाची आवश्यकता प्रतिपादन करतात.

दोनही संतांच्या मते 'मीपणा' म्हणजेच अहंकार अतिशय वाईट आहे. अहंकार म्हणजे मानवी जीवनाच्या अधःपतनाचा आरंभ होय. समर्थ म्हणतात–

"मीपण शस्त्रे तुटेना । मीपण फोडिता फुटेना ।
मीपण सोडिता सुटेना । काही केल्या ॥
मीपणे वस्तु नाकळे । मीपण भक्ति मावळे ।
मीपणे शक्ति गळे । वैराग्याची ॥
मीपणे प्रपंच न घडे । मीपणे परमार्थ बुडे ।
मीपणे सकळही उडे । यशकीर्ती प्रताप ॥"

अशाप्रकारे हा अहंकार अतिशय भयंकर आहे. एकदा माणसाच्या मनात तो शिरला की मग त्याला शस्त्राने तोडणेही कठीण जाते. या अहंकारामुळे वैराग्याची शक्तीही नष्ट होते. भक्ती लयास जाऊन ब्रम्हस्वरुपाचेही आकलन होत नाही. या अहंकारामुळे नीट प्रपंचही होत नाही आणि नीट परमार्थही साधत नाही. यश, कीर्ती, पराक्रम ही सर्व लयाला जातात.

इतकेच नव्हे तर–

"मीपणे मैत्री तुटे । मीपणे प्रीति आटे ।
मीपणे लिगटे । अभिमान आंगी ॥"
मीपणे विकल्प उठे । मीपणे कलह सुटे ।
मीपणे संमोह फुटे । ऐक्यतेचा ॥

या मीपणामुळे जवळचे मित्र दूर जातात, प्रेम संपुष्ठात येते आणि अंगामध्ये वृथाभिमान जडतो. या मीपणाने विकल्प उत्पन्न होतो, भांडणे उद्‌भवतात व ऐक्याची लालसाही आपोआपच कमी होते. म्हणून समर्थ हा 'अहंकार' सोडून द्यायला सांगतात.

"मीपण–जाणोनि त्यागावे । ब्रम्ह–होऊन अनुभवावे ।
समाधान–ते पावावे । निःसंगपणे ।। "

अशाप्रकारे या अहंकाराचा त्याग करून जो वागेल तो समाधानी पुरुष धन्य होय असे समर्थ म्हणतात. या अहंकारामुळेच मनुष्य जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकला आहे. वास्तविक पाहता जन्ममृत्यूपासून सुटका म्हणजे मोक्ष होय. परंतु अहंकार हा मोक्ष मार्गातील धोंड ठरतो म्हणून त्याचा निःपात आवश्यक आहे. या अहंकाराच्या निःपातासाठी समर्थ उपाय सुचवितात–

"जितुके जाणोन सांडिले । तितुके दृश्य बोलांडिले ।
जाणत्यास जाणतां तुटले । मूळ मीपणाचे ।। "

सर्वांना जाणणारा जो आत्मा त्यास जाणले की, आपोआपच अहंकाराचे मूळ तुटून जाते. अहंकारनिःशेष गळून पडतो.

तसेच 'स्वार्थ' हा मनुष्य स्वभावातील एक आवश्यक घटक असला तरी तो किती आणि कशाचा असावा याचाही विचार होणे आवश्यक असते. स्वार्थाचा अतिरेक हा मनुष्याला इंद्रियाधीन करतो आणि एकदा मनुष्य इंद्रियांच्या तालावर नाचू लागला की, दुर्गुण आपोआपच फोफावू लागतात. म्हणून सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेऊन दुर्गुणांना दूर सारणे व सद्गुण संवर्धन करणे आवश्यक आहे. या सद्गुणसंवर्धनासाठी अंतरात्मा निरंतर जागा ठेवावा लागतो, अंतरात्मा जागा असला म्हणजे मनुष्याला आपल्या अंगी असलेल्या अवगुणांची आपोआपच जाणीव होते.

समर्थांच्या मते आळस, संशय, दुराग्रह, बेताल वर्तन, मत्सर, दंभ, अहंकार, वासना लोलुपत्ता, कठोरवचन, निंदा, इत्यादी अवगुण हे मनुष्याच्या प्रगतीमार्गात अडथळा उत्पन्न करतात. ते केवळ परमार्थालाच बाधक ठरतात असे नव्हे तर, त्यामुळे मनुष्य समाज–जीवनातूनही उठण्याचा संभव असतो. म्हणून या सर्व दुर्गुणांना दूर सारून व्यक्तित्व-विकासाला व समाजधारणेला पोषक अशा सद्गण संवर्धनाकडे मनुष्याने आपले चित्त वेधले पाहिजे.

समर्थांनी सद्‌गुणसंवर्धनाच्या संदर्भात अनेकविध गोष्टी सांगितल्या असल्या तरी प्रामुख्याने नम्रता, विवेक, मृदू वाणी, सदैव सहकार्याची भावना या गोष्टींकडे विशेष लक्ष वेधले आहे. विवेक हा तर त्यांच्या मते सद्‌गुणांचा मुकूटमणी होय. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विवेकाचा प्रभाव दिसून येतो. विवेकच मनुष्याला नीतीचा मार्ग दाखवितो. विवेकामुळेच वासनांचे उदात्तीकरण होते व मनुष्य दुर्गुणांचे निर्मूलन करून सद्‌गुणांकडे वळू लागतो. विवेकामुळे वाणीवर नियंत्रण आणि वृत्तीत विनम्रता येते. विवेकामुळेच परोपकाराची वृत्ती वळावते. उलट विवेकशून्य माणूस अहंकाराने उन्मत्त होतो. चांगल्या गोष्टी करण्याकडे त्याची वृत्ती वळत नाही. अनेक प्रकारच्या दुर्गुणांचे माहेरघर असलेली त्याची हीन वृत्ती शेवटी त्याला अधःपतनाकडे नेते. त्याच्या फजितीला पारावार राहात नाही. त्याच्या अवगुणांमुळे सर्वत्र त्याची छीःथू होते. म्हणून समर्थ सांगतात–

"याकारणे अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे ।
तेणे मनासारिखे फावे । सकळ काही ॥ "

सद्‌गुण व दुर्गुण यातील फरक विवेकी पुरुषाला सहजच कळतो. सद्‌गुण अंगी बाणल्याने मनुष्याची सर्वत्र वाहवा होते आणि दुर्गुणांमुळे लोकांची त्या व्यक्तीकडे पाहण्याची दृष्टीच बदलते. शेवटी मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्याला समाजातच राहावयाचे असते; समाज सोडून राहाणे सर्वसामान्य माणसाला शक्य नाही. म्हणून स्वतःच्या उन्नतीसाठी व समाजाच्या हितासाठी आपल्या अंगी असलेल्या अवगुणांचा त्याग करावा आणि व्यक्तिगत विकासासाठी व समाजधारणेसाठी जेवढे म्हणून उत्तम गुण असतील ते आचरणात उतरविण्याचा प्रयत्न करावा. अशाप्रकारे वागणाऱ्या व्यक्तीची समाजजीवनात सर्वत्र पूजा होते; तो सर्वत्र आदराचे स्थान ठरतो. या संदर्भात समर्थांनी उत्तम पुरुषाची वर्णिलेली लक्षणे विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहेत. समर्थांचा 'उत्तम पुरुष' पाहिल्यानंतर मनुष्याने कोणत्या प्रकारचे सद्‌गुणसंवर्धन करावे व कोणत्या दुर्गुणांचे निर्मूलन करावे याची जाण आपोआपच येते.

सद्‌गुण संवर्धनामध्ये समर्थांनी त्याग व अपरिग्रहालाही विशेष महत्व दिलेले आहे. त्यांच्या विरागीपणाचे दृश्य प्रतीक म्हणजे त्यांचा पोषाख. समर्थांचा पोषाख म्हणजे केवळ लज्जारक्षणापुरती लंगोटी. लंगोटी लावूनच ते सर्वत्र वावरत. भिक्षेवर त्यांची उपजीविका चाले. भिक्षा मागितल्याने मनुष्य निरहंकारी व निराहारी होतो असे ते म्हणत. या भिक्षेमध्ये देखील मन गुंतण्याची शक्यता असल्याने **'बहुत आणिता घ्यावे । मुष्टी येक'** असे ते सांगतात. जीवनाचा आनंद भोगात नसून त्यागात आहे. परंतु त्याग हा खरोखरच त्याग असायला हवा. त्यागाच्या नावाखाली स्वार्थ, लोकेष्णा, आळस, ऐतखाऊपणा, बेजबाबदारी इत्यादी घातकी अवगुणांना वाव देऊ नये व खऱ्या अर्थाने साधक बनावे. साधकाचे लक्षण सांगताना समर्थ दासबोधात म्हणतात–

" अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणांचा अभ्यास ।
स्वरूपी लावी निजध्यास । या नांव साधक ॥ "

अशाप्रकारे सद्‌गुणसंवर्धनाने मनुष्याच्या मनातील विकार हळूहळू क्षीण होत जातात व सदाचाराकडे त्याच्या मनाची ओढ वाढून तो खराखुरा सज्जन पुरुष बनतो. असा सज्जन पुरुष म्हणजेच समर्थांच्या मते–

" जगी धन्य झालेला सर्वोत्तमाचा दास " होय.

एकंदरीत, समर्थांच्या मते जीवनात विविध प्रकारची दुःखे निर्माण करणाऱ्या दुर्गुणांचे निर्मूलन करून मनुष्याने आत्मोन्नती साधणाऱ्या व समाजोपयोगी ठरणाऱ्या अशा सद्‌गुणांचा अवलंब आपल्या आयुष्यात करावा व मानवी जीवनाचे सार्थक करावे. विकारांच्या आधीन होऊन वागण्यात शेवटी दुःखच पदरी पडते. परंतु विकारांवर नियंत्रण ठेऊन त्यांचा सयंमित स्वरुपात उपभोग घेण्यात मात्र जीवनातील खऱ्या सुखाचा आनंद प्राप्त होतो असे समर्थ सांगतात.

समर्थांप्रमाणेच तुकडोजी महाराजांनीही आत्मघातकी ठरणाऱ्या व समाजजीवन गढूळ करून टाकणाऱ्या अवगुणांचा धिःकार केलेला आहे. समाजजीवनातील दुर्व्यसनाचे प्रस्थ व दुराचाराचे दूषित वातावरण दूर

व्हावे आणि सर्वत्र सदाचाराचे मंगलमय वातावरण निर्माण व्हावे म्हणून ते सद्‌गुणसंवर्धनावर व दुर्गुण निर्मूलनावर जास्त जोर देतात.

सामान्यतः समाजाची चांगल्यापेक्षा वाईटाकडे सहज प्रवृत्ती असते.

" वाईटाकडे सहज प्रवृत्ती । अनेक प्रलोभने दुष्टांचे हाती ।
आम्रतरू मेहनतीनेही न जगती । गवत वाढे न पेरता ।। "

अशा अकारण उगवलेल्या गवतरुपी दुर्गुणांना समूळ उपटून टाकून समाजजीवनात सदाचाराचा आम्रवृक्ष बहरावा म्हणून महाराज आपल्या साहित्यातून सदाचाराचा संदेश देतात. लोकांना आजकाल चहा–चिवडा, चिरूट यांची फार चटक लागलेली आहे. हे सर्व मनुष्याच्या तन–मन-धनाच्या नाशास कारणीभूत ठरतात म्हणून ते वर्ज्य करावे असे महाराज सांगतात. तसेच सिनेमा, तमाशे, दारू, गांजा, सट्टा इत्यादीमध्येही लोकांचा अमाप पैसा खर्च होतो. त्यापासून फायदा तर काहीच नाही, परंतु मनुष्याचे सर्वतोपरी नुकसानच होते. सांप्रत युवापिढीवर तर सिनेमाचा अतिशय विपरित परिणाम झालेला आहे. त्यामुळे युवापिढी स्वतः विकृत व स्वच्छंदी तर बनत चाललेली आहेच, परंतु त्याचा अतिशय अनिष्ट परिणाम समाज जीवनावरही होत आहे दिवसेंदिवस सामाजिक अभिरूची बिघडू लागली आहे. सांप्रत समाज-जीवनात सिनेमांनी उडवून दिलेली खळबळ पाहून पुढे या देशाचे काय होणार अशा प्रकारची चिंता महाराजांना लागली होती. वास्तविक पाहता सिनेमा हे सामाजिक जागृतीचे व जनतेच्या करमणुकीचे एक महत्वपूर्ण श्रेष्ठ साधन आहे. परंतु अलीकडे उत्तानशृंगार व भडक हिंसा-चार ही पाश्चात्य चित्रपटांतून आपल्या चित्रपटात शिरलेली विकृत अंगे आहेत, त्यामुळेच सामाजिक अभिरुची दिवसेंदिवस वेगळे वळण घेत आहे. तसेच–

सिनेमाप्रमाणे दारुसारख्या दुर्व्यसनांनी देखील समाजजीवनात भयंकर कहर उडवून दिलेला आहे. दारुबाजांचा धिंगाणा वर्णन करताना महाराज सांगतात–

" दारू पिऊनि मारती स्त्रीला । सगळचा गावीच चळ सुटला ।
पूर आला भांडामांडीला । कोर्ट-कचेऱ्या गजबजल्या ॥
लोळे गटारात अमीरही । कोणीहि कोणास मारून देई ।
मुलीबाळी सुरक्षित नाही । ऐसा प्रसंग ओढवला ॥
पैसा अडका नष्ट झाला । ऐसा गाव ' उन्नतीस ' चढला ।
सगळचा गावाचाचि धिंगाणा केला । दारूबाजांनी ॥ "

अशा समाजजीवनाला अवकळा आणणाऱ्या या दारूच्या नशेसंबंधी महाराज मोठचा वैतागाने म्हणतात-

" वाहवा रे दारूची नशा । आली अवदशा । हुशारी गेली ।
कंगाल जाहला देश । गुलामी आली ॥ "

देशाला कंगाल करणाऱ्या दुर्व्यसनी व दुर्गुणी दारूबाजांना उद्देशून महाराज कळवळून सांगतात-

" तुकडचाची ऐक बातमी, किती तरी कमी ।
झाले या दारूच्या पायी, तू तरी सोड दारू भाई ॥ "

अशाप्रकारे आपल्या आयुष्याला अवकळा आणणाऱ्या अवगुणांचा त्याग करून जीवन सुखी, समृद्ध, समर्थ व सुंदर बनविणाऱ्या सद्गुणांना अंगी बाणावे अशीच उत्कट तळमळ महाराजांच्या शब्दा-शब्दातून व्यक्त झाली आहे. ' व्यसने सगळी सोडून देऊन सरळपणाचे जीवन जगायला ' ते सांगतात. ते यासंबंधी स्पष्टच म्हणतात की-

" अपनेहि अवगुण औ व्यसन, अपनेहि को दुःखदायि है ।
यह सोच लेगा तब तो तेरा, सुख समझ तुझमाहि । "
" निर्मल-विमल जब आचरण । तेरा खुदही बन जायगा ।
तब सौख्य क्या ? तू स्वर्ग का आनंदभी अजमायगा ॥ "

महाराजांनी या दुर्गुणांचा व दुर्व्यसनांचा समर्थांप्रमाणेच निषेध केला असून अतिशय प्रभावीपणे त्यांच्यावर विदारक प्रकाश टाकला व त्या दुर्गुण-दुर्व्यसनांचो अनिष्टता पटवून दिलेली आहे. समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने महाराजांचे हे समाज प्रबोधन बहुमोलाचे आहे.

दुर्गुण–दुर्व्यसनामुळे मनुष्याची सर्वतोपरी हानी होते म्हणूनच ते सद्गुण संवर्धनावर विशेष जोर देतात. सद्गुणसंवर्धनात सुसंस्काराचा सिंहाचा वाटा असतो. म्हणून ते समाजाच्या घडणीत संस्कारांना अधिक महत्व देतात. संस्कारातूनच व्यक्तीची जडण–घडण होत असते असे ते म्हणतात–

" मानव पशुयोनीतुनि आला । नराचा नारायण होणे त्याला ।
यासाठी संस्कार देऊनि सावरिला । क्रमाक्रमाने ॥ "

जीव पोटात असतानाच मातेच्या आचार–विचाराचे संस्कार त्याच्यावर होत असतात. यासाठी गर्भधारणेपासूनच तिने त्या जीवावर सुसंस्कार घडतील असे आचरण करणे आवश्यक असते. म्हणून महाराज सांगतात–

" या ब्रह्मचर्याश्रमाचे साधन । चाले गर्भधारणेपासून ।
पोटातचि असता जीव पडोन । जतन करावा संस्कारे ॥
संस्कार दुष्परिणामकारी । न पडावे आतील गर्भावरी ।
म्हणोनि मातापित्यांनी सदाचारी । रहावे सद्भावे ॥ "

गर्भधारणेपासून स्त्रियांना पाळावयाची पथ्ये देखील ते सांगतात–

" न करावे अश्लील भाषण । न बघावे दृश्य हीन ।
न राहावे व्यसनाधीन । दुर्गुणी अन्न न खावे ॥
आहार–विहार सात्विक पूर्ण । उत्तम गुणी चिंतन–वाचन ।
न ऐकावे शृंगार गायन । गर्भवतीस घेवोनि ॥ "

मुलांच्या संगोपनाची जबाबदारी मातापित्यांवरच असते म्हणून–

" मुलास जैसे कळो लागजो । तैसे त्यास सांभाळणे अवश्य झाले ।
त्याचे समोर न पाहिजे बोलिले । दुर्विषय कोणी ॥ "

असे महाराज सांगतात.

मुलांचे नीट संगोपन व त्यांच्यात सद्गुण संवर्धन हा जीवनातील अत्यंत महत्वाचा भाग आहे. त्यांच्या खाण्यापिण्यापासून तर कपड्या-लत्त्या पर्यंत फार बारकाईने लक्ष पुरवावे लागते. यासाठी महाराज सांगतात–

" मुलगा अभ्यासा लागला । की सात्विक खाणे असावे त्याला ।
खारट–आंबट, तिखट–मसाला । देऊ नये भोजनी ।
चमचमीत, चुरचुरीत । अति मधुर तळीव पदार्थ ।
अथवा रूक्ष, कृत्रिम–मिश्रित । भोजनासि न द्यावे ।
साधे ताजे अन्न द्यावे । वेळेवरि झोपवावे, जागवावे ।
झोपता, जागता जवळी नसावे । स्पर्शणारे कोणी ।। "

इतकेच नव्हे तर लहान मुलांना–

" कराया लावावे प्रातःध्यान । सायंकाळी प्रार्थना पूर्ण ।
झोपता, जागता चिंतन । आदर्श महापुरूषांचे ।। "

तसेच–

" शौकिन राहणी वर्जावी । सुगंधी अत्तरे, फुलेहि त्यजावी ।
कोणी बाल न ठेवी, तेल न लावी । ऐसे करावे ।।
बघू न द्यावे दर्पणी तोंड । वाढू न द्यावे पोषाखाचे बंड ।
पान बिडी चहाचे थोतांड । सर्वतोपरी वर्जावे ।। "

अशा प्रकारे–

" अश्लीलता कोठेहि न दिसावी । दिनचर्या आदर्श असावी ।
सकाळी सायंकाळी द्यावी । बौद्धिके ब्रम्हचर्याची ।। "

असे महाराज सांगतात.

एकंदरीत, 'दुर्व्यसनोंसम शत्रु नही । सद्गुण के सम मित्र नहीं ।' असे सांगून तुकडोजी महाराजांनी आपल्या सद्विचार प्रवाहातून विशेषतः सत्धर्म, सत्कर्म, प्रेम, सहकार्य, सहानुभूती, सत्य, सेवा, त्याग, काम-क्रोधावर नियंत्रण, दया, दान इत्यादी सद्गुणांवर प्रकाश टाकलेला आहे व दारु–गांजा, व्यभिचार, लाचलुचपतखोरी, काळाबाजार भ्रष्टाचार, इत्यादी समाजविघातक बाबी निषिद्ध मानलेल्या आहेत.

अशाप्रकारे या दोनही संतांनी आपापल्या काळाला अनुसरून सद्गुण-संवर्धनाचा व दुर्गुण–निर्मूलनाचा पुरस्कार केलेला आहे. यादोनही संताना मुख्यतः दुर्व्यसने आणि दुर्गुण या समाजदुष्ट दुष्प्रवृत्तींवर प्रहार करावयाचा होता आणि त्याचबरोबर आत्मोन्नती साधणाऱ्या व समाजोपयोगी

ठरणाऱ्या सद्गुण–सद्प्रवृत्तीचे समाजजीवनात संवर्धन करावयाचे होते. दुर्व्यसने आणि दुर्गुण जेव्हा संबंधित व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनकक्षा ओलांडून समाजजीवनाला बाधक ठरतात, तेव्हा हे दोनही संत त्याचा विशेषत्वाने परामर्श घेतात. परंतु हा परामर्श घेत असताना ते समाज दुष्ट प्रवृत्तीवर प्रहार करायलाही कमी करीत नाहीत.

या दोनही संतांनी समर्थ आणि एकसंघ अशा समाजाची उभारणी करण्याच्या दृष्टिकोणातूनच सद्गुण व दुर्गुण यांची मीमांसा केलेली आहे. संसारातील स्वार्थ, अहंकार, मत्सर, काम, क्रोध या उपाधीच मनुष्याच्या विकासाच्या मार्गात अडचणी निर्माण करतात. म्हणून त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी परोपकार, अहंकारदमन, दया, क्षमा, शांती इत्यादी गुणांचा अवलंब करणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. संसारात कोणाला दुखवू नका, वाईट विचार मनात आणू नका, व्यवहारात कोणाला फसवू नका, अहंकार करू नका, चांगल्या गोष्टीचा स्वीकार करा, व सर्वांशी प्रेमाने आणि नम्रतेने वागा, 'राखावी बहुतांची अंतरे' या प्रमाणे बहुतांशी लोकांना प्रसन्न ठेवा इत्यादी प्रकारचे त्यांचे विचार अतिशय उपयुक्त आहेत. नम्रतेची वृत्ती धारण करणाऱ्या व्यक्तीलाच सत्याची प्रचीती येते उलट अहंकारी व्यक्ती कितीही ज्ञानी किंवा विद्वान असली तरी तिला त्या ज्ञानाचा वा विद्वत्तेचा मुळीच उपयोग होत नाही असे दोनही संतांचे सांगणे आहे.

समर्थ तर स्पष्टच सांगतात की–

"जेणे मक्षिका मक्षिली जाणिवेची ।
तया भोजनाची रूची प्राप्त कैची ।
अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।
तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना ॥"

एखादी माशी पोटात गेल्याने मळमळ वाटते. अन्न कितीही स्वादिष्ट असले तरी पोटात गेलेल्या माशीमुळे अन्नाचा आस्वाद घेता येत नाही त्याप्रमाणे अहंकार (माशीसारखा) अल्पसा असला तरी तो सर्व गुणांची माती करतो.

समाजामध्ये कलह, वाद, तंटे-बखेडे या अहंकारामुळेच उद्भवतात असे दोनही संतांचे विचार असल्याने ते अहंकाराचा पूर्णतः नायनाट करायला सांगतात. तसेच सद्गुण-संवर्धनासाठी दुर्गुणांचा निषेध करणारी तत्त्वे मुद्दाम सांगून मनुष्याला सदाचारी प्रवृत्तीकडे वळण्याचा मार्गही सुचवितात.

समाजात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पाडावयाचा असेल आणि आपल्या विषयीचा आदर निर्माण करावयाचा असेल तर मनुष्याने सद्गुणांची जोपासना करणे अत्यावश्यक आहे. सद्गुणांची जोपासना याचा अर्थ असा की, प्रत्येकाने सत्यनिष्ठा बाळगावी, सदाचाराने वागावे, इंद्रियनिग्रह करावा, सात्विक आहार घ्यावा. स्वतः सदैव प्रसन्न असावे व इतरांनाही प्रसन्न ठेवावे. दया, क्षमा, शांती, नम्रता इत्यादी गुणांचा अवलंब करावा. काम-क्रोधादि विकारांवर नियंत्रण ठेवावे. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी व्हावे व आनंदाने आनंदी व्हावे. दया-क्षमा-शांती हे दोन्ही संतांच्या मते सद्गुण असलेत तरी दया कोणावर व कोणत्या प्रसंगी दाखवावी, क्षमा केव्हा करावी, शांती केव्हा ठेवावी यांचाही सारासार विचार होणे ते आवश्यक मानतात.

"क्षमा, शांतिमय हृदय । विश्वासूपणाचे वर्तन निर्भय ।
प्राण गेलियाही निर्दय । न व्हावे आम्ही ।"

असे जरी महाराज सांगत असले तरी-

"परि जेथे निर्दयपण हवे । तेथे दगडापेक्षाहि कठीण व्हावे ।

असे ते स्पष्टच म्हणतात. अन्यथा-

"भिकाऱ्यास भीक दिली । त्याने दारु गांजात उडविली ।
सांगा काय दया घडली । ऐशिया परी ॥"

असे होईल.

अशाप्रकारे सद्गुण संवर्धनाच्या व दुर्गुण-दुर्व्यसन निर्मूलनाच्या संदर्भातील दोन्ही संतांचे विचार सारख्याच स्वरुपाचे असून दोन्हीही संतांनी आचारशुद्धी व चित्तशुद्धी यावर विशेष भर दिलेला आहे. समर्थांचे 'मनाचे श्लोक' तर या संबंधीचा सबळ पुरावाच आहे.

"जनी निंद्य ते सर्व सोडून द्यायला
आणि जनीं वंद्य ते सर्वभावे करायला" ते सांगतात.

जगातील सर्व अनीतीचे व अधर्माचे मूळ मनुष्याच्या दुष्ट वासनेत आणि पापबुद्धीत अंतर्भूत असते. म्हणून समर्थ सांगतात–

"मना वासना दुष्ट कामा नये रे।
मना सर्वथा पापबुद्धि नको रे॥"

काम–क्रोधादि विकार मनुष्याच्या विनाशाला कारणीभूत ठरतात हे खरे. परंतु त्यांचे समूळ उच्चाटनही सोपे नाही म्हणून त्यांच्या आधीन होऊ नये एवढेच दोनही संत सांगतात.

एकंदरीत, या दोनही संतांचा काळ भिन्न असल्याने त्या काळच्या समस्यांमध्येही भिन्नता आढळणे स्वाभाविकच आहे. तथापि समाज-जीवनात सदाचार भाव प्रस्थापित व्हावा, आत्मोन्नती व सामाजिक उन्नयन साधावे, परस्पर प्रेम, सहकार्य, दया, क्षमा, शांती, भक्ती इत्यादी गुणांचा अवलंब व्हावा, या अपेक्षेनेच या संतद्वयाने आपल्या उक्तीतून व कृतीतून समाजाला सदाचार–संपन्न व समृद्ध जीवन जगण्याचे पाठ दिले आहेत. दोघांचीही दृष्टी मनुष्याच्या पारमार्थिक व प्रापंचिक उत्कर्षावर होती. आचरण शुद्ध राहून समाजजीवनात व्यवहार चांगला घडावा या जाणिवेतूनच त्यांनी भक्तीमार्गाला व्यावहारिक जीवनाची जोड दिलेली दिसते. संसाराच्या उपाधीत अडकलेला व वासना विकारात गुंतलेला मनुष्य आपली आत्मोन्नती साधू शकत नाही व व्यावहारिक जीवनही यशस्स्वी करू शकत नाही म्हणून त्यांनी सद्गुण संवर्धनाचा व दुर्गुण निर्मूलनाचा मार्ग स्थल-कार्य-परिस्थितीपरत्वे सोपा करून सांगितला आहे.

वर्ण-जाति-विषयक–

सामान्यतः वर्ण व जाति या शब्दांचा समान अर्थानेच प्रयोग करण्यात येतो. वास्तविक पाहता या दोन्हींचेही स्वरुप भिन्न आहे. वर्ण-व्यवस्थेचे स्वरूप पाहता असे दिसून येते की, चार महत्त्वपूर्ण कार्यात त्याची विभागणी केलेली आहे. एक म्हणजे राष्ट्ररक्षण, दुसरे ज्ञानदान,

तिसरे व्यापार व्यवसाय व चवथे सेवा. राष्ट्र रक्षणाचे कार्य करणारा तो क्षत्रिय, व्यापार–व्यवसाय करणारा तो वैश्य, धर्माची, नीतीची, शुद्ध आचार–विचाराची कामे करणारा तो ब्राम्हण आणि या तीनही वर्णांची सेवा करणारा तो शूद्र. अशाप्रकारे हे चार–वर्ण, समाजधारणेसाठी प्रस्थापित झाले. त्यालाच 'चातुर्वर्ण्य' असे संबोधले जाते.

वर्णव्यवस्थेच्या तुलनेत 'जाति' व्यवस्थेचे स्वरूप अगदीच लहान आहे. एका वर्णात असंख्य जातींचा अंतर्भाव असू शकतो. यादृष्टीने विभिन्न जातीचे लोक जर समान व्यवसाय करीत असतील तर त्यांचा वर्ण एकच समजला पाहिजे. वर उल्लेखिलेल्या चारही वर्णांची निर्मिती सामाजिक परिस्थिती व समाजाच्या आवश्यकतेनुसार झालेली आहे.

वस्तुतः भारतीय समाजव्यवस्थेत वर्णव्यवस्था ही पूर्णतः जन्मावरही आधारित नाही किंवा कर्म वा गुणावरही आधारित नाही. तथापि जन्म हाच वर्ण व जातीचा मूलभूत आधार ठरविण्यात येऊ लागला. व त्यानुसार प्रत्येक व्यक्तीचे व्यवसाय निश्चित करण्यात आले. पुढे–पुढे तर वर्णाश्रमावर आधारलेली ही 'चातुर्वण्य चौकट' समाजजीवनातून कधीही नष्ट न होणारी एक चिव्वट रूढीच बनली आणि प्रत्येकाने आपली परंपरा-प्राप्त कामे करावीत असा विचार पुढे येऊ लागला.

भागवत धर्मातील ज्ञानेश्वरासारख्या संतांनी देखील अशा 'चातुर्वण्या'चे समर्थनच केलेले आहे.

"सांगे शूद्रपरी आघवी । पक्वान्ने आहाति बरवी ।
ती द्विजे केवी सेवावी । दुर्बल जरी जाहला ।।"

(ज्ञाने. अ. ३–२२१)

शूद्रांच्या घरी जरी सर्व प्रकारचे उत्तम पक्वान्न असले, आणि ब्राम्हण जरी दुर्बल असला तरी तो खाणार नाही. अशाप्रकारे वर्णधर्मानुसार त्यांनी ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व आणि शूद्रांचे नीचत्व मान्य केलेले आहे. तथापि ज्ञानेश्वर व्यवहारात जरी विषमतेचे पक्षपाती होते तरी आध्यात्मिक क्षेत्रात मात्र त्यांनी सर्व वर्णांचा अधिकार सारखाच मानलेला आहे.

"यालागी पापयोनीहि अर्जुना । का वैश्य शूद्र अंगना ।
माते भजता सदना । माझिया येती ॥"

(ज्ञाने. अ. ९–४७४)

त्रैवर्णियांसारखे स्त्री, शूद्र आणि पापीही जर मन:पूर्वक भक्ती करतील तर ते मोक्षास पात्र ठरू शकतील. ज्ञानेश्वरांप्रमाणेच भागवत संप्रदायातील इतर संतांनींही समाजजीवनात मुरलेल्या वर्णभेदाला आपल्या भक्तीसंप्रदायात मुळीच स्थान दिले नाही आणि भागवतधर्माच्या पवित्र झेंड्याखाली "येथे भवतीगा एकसरे । जाती अप्रमाण" या न्यायाने सर्व जातीच्या लोकांना एकत्रित येण्याची संधी दिली. त्यामुळेच त्यांचा भागवत धर्म समाजातील सर्व स्तरांत लोकप्रिय झाला.

एकनाथ महाराज आपल्या 'एकनाथी भागवता' मध्ये सांगतात–

"हो का वर्णामाजी अग्रणी । जो विमुख हरिचरणी ।
त्याहूनि श्वपच श्रेष्ठ मानी । जो भगवद् भजनी प्रेमळु ॥"

(अ. ५–६०)

अशाप्रकारे अभक्त ब्राम्हणापेक्षा ते भगवद्भक्ती करणारा महान श्रेष्ठ मानतात. संत तुकाराम महाराजांनी देखील या संदर्भात असल्याच प्रकारचे विचार आपल्या अभंगातून व्यक्त केलेले आहेत. पहा–

"ब्राम्हण तो नव्हे ऐसी ज्याची बुद्धी । पाहा श्रुतीमधी विचारूनी ।
जयासी नावडे हरिनामकीर्तन । आणि नर्तन वैष्णवांचे ॥
सत्य ज्याचे वेळे घडला व्यभिचार । मातेसी व्यवहार अंत्यजाचा

(तुका अभंग १२३४)

ब्राम्हण तो याती अंत्यज असता । मानावा तत्त्वता निश्चयेसी ।
रामकृष्णनामे उच्चारी सरळे । आठवी सावळे रूप मनी ॥

(तुका अभंग १२३५)

ज्या ब्राम्हणाला ईश्वर नामस्मरण आवडत नाही, तो ब्राम्हणच नव्हे. त्याला व्यभिचारातून निर्माण झालेल्या संततीप्रमाणे नीच समजावे आणि जे अंत्यज नेहमी रामकृष्णांचे नामस्मरण करतात त्यांना ब्राम्हण मानावे. अशाप्रकारे त्यांच्या मते–

'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ'

म्हणजे वैष्णवांच्या दृष्टीने संपूर्ण संसार विष्णुमय असल्याने भेदाभेद मानणे अत्यंत अशुभ भ्रम आहे.

आता आपण या संबंधीचे समर्थ रामदासांचे व संत तुकडोजींचे विचार काय आहेत ते जाणून घेण्याचा प्रयत्न करू.

समर्थ रामदास–

गुरू तो सकळांसी ब्राम्हण । जरी तो जाला क्रियाहीन ।
तरी तयासीच शरण । अनन्यभावे असावे ।।

(दास द. ५ स. १–६)

असो ब्राम्हणा सुरवर वंदिती । तेथे मानव बापुडे किती ।
जरी ब्राम्हण मूढमती । तरि तो जगद्वंद्य ।।

(दास द. ५ स. १–१५)

ब्राम्हण सर्वांचा गुरु असून तो क्रियाहीन झाला तरी अनन्यभावे त्याला शरण गेले पाहिजे. देवाधिदेव ब्राम्हणाला वंदन करतात तेथे दुर्बल मानवाची गोष्ट काय ? असे रामदास म्हणतात. तसेच–

अंत्येज शब्दज्ञाना बरवा । परी तो नेऊन काय करावा ।
ब्राम्हणा सन्निध पूजावा । हे तो न घडे की ।।

(दास द. ५ स. १–१६)

अंत्यज जरी शब्दज्ञानी असला तरी त्याला घेऊन काय उपयोग म्हणून शुद्राला ब्राम्हणाजवळ बसवून त्याची पूजा करणे कसे शक्य आहे ? अंत्यजाच्या बाबतीत समर्थांची विषमतेची भावना वेळोवेळी उफाळून आलेली दिसते.

"अंतर येक तो खरे । परी सांगाते घेऊ न येती माहारे ।
पंडित आणि चाटे पोरे । येक कैसी ।।
मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडे ।
राजे आणि माकडे । येक कैसी ।।"

(दास द. १३ स. १०–१३–१४)

अंतरात्मा एक असूनही आपल्या सान्निध्यात महारांना कधीही घ्यायला नको. मनुष्य व गाढव, किंवा राजा आणि वानर कधीतरी एक होऊ शकतात काय ? असे ते विचारतात.

इतकेच नव्हे तर–

" नीच यातीसी सांगात । तो एक मूर्ख " (दास २–१–२९)

नीच जातीच्या सहवासात राहणारा मूर्ख होय. असे सांगून गुरु शिवाय असू नये परंतु नीच जातीचा गुरुही कधी करू नये.'

'गुरु विरहित असो नये । नीच यातीचा गुरु करू नये'

(दास २–३–३९)

असे ते म्हणतात. यावरून–

नीच जातीचा गुरु त्यांना लज्जास्पद वाटतो असे स्पष्ट दिसून येते. त्यांच्या मते ब्राम्हणांनी सद्गुरु आपल्याच जातीतील करावा. अन्यथा भ्रष्टाचार होतो. पहा–

"आता असो हा विचारू । स्वयातीचा पाहिजे गुरू ।
नाहीतरी भ्रष्टाकारू । नेमस्त घडे ॥"

(५–२–५८ ते ६४)

या संदर्भातील सुप्रसिद्ध विचारवंत आचार्य स. ज. भागवत यांचे विचार उल्लेखनीय वाटतात.

"रामदास शंकराचार्यांद्वारा सांगितलेल्या नवब्राम्हण धर्माचे पुरस्कर्ते होते. वैदिक परंपरेबाबत ते विशेष आग्रह धरीत. चातुर्वर्ण्याश्रित आचार तसेच विचारांचे परिपालन करण्यात ते अत्यंत दक्ष होते. चातुर्वर्ण्यावर आधारित समाजदर्शनाला त्यानी आदर्श मानले होते आणि महाराष्ट्रात त्याच्या प्रस्थापनेला आपले जीवनकार्य मानले होते.

(महाराष्ट्रात संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य. वा. र. सुंठणकर प्रस्तावना पृष्ठ १४–१५)

समर्थांच्या काळात धार्मिक दृष्टीने पाहता वर्णव्यवस्था मोडकळीस आली होती. कारण ब्राम्हणांचा सर्व जातीशी व्यवहार सुरू झाला होता.

मुसलमानी राज्यात ब्राम्हणांना खाण्या-पिण्याचा असा काही विधिनिषेध नव्हता. ते आचारभ्रष्ट होऊ लागले होते. इतकेच नव्हे तर बुद्धिभ्रष्ट बनून व आपले वर्णगुरुत्व सोडून आपल्या शिष्यांचे शिष्य बनले होते. कितीतरी ब्राम्हणदावक मलक फकिरांच्या शिष्यांचे शिष्य झाले होते. इतकेच काय, परंतु पीरांचे उपासक व स्वेच्छेने मुसलमान बनण्यात त्यांना कसलाच कमीपणा वाटत नव्हता. समर्थ यासंबंधी स्पष्टच सांगतात-

" ब्राम्हण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सोडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥
कित्येक दावल मलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरूक होती । आपले इच्छेने ॥

याच काळात तुकारामांसारखे शूद्रवर्णीय समजले जाणारे संत मात्र आपल्या अभ्यास व आत्मबलाच्या आधारे आध्यात्मिक क्षेत्रात ब्राम्हण लोकांनी त्यांना आपल्या गुरुस्थानी मानावे इतके आघाडीवर होते.

समर्थांनीच सांगितल्याप्रमाणे-

" गुरुत्व आले नीच याती । काही येक वाढली महंती ।
शूद्र आचार बुडविती । ब्राम्हणांचा ॥

नीच जातीला गुरुत्व प्राप्त होऊन तिचे महत्व वाढत होते. अशा परिस्थितीत डॉ. वि. भि. कोलतेंच्या मते **" ब्राम्हणांची आचारभ्रष्टता आणि स्थानभ्रष्टता रामदासांच्या अंतःकरणाला दुःख देत होती व अन्य वर्णाचे लोक ब्राम्हणांपेक्षा अधिक उन्नत होत होते, हेही त्यांना सहन होत नव्हते."**
(मराठी संतांचे सामाजिक कार्य. डॉ. वि. भि. कोलते पृष्ठ १२८)

ब्राम्हणांच्या सत्वहीनतेची कारणमिमांसा करताना समर्थ स्वतःच सांगतात को, 'ब्राम्हणांना गावगुंडपणा, ग्रामण्य, मत्सर इत्यादींनी सत्वहीन केले आहे. ज्या विष्णूने ब्राम्हणांच्या आदरप्रेमाने भृगुऋषीने मारलेल्या लाथेचे श्रीवत्सचिन्ह भूषण म्हणून मिरविले त्याच विष्णूने परशुराम अवतारात ब्राम्हणांना शाप दिला. पहा-

" ब्राम्हणास ग्रामणीने बुडविले । विष्णूने श्रीवत्स मिरविले ।
त्याच विष्णूने श्रापिले । परशरामे ॥

एकंदरीत, समर्थांना त्यांच्या काळातील या ब्राम्हणांच्या अवस्थेविषयी किती विषाद वाटत होता आणि त्यांच्या उन्नतीविषयीची किती उत्कट तळमळ लागली होती हे दिसून येते–

" लक्ष भोजनी पूज्य ब्राम्हण । आन यातीसी पूसे कोण ।

(दास द. ५–१–१४)

'लक्षभोजन प्रसंगी ब्राम्हणच पूज्य मानला जातो. त्या प्रसंगी अन्य जातीयांना कोण पुसतो ?' असले समर्थांचे संकुचित विचार पाहून **'हो गुणकर्मावर आधारीत वर्ण व्यवस्था नाही, जातीयतेचे नग्न प्रदर्शन आहे'** ('मराठी संतांचे सामाजिक कार्य' ले. डॉ. वि. भि. कोलते. पृ. १३३) असे वि. भि. कोलते यांनी काढलेले उद्‌गारही लक्षात घेण्यासारखे आहेत.

तात्पर्य असे की, रामदासांचे वर्णव्यवस्थाविषयक विचार ब्राम्हणांनुकूल होते यात शंकाच नाही. परंतु ब्राम्हणांविषयीच्या अवास्तव व अतिरेकी अहंकारामुळे त्यांना उचलून धरण्यासाठी अन्यवर्णियांना उचलून बाजूला फेकण्याची व त्यांना कमी लेखण्याची त्यांची वृत्ती त्यांच्यावर जातीय वादाचा आक्षेप घेण्यास कारणीभूत ठरलेली आहे. वर्णपरत्वे कर्तव्यनिष्ठता ही समाजसंवर्धनाला हितकारक ठरते आणि म्हणून प्रत्येक वर्णाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेऊन ते योग्यप्रकारे पार पाडले तर समाजाची घडी विस्कटत नाही; उलट तो समाज प्रगतीपथावर वाटचाल करू शकतो हे खरे; परंतु त्यासाठी तत्कालीन ब्राम्हणांच्या अधःपतनाच्या संदर्भात ब्राम्हणांना विशेषत्वाने उपदेश देऊन इतर वर्णीयांना कमी लेखणे हे कितपत युक्त आहे? त्यांना ब्राम्हणवर्णाचीच विशेष काळजी होती व ब्राम्हणांना दृष्टीपुढे ठेऊनच त्यांनी लेखन-प्रपंच केला असा जर कोणी याचा अर्थ केला तर ती चूक म्हणता येईल काय ?

संत तुकारामांनी आपल्या एका अभंगात यासंबंधी असे म्हटले आहे की–

" वेदविहित तुम्ही आईकाहो कर्मे । बोलतो ती वर्मे संतांपुढे ।
चारी वर्ण जाले एकाचिये अंगी । पाप पुण्य भागी विभागिले ॥ "

एकाच परमेश्वरापासून ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारही वर्णांची उत्पत्ती झाली असून पापपुण्यानुसार परस्परांत भेदही निर्माण झाला आहे. ब्राम्हणाने आपली विहित कर्मे करावीत, क्षत्रियाने प्रजापालन करावे, वैश्याने व्यापार करावा आणि शुद्राने सेवा करावी. समर्थही यासंबंधी तेच सांगतात–

" राजाने करावे राजधर्म । क्षात्रि करावे क्षात्रधर्म "
ब्राम्हणी करावे स्वधर्म । नानाप्रकारे "

परंतु–

" सांडूनिया रामराम । ब्राम्हण म्हणती दोमदोम "

अशी ही समाजातील पुढारलेली ब्राम्हण मंडळी जेव्हा देशद्रोही व धर्मद्रोही वर्तन करू लागली. तेव्हा सावधान करण्यासाठी समर्थांना प्रामुख्याने त्यांनाच आवाहन करावे लागले. अर्थात त्यांची ही पक्षपाती प्रवृत्ती आहे असे समजून त्यांच्यावर जातीयतेचा आक्षेप घेतल्या गेला.

या आक्षेपाचे खंडन–मंडन अनेक विद्वानांनी आपापल्यापरीने केलेले आहे. त्याच्या तपशीलात शिरण्याचे येथे प्रयोजन नाही. परंतु एवढे मात्र निश्चित म्हणता येईल की, कोणत्याही पुरूषाच्या आचार–विचारांचे व कार्य–कर्तृत्वाचे मूल्यमापन करीत असताना त्याचा काळ व त्या काळातील विशिष्ट परिस्थिती दृष्टिआड होता कामा नये. कारण त्या काळाचे व परिस्थितीचे प्रतिबिंबच संबंधित व्यक्तीच्या आचार–विचारात पडले असल्याचे पुष्कळदा प्रत्ययास येते. समर्थांच्याही बाबतीत बऱ्याच अंशी तसे झाले असण्याचा संभव आहे.

संत तुकडोजी–

तुकडोजी महाराजांचे वर्ण–जाती विषयक विचार समर्थ रामदासांच्या विचारांच्या तुलनेत अधिक सुसंगत, स्पष्ट व पुरोगामी स्वरूपाचे आहेत. या दोनही संतांच्या काळामध्ये जवळजवळ तीनशे वर्षाचे अफाट अंतर आहे. त्यामुळे त्यांच्या वर्ण–जाती विषयक विचारात काळ-परिस्थितीपरत्वे भिन्नत्व आढळणे स्वाभाविकच आहे.

वर्ण व्यवस्थेचे विश्लेषण करताना महाराज आपल्या ग्रामगीतेतील **' वर्णव्यवस्था '** या पाचव्या अध्यायात म्हणतात की–

" धंदे असती अनेक गुणांचे । परि मुख्य भेद चारचि त्यांचे ।
म्हणोनि " चातुर्वर्ण्य " नाव याचे । ठेविले ऋषिजनी ॥ "
(अ. ५ ओ. १६)

अशा प्रकारे समाजजीवनात विविध प्रकारचे व्यवसाय असले तरी प्रामुख्याने राष्ट्ररक्षण, ज्ञानदान, व्यापार-व्यवसाय व सेवा या चार विभागात त्यांचा समावेश होत असल्याने ऋषीमुनींनी त्याला **'चातुर्वर्ण्य'** असे नाव दिले असल्याचे ते सांगतात.

" संरक्षण देती ते क्षत्रिय । व्यापार करिती ते वैश्य निर्भय ।
न्यायदर्शन योजनाकार्य । ब्राम्हण वर्णा नेमिले ॥ "
(अ. ५ ओ. १७)

या तिन्ही कामी अनाधिकारी । तया शुद्र नाम निर्धारी ।
करी सर्वांची सेवा-चाकरी । तोहि सर्वांसी पूरक ॥ "
(अ. ५ ओ. १८)

या प्रमाणे राष्ट्र रक्षणाचे कार्य करणारा तो क्षत्रिय, ज्ञानदान करणारा तो ब्राम्हण, व्यापार-व्यवसाय करणारा तो वैश्य आणि या तीनही वर्णांची सेवा करणारा तो शूद्र. अशा प्रकारे हा 'चातुर्वर्ण्य' समाजधारणेसाठी समाजात प्रस्थापित झाला. परंतु या चातुर्वण्य व्यवस्थेला समाजातील विविधवर्गीय लोकांच्या स्वार्थी प्रवृत्तीमुळे विकृत स्वरुप प्राप्त होऊन त्याची चौकट इतकी मजबूत करण्यात आली की, पात्रता असूनही एका वर्णातून दुसऱ्या वर्णातील प्रवेशाला प्रतिबंध होऊ लागला. इतकेच नव्हे तर, विशिष्ट वर्णाचे शिक्कामोर्तब जन्मजात होऊन उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भाव समाजजीवनात रुजल्या गेला. वास्तविक पाहता-

" जो ज्यापाशी उत्तम गुण । त्यानेच त्याचे चालावे जीवन ।
व्हावे समाजाचेही धारण पोषण । हीच योजना चातुर्वर्णी ॥ "
(अ. ५ ओ २०)

असे महाराज सांगतात परंतु पुढे पुढे या वर्ण व जातिभेदाच्या नावाखाली अवडंबर माजून संपूर्ण समाजाचे अधःपतन होऊ लागले. महाराज यासंबंधी स्पष्टच सांगतात की-

" वास्तविक कामाकरिता वर्ण झाले । समाजासि सर्वचि लागले ।
म्हणोनि सर्वांनाचि महत्व मले । ब्राम्हणापासोनि महारावरि ॥ "
(अ. ५ ओ. ५८)

त्यात " तू नीच, मी उच्च " म्हणोन । वाढविले आडंबर पूर्ण ।
त्यानेच जाहाले पतन । वर्णांचे आणि गावाचे ॥ " (अ. ५ ओ. ५९)

महाराजांच्या मते माणसाची श्रेष्ठ–कनिष्ठताही त्याच्या आचार–धर्मावर व गुण–कर्मावर अवलंबून आहे; ती जन्मावर अवलंबून नाही.

हिंदुधर्मात मनुष्याला पशुतुल्य बनविणारी अत्यंत चिव्वट व दुष्ट रूढी जर कोणती असेल तर ती म्हणजे जातियता व विकृत वर्णभेद. हिंदुधर्माला हा एक भयंकर शाप आहे. विषमतेवर आधारलेल्या या समाजविघातक रूढीमुळे संपूर्ण समाज व्यवस्था खिळखिळी झाली आहे. आपल्याच सारख्या चालत्या–बोलत्या माणसांना या समाजव्यवस्थेने चातुर्वण्याची विकृत चौकट पुढे करून तुच्छ आणि गलिच्छ लेखले. अशा या अमानुष व पाशवी अत्याचाराविरुद्ध महाराजांनी वर्ण व जातिविषयक आपले स्वच्छ विचार मांडून श्रेष्ठ–कनिष्ठत्वाचा खरा निकष समाजाला समजावून सांगितला व वर्ण–जाति भेदाच्या फुग्यातील दूषित हवाच काढून टाकली.

या संबंधी ग्रामगीतेतील पाचव्या अध्यायातून त्यांनी निर्माण केलेले प्रश्न व त्यांची स्वतःच दिलेली उत्तरे मोठी विचार प्रवर्तक वाटतात.

पहा–

" शुद्राघरी उत्तम वर्तनी । तो शुद्रचि कैसा राहिला ?
तैसा क्षत्रियघरी भ्रष्ट निपजला । तो क्षत्रिय कैसा ? "
(अ. ५ ओ. ६९)

" एक ब्राम्हण दुकानि बैसला । मांसमच्छी विको लागला ?
त्याची पूजा कराया एक गेला । शोभा देईल काय ते ? ? "
(अ. ५ ओ. ७०)

ब्राम्हण म्हणवूनि विलास करी । नाना व्यसने अंगीकारी ।
करी नौकरी सावकारी । तो ब्राम्हण का मानावा ?
(अ. ५ ओ. ७१)

म्हणजेच त्यांच्या मते–

" जेथे दिसती ब्राम्हणाचे गुण । त्यासि आदरे म्हणावे ब्राम्हण ।
ऐसा स्थापिलाचि आहे सनातन । नियम वर्णाश्रमीचा ॥ "

(अ. ५ ओ. ७८)

तात्पर्य असे की, शुद्राच्या घरी जर सद्वर्तनी व्यक्ती असेल आणि तो भजन–पूजन व सत्कार्यात आपला वेळ घालवित असेल तर तो शुद्र निश्चितच नाही. तसेच आपला क्षात्रधर्म सोडून जर क्षत्रिय वाममार्गाने जात असेल तर तो क्षत्रिय खचितच् नव्हे. किंवहुना दुकानात बसून मासमच्छी विकणाऱ्या ब्राम्हणाची कोणी पूजा करू लागता तर ते शोभा कशी देणार ? एकंदरीत, अस्पृश्यामध्ये जरी 'ब्राम्हण' वर्णाचे गुण अतर्भूत असतील आणि त्याचा आचार तसा असेल तर त्याची 'ब्राम्हण' म्हणूनच आदराने पूजा करावी.

महाराज यासंबंधी स्पष्टच सांगतात की–

" म्हणोनि गुणांवरचि लक्ष द्यावे । जो ज्या गुणी तो त्या वर्णी म्हणावे । "

(अ. ५ ओ. ७९)

महाराजांच्या मते–

" हे ब्राम्हणत्व नव्हे जातीय । कुणीहि साधावे निर्भय । "

(अ. ५ ओ. १३०)

अशाप्रकारे जन्मजात वर्णभेदाची व जातीयतेची विकृत चौकट खिळखिळी करून माणसाच्या कर्तृत्वाला मूलभूत मानणारी महाराजांची ही भूमिका परंपरेपेक्षा निराळी असून समाजोपयुक्त आहे.

या समाजातील वर्णद्वेष व जातीयता नष्ट व्हावी म्हणून महाराज परमेश्वराला वरदान मागताना म्हणतात की–

" या भारतात बंधुभाव नित्य वसू दे । दे वरचि असा दे ।
हे सर्व पथ संप्रदाय एक दिसू दे । मतभेद नसू दे ।

(राष्ट्रीय भजनावली पृष्ठ १)

महाराजांच्या मते माणसाच्या मोठेपणाचा निकष म्हणजे त्याचे कर्तृत्व होय. म्हणूनच जन्मजात मोठेपणा त्यांना मान्य नाही.

अशा प्रकारे तुकडोजी महाराजांनी वर्ण व जातिविषयक विचार सुस्पष्ट शब्दांत समाजासमोर मांडून फार मोठी सामाजिक जागृती घडवून आणली. इतकेच नव्हे तर, कोणत्याही प्रकारचा वर्णद्वेष वा जातीयता न वाढविता जन्माधिष्ठीत उच्चनीचतेच्या विकृत कल्पनांचे समाजजीवनातून समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला.

समर्थ रामदास व संत तुकडोजी या दोघांच्याही वर्ण-जाति विषयक भूमिकांचा विचार केल्यास त्यातील मूलभूत भेद त्यांच्या खालील ओव्यांतून ठळकपणे जाणवतो.

पहा–

समर्थ म्हणतात–

" गुरू तो सकळांसी ब्राम्हण । जरी तो जाला क्रियाहीन ।
तरी तयासीच शरण । अनन्यभावे असावे ॥ "

(दास. द. ५ स. १–६)

" असो ब्राम्हणा सुरवर वंदिती । तेथे मानव बापुडे किती ।
जरी ब्राम्हण मूढमती । तरि तो जगद्वंद्य ॥ "

(दास. द ५ स. १–१५)

आणि याच संदर्भात महाराज सांगतात–

" एक ब्राम्हण दुकानि बैसला । मांस मच्छी विको लागला ।
त्याची पूजा कराया एक गेला । शोभा देईल काय ते ॥ "

(ग्राम–अ. ५–७०)

" ब्राम्हण म्हणवूनि विलास करी । नाना व्यसने अंगिकारी ।
करी नौकरी सावकारी । तो ब्राम्हण का मानावा ? । "

(ग्राम. अ. ५–७१)

म्हणजेच समर्थांच्या मते ब्राम्हण भ्रष्ट झाला असेल, तरी त्याला श्रेष्ठ मानावे उलट महाराजांच्या मते–

" जेथे दिसती ब्राम्हणाचे गुण । त्यासि आदरे म्हणावे ब्राम्हण । "

एवढे मोठे महदंतर या दोन संतांच्या विचारात दिसून येते. अर्थात हा तत्कालीन परिस्थितीचा परिणाम म्हणावा लागेल.

———

संत द्वयाची राष्ट्रीय भूमिका

समर्थ रामदास–

समर्थांचा काळ म्हणजे सतरावे शतक. समर्थांच्या राष्ट्रीय भूमिकेचा विचार करीत असताना त्यांच्या पूर्वीच्या महाराष्ट्राच्या स्थितीचा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात विजापूरला आदिलशहा, अहमदनगरला निजामशहा, बेदरला बरीदशहा यांचा अमल चालू होता. या शाही घराण्यांचा परस्परांमध्ये सतत सुरू असलेला संघर्ष आणि उत्तरेकडून मोगल बादशहाचे आक्रमक धोरण यामुळे महाराष्ट्रात सर्वत्र अशांतता प्रस्थापित झाली होती. त्यामुळे बंडाचे प्रस्थ बोकाळले होते. मुस्लीम शहाच्या पदरी अनेक मराठी सरदार असत. भोसले, घोरपडे, पिंगळे, चव्हाण, हंबीरराव, राजा ढुंढीराज, उदाराम ब्राम्हण, दादाजी विश्वनाथ यासारखी अनेक शूर घराणी निजामशाही अथवा आदिलशाही यांच्याकडे केवळ पैशासाठी कामास होती. त्यांचे गनिमीकाव्यातील कौशल्य, शौर्य, स्वामीनिष्ठा यामुळे त्यांना मोठ्या हुद्द्याच्या जागा देण्यात आल्या होत्या.

मुसलमानी सत्ता महाराष्ट्रात प्रस्थापित होताच महाराष्ट्राच्या आर्थिक व धार्मिक अवनतीस आरंभ झाला. अवर्षणामुळे पडलेले दुष्काळ, वाढती महागाई, परस्परांची राज्ये बळकावण्यात लागलेली अहमहमिका, यामुळे महाराष्ट्रातील जनता त्रस्त झाली होती. अनेक लोक आपली गावे सोडून परगावी जात. परस्परातील सत्तापिपासू प्रवृत्ती, हेवेदावे व स्पर्धा यामुळे गावे, पिके व घरेदारे उध्वस्त करण्यात येई.

ही सर्व परिस्थिती कमीजास्त प्रमाणात शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील अवतार कार्यापर्यंत सुरूच होती. पुढे ही परिस्थिती दूर करून महाराष्ट्रात सुवत्ता व सुख–समृद्धी नांदावी म्हणून शिवाजी महाराजांच्या हालचाली सुरू झाल्या आणि त्यांनी आपल्या पराक्रमाने मुसलमानांच्या ताब्यात असलेले अनेक किल्ले हस्तगत केले.

म्लेच्छांचे अत्याचारी धोरण पाहून त्यांचे राज्य नष्ट व्हावे व त्यासाठी महाराष्ट्रात आपला राजा असावा असे समर्थांना वाटत होतेच.

अर्थात त्यांचे हे स्वप्न शिवाजी महाराजांच्या माध्यमातून पूर्ण व्हायला लागले होते. समर्थ शिवाजी महाराजांच्या उत्कर्षासाठी व यशासाठीही अनेकदा भवानी देवीची प्रार्थना करीत. दक्षिणेच्या मुसलमान सुलतानांना आणि उत्तर हिंदुस्थानच्या मोगल सम्राट औरंगजेबालाही शिवाजी महाराजांचा पराक्रम पाहून धडकी भरली. समर्थांना हे अभिप्रेतच होते. त्यांना फार आनंद झाला व त्यांनी शिवाजींना पत्र लिहून त्यांचे अभिनंदन करताना म्हटले की–

" निश्चयाचा महामेरू । बहुजनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।। १ ।।
परोपकाराचिया राशी । अखंड घडती जयासी ।
तयाचे गुण महत्त्वासी । तुळणा कैची ।।
नरपति, हयपति, गजपति । गडपति भूपति जळपती ।
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठ भागी ।।
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणे नृपवर । तुच्छ केले ।। "

अशाप्रकारे निश्चयाचे महामेरू, नरपती, भूपती, छत्रपती, यशवंत, सामर्थ्यवंत, पुण्यवंत, विवेकशील, इत्यादी शब्दांनी शिवाजींचा समर्थांनी गौरव केलेला आहे. पुढे समर्थ व शिवाजी महाराज यांच्या भेटीत समर्थांनी राजकारणासंबंधीचे शिवाजींशी बोलणे केले. यावरून राष्ट्रभक्तीची ज्योत समर्थांच्या अंतःकरणात सतत कशी तेवत होती व ती प्रज्वलित ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न कसा सुरू होता हे त्यांच्या आचार–विचारावरुन स्पष्ट होते.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजीना जेव्हा राजपद प्राप्त झाले, तेव्हा त्यांनी शंभूराजांना पत्र पाठविले. त्या पत्रातील संक्षिप्त मजकूर असा–

" अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ।
तजवीज करीत बसावे । एकांत स्थळी ।।

काही उग्र स्थिती सोडावी । काही सौम्यता धरावी ।
चिंता पराची लागावी । अंतर्यामी ॥
आहे तितुके जतन करावे । पुढे अधिक मेळवावे ।
महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।"

इतकेच नव्हे तर–

शंभूराजांना समर्थ पुढे लिहितात–

" शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥

यावरून समर्थांच्या मनात शिवाजी महाराजांविषयी व त्यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्याविषयी किती निष्ठा होती हे दिसून येते. महाराष्ट्र राज्य भारतभर पसरावे अशी त्यांची मनोमन इच्छा होती.

समर्थांनी स्वराज्यस्थापनेसाठी शिवरायासारखे स्वतः शस्त्र हातात धरले नसले, तरी असंख्य लोकांची सशक्त संघटना उभारून त्यांच्यात स्वराज्य प्राप्तीची प्रेरणा निर्माण केली हा त्यांचा राष्ट्रीय बाणा अतिशय महत्वाचा मानावा लागेल.

शंभूराजांना त्यांनी लिहिलेल्या पत्रातील उपदेश वाचला असता रामदासांच्या राजनीतीचे दर्शन घडते.

पहा–

" सर्व लोकांना एकत्रित करून शत्रूचा निःपात करावा, सर्व लोकांना संघटित करून म्लेंच्छावर आक्रमण करावे, वडिलांनी मिळविलेल्या राज्यांचे रक्षण करावे, राज्याचा विस्तार वाढवावा, सर्वत्र महाराष्ट्र राज्य प्रस्थापित करावे."

क्षात्रधर्माविषयी बोलताना समर्थ लिहितात–

" जयास जीवाचे वाटे भय । त्याने क्षात्रधर्म करू नये ।
काही तरी करुनि उपाये । पोट भरावे ॥
विन्मुख मरणी नर्क होती । वाचून येता मोठी फजिती ।
इहलोक परलोक जाती । पहाना का ॥
मारिता–मारिता मरावे । तेणे गतीस पावावे ।
फिरोन येता भोगावे । महद्भाग्य ॥ "

अशा प्रकारे लढता लढता मेलो तर सद्गती प्राप्त होते आणि लढाईत यश मिळाले तर थोर भाग्याचा उपभोग मिळतो. श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरूक्षेत्रावर जे–

" हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम ॥ "

असे जे सांगितले आहे त्याचा प्रत्यय समर्थांच्या या ओव्यांमध्ये दिसून येतो. तोफेच्या गोळ्याप्रमाणे शत्रूवर निर्भयपणे जाऊन आदळावे असे ते म्हणतात.

शक्तीने मिळती राज्ये–

पराक्रमी श्री रामचंद्र प्रभु व शक्तीमान श्रीहनुमान हे समर्थांचे आदर्श होते. राजकारणासाठी समर्थांनी शक्ती उपासना केली.

" शक्तीने पावती सुखे । शक्ती नसता विटंबना ।
शक्तीने नेटका प्राणी । वैभव भोगिता दिसे ।
कोण पुसे अशक्ताला । रोगींसे बराडो दिसे ।
कळा नाही कांती नाही । युक्ति बुद्धि दुरावली ।
साजिरी शक्ती तो काया । काया मायाच वाढवी ।
शक्ती तो सर्वहि सुखे । शक्ति आनंद भोगवी ।
सार संसार शक्तीने । शक्तीने शक्ती भोगिजे ।
शक्त तो सर्वहि भोगी । शक्तिविण दरिद्रता ।
शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने यत्न होतसे ।
शक्ती युक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत धावती । "

अशाप्रकारे शक्तीने सर्व प्रकारची सुखे प्राप्त होतात. सर्व ऐश्वर्य भोगता येते. उलट अशक्ताची सर्वत्र फजिती होते. अंगात शक्ती असेल तर शरीर शोभिवंत, सतेज व सुंदर दिसते. आणि अशा शक्तीमान पुरूषाचा सर्वत्र प्रभाव पडतो. याशिवाय शक्तीमुळे आनंदही भोगता येतो आणि राज्येही मिळविता येतात. अर्थात शक्ती सोबतच युक्तीही हवी. शक्ती व युक्ती यांचा समन्वय साधला की, वैभव हसत–हसत सुखाने धाव घेते. असे समर्थ म्हणतात.

अशाप्रकारे समर्थांनी केवळ देवभक्तीलाच प्राधान्य देऊन त्याचा पुरस्कार केला नाही, तर ' **दुसरे ते राजकारण** ' हे त्यांनीच म्हटल्याप्रमाणे त्या राजकारणाला शक्ती उपासनेचा मंत्र त्यांनी दिला.

भवानी देवीचो करूणा भाकताना समर्थ म्हणतात–

" दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतो ।
परंतु रोकडे काही । मूळ सामर्थ्य दाखवी ॥ "

भवानी देवीपुढे समर्थांचे हे मागणे म्हणजे स्वराज्याविषयी त्यांच्या अंतकरणात किती उत्कट तळमळ होती हे स्पष्ट होते.

' **तुझा तू वाढवी राजा** ' या शब्दांतून त्यांनी ' महाराष्ट्रधर्म वाढविण्यासाठी शिवाजीला लहानाचा मोठा कर ' अशी प्रार्थना केली आहे. समर्थांचे तत्कालीन राजकीय घडामोडींचे सूक्ष्म अवलोकन लक्षात घेऊन त्यांना ' **राजकारणी–संत** ' अशीही संज्ञा देण्यात आलेली आहे.

रामदासांचे राजकीय मनोगत त्यांच्या ' आनंदवन भुवन ' या काव्यावरून अधिक स्पष्ट झालेले आहे. आनंदवन भुवनी हे त्यांना पडलेले एक स्वप्न आहे. त्यातील–

" बुडाला औरंग्या पापी । म्लेंच संव्हार जाहाला । "

या ओळीमध्ये ते औरंगजेब बादशहाला " औरंग्या ' या शब्दाने संबोधून आपला संताप व्यक्त करतात. या वरून त्यांना केवळ औरंगजेबाविषयीच खूप राग आहे असे वाटते. परंतु प्रत्यक्षात हा राग केवळ एका व्यक्ती पुरता मर्यादित नसून हिंदूवर अत्याचार करणाऱ्या पाशवी प्रवृत्ती वरील आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

हिंदूंवर होणाऱ्या अन्यायाविषयी त्यांच्या अंत:करणात आग किती धगधगत होती हे यावरून स्पट होते. तसेच ' बुडाला औरंग्या पापी ' या शब्दासंबंधी डॉ. पेंडसे असे म्हणतात की–" औरंगजेबाने इ. स. १६६९ मध्ये काशीचे विश्वेश्वराचे आणि मथुरेच्या केशवराजाचे अशी दोन्ही मंदिरे पाडून तेथे मशिदी उभारल्या व हिंदुस्थानांतील संपूर्ण हिंदु

जनतेच्या धार्मिक भावनांवर प्रचंड आघात केला. या हिंदुधर्म द्वेष्टचाला 'पापी' म्हणू नये तर काय म्हणावे ?"

(राजगुरू समर्थ रामदास ले. डॉ. शं. दा. पेंडसे पृ. ३६४)

राजकारणाविषयी आपले मनोगत अधिक स्पष्ट करताना समर्थ म्हणतात–

"जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥
मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकांकरवी करवावे ।
कित्तेक खलक उगवावे । राजकारणामधे ।
गनीमाच्या देखता फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा ।
ऐसा पाहिजे की राजा । कैपक्षी परमार्थी ।
धूर्तपणाची कामे । राजकारण करावे नेमे ।
ढिलेपणाच्या संभ्रमे । जाऊ नये ॥"

राजकारणाची कामे सावधानतेने करावी व त्यात शिथिलता कदापि येऊ देऊ नये असे ते म्हणतात.

धर्मस्थापनेच्या कार्यामध्ये रामदासांनी राज्यस्थापनेला अतिशय महत्त्व दिलेले आहे. राज्यस्थापनेचे कार्य ते धर्माचाच एक भाग समजत असत. रामदासांनी राजकारण केले, राजनीती सांगितली, परंतु त्यात ते अडकून पडले नाही. महाराष्ट्रातील हिंदुत्वराज्याच्या स्थापनेचे श्रेय पूर्णतः शिवाजी महाराजांकडे जाते यात शंकाच नाही, परंतु रामदासांनी आपल्या प्रवचनांतून लोकांमध्ये स्वधर्माभिमान व देशभक्ती जागविली, सुमर्थ संघटना उभारण्याची लोकांमध्ये प्रेरणा निर्माण केली आणि हिंदूनी मुस्लीमांची केवळ धनालाभासाठी चाकरी करणे ही निव्वळ गुलामगिरी आहे अशी शिकवण दिली. यादृष्टीने विचार करता त्यांची ही राष्ट्रीय भूमिका अतिशय महत्वाची ठरते.

महाराष्ट्र धर्म म्हणजे रामदासांच्या मते मुसलमानांच्या अत्याचारी प्रवृत्तीचा प्रतिकार, स्वधर्म प्रेम आणि मराठ्यांचे ऐक्य प्रस्थापित करणे होय. ही तीन तत्त्वेच त्यांच्या राजकारणी तत्वज्ञानाचे सार आहे. म्हणून

असे म्हणण्यात येते की, महाराष्ट्रधर्माचा पाया रामदासांनी घातला आणि त्यावर शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या भव्य महालाची उभारणी केली. महाराष्ट्रातील स्वराज्याच्या इमारतीसाठी अशाप्रकारे या दोन समकालीन महापुरुषांनी आपापल्या प्रवृत्तीनुसार पुरूषार्थाचे महान कार्य केले आहे. शिवाजींच्या निधनानंतर शंभू राजाने धारण केलेली उग्र प्रवृत्ती स्वराज्याच्या विनाशास कारणीभूत ठरेल या जाणिवेनेच रामदासांच्या अंतःकरणातील राष्ट्रनिष्ठा स्वस्थ न बसता ' **मागील अपराध क्षमावे । कारभारी हाती धरावे** ' असे मोठ्या आत्मीयतेने ते शंभूराजांना सांगू लागले.

धर्म व राष्ट्र यांचा निकट संबंध असतो हे रामदासांनी ओळखले. समर्थ रामदास हे जसे स्वानुभव संपन्न संत होते, तसेच ते प्रखर राष्ट्रभक्तही होते. म्हणूनच त्यांच्या चरित्रात राजकारण व धर्मकारण यांचा सुंदर समन्वय साधल्या गेलेला आहे. त्यांच्या ग्रंथातील राष्ट्रभक्ती जागविणारे विचार वाचले म्हणजे इटलीतील मॅझिनी या देशभक्ताचे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. विचार परिवर्तन हे राज्यक्रांतीचे बीजरूप कार्य असते. मॅझिनीच्या स्फूर्तिपद लेखामुळे इटलीतील लोकांची मने स्वातंत्र्य प्रवर्तक बनली. रामदासांच्याही प्रबोधनाने महाराष्ट्रामध्ये स्वराज्य प्राप्तीची प्रेरणा निर्माण केली. रामदासांचे हे बहुमोल राष्ट्रीय कार्य लक्षात घेऊन श्री न. चिं. केळकर यांनी रामदासांना ' महाराष्ट्राचे मॅझिनी ' या शब्दांनी संबोधले आहे. डॉ. शं. दा. पेंडसे यासंबंधी स्पष्टच म्हणतात की–' रामदासांचे हे राष्ट्रनिर्मितीचे ' कार्य इटलीच्या युवकांना राष्ट्रभक्तीचे तत्वज्ञान शिकविणाऱ्या मॅझिनीच्या कार्याच्या तोलाचे होते "

(मराठी संत–काव्य आणि कर्मयोग डॉ. शं. दा. पेंडसे १९६१)

प्रो. शं. द. जावडेकर हे आपल्या "राजनीति शास्त्र परिचय" या ग्रंथात लिहितात–मॅझिनीने गेल्या शतकात युरोपात राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या तत्वाचा पुष्कळ प्रसार केला व राष्ट्रधर्माची कल्पना लोकांना आणून दिली. राष्ट्रीयत्वाच्या भावनेला आध्यात्मिक किंवा धार्मिक स्वरूप देण्याचे कार्य त्याने उत्तम प्रकारे बजाविले आहे." (पृष्ठ ६०)

प्रो. जावडेकरांच्या या विधानातील आशयाशी-श्री. स. खं. आळतेकर आपल्या 'श्रीसमर्थ चरित्र' या ग्रंथात पृष्ठ २०८ वर म्हणतात त्याप्रमाणे–

" सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥

" ही समर्थांची सुप्रसिद्ध ओवी तंतोतत जुळते ". समर्थांनी लोकमताला राजनीतीच्या दृष्टीने दिलेले महत्व लक्षात घेता फर्ग्युसन महाविद्यालयातील इतिहासाचे प्राध्यापक कै. लिमये यांनी (' फर्ग्युसन कॉलेज मॅगेझीन, फेब्रुवारी १९१८) यासंबंधी उद्धृत केलेले विचार उल्लेखनीय वाटतात. ते म्हणतात–" रामदास हे लोकांमध्ये चैतन्य उत्पन्न करणारे फार उच्च दर्जाचे लोकनायक होते. म्लेच्छांकडून हिंदूंना भोगाव्या लागलेल्या यातनांचे हृदयद्रावक वर्णन करून महाराष्ट्रातील लोकांची मने उद्दीपित करण्याचा त्यांचा हेतू होता. "

" राजकारण बहुत करावे । परंतु कळोचि नेदावे ।
परपीडेवरी नसावे । अंतःकरण " ॥

अशी न्याय नीतीची मर्यादा राखून समर्थांनी राजकारणाचा केलेला उपदेश हा उदात्त स्वरूपाचा नाही असे कोण म्हणेल ? राजकारण म्हणजे धर्मराज्याला पोषक असा उद्योग होय या दृष्टिकोणातूनच समर्थांच्या मते राज्यशासन हे धर्म निमंत्रित असावे आणि राज्यक्रांतीला धर्माचे अधिष्ठान असावे म्हणजे उत्तम राज्य व्यवस्था निर्माण होते. अशा उत्तम राज्यव्यवस्थेतून ' रामराज्य ' निर्माण व्हावे असे समर्थांचे स्वप्न होते.

समर्थांना राजसत्ताक पद्धती मान्य होती. राजा म्हणजे राज्यसंस्थेचा प्रमुख असून संपूर्ण सत्ता त्याच्याच ठिकाणी केंद्रित झालेली असते असे ते म्हणत असत. कोणत्याही संस्थेतील–मग ती कुटुंबसंस्था असो, की राज्य संस्था असो,–प्रमुखाच्या वर्तणुकीचे बरे वाईट परिणाम त्या त्या संस्थातील घटकांना भोगावे लागतात. म्हणून, राजा हा उत्तम वर्तनी व आदर्श पुरूष असावा म्हणजे प्रजा सुखी व संतुष्ट असते. स्वतःच संपूर्ण राज्याचे त्यांनी अवलोकन करावे, स्वतंत्र बुद्धीने विचार करावा केवळ आपल्याच कारभाऱ्यांवर विसंबून राहू नये. राजा नालायक

निघाला तरी बंड करू नये, त्याला आपोआपच मृत्युनंतर नरकवास घडतो असे त्यांचे विचार मात्र पटत नाहीत. राजा विवेकी, दक्ष असावा. राजा म्हणजे प्रजेचा मायबाप. परोपकारी, सदैव प्रजेचीच चिंता वाहणारा, शूर, दुष्टांचा संहारकर्ता, प्रसंगावधानी असावा. समर्थ अशा उत्तम राजाला, 'श्रीमंत योगी, असे संबोधतात. राजाने राजैश्वर्य भोगूनही मनाने अलिप्त असावे. परस्त्री–परद्रव्य या पासून दूर असावे. धर्मसत्ता, साधुसंत यांचा तो कैवारी असावा. तसेच तो पराक्रमी, न्यायी, शत्रु–मित्रांची विचारणा करणारा, जाणत्याचे 'पेच जाणणारा व नष्टाशी नष्ट योजणारा असावा. समर्थ सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त होते तथापि आपल्या निर्भय वृत्तीमुळे व समाजोद्धाराच्या उत्कृट तळमळीमुळे तत्कालीन समाज व शासन यांच्यावर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा चांगलाच प्रभाव दिसून येतो.

तत्कालीन परिस्थितीचा अचूक वेध घेऊन राष्ट्राला पाशवी सत्तेच्या मिठीतून सोडविण्यासाठी त्यांनी विधायक क्रांतीचा मार्ग राष्ट्रासमोर ठेवला. हे त्यांचे कार्य त्यांच्या राष्ट्रीय प्रवृत्तीची साक्ष पटविते.

रामराज्य–

सत्य, न्याय, नीती, प्रेम, स्वातंत्र्य, निर्भयता, नांदणे म्हणजे त्यांच्या मते रामराज्य होय. असे रामराज्यच आपल्या राष्ट्रात त्यांना अभिप्रेत होते. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकसमयी रामदास स्वत: जातीचे रायगड वर हजर नव्हते. त्यांच्या वतीने दिवाकर भट्ट रायगडावर रवाना करण्यात आले होते.

वास्तविक पाहता शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राचा छत्रपती बनून म्लेच्छांचा संहार करावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा असे स्वप्न पाहणारे व ते साकार होण्यासाठी भवानी देवी जवळ 'तुझा तू वाढवी राजा' म्हणून प्रार्थना करणारे समर्थ रामदास शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी रायगडावर उपस्थित राहू नये यावरून त्यांना यापेक्षा काही महत्वपूर्ण कामामुळे किंवा प्रकृती, अस्वास्थ्यामुळे जाता आले नसावे हे संभवत नाही. कारण तसा उल्लेख आढळत नाही. रामदासांच्या मनात

शिवाजीविषयी निर्व्याज प्रेम होते हे लक्षात घेऊनही प्रस्तुत प्रसंगीची त्यांची अनुपस्थिती विशेषत्वाने खटकल्यावाचून राहात नाही. या संदर्भातील डॉ. वि. भि. कोलते यांचे खालील उद्‌गार उल्लेखनीय आहे.

डॉ. कोलते म्हणतात–" आपल्या स्वधर्म संरक्षणाच्या स्वप्नाचा साक्षात्कार रामदासांनी ज्या शिवाजीत पाहिला त्यांच्याच राज्यरोहण समारंभाच्या सुमंगल प्रसंगी रामदास रायगडाला उपस्थित राहिले नाही ' ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे.

(मराठी संतांचे सामाजिक कार्य पृष्ठ १४८)

समर्थांचे राजकारण–

कोणालाही दुःख न देता सर्वांना राजकारणात युक्तीने गुंतवून घ्यावे. नष्टांचा प्रतिकार करण्यास किंवा त्यांच्यावर देखरेख ठेवण्यास नष्टांचीच योजना करावी. काट्याने काटा काढावा परंतु काढतांना तो कळू देऊ नये. सर्व कारभाराचे मुख्य सूत्र आपल्या हाती ठेवावे व इतर कामे लोकांकडून करवून घ्यावीत. राजकारणात अनेक धूर्त लोक असतात, त्यांना गुंतवून ठेवावे. दुर्जनांच्यामुळे राजकारण अडून पडेल असे करू नये असे समर्थ म्हणतात. पहा–

" कांटीने कांटी झाडावी । झाडावी ते कळो नेदावी ।
कळकट पणाची पदवी । असो न द्यावी ॥ "
" जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ "
हुंब्यास हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदापुढे उभा करावा । दुसरा लौंद ॥
घटासी आणावा घट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥ "
जैशास तैसा भेटे । तेथ्हां मजालसी बरी थाटे ।
इतुके होते परी धणी कोठे । दृष्टीस न पडे ॥ "

अशाप्रकारे राजकारणातील मुत्सद्दी डावपेच ते आपल्यासमोर मांडतात. हे सर्व लक्षात घेतले म्हणजे समर्थ हे केवळ संत किंवा साधुच नव्हते, तर ते राजकारणी साधु होते असे म्हणणे अधिक उचित ठरेल.

भक्तीयोगाला राजकारण त्याज्य नाही हे खरे; परंतु केवळ भक्ती-मार्गाच्या माध्यमातून समाज जागृतीचे व समाजोन्नतीचे कार्य अवघड आहे हे ओळखून युक्ती–शक्तीच्या समन्वयातूनच समर्थांनी ते कार्य करण्याची प्रेरणा लोकांमध्ये निर्माण केली. समर्थांचे हे राजकीय चातुर्य पाहून काही लोक त्यांना शिवाजी महाराजांचे राजकीय गुरू मानतात. परंतु ही गोष्ट शिवाजी महाराजांवर अन्याय करणारी वाटते.

समर्थांचा पारमार्थिक गुरू जसा प्रत्यक्ष श्रीरामच होता त्याप्रमाणे शिवरायांचा राजकीय गुरु परमेश्वरच होता. या असामान्य युगपुरुषाची राजकीय प्रतिभा ईश्वर निर्मित होती, ते 'ईश्वराचे देण' होते 'असे समर्थांनीच म्हटले आहे' हे या संदर्भातील डॉ. शं. दा. पेंडसे यांचे विचार उल्लेखनीय वाटतात.

(राजगुरू समर्थ रामदास. ले. डॉ. पेंडसे पृ. २३६–२३७)

एकंदरीत, समर्थांच्या राष्ट्रीय भूमिकेचा परामर्श घेत असताना त्यांचे 'राजकारण' सतत दृष्टीपुढे ठेवावे लागते. समर्थांच्या 'राजकारणा' चा अर्थ केवळ 'चातुर्य' असाही करण्यात येतो. परंतु समर्थांचे राजकारण म्हणजे चातुर्य एवढाच संकुचित अर्थ त्याला नसून त्यांचा 'राजकारण' शब्द राजकीय घडामोडीशी संबंधित आहे. राजकारणासही चातुर्य–किंवहुना फार मोठ्या प्रमाणात–अपेक्षित असते. चातुर्याशिवाय राजकारण हे खरे राजकारणच नव्हे असे समर्थांचे स्पष्ट मत दिसते. म्हणूनच त्यांनी एखाद्या धूर्त राजकारण्याप्रमाणे मुत्सद्दी राजकारणाचे धडे शिकवून आपले 'देवकारण' न सोडता स्वराज्य व सुराज्य प्रस्थापित करणारे राजकारण केले. या राजनीतीतूनच त्यांच्या 'राष्ट्रीय भूमिकेचे यतार्थ दर्शन घडते.

तुकडोजींची राष्ट्रीय भूमिका–

तुकडोजी महाराजांना 'राष्ट्रसंत' असे संबोधण्यात येते. त्यांची राष्ट्रीय भूमिका जाणून घेत असताना दोन कालखंड दृष्टीपुढे येतात. पहिला स्वातंत्र्यपूर्व कालखंड आणि दुसरा स्वातंत्र्योत्तर कालखंड. या दोन्ही कालखंडामध्ये आपल्या देशाची राजकीय परिस्थिती भिन्न स्वरुपाची होती.

तुकडोजी महाराजांचा जन्म इ. स. १९०९ मध्ये झाला. त्यावेळी भारतात इंग्रजांचे राज्य होते. पुढे भारत इ. स. १९४७ साली स्वतंत्र झाला. म्हणजे महाराज आपल्या आयुष्याच्या आरंभीची अडतीस वर्षे पारतंत्र्याच्या काळात वावरले. या काळात लो. टिळक आणि महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यचळवळीला जोर चढू लागला होता. हिंदु-मुसलमानातील ऐक्य भंगावे म्हणून इंग्रजी राजवटीकडून सारखा प्रयत्न करण्यात येई. हिंदू-मुसलमानांची शक्ती आपसामध्ये लढण्यात खर्च व्हावी व त्यांचे स्वातंत्र्य-चळवळीकडे दुर्लक्ष व्हावे असा त्यांचा कावा होता. महाराजांनी इंग्रजांचा हा कुटील कावा ओळखला आणि हिंदु-मुसलमानांचे ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

" एक रावण निघून गेला असला तरी दुसरा झाला हा " अशा शब्दांत महाराजांनी ब्रिटीश राजवटीला ' रावण ' संबोधून तत्कालीन राजकीय परिस्थितीवर त्रिदारक प्रकाश टाकलेला आहे.

' हा ओलचि मारत झाला ' आणि धरला करि हा असुराने '

अशी मारताची तत्कालीन अवस्था पाहून महाराजांनी लोकांच्या मनात स्वातंत्र्याविषयीची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी प्रेरणादायी भजने गाण्यास सुरूवात केली.

महाराज १९-२० वर्षाचे असताना त्यांचे चिमूरच्या परिसरातील जंगलात वास्तव्य होते. त्यावेळी ते पाटीची चकती घेऊन त्याची तकली करीत व सूत कातू लागत. लोकांनी काही विचारले तर ' इसीसे पार लगनेवाला है । ' असे काहीसे अस्पष्ट उत्तर देत. पुढे देश म. गांधींच्या प्रेरणेने पेटून उठला तेव्हा महाराजांच्या अस्पष्ट उत्तराचा अर्थ लोकांना समजला. माणिक प्रासादिक बाल समाज, भजन मंडळ, आरती मंडळ व त्यातूनच पुढे श्रीगुरुदेव सेवा मंडळाची निर्मिती करून महाराज त्यांच्यात स्वातंत्र्य प्राप्तीची प्रेरणा निर्माण करू लागले. महाराजांचा खादीधारी वेष, त्यांची सूतकताई, क्रांतिकारक भजने इ. गोष्टींमुळे ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मनात शंका निर्माण होऊन त्यांनी इ. स. १९३० च्या सुमारास महाराजांना तुरुंगात डांबण्याचा कट रचला. परंतु त्यावेळी महा-

राजांना पकडण्यात त्यांना यश आले नाही. जंगल सत्याग्रहातील सत्याग्रहींसमोर 'झूठी गुलामशाही क्यों डर बता रही है।' अशी स्फूर्तिप्रद भजने गाऊन संपूर्ण परिसर स्वातंत्र्य प्रेरणेने पेटवून दिला. परकीय राजवटीने भारताला 'पिळून चिपाड केल्याचे' शल्य त्यांच्या मनात सतत सलत होते. आपल्या देशाला अवकळा आणलेल्या आसुरी शक्तीच्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी त्यांनी युवाशक्तीला तर आवाहन केलेच, परंतु शृंखलाबद्ध भारतमातेची हाक त्यांनी साधुसंतांच्याही कानावर घातली.

" ऐ संतमहंतों ! जाग उठो ! क्यों सोये आसनमाही ।
सोनेका समय नही भाई । "
भारतपर जब बिपत पडी तो, करना काम सवाई । "
(अनुभव प्रकाश पृ. १२०)

महाराजांच्या या स्फूर्तीप्रद आवाहनाने अध्यात्ममार्गी लोक सुद्धा जागे झाले व राष्ट्रनिष्ठेने प्रेरित होऊन त्यांनीही स्वत:ला स्वातंत्र्याच्या धगधगत्या यज्ञकुंडात झोकून दिले.

' गर्जू द्या – वीर गर्जना
चमकू द्या – रक्त वीरांचे
उघडू द्या – कर्ण शूरांचे
फोडू द्या – मंड क्रूरांचे
द्या प्राण, रणी खोवुनी । हात हे कां जोडता ?
(अनुभव सागर पृ. १४७)

अशी महाराजांची एकापेक्षा एक स्फूर्तिप्रद भजने ऐकली म्हणजे त्यांच्या रोमारोमात राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम भिनले होते याचा प्रत्यय येतो.

समर्थांप्रमाणेच महाराजांनीही संघटनेवर जास्त जोर दिला. संघटना ही एक फार मोठी शक्ती आहे; ते प्रचंड सामर्थ्य आहे हे त्यांनी ओळखले आणि–

" तोडो पंथनको नाना ।
सब संघ बनालो अपना । "

अशी लोकांमध्ये संघटनेची स्फूर्ती निर्माण केली.

" गुलामी अब नही होना । हमारे प्रिय भारतमें । " असे स्पष्टपणे बजावण्याचे साहस पारतंत्र्याच्या काळात त्यांनी दाखविले आणि लोकांमध्ये पारतंत्र्याविषयीची चीड व स्वातंत्र्याविषयीची प्रेरणा निर्माण करून मायभूमीच्या मुक्ततेसाठी तळहातावर शीर घेऊन लढणारे वीरगडी त्यांनी निर्माण केले.

तुकडोजी महाराज हे राष्ट्रप्रेमाने भारलेले निष्ठावंत राष्ट्रभक्त होते, राष्ट्रसंत होते. त्यांनी आपले सर्वस्व राष्ट्रपुरुषाला समर्पण केले होते म्हणूनच–

" स्वातंत्र्य धराया करी । तोड उरीची सुरी ।
पडू दे प्राण प्रसंगावरी । "

(अनुभव सागर भ. पृ. २१०–२११)

अशी स्फूर्तिप्रद भजने त्यांच्या मुखातून सहजगत्या बाहेर पडू लागली. देशनिष्ठा किंवा राष्ट्रभक्ती केवळ 'वंदेमातरम्' किंवा 'भारतमाताकी जय' असे शब्द उच्चारल्याने प्रकट होत नाही. त्यासाठी सर्वस्व समर्पणाची तयारी असावी लागते. महाराजांनी ही तयारी पूर्वीपासूनच करून ठेवली होती. परदेशी वस्तुंचा वापर करू नये, स्वदेशी वस्तुंचाच वापर करावा अशा कृतीशील शिकवणही त्यांनी लोकांना दिली. इतकेच नव्हे तर, धर्माच्या नावावर दंगे–धोपे माजविणाऱ्या व प्रसंगी रक्तपात करणाऱ्या धर्मांध लोकांना त्यांनी स्पष्टच बजावले की–

'तो पहले देशको अपना लो । करो फिर धर्म का जपना ।।"

अशाप्रकारे त्यांनी धर्मापेक्षाही देश जास्त महत्त्वाचा मानून तो गुलामगिरीतून सोडविण्यासाठी आपसातील मतभेद दूर सारुन सर्वांनी एक होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. देश जगला तर धर्म जगतो व धर्म जगला तरच देवता जगत असतात असे त्यांचे स्पष्ट मत होते. या दृष्टीनेच ते 'देश हा देवचि पवित्र' मानून देशाला जगविण्याची, जागविण्याची आणि जोपासण्याची प्रेरणा वारंवार देतात.

महाराजांची स्वातंत्र्यस्फूर्तिप्रद भजने म्हणजे पारतंत्र्यात सुस्तावलेल्या समाज जीवनाची संजीवनीच ठरली. सामान्यतः १९३० पासून

'चलेजाव' चळवळीला पोषक पार्श्वभूमी त्यांनी तयार करुन ठेवली होती. त्यावेळी सत्याग्रहींच्या शिबिरात जाऊन व्याख्याने देणे, भजने गाणे, स्वातंत्र्य-स्फूर्तिप्रद गोते म्हणणे इत्यादी गोष्टी ते करीत असत. १९३१ सालची गोष्ट. श्री जगदीशराव साळवे नावाच्या स्वातंत्र्य संग्राम सैनिकाने महाराजांना मोठा मार्मिक प्रश्न विचारला–"महात्मा गांधीके नेतृत्वमे जो स्वराज्यका आंदोलन चल रहा है। क्या वह सफल हो सकेगा ? महाराजांनी तात्काळ उत्तर दिले होते की–

"शिवछत्रपतीके वक्त जो परिस्थिती थी वही आज है। संतोंने वहाँ वातावरण बनाया था। जिससे शिवाजीने लाभ उठाया। आजभी महात्माजीके आंदोलनसे स्वराज्य मिल जायेगा और होनहार लोग आगे कारोभार संभालेंगे।"

(श्रीगुरुदेव–हिंदी विभाग आक्टो. १९६९ पृ. ८)

महाराजांच्या वरील विधानात शिवाजी महाराजांच्या स्वराज्य-स्थापनेच्या कर्तृत्वात तत्कालीन संत तुकाराम-समर्थ रामदास या संतांच्या कार्याचा अप्रत्यक्ष उल्लेख दिसून येतो आणि त्याचबरोबर भारताला स्वातंत्र्य प्राप्त होईलच याविषयीचा त्यांच्या मनातील उदंड आत्मविश्वासही प्रकट होतो.

इ. स. १९३३ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूरला फार मोठा चातुर्मास घेऊन त्यांनी प्रार्थना, व्यायाम, भाषण, चर्चा, शंका–समाधान इत्यादी विधायक कार्यक्रमांद्वारे लोकांना राष्ट्रधर्माचा बोध दिला. १९३४ मध्ये वर्धा जिल्ह्यातील आष्टी या गावी विविध विधायक कार्यक्रम घेऊन लोकांमध्ये स्वातंत्र्यप्रीतीची ज्योत प्रज्वलित केली. १९३५ साली सालबर्डीचा सुप्रसिद्ध महारुद्र यज्ञ घेऊन सामाजिक जाणिवेने जनसमुदाय भारावून टाकला. या यज्ञाच्या निमित्ताने त्यांनी लोकांमध्ये निर्माण केलेली सामाजिक प्रेरणा अद्भूत स्वरूपाची होती. सालबर्डीच्या यज्ञानंतर १९३५ मध्ये त्यांनी विदर्भात तुफानी दौरा करून भजन, भाषण, सप्ताह एक्के आदिच्या माध्यमातून फार मोठी सामाजिक व राष्ट्रीय जागृती घडवून आणली. १९३६ मध्ये म. गांधींच्या आग्रहास्तव ते सेवाग्रामला

राहिले. त्यावेळी त्यांनी गायिलेली स्फूर्तिप्रद भजने म. गांधींना विशेष आवडत.

आपल्या कार्याचे स्फूर्तिस्थान म्हणून त्यांनी नागपूर–अमरावती रोडवर मोझरी या गावाच्या परिसरात १९३५ साली एका लहानशा झोपडीने गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. त्याचेच विशाल स्वरूप आज आपल्याला 'गुरुकुंज आश्रमाच्या' रूपाने पाहावयास मिळते. तेथे त्यांनी व्यायाम, आरोग्य, ग्रामोद्योग, गोरक्षण, कृषी, शाळा, दवाखाना, व प्रशिक्षण महाविद्यालये इत्यादी विभाग सुरू करून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला पोषक अशा दैनंदिन व साप्ताहिक कार्यक्रमांची योजना अमलात आणली.

अशाप्रकारे महाराजांनी भारतभर परिभ्रमण करून आपल्या भजन-भाषणाद्वारे व विधायक कार्याद्वारे समाजात राष्ट्रजागृती निर्माण केली व गावोगावी श्रीगुरुदेव सेवामंडळाची स्थापना करून लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. महाराजांच्या या सर्व विधायक स्वरूपाच्या योजनाबद्ध कार्यामुळे लोकांमध्ये स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा निर्माण होण्यास बरीच मदत झाली आहे हे भारतीय स्वातंत्र्याचा इतिहासही विसरू शकणार नाही.

१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील महाराजांचा सहभाग

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात १९४२ चा स्वातंत्र्य लढा अविस्मरणीय ठरला आहे. १९४२ मध्ये स्वातंत्र्य आंदोलनाने जहाल स्वरुप धारण केले. या आंदोलनाचे प्रवर्तन महात्मागांधींनी केले होते. त्यांनी उभ केलेले हे आंदोलन राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अचूक आहे हे महाराजांनी ओळखले आणि या आंदोलनात समस्त भारतीय जनतेने सहभागी व्हावे म्हणून त्यांनी भजन व भाषणांच्या द्वारे आवाहन करण्यासाठी दौरे सुरु केले. गांधीजींनी प्रज्वलित केलेली ज्योत अधिक उग्र आणि उत्तजित करण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम हाती घेतले. विशेषत: विदर्भाच्या परिसरात महाराजांच्या आवाहनाचा व कार्य-क्रमांचा विशेष परिणाम जाणवला, आणि सारा जनसमुदाय ब्रिटीशांच्या

अमानुष अत्याचारांच्या प्रतिकारार्थ पेटून उठला. महाराजांची पहाडी आवाजातील प्रभावी भजने साऱ्या आसमंतात निनादू लागली. जन-समुदायांच्या मनातील जोश उफाळून आला. ब्रिटीश राजवटीला महाराज सांगू लागले–

"अब काहेको धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे।
आते है नाथ हमारे॥

इतकेच नव्हे तर–

"झाड झडूले शस्त्र बनेंगे। भक्त बनेगी सेना।
पत्थर सारे बाम बनेंगे। नाव लगेगी किनारे॥
(अनुभव प्रकाश भाग २ (तुकडोजी म.)–पृ. १२६)

महाराजांच्या या क्रांतिकारक गीतांचा जनमनावर योग्य तोच परिणाम झाला. स्वातंत्र्य आंदोलनाने जहाल स्वरूप धारण केले आणि हिंसक वळण घेतले. पोलीस स्टेशन, सरकारी शाळा, डाकबंगला इत्यादी भस्मसात होऊ लागले. ब्रिटीश अधिकारी हादरून गेले. या जहाल क्रांतीमागे तुकडोजी महाराज उभे आहेत असा संशय सरकारला आला आणि त्यांनी महाराजांना इ. स. १९४२ च्या ऑगष्ट महिन्यात अटक करून तुरुंगात टाकले. परंतु जनप्रक्षोभ पाहून राज्यकर्त्यांनी मोठ्या मुत्सद्देगिरीने अवघ्या चारच महिन्यानी महाराजांची तुरुंगातून सुटका केली. महाराजांच्या तुरुंगवासामुळे मूलतःच भक्तीप्रवण असलेली सामान्य जनता असंतुष्ट होत आहे आणि हा असंतोष राज्यसत्तेला परवडण्यासारखा नाही असा कावेबाज विचार राज्यकर्त्यांच्या मनात येऊन गेला असणे संभवनीय आहे. म्हणूनच स्वतःच्या सोयीसाठी महाराजांची मुक्तता ही तत्कालीन राज्यकर्त्यांना आवश्यक वाटली असावी. त्या चळवळीत अनेक कार्यकर्ते भूमीगत होते. त्यांना लपविण्यासाठी महाराजांनी बऱ्याच युक्त्या-प्रयुक्त्या योजिल्या. तरीही अनेक आंदोलकांना आजन्म कारावास व फाशीसारख्या दुर्धर शिक्षा ठोठविण्यात आल्या.

विश्वशांती सप्ताह–इ. स. १९४३ मध्ये नागपूरला नव्यानेच स्थापन झालेल्या फाशी निवारक समितीला महाराजांनी बरेच साहाय्य केले.

त्याचवेळी महायुद्धामुळे महागाई वाढली होती. सरकारने लोकांमध्ये वातावरण निर्माण केले होते. अशा वेळी महाराजांनी लोकांना दिलासा देण्यासाठी 'विश्वशांती–सप्ताह' साजरा करण्याचा प्रयत्न केला. १७ जानेवारी १९४३ ते २४ जानेवारी १९४३ पर्यंत त्या सप्ताहात भाषणे, प्रार्थना, ग्रामसफाई, व्यायाम, उद्योग, इत्यादी कार्यक्रम आयोजिण्यात आले. त्यावेळी संपूर्ण भारतात सर्व धर्माच्या लोकांनी विश्वशांतीसाठी मौनप्रार्थना केली. या विश्वशांती सप्ताहाच्या मागे प्राप्त परिस्थितीविषयी लोकांच्या मनात जागृती निर्माण करणे आणि लोकांची कर्तव्यभावना उद्दीपित करणे हाच उद्देश होता. या उपक्रमामुळे मानवतावादी दृष्टिकोण निर्माण होण्यास मदत झाली.

स्वातंत्र्योत्तर काळ व महाराज

इ. स. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला आणि इ. स. १९६८ मध्ये महाराजांचे निर्याण झाले. म्हणजेच जवळ जवळ एकेवीस वर्ष महाराज या स्वातंत्र्योत्तर काळात वावरले. १५ ऑगष्ट १९४७ रोजी अखंड भारत परवशतेतून मुक्त होत नाही तोच त्याची पाकीस्तान आणि भारत अशी दोन शकले पडली. विभक्त भारतात काँग्रेसपक्ष सत्तारूढ झाला आणि सत्तेची सूत्रे काँग्रेसच्या हाती येत नाही तोच महात्मा गांधीचा इ. स. ३० जानेवारी १९४८ रोजी खून करण्यात आला. पुन्हा जातीय दंगली माजण्याचे वातावरण देशात निर्माण झाले. परंतु तुकडोजी महाराज आणि स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळात पुढे सत्तास्पर्धा सुरू झाली आणि अनेक पक्षोपपक्ष राजकीय आखाड्यात उमेदवारी घेऊन उतरले. पक्षबाजीला ऊत येऊ लागला. राष्ट्रनिष्ठेच्या नावावर गल्लाभरू प्रवृत्ती बळावू लागली. त्याचाच परिणाम समाज-जीवनावरही झाला. महाराजांच्या खालील ओळींतून या परिस्थितीचे प्रतिबिंब प्रत्ययास येते.

महाराज म्हणतात–

"ये धर्म-गुंडे, राज-गुंडे, लोक-गुंडे बढ गये।
घुसखोर-गुंडे, चोर-गुंडे, साध-गुंडे चढ गये।
बेपार-गुंडे, प्यार-गुंडे, बात-गुंडे अड गये।
सब जगह गुंडागर्दीसे, राज-ठंडे पड गये॥"

(लहर की बरखा भाग-२ पृ. २३२)

अशा परिस्थितीत राजकीय व सामाजिक पातळीवरील विस्कटलेली घडी नीट कशी करता येईल इकडे तुकडोजी महाराजांचे लक्ष वेधल्या गेले.

महाराजांचे स्वातंत्र्यप्राप्तीचे एक स्वप्न पूर्ण झाले तरी स्वराज्याचे रुपांतर सुराज्यात करण्याचे त्यांचे स्वप्न अजून अपूर्णच होते. स्वराज्याचे अस्तित्व हे सुराज्याच्या अधिष्ठानावर अवलंबून असते, स्वराज्याची इमारत सुराज्याच्या पायाने मजबूत केल्याशिवाय ती टिकत नाही याची जाणीव त्यांना होती. त्यांच्यामते समाजाचा नैतिक उन्नती आणि समानतेने वागण्याची प्रवृत्ती हे सुराज्याचे बीज आहे. सुराज्याचे सिंहासन समयोचित धार्मिकता, न्यायनिष्ठ राजकीयता, सामाजिक व धार्मिक समता आणि सेवापरायण जीवनाची श्रेष्ठता या चार पायावर उभारलेली असते. परंतु स्वधर्माचा अहंकार, स्पृश्य-अस्पृश्यतेची भावना, पथभेद व मोक्षाच्या नावाने निर्माण झालेली निष्क्रियता ते सिंहासन ढासळून पाडीत असतात. या सर्व गोष्टींची जाणीव ठेऊनच महाराजांनी स्वराज्याला सुराज्य करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार करणारी भजने गायिली आणि **'या भारतात बंधुभाव नित्य दिसू दे। दे वरचि असा दे!'** असे परमेश्वराला वरदान मागितले. विनोबाजींच्या भूदान चळवळीतही ते काही काळ सहभागी झाले होते. १९५५ मध्ये जपानची यात्रा करण्याचा योगही महाराजांना आला.

इ. स. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्यावेळी महाराजांनी चिन्यांचे आव्हान स्वीकारताना–

"तैयार हुआ है हिंद तुम्हारे साथ।
आवो चिनीयो मैदान में देखो हिंदका हाथ।"

अशी स्फूर्तिप्रद भजने गायिली व भारतीय नवजवानांमध्ये भारतमातेच्या

रक्षणासाठी प्राणार्पण करण्याची प्रेरणा निर्माण केली. तसेच पाकीस्तानने जेव्हा आपल्या देशावर आक्रमण केले, तेव्हाही महाराजांनी पाकीस्तानच्या प्रतिकारार्थ भारतीयांच्या भावना उद्दीपित करणारी भजने गायिली व भाषणे दिली. अशाच त्यांच्या एका भाषणातील खालील उतारा येथे वाचकांच्या माहितीसाठी मुद्दाम उद्धृत करीत आहे.

"सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे सगळीकडून आपला देश संकटात आहे. या संकटाचा सामना अनेक प्रकारे आपणास करावा लागेल. कारखान्यात कष्ट उपसून जीवनावश्यक वस्तू आणि शस्त्रास्त्रांचे ढीग निर्माण करावे लागतील. सैन्यात भरती होऊन सरहद्दीवर पराक्रम गाजवावे लागतील."

तसेच ते पुढे म्हणतात–

"आपण जमविलेला संरक्षण–निधी आपण देशाला दिलेले जवान आणि देश रक्षणासाठी आपण कार्यान्वित केलेल्या अनेक योजना या गोष्टी मला मोलाच्या वाटतात. ही जागृती आपण शेवटपर्यंत टिकविली पाहिजे."

(राष्ट्रसंतांची भाषणें–सं. बाबा मोहोड पृ. ७–८)

महाराजांच्या वरील वक्तव्यावरून त्यांच्या मनातील देशाविषयीची उत्कट भक्ती व स्वातंत्र्याविषयीची अपार प्रीती प्रकट होते.

समाजात नेहमी दोन प्रकारचे सुधारक असतात. एक बोलके व दुसरे कर्ते. महाराज हे कर्ते सुधारक होते. त्यांनी राजकीय जीवनाची विस्कटलेली घडी स्वतःच्या योजनाबद्ध कार्यक्रमाने व कर्तृत्वाने नीट सावरण्याचा प्रयत्न केला. राजनीती म्हटली की, बनवाबनवी, फसवाफसवी, स्वार्थ, सत्तापिपासू प्रवृत्ती असा सर्वसामान्यपणे समज झालेला आहे. परंतु महाराजांनी विशुद्ध राजनीतीचे पाठ देऊन राजनीती ही शुद्ध, शूचिर्भूत व पवित्र असली पाहिजे असे निक्षून सांगितले, **'यथा राजा तथा प्रजा'** किंवा **'जया शिरी कारभार । बुद्धि सार तयांची ।'** या संत तुकारामांच्या वचनाप्रमाणे राज्यकर्त्याने प्रजेपुढे आपल्या शुद्ध आचरणाचा आदर्श ठेवावा असे ते म्हणतात.

तद्वतच–

" चाहे बनादे इसे स्वर्गभूमी । चाहे लगादे नरक की निशानी ।
तेरे चलनपर है भारत की नैया । तू सोचले सारा काम ।
सुनले भारत के प्यारे जवान । तुझपे सौपी हे जिंदगी तमाम ।। "

(राष्ट्रीय भजनावली–भजन १८ वे)

अशाप्रकारची भजने गाऊन त्यांनी भारतीय तरुणांमध्ये देशभक्तीची ज्योत प्रज्वलित केली.

आपल्या भारत देशात अनेक धर्म, पंथ, जाती आहेत. त्यांच्यातील मतभेद व भांडणेही सामाजिक एकात्मतेला व राष्ट्रीयतेला मारक ठरतात म्हणून ती मिटावीत व समग्र भारतीय सलोख्याने व गुण्यागोविंदाने राहावे, त्यांच्यात सलोखा निर्माण व्हावा यासाठी महाराज सतत प्रयत्नशील राहिले. स्वतंत्र भारताच्या रेखाटलेल्या चित्रासोबतच त्यांनी त्याच्याशी निगडित असलेल्या नेतृत्व, मतदान, लोकशाही शासन, देश हाच देव इत्यादी कल्पनाही स्पष्ट करून लोकांपुढे ठेवल्या.

देशाचे नेतृत्व निःस्पृह, निःस्वार्थी, नीतिमान व कर्तृत्ववान व्यक्तीच्या हातात असावे असे ते म्हणतात. लोकशाही शासन प्रणालीत निवडणुकीला अनन्यसाधारण महत्त्व असते म्हणून लोकांनी मतदान फार सावधानतेने केले पाहिजे असे सांगताना महाराज म्हणतात–

" भवितव्य तुमच्या हातात,
तुमचं बहुमत, तेच होणार उद्या सरकार ।
म्हणुनि मतदान जपुनि द्या फार । नाहीतर उलटल ही तलवार ।
तुमचा तुमच्यावर होईल वार रे – – जो – – –जो ।। "

(लोकशाहीचे पोवाडे, तु. म. पृष्ट ८)

तसेच निवडणुकी संबंधी महाराज पुढे सांगतात–

" निवडणूक जणु स्वयंवर । ज्या हाती देण जीवनाचे बागडोर ।
त्यासी लावावी कसोटी सुंदर । सावधपणे ।। "

(ग्रामगीता १०–९९)

एकदा मतदान करताना गफलत झाली की त्याचे दुष्परिणाम पुढे कित्येक दिवस समाजाला भोगावे लागतात याच जाणिवेतून महाराज मतदानासंबंधी लोकांना सावध करतात.

देश हाच देव–समर्थ रामदासांप्रमाणे तुकडोजी महाराजांचीही देशावर देवासारखी भक्ती होती. किंबहुना देश हाच त्यांचा देव होता.

" या देवकार्यी, देशकार्यी भिन्नता मानू नको ।
ते एक या दोघांतही, मग खिन्नता आणू नको ।
तुकड्या म्हणे या देव–देशा ऐक्य स्वरुपी जाणना ॥ "

(आदेश रचना, तु. म. पृ. ६०)

या ओळींतून त्यांची ' देश हाच देव ' ही भावना व्यक्त होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाले, परंतु देशातील गोर–गरीब, उपेक्षित वर्ग आणि शेतकरी अजूनही दारिद्र्याच्या खाईत खितपत पडला आहे याची तीव्र वेदना त्यांना अस्वस्थ करून सोडत होती. म. गांधींच्या अकस्मात निधनाने उपेक्षितांच्या उत्कर्षाविषयीच्या आकांक्षा पार विरून गेल्या होत्या. तथापि, तशाही औदासिन्याच्या वातावरणात महाराज हिंमत न सोडता पुढे आले आणि समाजाला तळमळीने सांगू लागले–

" देशासाठी सर्वचि जगू या । सान थोर हा मार्ग क्रमू ।
पूज्य महात्मा गांधी अपुल्या । देशाचा नेता गेला ।
त्यांची उरली इच्छा पुरती । करण्यासाठी गुरुदेव नमू ॥ "

(समाज संजीवनी पृ. ७ तु. म.)

तसेच तरूणांना राष्ट्र जागविण्याचा स्फूर्तिदायक संदेश देताना महाराज म्हणतात–

" राष्ट्र जागवा, राष्ट्र जागवा, जागृत व्हा तरूणांनो ! अमुच्या ।
वीर वृत्तिचा दिवा उजळवा, जागृत व्हा तरूणांनो ! अमुच्या ॥ "

(समाजसंजीवनी तु. म., पृ. १६)

महात्मा गांधीनी सांगितलेल्या मार्गाने जाऊन आपल्या देशाची सर्वांगीण भरभराट करण्याची जबाबदारी सर्व भारतीयांवर आहे याची जाणीव देताना ते म्हणतात–

'धनधान्याने हो भरपूर हा। गोवंशाने हो सुंदर हा।
वाढो शेति शक्ति खदान।
वीर तरूण हो सर्व शिपाई। तत्पर देशासाठी सदाहि।
रक्षी राष्ट्रपित्यांचे दान॥"

(समाज संजीवनी तु. म., पृ. ५३)

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशात पक्षबाजी फोफावू लागल्याचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. आपल्या पक्षाच्या हातात राज्यसूत्रे यावीत म्हणून प्रसंगी देशहिताकडे दुर्लक्ष करून सत्तास्पर्धेत उतरणाऱ्या लोकांना उद्देशून महाराज म्हणतात–

"हे यार ! छोडो पक्षबाजी, देशवासी एक हो।
शत्रु खडा है द्वारपर, अपने लिये तो नेक हो॥
वह तो गनिमी चालसे, है मारनेको आ रहा।
तुम होशमे हो या नही ? फिर क्यों तमाशा हो रहा॥"

(लहरकी बरखा भाग २ तु. म., पृ. ७३)

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात तुकडोजी महाराजांनी आपल्या भजन–भाषण व साहित्याच्या माध्यमातून राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीने फार मोठे कार्य केलेले आहे. त्यासाठी त्यांच्यावर तुरुंगवासात जाण्याचाही प्रसंग आला. आधी स्वराज्यासाठी व स्वराज्य प्राप्तीनंतर सुराज्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. विदर्भातील या संतपुरूषाचे हे भरीव राष्ट्रीय कार्य व राष्ट्रीय भूमिका लक्षात घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' या सार्थ संज्ञेने संबोधणे निश्चितच उचित ठरेल.

तौलनिक परामर्श–

समर्थ व राष्ट्रसंत यांच्या राष्ट्रीय भूमिकांचा तौलनिक परामर्श घेत असताना एक महत्वपूर्ण बाब निश्चितच दृष्टीपुढे राहाते आणि ती म्हणजे या दोनहीसंतांच्या कार्याला धर्म, भक्ती, देव, अध्यात्म इत्यादींचे अवगुंठन असले तरी राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती व स्वराज्य आणि सुराज्य अर्थात समर्थांचे रामराज्य व तुकडोजींचे ग्रामराज्य हे दोघांच्याही कार्याचे सतत अधिष्ठान राहिलेले आहे. समर्थांच्या काळात लोकशाहीची

कल्पना उदयास आली नसल्याने अर्थातच निवडणूक मतदान इत्यादी गोष्टींचे प्रस्थ नव्हते त्यामुळे त्याचा उल्लेख आढळत नाही. हिंदवी स्वराज्याच्या पायावर उभारलेल्या समर्थ समाज निर्मितीचे स्वप्न समर्थांना अभिप्रेत होते. त्यांच्या 'आनंदवन भुवनी काव्यात' या स्वप्नाचे काही अंश आढळतात.

जसे की–

" स्वधर्माआड जे विघ्ने । ते ते सर्वत्र उठीली ।
लाटिली कुटिली देवे । दापिली कापिली बहु ।। "

तसेच–

" बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले ।
अभक्तांचा क्षयो जाता । आनंदवन भुवनी ।। "

पुढे असेही म्हणतात–

" बुडाला औरंग्या पापी । म्लेंच संव्हार जाहला ।
मोडली मांडली छेत्रे । आनंदवन भुवनी ।। "

समर्थकालीन राजकीय परिस्थिती बरीच भिन्न होती. शिवाजी सारखा पराक्रमी पुरुष महाराष्ट्रात अवतरलेला पाहून समर्थांचा स्वराज्य-स्वप्नपूर्ती विषयीचा विश्वास वृद्धिगत झाला आणि त्यांनी शिवाजी महाराजांवर मुक्तकंठाने स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. महाराष्ट्र राज्य भारतभर पसरावे अशी समर्थांची उत्कट इच्छा होती. त्याला अनुसरूनच त्यांनी लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची प्रेरणा निर्माण केली. तथापि त्यासाठी तुकडोजी महाराजांसारखा त्यांच्यावर तुरुंगात जाण्याचा प्रसंग मात्र आला नाही. या दोनही संतांनी भक्ती मार्गाच्या माध्यमातून राष्ट्र-भक्तीचे स्फूर्तिप्रद धडे देऊन लोकांमध्ये राष्ट्राविषयीची जी आत्यंतिक निष्ठा निर्माण केली ती कालपरत्वे सारख्याच स्वरुपाची होती असे म्हणता येईल.

या दोन्ही संतांनी ' देशालाच देव ' संबोधून देशाची देवासारखी पूजा केली. समर्थांचा संपूर्ण रोष म्लेंच्छांवर होता. त्यांची महाराष्ट्रातून पूर्णतः हकालपट्टी होऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना व्हावी अशी त्यांची

राष्ट्राच्या कल्याणासाठी प्रसंगी प्राण अर्पण करावयास लावणारा डोळस राष्ट्रवाद दोनही संतांनी शिकविला. शिवकाळात जसे समर्थांचे राजकीय कार्य महत्त्वाचे मानले जाते तसेच वीसाव्या शतकात स्वातंत्र्य-पूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील तुकडोजी महाराजांचे राजकीय कार्यही महत्वाचे मानले जाते.

समर्थांपेक्षा तुकडोजी महाराजांचा काळ हा आपल्या दृष्टीने अतिशय जवळचा असल्यामुळे त्यांचे एतद्-विषयक विचार समजून घ्यायला अडचण पडत नाही. समर्थांच्या राष्ट्रीय भूमिकेतून एका शक्तीशाली शासनाचे ध्येयस्वप्न स्पष्ट दिसते आणि तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रीय भूमिकेतून त्यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारसरणीचे दर्शन घडते. एकंदरीत, समर्थ व राष्ट्रसंत हे दोघेही टाळकुटे संत नव्हते. तत्कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचे सूक्ष्मावलोकन करून व त्यासंबंधीचे चिंतन करून समाजात राजकीय जागृती निर्माण करण्या-साठी दोघांनाही कालानुरूप निरनिराळे उपाय योजिलेले दिसतात. स्वराज्य व सुराज्य हे या दोनही संतांच्या राष्ट्रीय भूमिकेचे बीजस्थान आहे असे म्हणावयास हरकत नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे यथोचित भान ठेवलेल्या या दोन्ही संघटनकुशल संतांच्या राष्ट्रीय भूमिकेत अशाप्रकारे बरेच साम्य आढळून येते.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३२१९
दा. क्र.

रामदासांचे रामराज्य–तुकडोजींचे ग्रामराज्य

रामदासांचे रामराज्य–

राज्यव्यवस्थेचा एक आदर्श म्हणून 'रामराज्य' या शब्दाचा वापर अनेकदा करण्यात येतो. समर्थ समकालीन संत तुकाराम व वीसाव्या शतकातील महात्मा गांधी यांनी देखील राज्यव्यवस्थेचा एक आदर्श म्हणूनच 'रामराज्य' या शब्दाचा वापर केलेला आहे. रामदासांनी आपली रामराज्याची कल्पना सविस्तरपणे विशद केलेली असून त्यावरून त्यांना काय अपेक्षित होते याचा सहजच अंदाज घेता येतो. रामराज्याचे वर्णन करताना समर्थ लिहितात–

"उद्वेग पाहतां नाही, चिंतामात्र नसे जनीं ।
व्याधि नाही रोग नाही, लोक आरोग्य नांदती ॥
कुरूपी पाहतां नाही, जरा मृत्य असेचिना ।
आदरू सकळे लोकां, सख्यप्रीती परस्परे ॥
बोलणे सत्य न्यायाचे, अन्याय सहसा नसे ।
अनेक वर्तती काया, येकजीव परस्परे ॥
दरिद्री धुंडिता नाही, मूर्ख हा तो असेचिना ।
परोपकार तो मोठा, सर्वत्र लोकसंग्रही ॥"

अशाप्रकारे समर्थांच्या रामराज्यात उदासिनता, चिंता, व्याधि, रोग, यांना मुळीच थारा नव्हता. सर्व लोक निरोगी होते. सर्वत्र 'सत्यं–शिवं–सुंदरम्' चा साक्षात्कार घडत होता. मृत्यूचे भयही संपले होते. तेथील लोकांमध्ये परस्परांत आदरभाव असून ते प्रीतीच्या धाग्यानी परस्परांमध्ये बांधल्या गेले होते. सर्वत्र, सत्य व न्याय यांची प्रचीती येत होती. अन्यायाला मुळीच थारा नव्हता. तसेच दारिद्र्य तर औषधलाही दिसत नव्हते. लोक सर्वत्र अतिशय आनंदाने व गुण्यागोविंदाने राहात होते. परोपकाराच्या गुणामुळे सर्वत्र लोकसंग्रह सहजच होत असे. इतकेच नव्हे तर, समर्थ पुढे सांगतात–

"अद्भूत पीकती भूमी, वृक्ष देती सदाफळें ।
अखंड दुभती धेनु, आरोग्य वाहाती जळे ॥
चढता वाढता प्रेमा सुखानंद उचंबळे ।
संतोष समस्त लोकां, रामराज्य भूमंडळी ॥"

समर्थांची रामराज्याविषयीची ही कल्पना वाचून संत तुकारामांच्या रामराज्यासंबंधीच्या अभंगाची आठवण होते. रामराज्याचे चित्र रेखाटताना तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात–

"जाले रामराज्य काय उणे आम्हांसी ।
धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैसी ॥"

(तुका–गाथा–११०६)

रामराज्य निर्माण झाल्यामुळे कोणत्याच गोष्टींची कमी नाही. सर्वत्र सुख–समृद्धी आहे. पृथ्वी उत्तम पीक देते, गायी–म्हशी दूध देतात.

"जाले रामराज्य आनंदली सकळे ।
तुका म्हणे गाईवत्से नरनारी बाळे ॥"

अशा प्रकारे सर्व प्राणीमात्र या रामराज्यामुळे आनंदित झाले आहेत. समर्थांचीही रामराज्याची कल्पना अशीच होती. हिंदूंचा होत असलेला अनन्वित छळ, हिंदू देवतांची उद्ध्वस्त झालेली देवळे, तीर्थक्षेत्रांचा उच्छेद हा सर्व प्रकार पाहून धर्मस्वातंत्र्य व धर्माचरण प्रस्थापित करण्यासाठी रामदासांना महाराष्ट्र राज्य हवे होते.

महाराष्ट्र धर्म व महाराष्ट्र राज्य प्रस्थापित व्हावे अशी जरी रामदासांची अपेक्षा असली तरी त्यांना मुख्यत्वेकरून रामराज्य हवे होते. महाराष्ट्र धर्म व महाराष्ट्र राज्य हे रामराज्य–स्थापनेचे केवळ एक माध्यम असून त्यासाठीच ते रामराज्याचा ध्येयवाद मांडताना दिसतात. रामदास हे नावाप्रमाणे रामाचे निःसीम भक्त होते. अयोध्याचे राजे–राम– हा त्यांचा आदर्श होता. अयोध्याच्या राज्यात सर्व समाज आनंदाने राहात होता. सर्वत्र न्याय–नीतीचे वातावरण होते. तसेच त्या राज्यांतील लोक क्रोध–मत्सरादि दुर्गुणांपासून दूर असून त्यांच्यात परस्परांविषयी प्रेम व आदर होता. या रामराज्य–अयोध्येचे–वातावरण

आपल्या येथे सर्वत्र निर्माण व्हावे ही रामदासांच्या अंतःकरणातील तीव्र तळमळ असल्याचे दिसून येते. अयोध्यापती रामासारखी न्याय, नीती, प्रेम, आदर, सत्य, यावर अधिष्ठित असलेल्या रामराज्याची त्यांची आकांक्षा होती.

अशाप्रकारे समर्थांच्या स्वप्नातील रामराज्यात लोकांमध्ये परस्परांविषयी प्रेम होते, आदर होता. सर्वत्र सत्य व न्याय यांची प्रचीती येई. अन्याय सहसा कोणावर होत नसे. रामदासांच्या मनात घोळत असलेल्या रामराज्यविषयक विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या 'आनंदवन भुवनी' या काव्यात पडलेले दिसते. 'आनंदवन भुवनी' हे रामदासांना पडलेले एक स्वप्न आहे. त्यात त्यांनी आपल्या आशा-आकांक्षांचे चित्र पाहिले.

"जन्मदुःखे जरादुःखे। नित्य दुःखे पुन्हपुन्हा।
संसार त्यागणे जाणे। आनंदवन भुवना॥
कष्टलो कष्टलो देवा। पुरे संसार जाहाला।
देहे त्यागासी येणे हो। आनंदवन भुवना॥"

संसारातील अनेकविध दुःखांनी मन पोळून निघाल्यामुळे त्रस्त होऊन प्राणत्याग करण्यासाठी 'आनंदवन भुवन' म्हणजे काशीला आपले प्रस्थान होत असल्याचे रामदासांनी स्वप्न पाहिले. तेथे त्यांना काय दिसले ?

"स्वधर्माआड जे विघ्ने। ते ते सर्वत्र उठीली।
लाटिली कुटिलीं देवें। दापिलो कापिली बहु॥"
"कल्पांत मांडला मोठा। म्लेंच्छदैत्यां बुडावया।
कैपक्ष घेतला देवी। आनंदवन भुवनी॥"

इतकेच नव्हे तर-

"बुडाले सर्वही पापी। हिंदुस्थान बळावले।
अभक्तांचा क्षयो जाला। आनंदवन भुवनी॥"
"बुडाला औरंग्या पापी। मेंच्छ संहार जाहला।
मोडली मांडली क्षेत्रे। आनंदवन भुवनी॥"

अशाप्रकारे–स्वधर्माच्या आड येणाऱ्या संकटांचा देव नायनाट करीत होते. मेंच्छरूपी दैत्यांना बुडविण्यासाठी सर्वत्र धामधूम सुरू होती. आता हिंदुस्थान सामर्थ्यशाली बनून सर्व पाप्यांना त्यांनी नामशेष करून टाकले होते. प्रत्यक्ष पापमूर्ती औरंगजेबाचा अवशेष देखील आता उरला नव्हता. मेंच्छाकडून उद्धवस्त करण्यात आलेली तीर्थक्षेत्रे पुन्हा वसविण्यात आली होती.

एकंदरीत, महाराष्ट्रातील जनतेच्या हलाखीने हताश झालेल्या समर्थांनी महाराष्ट्रातील सुख–समृद्धीचे पाहिलेले स्वप्न **'स्वप्नी जे देखिले रात्री । ते ते तैसेचि होतसे ।'** असे त्यांनीच म्हटल्याप्रमाणे या 'आनंदवनभुवनो'मध्ये साकार झाल्याचे अनुभवास येते.

समर्थांच्या अपेक्षेप्रमाणे आता लोकांमध्ये स्थिरस्थावरपणा आला होता. स्नानसंध्येसाठी विपुलपाणी असून आता आनंदवन भुवनात जप–तप–अनुष्ठानांना आरंभ झाला होता. देवी भवानीने पूर्वी केलेल्या दैत्यसंहाराचा प्रत्यय जणु पुन्हा येत होता. असे हे समर्थांच्या स्वप्नातील आनंदवनभुवनातील वातावरण होते.

श्री. ग. वि. अकोलकरांच्या मते "समर्थांच्या साहित्य सोनियाच्या खाणीतील 'आनंदवन भुवन' हे कोहिनूर रत्नाप्रमाणे झगमगणारे व दिपवणारे एक आगळे रत्न आहे. 'रामराज्याचे स्थान' त्यात शब्दांकित झाले असल्याने ते विशेष महत्त्वाचे आहे. (श्रीसमर्थ चरित्र–ले. स. खं. आळतेकर. संपादकीय पृ. २१) प्रा. श्री. म. माटे या आनंदवनभुवना-संबंधी लिहितात–"आनंदवनभुवन हे स्वामींचे काव्य फार उद्दीपक आहे. ते वाचत असताना एक विलक्षण प्रोत्साहन आपल्या मनात भरत जाते. ... वाचकाच्या मनाला एक प्रकारचा उन्माद चढावा अशीच या काव्याची रचना आहे. त्यातील नुसत्या ध्वनीनेसुद्धा वाचकाला आवेश चढतो आणि आपण एखाद्या मोठ्या आक्रमक कार्यप्रसंगात गुंतलो आहोत किंवा तसा प्रसंग आपण प्रत्यक्ष पाहात आहोत असेच वाचकाला वाटू लागते."

(समर्थ रामदास–एक अभ्यास. ले. य. द. पेण्ढरकर. टीपा पृ. २६५)

'आनंदवनभुवनी' हे काव्य समर्थांना कोठे स्फुरले ? त्यांनी ते कधी लिहिले ? आनंदवन भुवनाचे निश्चित स्थान कोणते ? याविषयी विद्वानांमध्ये एकमत नाही. तथापि डॉ. शं. दा. पेंडसे यांनी या संबंधी मांडलेले मत मान्य होण्यासारखे आहे. ते म्हणतात–

'समर्थ हिंदुस्थानच्या चारही दिशांना बारा वर्षे भ्रमण करून काशीला रामगंगेच्या तीरावर वसले असताना समर्थांच्या बुद्धीपुढे सर्व हिंदुस्थान सर्व प्रचलित परिस्थितीसह उभे राहिले आणि त्यांच्या दिव्य प्रतिभेला भावी हिंदुस्थानचे जे 'भव्य चित्र' दिसले त्याचे चित्रण या काव्यात आहे. त्यांच्या मते 'आनंदवन' हा शब्द महाराष्ट्राला नव्हे तर काशीक्षेत्राला अनुलक्षून आहे.'

(राजगुरु समर्थ रामदास ले. डॉ. शं. दा. पेंडसे पृ. ३४३)

डॉ. वि. भि. कोलते यांचे यासंबंधीचे मत असे की "एक दिवस रामदासांना (आनंदवन भुवनाचे) स्वप्न पडले. त्यात त्यांनी आपल्या इच्छेचे चित्र पाहिले. संसार दुःखाने त्रस्त होऊन प्राण त्याग करण्यासाठी 'आनंदवनभुवन' काशीला आपण चाललो आहो असे त्यांना दिसले."

(मराठी संतांचे सामाजिक कार्य. ले. डॉ. वि. भि. कोलते–
अनु–सौ. सुमती कोलते पृ. १३८)

यावरून काशीक्षेत्राला अनुलक्षूनच आनंदवन भुवन हा शब्द त्यांनी योजिलेला असून त्यात त्यांनी डॉ. पेंडसे म्हणतात त्याप्रमाणे भावी हिंदुस्थानचे 'भव्य स्वप्न' पाहिले आहे हे मत मान्य होण्यास हरकत नसावी. अर्थात समर्थांच्या कल्पनेतल्या रामराज्याचे प्रतिबिंब त्यात उमटले असल्याने या काव्याला विशेष महत्व आले आहे.

अशाप्रकारे 'रामराज्य' हे रामदासांचे एक मनाशी बाळगलेले स्वप्न असून त्यात त्यांना राजकीय स्वातंत्र्याचा साक्षात्कार झाला. दुर्जन व मेंच्छ नामशेष झाल्याचे त्यांना दिसले. समाजजीवनात धनधान्याची समृद्धी निर्माण झाली. सामाजिक जीवनातील अस्थिरता व भीती संपुष्टात येऊन त्याला स्थिरता व निर्भयता प्राप्त झाली. धार्मिक जीवन-

मूल्यांची नीट जोपासना होऊ लागली. सामाजिक जीवन सर्वांगाने वैभव-संपन्न व समृद्ध बनले. असा हा रामराज्याचा काळ म्हणजे मोठा मंगलमय काळ होता. राजाची प्रजेप्रती न्यायी वागणूक, समाजात परस्पर प्रेम व सहकार्याची भावना, परोपकारी वृत्तीची वाढ इत्यादी गोष्टी पाहून समर्थांना जणु आपले स्वप्नच साकार होत असल्याचे समाधान मिळाले. तसेच रामदासांच्या कल्पनेतील रामराज्यात रोगराई, दुष्काळ, दैन्य, द्वेष–मत्सर यांचा अभाव आढळतो. सर्वत्र सर्वच बाबतीत भरभराट जाणवते. अध्यात्मविद्या, संगीत, कला, इत्यादींना परिस्थिती अनुकूल असावी असा तो रामदासांच्या मनातील रामराज्याचा काळ होता.

एकंदरीत,–

दानवांनी जेव्हा देवांवर मात करून त्यांना त्रस्त करून सोडले तेव्हा दानवांच्या बंधनातून देवांची मुक्तता करण्यासाठी रामराज्य प्रस्थापित झाले होते. समर्थांनी याच पौराणिक संदर्भाच्या पार्श्वभूमीवर शिवकाळात रामराज्याचे ध्येय उराशी बाळगले होते. यवनांच्या पिसाट प्रवृत्तीचे परिणाम महाराष्ट्रातील गरीब रयतेला नित्य भोगावे लागत होते. हिंदूंच्या तीर्थक्षेत्रांचा व देवदेवतांचा उच्छेद सतत सुरू होता. यवनांच्या अन्यायी व अत्याचारी आचरणाला आता मर्यादा उरली नव्हती. समर्थांनी तीर्थाटनाप्रसंगी ही सारी भयानक दृश्ये प्रत्यक्ष पाहिली आणि त्यांनी या परिस्थितीचे आमूलाग्र परिवर्तन व्हावे या उद्देशाने 'रामराज्य' प्रस्थापित करण्याचा एकच ध्यास धरला. "जेव्हा जेव्हा मती कुंठीत करणारी जुलमी राजवट येते तेव्हा तेव्हा कोंडी फोडण्यासाठी रामराज्याची घोषणाच संजीवनी मंत्रासारखी कार्य करते. म्हणूनच तुलसीदास, एकनाथ, समर्थ व महात्माजींनीही रामराज्याचीच घोषणा केली" हे श्री विजय देशमुख यांचे या संदर्भातील विधान उल्लेखनीय आहे. (समर्थ स्मरण–विजय देशमुख पृष्ठ २७)

तुकडोजींचे ग्रामराज्य–

रामदासांच्या 'रामराज्या' प्रमाणेच तुकडोजींनी ग्रामगीतेतून 'ग्रामराज्या' ची कल्पना मांडलेली आहे. विशेषतः ग्रामगीतेच्या 'ग्रामकुटुंब' या अडतिसाव्या आणि 'भू–वैकुंठ' या एकोणचाळिसाव्या

अध्यायातून त्यांनी 'ग्रामराज्या' ची कल्पना सविस्तरपणे विशद केलेली आहे.

अडतिसाव्या अध्यायाच्या थोडे आरंभीच महाराज म्हणतात–

" अवघाचि संसार व्हावा सुखी । मंगलता निघो सर्वमुखी ।
खळ, दुर्जनांचीही दृष्टि निकी । व्हावी सर्वथा ॥
मित्रता नांदावी सर्व जनी । उणीव न दिसावी कोठे कोणी ।
जो जो इच्छा करिती प्राणी । व्हावी पूर्ण ती न्याये ॥
नको कोठेहि द्वेष, वैर । न उरो कोठे हाहाःकार ।
दंभ, मत्सर, अत्याचार । अनाचार न राहो ॥
लया जावो जगाचा भेद । परस्परपोषक होवोत वाद ।
नांदो आनंदी आनंद । सगळीकडे सर्वदा ॥ "

(ओवी ८ ते ११)

याप्रमाणे संपूर्ण संसार सुखाचा व्हावा, सर्वांच्या मुखातून मंगल शब्द बाहेर पडावेत, दुष्ट व दुर्जनांची दृष्टी चांगली व्हावी, सर्वत्र मित्रत्वाची भावना प्रस्थापित व्हावी, कोठेही कोणत्याप्रकारची उणीव दिसू नये, सर्वांची सदिच्छा पूर्ण व्हावी, कोठेही द्वेषाची वा शत्रुत्वाची भावना नसावी, कोठेही हाहाःकार असू नये, दंभ मत्सर, अत्याचार, अनाचार कोठेही नसावा, जगातील भेद समूळ नष्ट व्हावेत, वाद परस्पर पोषक असावेत आणि 'आनंदी आनंद गडे । जिकडे तिकडे चोहीकडे' याप्रमाणे सर्वत्र सदैव आनंदी–आनंद नांदावा अशा प्रकारची उत्कट तळमळ जगातील सर्व महापुरुषांच्या मनात रात्रंदिवस घोळत असल्याची ग्वाही महाराज देतात.

" हीच तळमळ रात्रंदिनी । सारखी होती तयांचे मनी ।
जगी जे झाले थोर कोणी । महापुरूष कोठेहि ॥ "

(ओ. १२)

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातून परमेश्वराला जे पसायदान मागितले आहे त्यातूनही असाच प्रत्यय येतो.

पहा–

" जे खळांचो वांकुडे मोडे । तेया सत्संगी रति वाढे ।
भूता परस्परें पडे । मैत्र जीवाचे ॥
दुरितांचे तिमिर जाओ । विश्वा स्वधर्म सूर्य पाहो ।
वांछिल ते ते लाहो । प्राणिजात ॥
वर्षते सर्व मंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियळी ।
अनवरत भूमंडळी । भेटोतु भूता ॥ " (ओ. ७३ ते ७५)

अशाप्रकारे ज्ञानेश्वरांच्या या उदात्त विचारांचे प्रतिबिंब रामदास, तुकाराम, तुकडोजी सारख्या संतांच्या साहित्यातही उमटलेले दिसते. महात्मा गांधींची रामराज्याची कल्पनाही अशाच स्वरुपाची आहे. समाज-जीवनातील गरिबी-श्रीमंतीची व स्पृश्य-अस्पृश्य या भेदाची भयानक पोकळी बुजली पाहिजे व समग्र समाज बंधुभावाने एकत्र नांदला पाहिजे अशीच त्यांची इच्छा होती.

तुकडोजी महाराजांच्या कल्पनेतून अवतरलेले ग्रामराज्य हे एक आदर्श ग्रामराज्य आहे. त्यातून महाराजांनी कालोचित कल्पनांद्वारे एका आदर्श ग्रामराज्याचे चित्र रेखाटले आहे. त्यांच्या मते स्वयंशासन हे आदर्श ग्रामराज्याचे महत्वांचे वैशिष्टय आहे. ग्राम हे त्यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनाचे महत्वाचे केंद्र मानून ग्रामोन्नतीच्या अधिष्ठानावरच आपला देश समर्थपणे उभा राहू शकत असल्याची जाणीव करून दिली. त्यांना ग्रामराज्यात-संघटित, सामाजिक भावना विशेष जागरूक व जागृत असलेला, संख्येने मोठा नसला तरी, एकीकरणाच्या भावनेने भारलेला, परिमित, नियमित, संयमित व सत्प्रवृत्त असा लोकसमुदाय प्रस्थापित करावयाचा होता. त्यांचो ग्रामराज्याची कल्पना अगदीच अभिनव स्वरुपाची नसली तरी तिच्या कालानुरुप केलेल्या मांडणीवरून ग्रामराज्याचे आगळे वेगळेपण जाणवल्याशिवाय राहात नाही. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी म्हटल्याप्रमाणे " समाज जुन्यात गढला असतो, एकदम नवे त्याला पचविता येत नाही आणि म्हणूनच नवा लेखक नव्या परिभाषेत जुनोच गोष्ट सांगतो. "

(ग्रामगीता–प्रस्तावना–डॉ. शं. दा. पेंडसे पृ. ४७)

प्रस्तुत विधान महाराजांच्या बाबतीत पूर्णतः लागू पडते.

पूर्वीच्या संतांच्या साहित्यात ग्रामविकाससंबंधीचा विशेष उल्लेख आढळत नाही तथापि समर्थ रामदास व संत तुकाराम यांच्या रामराज्या संबंधीच्या कल्पनांमध्ये त्याचे काही अंश आढळतात. जसे की–

" संतांचिया गावी प्रेमाचा सुकाळ । नाही तळमळ दुःख क्लेश "

या तुकारामांच्या ओळीतून संत आपला गाव आनंदमय बनविण्याची अपेक्षा करतात एवढेच सूचित होते. समाजाला सर्वांगीण समृद्धी लाभणे आणि सर्वत्र आनंदाचे वातावरण असणे हेच संतांच्या दृष्टिकोणातील 'रामराज्य' होय. तुकडोजी महाराज 'भू-वैकुंठ' या अध्यायाच्या अगदी आरंभीच म्हणतात–

'सर्व लोकांचे समाधान । याहूनि स्वर्ग नाही महान ।
नांदती द्वेषमत्सराविण । बंधुभाव सर्व जेथे ॥"

(अ. ३९ ओ. १)

तुकडोजी महाराजांनी ग्रामीण जनतेतील सुप्त व प्रचंड शक्ती ओळखली आणि तिची आराधना करून 'भू-वैकुंठ' करण्याचा प्रयोग केला. महाराजांच्या मते 'भू-वैकुंठ' होण्यासाठी समाजात गरिबी–श्रीमंतीची प्रचंड पोकळी नसावी. विषमता, रोगराई समूळ नष्ट व्हावी. पंथ-पक्ष नसावा. जातिभेद नसावा. संपूर्ण गाव एका कुटुंबाप्रमाणे आनंदात नांदावे. सर्वांनी परस्परांच्या सुख–दुःखात समरस व्हावे. सर्वांनी भरपूर परिश्रम करावे. सर्वांच्या अन्न–वस्त्र निवारा ह्या आवश्यक गरजा पूर्ण व्हाव्यात. सर्वांनी सकाळी उठून स्वच्छता, ध्यान, प्रार्थनादि कार्यक्रम सामुदायिक पद्धतीने पार पाडावे. गावातील दुर्व्यसने दूर व्हावीत. अन्याय-अत्याचार कोठेही नसावा.

समर्थ रामदासांच्या कल्पनेतील रामराज्याचे प्रतिबिंब जसे काही प्रमाणात 'आनंदवन' मध्ये उमटले आहेत, तसेच तुकडोजी महाराजांच्या ग्रामराज्याचे प्रतिबिंब त्यांच्या 'ग्रामगीतेतील काही ओव्यांमध्ये उमटलेले दिसते. महाराजांचे ग्रामराज्य हे एक आदर्श ग्रामराज्य आहे. आणि हे ग्रामराज्य कसे असावे हे सांगताना महाराज म्हणतात–

"सर्वांगीण असावी ग्रामरचना । मनोरंजनासहित पुरवाव्यात भावना ।
जेणे करून ग्रामवासियांना । आठव ना ये शहराचा ॥
व्याख्याने, कीर्तने, कलापथक । वादविवाद, पोवाडे, नाटके सात्विक ।
ऐसी नित्य नवनवी करमणूक । गावी चालवावी सर्वांनी ॥"

(अ. १३ ओ. ९५-९६)

सुंदर असावे वाचनालय । नाना ग्रंथ ज्ञानमय ।
करावया सुबुद्धीचा उदय । गावलोकी ॥
काय चालले जगामाजी । कळावे गावी सहजासहजी ।
म्हणोनि वृत्तपत्रे असावी ताजी । आकाशवाणीही त्याठायी ॥

(अ. १३-ओ. १०३-१०४)

गरीब-श्रीमंत कोणी नाही । नाहि दारिद्र्य रोगराई ।
उंचनीच कामे सर्वहि । करिती लोक प्रेमभरे ॥

(अ. ३९ ओ. २)

गावात नाही झगडा-तंटा । कोणी नाही बोलणारा उफराटा ।
सरळ, सालस स्वभाव चोखटा । प्राणियांचा दिसावा ॥

(अ. ३९ ओ. ७४)

ऐसे गाव होता आदर्श पूर्ण । शहराहूनीहि नंदनवन ।
सर्वांचे करील आकर्षण । सुंदर जीवन तुकड्या म्हणे ॥

(अ. १३ ओ. ११७)

अशाप्रकारे नासलेल्या समाजजीवनाचे शुद्धीकरण करण्यासाठी आणि दुर्लक्षिल्या गेलेल्या ग्रामातील गरीब व दुःखी लोक संपन्न व सुखी होण्यासाठी महाराजांनी आदर्श ग्रामराज्याची कल्पना मांडलेली आहे. त्या आदर्श ग्रामराज्यात स्वावलंबन, कुटिर व लघु-उद्योगालाही त्यांनी महत्वाचे स्थान दिलेले आहे. गावाची गरज भागावी म्हणून आवश्यक त्या सर्व वस्तूंचे उत्पादन गावातच व्हावे व सहकारी तत्त्वावर जीवनोपयोगी वस्तूंचे भांडारगृह चालविण्यात यावे असे ते म्हणतात. असे जर झाले तर महाराजांच्या मते-

"याने सर्वांस मिळेल सुख । मिटेल जीवनाची भूक ।
ग्रामराज्य होईल सुरेख । आर्थिकतेने समृद्ध ॥"

(अ. १८ ओ. १०३)

तुकडोजी महाराजांचे हे ग्रामराज्य म्हणजे एक प्रकारचे रामराज्यच होते. महाराज स्वतःच यासंबंधी सांगतात–

"ग्रामराज्यचि रामराज्य । स्वावलंबन हेचि स्वराज्य ।
बोलिले महात्मा विश्वपूज्य । विकास त्याचा सुंदर हा ।।"

(अ. ३९ ओ. १२५)

तुकडोजी महाराजांचे कर्तृत्व लक्षात घेऊन महाराष्ट्र विधानसभेचे माजी सभापती श्री. त्र्यं. शि. भारदे म्हणतात–"भारतीय संतपरंपरेचा परिपाकच या राष्ट्रसंताच्या व्यक्तित्वात झाला. साधुत्व शक्तीला साहित्य-शक्तीची जोड मिळाली. महासंताचा महाकवी बनला. . . .याच भूलोकावर स्वर्गाचे साम्राज्य आणू इच्छिणारा !

(ग्रामगीता–प्रस्तावना पृ. ७)

एकंदरीत, रामदासांच्या दिव्य प्रतिभेला जसे भावी हिंदुस्थानचे भव्यचित्र दिसले व ते त्यांनी आनंदवनभुवनी मध्ये रेखाटले, तसेच महाराजांनी भावी भारताचे पाहिलेले भव्य स्वप्न आपल्या ग्रामगीतेतून साकार केले आहे. रामदासांचे 'रामराज्य' काय किंवा तुकडोजींचे 'आदर्श ग्रामराज्य' काय त्या दोन्हीचा जवळजवळ एकच आशय अभिव्यक्त झाला आहे.

रामराज्य–ग्रामराज्य–तौलनिक परीक्षण

महाराष्ट्र धर्म किंवा महाराष्ट्र-राज्य प्रस्थापित व्हावे अशी समर्थांच्या अंतरीची उत्कट तळमळ जरी वारंवार व्यक्त होत असली, तरी त्यांचे अंतिम उद्दिष्ट 'रामराज्य' हेच होते. या रामराज्य निर्मितीचे महाराष्ट्र धर्म व महाराष्ट्र राज्य हे केवळ माध्यम ते मानतात. मात्र तुकडोजी महाराजांचे संपूर्ण लक्ष भारतातील ग्रामीण विकासाकडे आहे. भारतातील ग्रामांचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे ग्रामराज्य व रामराज्य होय. राष्ट्रोन्नतीसाठी भारतातील प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व्हायला हवे असे ते म्हणतात. समर्थांनी जसे 'रामराज्या'चे काहीसे चित्र 'आनंदवनभुवनी' या काव्यातून रेखाटले आहे; तसेच महाराजांनी आपल्या आदर्श ग्रामराज्याचे चित्र 'ग्रामगीतेतील' काही अध्यायांतून रेखाटलेले आहे.

समर्थांनी अयोध्यापती आदर्श रामाच्या राज्यात 'लोक आरोग्य नांदती' असे सुख-समृद्धीचे वातावरण जसे वर्णिले आहे, तसेच महाराजांनी आदर्श ग्रामातील वातावरणाचे दृश्य चितारून आदर्श ग्रामाला तीर्थक्षेत्रासारखेच महत्व दिलेले आहे. महाराज म्हणतात–

" ईश्वरे व्यापले हे विश्व । म्हणोनि जगचि आम्हा देव ।
विश्वाचा मूळ घटक गाव । ग्रामगीता त्यासाठी ॥
यात ग्रामाचा जयजयकार । सर्व तीर्थक्षेत्रांचे ग्रामचि माहेर ।
ग्राम हा विश्वाचा पाया सुंदर । ग्राम नसता प्रलयचि ॥ "

(अ. ४१ ओ. १–२)

रामदासांना आपल्या काळातील म्लेंच्छांचा अन्याय–अत्याचार, हिंदूंचा अनन्वित छळ, त्यांच्या देव–देवतांचा विध्वंस आणि तीर्थक्षेत्रांचा उच्छेद पाहून वैतागही उत्पन्न होतो आणि त्यांचा संतापही बळावतो. अशा त्रस्त परिस्थितीतून महाराष्ट्र मुक्त व्हावा व सर्वत्र महाराष्ट्र राज्य प्रस्थापित व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा होती. या तीव्र इच्छेतूनच त्यांना एक 'आनंदवनभुवनाचे' स्वप्न दिसले. त्या आनंदवनभुवनाच्या स्वप्नामध्ये साकारलेले रामदासांचे 'रामराज्य' व समृद्ध भारताचा पाया असणारे तुकडोजींचे ग्रामराज्य यांचा तुलनात्मक परामर्श घेऊ या.

समर्थांना म्लेंच्छाकडून हिंदूंवर होणारा अनन्वित अत्याचार जसा पाहवला नाही, तसेच महाराजांना भारतवर्षातील लाखो खेड्यापाड्यांतून पसरलेल्या जनतेतील अज्ञपणा, अशिक्षितपणा, अस्वच्छता, शिस्तहीनता, परावलंबित्व इत्यादी गोष्टी पाहवल्या नाहीत. म्हणूनच या दोन्ही संतांनी आपापल्या काळ व परिस्थितीनुरुप 'रामराज्या'चे व 'ग्रामराज्या'चे चित्र शब्दांकित केले आहे.

भारतवर्षाच्या भौतिक व आध्यात्मिक उन्नतीसाठी स्वतंत्र शासनाची अपरिहार्यता दोघांनीही आपापल्या काळात पोटतिडकीने दर्शविली व त्यातूनच त्यांच्या 'रामराज्याची' आणि 'ग्रामराज्याची' कल्पना साकारली. या दोनही संतांचे समाजजीवनाचे निरीक्षण सूक्ष्म, मर्मग्राही व जिव्हाळ्याचे असून त्यांच्या 'रामराज्या'च्या व 'ग्रामराज्या'च्या कल्पनेत ते पूर्णपणे

प्रतिबिंबित झालेले दिसते. समाजजीवनातील सुख, शांती, समाधान, समृद्धी, निर्मळता, सत्यता, पावित्र्य, चारित्र्य, शौर्य, पराक्रम, स्वातंत्र्य, स्वावलंबन इत्यादी बाबींकडे या दोन्हीही संतांनी पुरेपूर लक्ष पुरवून रामराज्याचे व ग्रामराज्याचे स्वप्न आपल्यापुढे सतत ठेवले आहे व ते साकार करण्यासाठी कालोचित असे उपायही सुचविलेले आहेत. त्यातून आपल्याला या दोन्ही द्रष्ट्या-संतांनी भावी भारताच्या रेखाटलेल्या भव्य चित्राचे स्वरूप पाहावयास मिळते.

रामदास व तुकडोजी या दोन्ही संतांनी आपले अध्यात्म आणि आपला भक्तीमार्ग रामराज्य व ग्रामराज्य यांच्या प्रस्थापनेसाठी समर्पित केलेले आहे. रामराज्याच्या स्थापनेसाठी रामदास जसे धडपडताना दिसतात तसेच आदर्श ग्रामराज्याच्या निर्मितीसाठी तुकडोजींनीही आयुष्यभर अविश्रान्त परिश्रम केले.

रामदासांच्या कार्यशील अध्यात्माचे मूळ रामराज्याच्या कल्पनेमध्ये आहे. त्यांच्यामते राज्य हे अयोध्यापती रामाच्या राज्यासारखे व्हावे, त्यात क्रोधमत्सरादि दुर्गुणांचा समूळ नाश व्हावा. तर तुकडोजींच्या कार्यशील अध्यात्माचे मूळ आदर्श ग्रामराज्यामध्ये आहे. किंबहुना संपूर्ण समाजक्रांतीकार्याच्या पार्श्वभूमीवर त्यांची आदर्श ग्रामराज्य निर्मितीची कल्पना अत्यंत महत्वपूर्ण आहे. या देशातील कामकरी, कष्टकरी, शेतकरी सुखी व्हावा, त्याच्या कष्टाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी; प्रत्येक खेडे स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हावे हे महाराजांचे ध्येय-स्वप्न होते आणि त्यानुरुप त्यांचे प्रयत्न होते.

काळ व परिस्थितीच्या मर्यादा-

प्रत्येक विचारप्रवर्तक पुरुषाच्या विचाराला व कार्याला काळ व परिस्थितीच्या मर्यादा पडतात. रामदास व तुकडोजी हे दोघेही आपापल्या काळातील विचारप्रवर्तक पुरुष होते. अर्थातच रामदासांच्या 'रामराज्य' विषयक कल्पनांमध्ये व तुकडोजींच्या 'ग्रामराज्य' विषयक कल्पनांमध्ये काळ व परिस्थितीनुसार पडलेल्या मर्यादा स्वाभाविकच जाणवतात. तथापि, रामदासांच्या रामराज्यापेक्षा तुकडोजींच्या

ग्रामराज्याची व्यापकता विशेषत्वाने जाणवते. मुख्य म्हणजे 'रामराज्य' हे समर्थांचे एक 'स्वप्न' आहे आणि 'ग्रामराज्य' हा महाराजांचा एक अभिनव कृतिशील प्रयोग आहे. हा अभिनव कृतिशील प्रयोग करीत असताना महाराजांची दृष्टी संपूर्णत: समाजातील तळागाळाच्या माणसाच्या सर्वांगीण विकासावर केंद्रित झालेली दिसते.

समर्थांच्या 'रामराज्या'त–

"अद्भूत पिकती भूमी । वृक्ष देती सदा फळे ।
अखंड दुभती धेनु । आरोग्ये वाहाती जळे ॥
उजळे स्वापदे पक्षी । नाना जीव भूमंडळी ।
आनंदरूप बोभाती । नानास्वर परस्परे ॥
नद्या सरोवरे बावी । डोलती नूतने बने ।
फळती फुलती झाडे । सुगंध वन वाटिका ॥"

असे एक समृद्धीचे स्वप्न साकारले आहे. या समृद्धीच्या स्वप्नात त्यांनी संगीतादी कलांचाही समावेश केलेला आहे–

"नान युक्ती नाना बुद्धी । नाना विद्या नाना कळा ।
नाना संगीत सामर्थ्ये । नाना वाद्ये परोपरी ॥"

श्रीरामचंद्रप्रभु हे रामदासांचे आराध्य दैवत होते. स्वाभाविकच रामराज्यातील सुख–समृद्धी त्यांच्या 'रामराज्या'च्या स्वप्नात साकारलेली आहे परंतु तुकडोजींचे आराध्यदैवत म्हणजे स्वत: कष्ट भोगून इतरांना सुखी करणारा 'ग्रामनाथ' आहे. आपल्या ग्रामगीतेच्या 'अर्पणपत्रिके' मध्ये ते ग्रामनाथाला उद्देशून म्हणतात–

'तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो । सकळांचे लक्ष तुजकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो । विश्रामाजी या योगे ॥'

एकंदरीत समर्थ व महाराज हे दोघेही संतकवी होते. इहपर असा उभयविध विवेक, उज्ज्वल उन्नयनाची अखंड आकांक्षा आणि क्रियाशील असे विक्रमी वैराग्य दोघांच्याही ठिकाणी होते तथापि त्यांच्या रामराज्य व ग्रामराज्य यांच्या तपशीलातील फरक हा त्या काळाचा व परिस्थितीचा परिणाम म्हणावा लागेल.

संतद्वय–साहित्यदृष्टी व सृष्टी

साहित्याच्या ठिकाणी समाजजीवन घडविण्याचे अलौकिक सामर्थ्य असते. ऑस्ट्रियाच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या इटलीला मॅझिनी या इटलीच्या महान देशभक्ताने आपल्या 'यंग इटली' या वृत्तपत्राद्वारे जागृत केले. भारतीय वृत्तपत्रांनीही पारतंत्र्याच्या काळात जनतेत अशी जागृती घडवून आणून इंग्रजी राज्यकर्त्यांची झोप उडवून दिली होती. अशाप्रकारे साहित्य ही एक प्रचंड शक्ती आहे. समाजाला बरी–वाईट दिशा देण्याचे सामर्थ्य या साहित्यात आहे.

समर्थ रामदास व संत तुकडोजी यांनी आपल्या साहित्यशक्तीने आपापल्या काळात फार मोठी खळबळ माजवून दिली. या संतद्वयाच्या साहित्यातून साकारलेली भारतीय समाजजीवनाची व संस्कृतीची माहिती आणि महती तसेच डोळस राष्ट्रवादाचे धडे आजही आपणास स्फूर्तिदायक ठरतात. आपापल्या काळातील समाजजीवनाचे सत्यदर्शन घडविणारे संतद्वयाचे साहित्य ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, कबीर, या संतांसारखेच सद्विचारप्रेरक व विचारप्रवर्तक आहे. भारतीय समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय व धार्मिक जीवनात फार मोठे परिवर्तन घडवून आणण्यास ते पोषक ठरले आहे.

सतराव्या शतकात महाराष्ट्रात परकीय सत्तेमुळे समाजाच्या अस्मितेला धोका उत्पन्न झाला असताना पुरुषार्थ जागृतीचे कार्य समर्थांच्या 'दासबोधा' ने जसे केले तसेच वीसाव्या शतकात भारतीय पारतंत्र्याच्या व स्वातंत्र्याच्या काळात जनजागृतीचे महद्कार्य तुकडोजी महाराजांच्या स्फूर्तिदायी साहित्यानेही केले आहे.

समर्थांचे दासबोध, रामायण आणि स्फुट अभंगादी साहित्य बऱ्याच प्रमाणात मराठी भाषेमध्येच असले तरी त्यांचे काही पदे आणि दोहे हिंदी भाषेतही आहेत. त्यांच्या उपलब्ध असलेल्या विपुल साहित्य सृष्टीतील बहुतांशी भाग अध्यात्म–विचाराने व्यापलेला आहे.

समर्थांच्या लिखाणातील सरळसोटपणा, रांगडी भाषा, पुनरूक्ति व शब्दपाल्हाळ पाहून त्यांना साहित्यिक किंवा कवी संबोधण्यासंबंधी

अनेकांच्या मनात शंका आहे. 'रसात्मकम् काव्यम्' काव्याची हीच जर एकमेव कसोटी असेल तर मग त्या कसोटीवर केवळ समर्थांचे किंवा तुकडोजींचेच काय परंतु अनेक कवी–महाकवींचेही काव्य 'काव्य' या संज्ञेस पात्र ठरणार नाही.

समर्थांच्या मते कवी–

> **"की हे शब्द रत्नांचे सागर । की हे मुक्तांचे मुक्त सरोवर ।**
> **नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाले ।।**
>
> (द. १ स. ७ ओ. ४)

या प्रमाणे समर्थांच्या मते कवी "**शब्द रत्नांचे सागर**" असतात. इतकेच नव्हे तर–ते "**मुक्तीचे मुक्त सरोवर**" असून सरस्वतीच्या कृपेने त्यांच्या ठायी '**नाना बुद्धीचे वैरागर**' निर्माण होते. कवी संबंधीची आपली कल्पना अधिक स्पष्ट करताना समर्थ पहिल्या दशकातील सातव्या समासात म्हणतात–"कवी अध्यात्मग्रंथाची खाण किंवा बोलके चिंतामणी आहेत. किंबहुना कामधेनूच्या पान्हयाचा प्रवाह कविरूपाने श्रोत्यांवर आला आहे. कवी म्हणजे जणु सर्व मनोरथ पूर्ण करणारे कल्पतरूच आहेत. ते मोक्षाचे ऐश्वर्य असून निर्गुण–निरंजन परब्रह्माची ओळख आणि मायेपेक्षा वेगळ्या अशा परमात्म्याचे स्वरूप होत. या कवीरूपाने वेदांचे गूढ किंवा परमेश्वराचा अलभ्य लाभ अतिशय सोपा झाला आहे. कवी म्हणजे जणु मुमुक्षूचे डोळे उघडणारे अंजनच होय. ते स्वधर्माची सदैव जागृति ठेवतात. ते वैराग्याचे संरक्षण आणि भक्तांचे भूषण होत. कवींच्या वाग्विलासाने श्रोतृवृंदांचे कर्ण रसास्वादनाने तृप्त होतात. कवी म्हणजे सृष्टीचा अलंकार, लक्ष्मीचा शृंगार आणि सर्व सिद्धींचा निर्धार होत. कवी हे देवांना नाम–रूप देणारे व ऋषिमुनींचे माहात्म्य कथन करणारे असून शास्त्रांचे सामर्थ्य ते सहजच विशद करतात. महाकवींच्या उत्कृष्ट काव्यांमुळेच जगाचा उद्धार झालेला आहे. अन्यथा महाकवींच्या उत्कृष्ट काव्यावाचून जगोद्धार अशक्य होता. अशाप्रकारे कवी हा सृष्टीचा आधार बनला आहे.

"नस्ता कवींचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्धार ।
म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥"

(द. १ स. ७ ओ. २१)

अशाप्रकारे समर्थांनी कवीचा महिमा वर्णन केलेला आहे. एकंदरीत, कवींच्या कवित्वामुळे जगाच्या उद्धाराला चालना मिळते हे समर्थांनी मान्य केले आहे. कवीच्या कवित्वामुळे लोकजागृतीचे कार्य घडले पाहिजे, चैतन्याचे वारे समाजात खेळले पाहिजे अशी जर आपली अपेक्षा असेल तर ती समर्थांच्या व तुकडोजी महाराजांच्या काव्यनिर्मितीकडे पाहता निश्चितच पूर्ण होऊ शकेल. या दोघांही संतकवींच्या काव्यात काही प्रमाणात ओबड धोबडपणा जाणवत असला आणि मृदु, मुलायम लुस-लुशीत शब्दांचा बऱ्याच प्रमाणात अभाव व रांगडी भाषेचा अधिक भरणा आढळत असला तरी त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून जनमतीचा कलंक झडण्यासाठी वेळोवेळी दिलेली प्रेरणा व लोकशिक्षण, आणि पारतंत्र्याच्या काळातील जागृतीचे केलेले कार्य पाहू जाता ते केवळ कवीच नव्हेत तर त्यांना 'महाकवी' ही उपाधी सहजच शोभू शकेल. समर्थांच्या वाङमयीन गुणांचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करताना प्रा. भा. श्री. परांजपे म्हणतात– "पारतंत्र्याच्या काळातील कोणत्याही राष्ट्राचे व तेथील लोकांचे राजकारण द्विविध स्वरूपाचे असते. जुन्या राजसत्तेशी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना स्फूर्तिप्रद होतील अशी नवीनवी धोरणे ठेवावी लागतात आणि त्यातूनच वरवर दिसायला युद्धोन्मुख असे राजकारण जन्माला येते. या युद्धोन्मुख राजकारणाला उचलून धरण्यासाठी रामदासांना आपले वाङमयीन बळ खर्ची घालावे लागले. जाज्वल्य दैवतांना आवाहन आणि नर प्रशस्ती, वीर मातांच्या कथा आणि बंधविमोचनाचे पोवाडे अशा तऱ्हेचे वाङ्मय रामदासांनी रचले ते या उद्देशानेच होय. या वाङमयात युद्धाची व प्रतापाची वर्णने त्यांनी विशेष जोमदार भाषेत मांडलेली दिसतात."

(रामदासांचे साहित्य शास्त्र (१९७३) पृष्ठ १४९)

समर्थांच्या नरप्रशंसेमध्ये आणि युद्धवर्णनामध्ये आलेल्या नाटचात्मकतेमुळे त्यांची वर्णने सजीवस्वरूपाची वाटतात. रामायणातील युद्ध-

कांड या निवडक कथाभागामध्ये युद्धकांड तेराशे श्लोकांत मोठ्या रमणीयतेने फुलविले आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर शंभूराजांना समर्थांनी जे पत्र लिहिले त्यातील 'शब्दन् शब्द' म्हणजे जणू स्फूर्तीचा झराच ठरावा अशा प्रकारचा एक प्रेरणास्त्रोत आहे. उदाहरणादाखल खालील ओळी पहा–

" शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥
शिवरायाचे कैसे चालणे । शिवरायाचे कैसे बोलणे ।
शिवरायाची सलगी देणे । कैसे असे ॥ "

काव्याचे विविध प्रकार

समर्थ काव्याचे काही प्रकार मानतात. एक धीट, दुसरे पाठ तिसरे धीटपाठ आणि चवथे प्रासादिक, दासबोधातील चौदाव्या दशकाच्या तिसऱ्या समासात समर्थ या प्रकारांचे वर्णन करताना म्हणतात–

" धीट म्हणिजे धीटपणे केले । जे जे आपुल्या मनास आले ।
बळेंचि कवित्व रचिले । या नांव धीट बोलिजे ॥ "

आपल्या मनास येईल तशा प्रकारचे काव्य ओढून ताणून रचणे त्याला 'धीट' काव्य म्हणतात.

" पाठ म्हणिजे पाठांतर । बहुत पाहिले ग्रंथांतर ।
तयासारिखा उतार । आपणहि केला ॥ "

अनेक ग्रंथांचा अभ्यास करून किंवा ते पाठ करून त्यातील विचारांची नक्कल करणे याला 'पाठ' काव्य असे म्हणतात.
आणि–

" सीघ्रचि कवित्व जोडिले । दृष्टी पडिले तेचि वर्णिले ।
भक्तींवाचून जे केले । त्या नांव धीटपाठ ॥ "

शीघ्र कविता करणे किंवा दृष्टीस पडेल त्याचे वर्णन करणे अशा भक्तिविरहित काव्याला 'धीटपाठ' काव्य असे म्हणतात. अशा

काव्यामध्ये कामवासना उद्दीपित करणारी अशी शृंगारिक किंवा वीररसपूर्ण किंवा हास्यरसपूर्ण वर्णने केलेली असतात. असल्याप्रकारचे काव्य समर्थांच्या मते अत्यंत क्षुद्र प्रकारचे काव्य होय. असले काव्य स्वार्थाने प्रेरित होऊन केवळ दुसऱ्याची स्तुती करण्यासाठी केलेले असते. परंतु समर्थांच्या मते असल्या प्रकारच्या क्षुद्र धीटपाठ काव्याने भवसागराचे पैलतीर गाठता येत नाही.

तुकाराम महाराजांनीही असल्या काव्यासंबंधी असे म्हटले आहे की–

" न ये नेत्रा जळ । नाही अंतरी कळकळ ।
तो हे चावटीचे बोल । जन रंजवणे फोल ॥ "

(गाथा–८२)

तसेच स्वार्थ हेतूने प्रेरित होऊन काव्य प्रसरविणाऱ्यांचा प्रखर शब्दांत धिक्कार करताना ते म्हणतात.

" तुका म्हणे कवित्व करी । मानवस्तु हे आवरी ।
थू थू त्याच्या तोंडावरी । व्यर्थ सिणवी वैखरी ॥ "

(गाथा–३५६७)

एकंदरीत, समर्थांच्या मते–

काव्य धीटपाठ नसावे; ते 'बळेचि कवित्व' नसावे; त्यात उद्धटपणा व पाखंडीपणा नसावा; त्यापासून वाद उत्पन्न होऊ नये; रसभंग होऊ नये; त्यात पाल्हाळ नसावा, कुटिलपणा किंवा क्षुद्रपणा नसावा; पुनरूक्ती नसावी; ते भक्तीहीन नसावे. समर्थ म्हणतात–

" भक्तिहीन जे कवित्व । तेचि जाणावे ठोंबे मत ॥ "

(द. १४ स. ३ ओ. १९)

काव्य कसे असावे ?

समर्थांच्या मते काव्य प्रासादिक असावे. त्यांच्या दृष्टिकोनातून सर्वश्रेष्ठ काव्य म्हणजे प्रासादिक काव्य होय. कारण या प्रासादिक काव्यामुळे त्यांनी वर्णन केल्याप्रमाणे–

" वैभव कांता कांचन । जयास वाटे हे वमन ।
अंतरी लागले ध्यान । सर्वोत्तमाचे ॥

कांड या निवडक कथाभागामध्ये युद्धकांड तेराशे श्लोकांत मोठ्या रमणीयतेने फुलविले आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर शंभूराजांना समर्थांनी जे पत्र लिहिले त्यातील 'शब्दन् शब्द' म्हणजे जणू स्फूर्तीचा झराच ठरावा अशा प्रकारचा एक प्रेरणास्त्रोत आहे. उदाहरणादाखल खालील ओळी पहा–

" शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ॥
शिवरायाचे कैसे चालणे । शिवरायाचे कैसे बोलणे ।
शिवरायाची सलगी देणे । कैसे असे ॥ "

काव्याचे विविध प्रकार

समर्थ काव्याचे काही प्रकार मानतात. एक धीट, दुसरे पाठ तिसरे धीटपाठ आणि चवथे प्रासादिक, दासबोधातील चौदाव्या दशकाच्या तिसऱ्या समासात समर्थ या प्रकारांचे वर्णन करताना म्हणतात–

" धीट म्हणिजे धीटपणे केले । जे जे आपुल्या मनास आले ।
बळेंचि कवित्व रचिले । या नांव धीट बोलिजे ॥ "

आपल्या मनास येईल तशा प्रकारचे काव्य ओढून ताणून रचणे त्याला 'धीट' काव्य म्हणतात.

" पाठ म्हणिजे पाठांतर । बहुत पाहिले ग्रंथांतर ।
तयासारिखा उतार । आपणहि केला ॥ "

अनेक ग्रंथांचा अभ्यास करून किंवा ते पाठ करून त्यातील विचारांची नक्कल करणे याला 'पाठ' काव्य असे म्हणतात.
आणि–

" सीघ्रचि कवित्व जोडिले । दृष्टी पडिले तेचि वर्णिले ।
भक्तींवाचून जे केले । त्या नांव धीटपाठ ॥ "

शीघ्र कविता करणे किंवा दृष्टीस पडेल त्याचे वर्णन करणे अशा भक्तिविरहित काव्याला 'धीटपाठ' काव्य असे म्हणतात. अशा

काव्यामध्ये कामवासना उद्दीपित करणारी अशी शृंगारिक किंवा वीररसपूर्ण किंवा हास्यरसपूर्ण वर्णने केलेली असतात. असल्याप्रकारचे काव्य समर्थांच्या मते अत्यंत क्षुद्र प्रकारचे काव्य होय. असले काव्य स्वार्थाने प्रेरित होऊन केवळ दुसऱ्याची स्तुती करण्यासाठी केलेले असते. परंतु समर्थांच्या मते असल्या प्रकारच्या क्षुद्र धीटपाठ काव्याने भवसागराचे पैलतीर गाठता येत नाही.

तुकाराम महाराजांनीही असल्या काव्यासंबंधी असे म्हटले आहे की–

" न ये नेत्रा जळ । नाही अंतरी कळकळ ।
तो हे चावटीचे बोल । जन रंजवणे फोल ॥ "

(गाथा–८२)

तसेच स्वार्थ हेतूने प्रेरित होऊन काव्य प्रसरविणाऱ्यांचा प्रखर शब्दांत धिक्कार करताना ते म्हणतात.

" तुका म्हणे कवित्व करी । मानवस्तु हे आवरी ।
थू थू त्याच्या तोंडावरी । व्यर्थ सिणवी वैखरी ॥ "

(गाथा–३५६७)

एकंदरीत, समर्थांच्या मते–

काव्य धीटपाठ नसावे; ते 'बळेचि कवित्व' नसावे; त्यात उद्धटपणा व पाखंडीपणा नसावा; त्यापासून वाद उत्पन्न होऊ नये; रसभंग होऊ नये; त्यात पाल्हाळ नसावा, कुटिलपणा किंवा क्षुद्रपणा नसावा; पुनरूक्ती नसावी; ते भक्तीहीन नसावे. समर्थ म्हणतात–

" भक्तिहीन जे कवित्व । तेचि जाणावे ठोंबे मत ॥ "

(द. १४ स. ३ ओ. १९)

काव्य कसे असावे ?

समर्थांच्या मते काव्य प्रासादिक असावे. त्यांच्या दृष्टिकोनातून सर्वश्रेष्ठ काव्य म्हणजे प्रासादिक काव्य होय. कारण या प्रासादिक काव्यामुळे त्यांनी वर्णन केल्याप्रमाणे–

" वैभव कांता कांचन । जयास वाटे हे वमन ।
अंतरी लागले ध्यान । सर्वोत्तमाचे ॥

जयास घडीने घडी । लागे भगवंत आवडी ।
चढती वाढती गोडी । भगवद्जनाची ॥ "
(द. ११४ स ३ ओ. २२-२३)

त्याला इहलोकीचे कनक-कांतादि ऐश्वर्य वमनप्राय वाटते आणि अंतःकरणात सर्वोत्तमाचे ध्यान लागून राहते. त्याला क्षणोक्षणी परमेश्वराविषयीची आवड उत्पन्न होते व भगवद्जनाची गोडी चढत्या प्रमाणात वाढत जाते.

अशाप्रकारे समर्थांच्या मते काव्यामधून आपल्या अंतःकरणाला भगवंताविषयीची ओढ निर्माण झाली पाहिजे. विरक्तीची प्रेरणा मनात उत्पन्न झाली पाहिजे. हे श्रेष्ठ काव्याचे लक्षण समर्थ मानतात. थोडक्यात म्हणजे समर्थांच्या मते कवित्व निर्मळ, स्पष्ट, सोपे, सरळ व रसाळ असावे. ते अर्थप्रचुर, मृदु, मंजुळ, कोमल, भव्य, अद्भुत, विशाल, मधुर व भक्तिरसाने रसरसलेले असावे.

समर्थांचे काव्य–

समर्थांच्या काव्यात सर्वत्र भक्तिरस विपुल प्रमाणात प्रत्ययास येतो. त्यांची संपूर्ण करुणाष्टके भक्तिरसाने व परमेश्वराच्या प्रशंसेने भरलेली आहेत. या करुणाष्टकात करुणाघन–करुणासागर श्रीरामाला समर्थांनी अत्यंत विनम्र होऊन परोपरीने आळविले आहे.

'**तुजविण शीण होतो । धाव रे धाव आता**' या सारखी वचने वाचताना डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागतात.

समर्थांच्या मते काव्यात नरस्तुती मुळीच नसावी. मात्र शिवाजी महाराजांना त्यांनी लिहिलेल्या पत्रात शिवाजी महाराजांची स्तुती आढळते–

" या भूमंडळाच्या ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र धर्म राहिला काही । तुम्हा करितां ।। "

तसेच शंभूराजाला लिहिलेल्या पत्रातूनही शिवाजी महाराजांविषयीची प्रशंसा प्रकट झाली आहे. अर्थात अशाप्रकारे शिवाजी राजांची

प्रशंसा करून समर्थांनी नरस्तुतीचा वाङ्मयीन संकेत मोडला असला तरी कुठल्याही स्वार्थाने प्रेरित होऊन त्यांनी तसे केले नाही. त्यांच्या-समोर त्यावेळी शिवाजी हा एक राजा नव्हता तर 'हे तो श्रींचे राज्य' मानणारा एक राजयोगी वृत्तीचा महापुरुष उभा होता. त्याच्या चरित्र–चारित्र्याचे दर्शन काव्याद्वारे घडवून समाजापुढे अशा राजयोगी पुरुषाचा आदर्श ठेवावा; एक ध्येयवाद मांडावा असाच समर्थांचा सद्हेतू असला पाहिजे.

" जितुके काही आपणासी ठावे । तितुके हळुहळु सिकवावे ।
शाहाणे करून सोडावे । बहुत जन ॥ "

(द. १९. स. १० ओ. १४)

अशा प्रकारे साहित्याद्वारे लोकशिक्षणाचे कार्य व्हावे; समाजामध्ये ईश्वरभक्तीची सर्वत्र वाढ व्हावी हेच ते साहित्याचे प्रयोजन समजतात. यासंबंधी ते स्वतःच सांगतात–

" ऐसा माझा वाग्विलास । म्हणौन बोलतो सावकाश ।
भावाचा भोक्ता जगदीश । म्हणौनिया ॥ "

(द. १ स. ६ ओ. १६)

काव्य निर्मितीचे श्रेय परमेश्वराला–

संत तुकारामांप्रमाणेच समर्थही आपल्या काव्यनिर्मितीचे श्रेय परमेश्वराला देतात.

संत तुकाराम जसे म्हणतात की,–

" काय म्या पामरे बोलावी उत्तरे । मज विश्वंभरे बोलविले । "

किंवा,

" फोडिले भांडार । धन्याचा हा माल
मी तो हमाल । भार वाही ॥ "

त्याच प्रमाणे समर्थही सांगतात–

" भक्ताचेनी साभिमाने । कृपा केली दाशरथीने ।
समर्थ कृपेची वचने । तो हा दासबोध ॥ "

(द. २०–स. १० ओ. ३०)

" सकळ करणे जगदीशाचे। आणि कवित्व कार्य मनुष्याचे ।
ऐसा अप्रमाण बोलण्याचे। काय घ्यावे ॥ "

(द. २० स १० ओ. ३५)

भक्तांच्या उद्धाराच्या उत्कट तळमळीने श्रीराम प्रभूने कृपा केली म्हणूनच त्यांच्या कृपेची वचने एकत्र ग्रथित होऊन हा श्रीदासबोधग्रंथ तयार झाला. समर्थ पुढे स्पष्टच सांगतात की–

" सर्वत्र गोष्टींचा कर्ता परमेश्वर असताना केवळ काव्यनिर्मितीचे श्रेय स्वतःकडे घेण्यात काय अर्थ आहे ? "

समर्थांच्या विपुल साहित्य–संभारात जवळजवळ तीन चतुर्थांश भाग अध्यात्मपर आहे. त्यांनी आपल्या काव्यात शृंगाररसाला स्थान दिले नसले तरी त्याची सौंदर्यदृष्टी मात्र त्यांच्या काही काव्यातून प्रतीत होते. उदा० त्यांचा हा काव्यांश पहा–

" झिरपती झरती झरती झरे ।
न धरितां धरितां निर वावरे ।
बहुत पामळ बोध महीतळी ।
नमकुटे धुकटे कट पामळी ।
सुरस रम्य रसाळ वनांतरा ।
हरित रंग सुरंग दिसे बरा ।
दिसतसे रमणीय वसुंधरा ।
नुतन पल्लव हा तरू साजिरा ।
द्रुमलता समता द्रुण मातले ।
सुख मनी सुमनी मन रातले ।
परम सुंदर ते खग बोलती ।
गमतसे वसती कमळापती ॥ "

(ल. रा. पांगारकर श्रीसमर्थ ग्रंथ भांडार,
(१९७८), विविध प्रकरणे)

एकंदरीत, रामदासांच्या काव्याची भाषा वरवर पाहता लुसलुशीत वाटत नसली तरी ती ओजस्वी आहे. त्यांच्या अंत:करणातील लोकोद्धाराच्या उत्कट तळमळीमुळे व महाराष्ट्र राज्य आणि धर्माच्या आत्यंतिक अस्मितेमुळे त्यात प्रखरता जाणवते. थोडक्यात म्हणजे तळमळ आणि उत्कटता हेच समर्थ साहित्याचे प्रयोजन आहे. आणि तेच त्यांच्यामते इतरही साहित्यिकांच्या साहित्याचे प्रयोजन असावे. समर्थांचे साहित्य हे तत्कालीन महाराष्ट्राचे त्या काळातील एक प्रेरणास्रोत होते. अशाप्रकारे समर्थांच्या साहित्याला तत्कालीन महाराष्ट्राचे प्रेरणास्रोत म्हणून मान मिळाला असला तरी, आजही बुद्धिजीवी वर्गामध्ये त्याचे महत्व कमी झाले नाही.

तुकडोजी महाराज आणि साहित्य–

विनोबाजींच्या मते–विज्ञान आणि आत्मज्ञान याहून श्रेष्ठ अशी जगाची जडण–घडण करणारी शक्ती म्हणजे साहित्य होय. साहित्य ही एक संयोजक शक्ती आहे. ती विज्ञान आणि आत्मज्ञान यांचा संयोग करते. साहित्य ही सरस्वतीची साक्षात वाणीच असते. ही पवित्र वाणी लोकांच्या अंत:करणातील पाप धुवून त्याला निर्मळ करते. जगाचे पोषण करण्याचे व जीवनाला सतत सोबत करण्याचे सामर्थ्य एकटचा साहित्यातच आहे. चांगल्या साहित्यामुळे चित्ताची शुद्धी होते. समाजाला वळण लागते. महाराष्ट्रातील संतकवींच्या साहित्यात वरील सर्व गुण अंतर्भूत असल्याचा निर्वाळा तुकडोजो महाराज आपल्या ग्रामगीतेतील ओवीतून देतात–

"महाराष्ट्रो संत–कवि–परंपरा । तैसाचि चरित्र–ग्रंथांचा पसारा ।
वळणो लावावया समाज सारा । ग्रंथ लिहिले बहुतांनी ॥"

(अ. ४० ओ. ४५)

समाज जीवनावर नेहमी रुढी–परंपरांचा प्रबळ पगडा असतो. अशावेळी कालोचित मार्गदर्शन करून अनिष्ट रुढी–परंपरांच्या विळख्यातून समाजाला मुक्त करण्याची जबाबदारी साहित्यिकांवरच येऊन पडते. तेव्हा ही जबाबदारी समर्थपणे पार पाडण्यासाठी साहित्यिकांनी सदैव सिद्ध असण्याची आवश्यकता तुकडोजी महाराज प्रतिपादन करतात–

"समाज झाला रुढिबद्ध । तेथे सांगावे सिद्धान्त शुध्द ।
समाज कार्यही करावे विशद । वेळ पडेल त्यापरी ॥"
(अ. ३० ओ. २८)

महाराजांची साहित्यसेवा ही अशाच प्रकारची होती. त्या सद्हेतूनेच महाराजांची साहित्यनिर्मिती झाली आहे. जवळ-जवळ अर्ध-शतकाच्या वर हिंदी-मराठी भजनांची व भाषणांची पुस्तके लिहून त्याद्वारे समाजावर सुसंस्कार करण्याचे व त्याला नीट वळण लावण्याचे महद्कार्य महाराजांनी केले आहे. ग्रामगीता हा त्यांचा ग्रंथ तर तुकोबांची अभंगगाथा आणि रामदासांच्या दासबोधासारखा आज महत्वाचा मानला जात आहे. त्यांची ही साहित्य सेवा लक्षात घेऊन महाराजांच्या साहित्याचे संपादक श्री सुदामजी सावरकर म्हणतात-

"महाराजांची साहित्यसेवा ही 'स्वान्तसुखाय' किंवा मनोविनोदाय' अशीच नसून ती प्रामुख्याने 'बहुजन-हितायही' आहे. ती तपोभूमि किंवा पुष्पवाटिकाच नव्हे, तर बहरलेली लोकोपयोगी फळबागही आहे." (राष्ट्रसंत श्री तुकडोजी, व्यक्तित्व आणि कर्तृत्व-ले. सुदाम सावरकर पृष्ठ ४४)

शब्दशक्ती हे साहित्याचे वाहन-

समर्थांप्रमाणेच महाराजही शब्द व शब्दशक्तीचे महत्व मानतात. शब्द व शब्दशक्ती हे साहित्याचे वाहन आहे. म्हणून या वाहनांचा वापर काळजीपूर्वक करणे हे साहित्यिकाचे कर्तव्य ठरते. साहित्यिकांच्या वाणीचे व लेखणीचे महत्व विशद करतांना महाराज लिहितात-

"साहित्यिकांची वाणी आणि लेखणी मनात आणेल तर हलाहल-विष-ओतून समाजाचा सत्यानाश करू शकेल आणि योग्य मार्गाने पाऊल टाकील तर अमृतसंजीवनी प्रमाणे स्मशानातसुद्धा नंदनवन निर्माण करू शकेल" (श्रीगुरुदेव मासिक, मे १९५३ पृ. ८) त्यांच्या मते-**साहित्यिक हा समाजाचा प्रतिनिधी, समाजाला मार्गदर्शन करणारा वाटाडया व जनतेची शक्ती जागृत करून नवे जग आकारास आणणारा शब्दसृष्टीचा ईश्वरच होय.** साहित्याचे सामर्थ्य म्हणजे शब्दाचे सामर्थ्य. हे सामर्थ्य ओळखूनच समर्थ व महाराज या दोनही संतांनी आपली साहित्य-निर्मिती

केली आहे. जगात उलथापालथ घडवून आणण्याचे व मृतातही चैतन्य ओतण्याचे सामर्थ्य शब्दांत असते या जाणिवेतूनच त्यांची साहित्यसृष्टी साकारली आहे. शब्दशक्तीची जाणीव संत तुकाराम महाराजांनाही होती. शब्दशक्ती संबंधी सांगताना ते म्हणतात–

"आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दाचीच यत्ने शस्त्र करू ।
शब्दचि अमुच्या जीवाचे जीवन । शब्द वाटू धन जन लोका ।
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव । शब्देचि गौरव पूजा करू ।।"

तुकडोजी महाराजांनांही आपल्या शब्दशक्तीविषयी असाच आत्मविश्वास होता. त्या आत्मविश्वासानेच ते म्हणतात–

"मैं शब्दकी खैरात हूँ । सब शब्द मेरे पास है ।
मुर्दे जगा दूं शब्दसे । होता अशुभका नाश है ।।"
(लहरकी बरखा भाग-२ पृ. ११६)

महाराजांच्या शब्दात प्राण आहे, बाणेदारपणा आहे. तेज आहे, ओज आहे. आणि म्हणूनच त्यांचे संपूर्ण साहित्य हृदयस्पर्शी, ओजस्वी आणि तेजस्वी झाले आहे. तथापि, अशा समर्थ साहित्याचे श्रेय ते स्वत:कडे घेत नाही. समर्थांनी जसे श्रेय परमेश्वराला दिले आहे तसे महाराज आपल्या साहित्यनिर्मितीचे श्रेय आपल्या गुरुंना आडकोजी महाराजांना देतात.

"गुरुदेव सद्गुरु आडकोजीने, कृपासिंचन किया ।
तुमभी भजन लिखते रहो, आशिष यह मुझको दिया ।
तबसे भजन–लेखन बढा, इस हाथसे सम्हले नहीं ।
गंगा प्रवाहित वाक्यरचना, सहजही होती गयी ।।"
(मेरी जीवन यात्रा–तुकडोजी–पृ. ८५)

साहित्याला सत्याचे अधिष्ठान असावे–

महाराजांच्या मते साहित्याला सत्याचे अधिष्ठान असावे; त्यात खोट्या गोष्टींना वाव नसावा. हा आपला साहित्यविषयक दृष्टिकोण ते स्वत:च्याच साक्षीने सांगतात–

"हूँ तो कवी पर हूँ अशास्त्री, भावभक्तिही से भरा।
अक्षर कहाँ भूले हो पर, झूठा नही अंतर मेरा।
है लक्ष मेरा सत्य, उसका नृत्य करता हूँ सदा।
गाता और लिखता-बोलता, होता न गुरुपद से जुदा॥"
(लहरकी बरखा भाग-२ पृ. २२१)

अशाप्रकारे आपला स्वानुभव कथन करीत असतानाच ते इतर कवीनांही स्पष्ट इशारा देतांना म्हणतात-

"हर आदमीही है कवी। जीवन बनाना काव्य से।
जैसी निगा वैसेहि वे। हो सव्य से अपसव्य से।
संसारही है काव्य यह। देखो, सुनो, करते रहो।
आसक्ति मत रखना कवी। सहते रहो, बहते रहो॥"
(लहरकी बरखा भाग-२ पृ. २२२)

अफाट जनसागर हाच आपला साहित्य क्षेत्रातील गुरु होय. असे सांगताना तुमसर येथील विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाच्या उद्घाटन-प्रसंगी महाराज म्हणाले होते-

"मी साहित्य पुस्तकातून शिकलो नाही, अफाट जनसागरातून, हृदयाच्या गाभ्यातून, आंतरिक उचंबळीतून मी साहित्य शिकलो. साहित्याची कल्पना ह्या जनसागरात मिळाली."
(श्रीगुरुदेव मासिक-फेब्रु. १९५६ पृ. ९)

साहित्यिकांकडून अपेक्षा-

माणसा-माणसातील दूरावा दूर करून माणूस घडविण्याचे प्रचंड सामर्थ्य साहित्यात आहे. प्रसंगी पारतंत्र्याच्या बेड्याही तडातड तोडून फेकून दिल्याचे अचाट सामर्थ्य त्याने दाखविले आहे. तेव्हा अशा सामर्थ्यसंपन्न साहित्य प्रसरविणाऱ्या साहित्यिकाने समाजजीवनातील कुजट कल्पनांचा विध्वंस केला पाहिजे आणि दंभस्फोट करून समाजाला सावध केले पाहिजे. माणसा-माणसात जवळिक निर्माण करणारी जीवनमूल्ये साहित्याच्या माध्यमातून प्रस्थापित व्हावीत व माणसाला मंगलमय जीवनाचे दर्शन घडावे या हेतूने महाराज म्हणतात-

" माणसाला मानव करावयाचे आहे, त्याला दानव व्हावयाचे नाही. माणसाला माणूस करावयाचे आहे, 'कणूस' नाही. त्याला सर्व जीवनाचे मनोहर हृदयंगम दर्शन घडवायचे आहे. त्यातले मांगल्य, त्यातले अभिजात सौंदर्य, त्यातले सारे वर्म, सारे मर्म, अनुभवायचे ज्ञान त्याला द्यायचे आहे. हे कार्य एक सतीचे वाण आहे, एक दिव्य आहे. हे दिव्य साहित्यिकांनी करायला हवे आहे."

('हितबोध' सं. अ. ना. देशपांडे पृ. ७२)

त्यांच्यामते–साहित्य हे उभयविध स्वरुपाचे आहे. जसा उपयोग कराल तसा उपयोग होतो. त्यांनी साहित्याला " विस्तवाची " समर्पक उपमा दिलेली आहे. विस्तव अन्नही शिजविते आणि विडीही पेटविते. परंतु " विडी शिलगवून कुठेही जळते–थोटूक फेकून आगी लावणे हा त्याचा उपयोग नव्हे. "

(हितबोध सं. अ. ना. देशपांडे पृ. ७२)

एकंदरीत, साहित्याची उभयविध स्वरुपाची क्षमता लक्षात घेऊन त्याचा योग्य उपयोग होणे आवश्यक असल्याचे महाराज प्रतिपादन करतात. साहित्याचा दुरुपयोग झाला किंवा साहित्यशक्ती वायफळ उपयोगात येऊ लागली तर समाजाला नीट वळण लागण्याऐवजी विकृत वळण लागण्याची शक्यताही ते बोलून दाखवितात. अर्थात समाजाला विकृत वळण लावणारे साहित्य हे क्षणजीवी स्वरूपाचे असते; ते दीर्घ-काळ टिकू शकत नाही; उलट ज्ञानेश्वरी, अभंगगाथा, भागवत, दासबोध, ग्रामगीता असल्या प्रकारचे संत साहित्य हे अक्षर–वाङमय ठरते. आजही या संतसाहित्यातील वचने मराठी माणसांच्या मनीमुखी घोळत आहेत. म्हणून असले अव्वल दर्जाचे साहित्य निर्माण करण्याचे आवाहन करीत असताना महाराज म्हणतात–

" साहित्य झब्बूसाठी, दीनदुबळ्यांच्या झोपड्या चिरडण्यासाठी नाही. जगाला जागविण्यासाठी, जगाच्या निरीक्षणासाठी, जगाच्या विशालतेत विलीन होण्याचे शिक्षण घेण्यासाठी साहित्य आहे. साहित्याने भरारभर उडचा मारत वा अंतराळातून उडत जायला नको. अशा तकलादू

क्षणजीवी साहित्याचे भवितव्य विनाशाकडे वळणारे असते. असे साहित्य जिवंत राहात नाही. त्याचा उपयोग होत नाही. परिणामकारकता त्यात उरत नाही. "

(' हितबोध ' सं. अ. ना. देशपांडे पृ. ७३)

एकंदरीत, महाराजांच्या मते साहित्य हे समाज जीवनाचे महत्वपूर्ण अंग आहे. जीवनाला योग्य वळण देऊन त्याची सतत सोबत करण्याची क्षमता त्याच्यात असते. म्हणूनच त्याची समाजजीवनापासून फारकत करता येत नाही. साहित्य हे स्वयं गंगाजळासारखे निर्मळ असले की, त्याच्यात दुसऱ्यालाही निर्मळ करण्याचे सामर्थ्य आपोआपच येते. मनोरंजनार्थ किंवा उदरनिर्वाहार्थ निर्माण होणारे साहित्य हे जास्त काळ टिकत नाही. आणि म्हणून समाजजीवनाला आधार देणारे; पोषक ठरणारे, दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करणारे, प्रसंगी प्रेरणा देणारे आणि अज्ञजनांच्या उन्नतीचा मार्ग शोधणारे साहित्य हेच खरे साहित्य होय असे साहित्याविषयीचे महाराजांचे स्पष्ट मत होते.

समर्थ रामदास आणि तुकडोजी महाराज यांचे साहित्य अशा सद्विचार प्रेरणेतून निर्माण झाले आहे. त्यांचे साहित्य अध्यात्म-अनुभवाच्या समृद्धीतून साकार झाले असले, तरी दोघांच्याही साहित्यातील समाजाभिमुखता आणि त्यातील व्यावहारिक तत्त्वज्ञान समाजाला सदैव मार्गदर्शन करीत राहील यात शंका वाटत नाही. आता या दोनही संतांच्या साहित्याचे तौलनिक मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करू या.

संतद्वयाच्या साहित्याचे तौलनिक मूल्यमापन–

समर्थ रामदास व तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रात अवतरलेले श्रेष्ठ दर्जाचे संतकवी होते. आपापल्या काळात त्यांनी साहित्याच्या माध्यमातून समाजजीवनाला उजाळा देण्याचे, लोकशिक्षणाचे, लोकसुधारणेचे व लोकहिताचे अलौकिक कार्य केले आहे. या दोनही संतांची भाषा काळाचे अफाट अंतर असूनही बरीचशी मिळती-जुळती आहे. या दोन्ही संतांनी मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषेतून साहित्य निर्मिती केली. समर्थांचा दासबोध आणि तुकडोजी महाराजांची ' ग्रामगीता ' या

दोन्ही ग्रंथांना त्यातील भावार्थामुळे बरीच लोकप्रियता प्राप्त झाली. समर्थांनी 'माया' वर केलेले चंचळ नदीचे रूपक अतिशय मार्मिक आहे; तद्वत्च तुकडोजी महाराजांचे साहित्यही नावाविध अलंकाराच्या खैरातीने खुललेले आहे. अनेकविध अलंकारांच्या अचूक योजनेने त्यांचे साहित्य सालंकृत झाले आहे. काही उदाहरणे पहा–

"सूर्य जैसा नभी उगवला । अंधःकाराचा नाश झाला ।
तैसा तू हृदयी प्रकटला । जीव झाला विश्वव्यापी ॥"
(ग्रा. अ. १ ओ. २१)

त्यांच्या 'स्फूर्तितरंग' पुस्तकातील उपमा अलंकाराचे आणखी एक उदाहरण पहा–

"सत्यज्ञान प्रकटता, पळती षड्रिपु विकार अंतरीचे ।
जैसे भानु–उजेडे, तम नाशे चोर लुप्त भूवरिचे ॥"

समर्थांची काही वचने जशी सुभाषितासारखी सहज स्मरणीय झाली आहेत. उदा०–

"केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे"
"मना त्वाचिरे पूर्व संचित केले ।
तया सारिखे भोगणे प्राप्त झाले ॥"
किंवा
"सदा सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ॥"

तद्वत्च, तुकडोजी महाराजांची काही वचने लोकांच्या सहज तोंडी बसलेली आहेत.

उदा०:–

"धन हे गरिबाचे रक्त । समजोनि वागोत श्रीमंत ।"
"मंदिरी बसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गिचे काटे उचलावे ।"
"हाती उद्योगाचे साधन । मुखी रामनामाचे चिंतन ॥"

दोघांच्याही वाङ्मयीन गुणांनीयुक्त व सद्विचारप्रेरक साहित्यामुळे समाजाच्या राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उन्नतीला वरीच मदत झालेली आहे. तथापि या दोन्ही संतांनी आपल्या थोर साहित्य-निर्मितीचे श्रेय स्वत:कडे घेतले नाही. दोघांच्याही अंत:करणामध्ये असलेला भक्तीचा उमाळा त्यांनी देवाचे स्तुतिगान करण्यासाठी तर उपयोगात आणला आहेच, परंतु त्याचवरोवर त्यांच्या भक्तीपर साहित्यातून समाजपरिवर्तनाची नवी दिशाही दर्शविली गेली आहे. अर्थात हे समाज-परिवर्तनाचे कार्य समर्थांपेक्षा महाराजांच्या साहित्यातून अधिक प्रमाणात प्रत्ययास येते. या दोन्ही संतकवींच्या साहित्यात कल्पनेच्या भराऱ्या नसून वास्तवतेचे यथार्थ दर्शन आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्याला सजीवता आली आहे.

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. म. माटे समर्थांच्या भाषेसंबंधी म्हणतात–

"रामदासांच्या रांगड्या भाषेची फेकाफेक 'आनंदवन' या काव्यात केवळ कळसाला पोचली आहे. वाचकाच्या मनाला एक तऱ्हेचा उन्माद चढावा अशीच या काव्याची रचना आहे. त्यातील नुसत्या ध्वनीनेसुद्धा वाचकाला आवेश चढतो आणि आपण एखाद्या मोठ्या आक्रमक कार्यप्रसंगात गुतलो आहोत किंवा तसा प्रसंग आपण प्रत्यक्ष पाहत आहोत असेच वाचकाला वाटू लागते."

(श्री रामदास स्वामींचे प्रपंचविज्ञान पुष्ठ १९४ ले. श्री. म. माटे)

समर्थांप्रमाणेच तुकडोजींच्याही साहित्यात सूक्ष्मता आणि वर्णनांचा बारीकसारीक तपशील प्रत्ययास येत असला तरी तुकडोजींच्या साहित्यात समर्थांच्या तुलनेत त्याचे प्रमाण एकूण कमीच म्हणावे लागेल. तसेच समर्थांच्या साहित्यातील पाल्हाळ व पुनरावृत्ती देखील महाराजांच्या लिखाणात तेवढ्या प्रमाणात आढळत नाही. मात्र समर्थांच्या भाषेचा रांगडेपणा महाराजांच्याही लिखाणात थोड्याफार प्रमाणात जाणवतो.

पारतंत्र्याच्या काळात पुरुषार्थ जागृतीचे, क्रांतिकार्य दोघांच्याही स्फूर्तिदायी साहित्याने केले आहे. या दोन्ही संतांच्या क्रांतिदर्शी दृष्टीने कालानुरूप जीवनाच्या सर्वक्षेत्रांचा वेध घेतला. या दोघांचेही साहित्य वाचत असताना त्यातून "येथे प्रचीतीचे बोलिले" असा सुखद अनुभव येतो.

या दोन्ही संतकवींचे साहित्य म्हणजे भारताचे अमोल संस्कारधन आहे. ते एक प्रकारचे प्रेरणास्रोत आहे. संपूर्ण समाजजीवनविषयक सरस व सुरस सारबोध या संतद्वय–साहित्यातून साकार झालेला आहे. या दोन्ही संतांच्या साहित्यसंगीतातून समाजनिष्ठ जीवनाचे सूर स्त्रवताना दिसत असले, तरी महाराजांच्या तुलनेत समर्थांच्या सूरांमध्ये वर्णाश्रम विचारांसारख्या काही वाबी बऱ्याच संकुचित स्वरूपाच्या जाणवतात. तथापि, आपापल्या काळातील समाजजीवनाची अध:पतित व अनुकंपनीय अवस्था सहृदयतेने वर्णन करून या दोनही क्रांतदर्शी कवींनी मानवातील अस्मितेला आवाहन केले आहे. त्यांच्या चिंतनातून व विचारमंथनातून उस्फूर्तपणे उतरलेले शब्दांकण सुवर्णस्वरूप होऊन त्यांच्या साहित्यसृष्टीत साकारले आहेत.

समर्थांची ग्रंथरचना विपुल आहे. श्री दासबोध, मनाचे श्लोक, आत्माराम हे त्यांचे प्रमुख ग्रंथ होत. त्याशिवाय करुणाष्टके, अभंग, पदे, आरत्या, मानपंचके, लळिते इत्यादी प्रकारही त्यांनी केले आहेत.

समर्थ रामदासांचे प्रकाशित साहित्य

(१) दासबोध (२) मनाचे श्लोक (३) करुणाष्टके (४) जुना दासबोध, (५) आत्माराम, (६) रामायण (७) ओव्या, चौदा शतक (८) स्फुट ओव्या (९) षड्रिपु (१०) पंचीकरण योग (११) चतुर्थमान (१२) मानपंचक (१३) पंचमान (१४) स्फुट श्लोक.

संत तुकडोजींची ग्रंथरचनाही विपुल आहे. ती खालील प्रमाणे–

संत तुकडोजी महाराजांचे प्रकाशित साहित्य

मराठी

(१) ग्रामगीता ओवीबद्ध ग्रंथ (२) अनुभव सागर भजनावली भाग १ (३) अनुभव सागर भजनावली भाग २ (४) जीवन जागृति भजनावली (५) लोकशाहीचे पोवाडे (६) समाज–संजीवनी भजनावली (७) दिव्यदर्शन भजनावली (८) क्रांतिवीणा भजनावली (९) नव–जागृति भजनावली (१०) विवेक–माधुरी (११) राष्ट्रीय भजनावली

(१२) अरुणोदय भजनावली (१३) भक्तिकुंज भजनावली (१४) आदेश रचना (१५) अनुभवामृत अभंगावली भाग १ व २. (१६) आत्मविकास अभंगावली (१७) माझी आत्मकथा अभंगावली (१८) स्फूर्ति तरंग (१९) सुविचार–स्मरणी (२०) आनंदामृत ओवी-बद्ध ग्रंथ (२१) श्रीगुरुदेव विवाहपद्धती (२२) गीताप्रसाद लेखसंग्रह (२३) युगप्रभात लेखसंग्रह (२४) विश्वशांतियोग लेखसंग्रह (२५) राष्ट्र-संतांची प्रवचने (२६) राष्ट्रसंतांची पत्रे (२७) राष्ट्रसंतांची भाषणे (२८) दारुबंदी भजनावली.

हिन्दी

(१) अनुभव प्रकाश भजनावली भाग १ (२) अनुभव प्रकाश भजनावली भाग २ (३) अनुभव प्रसाद भजनावली (४) स्वानुभवामृत (५) लहरकी बरखा भाग १ (६) लहरकी बरखा भाग २ (७) मेरी जीवन यात्रा (८) गांधी गीतांजली भजनावली (९) विवेक–सरिता भजनावली (१०) जीवन ज्योति भजनावली (११) राष्ट्रीय भजनावली (१२) क्रांति–दीप भजनावली (१३) सुधा-सिंधु भजनावली (१४) ज्ञान-दीप भजनावली (१५) राष्ट्र–नौका भजनावली (१६) आत्मप्रभा भजनावली हिंदी–मराठी (१७) वाचा–वल्ली भजनावली (१८) भजन-कुंज भजनावली (१९) भक्ती–सुधा भजनावली (२०) सद्विचार प्रवाह (२१) ज्ञान–कुंज मराठी–हिन्दी (२२) विद्या–पुष्प (२३) श्रीसंत गजानन महाराज स्तवनांजलि हिन्दी मराठी (२४) सामुदायिक–प्रार्थना पाठ और चुने भजन (२५) अमृतांजली भजनावली (२६) मेरी जापान यात्रा (२७) भारत साधू समाजकी सेवा–साधना (२८) सेवा स्वधर्म.

महाराष्ट्रातील या दोनही संतांच्या प्रस्तुत प्रकाशित साहित्यांमध्ये समर्थांचा 'दासबोध' व राष्ट्रसंतांची 'ग्रामगीता' हे दोन ग्रंथ प्रमुख आहेत. त्यांचा परामर्श पुढील प्रकरणी घेऊ या.

—

दासबोध आणि ग्रामगीता

दासबोध–

दासबोध हा ग्रंथ दासांनी म्हणजे रामाच्या दासांनी अर्थात रामदासांनी–आपल्या अनुयायांना केलेला बोध होय. श्रीरामचंद्र प्रभूंवर त्यांची अनन्यसाधारण निष्ठा होती; त्यांच्याविषयी अंतःकरणात अत्यंत उत्कट भक्ती होती. श्रीरामचंद्रप्रभूपासून रामदासांना जो आत्मबोध झाला त्या आत्मबोधाचाच आविष्कार त्यांनी 'दासबोधा'तून केलेला आहे. हा दासबोध ग्रंथ भगवद्गीतेप्रमाणेच संवादात्मक आहे.

ग्रंथाच्या सुरवातीसच हा संवाद आलेला आहे. पहा–

"श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिले जी येथ ।
श्रवण केलियाने प्राप्त । काय आहे ॥"

(द. १, स. १ ओ. १)

श्रोत्यांच्या प्रस्तुत प्रश्नाला उत्तर देताना समर्थ सांगतात–

"ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।
येथे बोलिला विशद । भक्ति मार्ग ॥"

(द. १ स. १ ओ. २)

तसेच दासबोधाच्या प्रत्येक समासाच्या शेवटी 'इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे' असा उल्लेख आढळतो. यावरून हा दासबोध ग्रंथ गुरूशिष्य संवादात्मक आहे याविषयी कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. तथापि, कृष्णार्जुनाच्या संवादाप्रमाणे या ग्रंथात गुरुशिष्यांच्या संवादात सातत्य व संगती आढळत नाही. एवढे मात्र खरे कीं, आपला श्रोतृवृंद समोर बसला आहे असे समजूनच समर्थांनी दासबोधाचे लेखन केले आहे असे दिसते. या दासबोधात समर्थांनी प्रामुख्याने खालील चतुःसूत्रीचे विस्तृत विवेचन सहज समजेल अशा भाषेतून केलेले आहे. ही चतुःसूत्री म्हणजे १) हरिकथा निरुपण. २) राजकारण. ३) सर्वांविषयी सावधपण आणि ४) अत्यंत साक्षेप म्हणजे अविश्रान्त प्रयत्न होय.

'मुख्य हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्व विषई ॥"

(द. ११ स. ५ ओ. ४)

'चवथा अत्यंत साक्षेप' (द. ११ स. ५ ओ. ५)

दासबोधातील समर्थांनी सांगितलेली प्रस्तुत चतुःसूत्री म्हणजे सुखी, संपन्न, समर्थ व सफल जीवनाची गुरुकिल्लीच होय.

समर्थांच्या सर्व ग्रंथांमध्ये 'दासबोध' हा ग्रंथ प्रमुख आहे. या दासबोधात एकूण २० दशक असून प्रत्येक दशकात साधारणतः १० समास अंतर्भूत आहेत. सार्थ श्री दासबोधाच्या प्रस्तावनेत श्री. ना. रा. पांगारकरांनी म्हटल्या प्रमाणे 'प्रत्येक समास म्हणजे एक स्वतंत्र व्याख्यान आहे. आणि २०० समासांचा दासबोध म्हणजे २०० व्याख्यानांचा एक संग्रह आहे.' या वीसही दशकातील एकूण २०० समासांमध्ये समर्थांनी विविध विषयांचे प्रतिपादन केलेले आहे. माया आणि ब्रम्ह, प्रपंच आणि परमार्थ, सृष्टीची उभारणी आणि संहारणी, कुविद्या आणि सद्विद्या, करंटे आणि सदैव, बंध आणि मोक्ष, संसार आणि सायुज्य-मुक्तीचे स्वरूप, नवविधाभक्ति आणि चतुर्विधा मुक्ति, सद्गुरू आणि असद्गुरू, सच्छिष्य आणि असच्छिष्य, विवेक वैराग्य, महंत लक्षण, निःस्पृह लक्षण, कविकाव्य लक्षण, इत्यादी अनेकविध विषयांचे विवरण दासबोधात आले आहे. या विविध विषयांच्या विवरणामुळेच वि. पा. दांडेकराना त्याला 'ज्ञानसिंधु' म्हणावेसे वाटते'

(मराठी साहित्याची रूपरेखा पृष्ठ ११९)

ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकोबाचे अभंग, यांना मराठी भाषेतील वेद मानण्यात येतात. या तीन श्रेष्ठ संत-काव्य-ग्रंथांमध्ये 'दासबोधा' चाही समावेश करून समर्थ संप्रदायी त्याला वेदतुल्य मानतात. या सर्व ग्रंथांतून समाजाला ज्ञानभक्तीचा सुलभ मार्ग सांगितल्या गेला आहे. या बाबतीत 'साधु दिसती वेगळाले । परि ते स्वरुपी मिळाले' या समर्थ वचनाचा प्रत्यय येतो. त्या सर्व ग्रंथातील अध्यात्म निरूपण सामान्यतः समान असले तरी प्रत्येक ग्रंथाचे

आगळे–वेगळे वैशिष्टय निश्चितच आहे. अर्थात हे वैशिष्टय प्रामुख्याने देशकालपरत्वे व प्रकृती धर्मानुसारच म्हटले पाहिजे.

श्रीमत् दासबोधातील आपल्या निरूपणाच्या माध्यमातून समर्थांनी जणु आपल्या व्यक्तिमत्वाचेच दर्शन घडविले आहे. या दृष्टीने 'दासबोध' म्हणजे समर्थांचा 'चरित्र–ग्रंथ' च समजण्यात येतो. आपल्या सर्व आप्तजनांच्या मायापाशातून आणि प्रपंचाच्या जंजाळातून मुक्त होण्यासाठी समर्थ अवघ्या बाराव्या वर्षी बोहल्यावरून पळून जातात याचे प्रतिबिंब त्यांच्या खालील ओवीत उमटले आहे.

" देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावे सेवटी । प्राण तोहि वेचावा ॥ "
(द. स. ८ ओ. ८)

परमेश्वर–प्रभु रामचंद्र–यांच्या सख्यत्वासाठीच त्यांनी आप्तजनांचा व घरादाराचा त्याग केलेला दिसतो. त्यांनी स्वतः जरी बायको-पोराचा प्रपंच केला नसला, तरी लोकांना मात्र 'प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणे तुम्ही कष्टी व्हाल ।' असे त्यांनी स्पष्टच सांगितले आहे. तसेच त्यांचा वेष आणि त्यांची गुण–वैशिष्टये पाहिलीत, तर त्यांनीच म्हटल्या प्रमाणे–'वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा' असा सहजच प्रत्यय येतो. दासबोधातील 'निःस्पृह लक्षणे' म्हणजे समर्थांचीच लक्षणे असावीत इतके त्यातील साम्य जाणवते. यावरून 'दासबोध' म्हणजे समर्थांच्या जीवनानुभूतीचा व व्यक्तिमत्वांचा उत्कट आविष्कारच होय असे म्हटले तरी चालेल. 'हे प्रचितीचे बोलिले । आधी केले मग सांगितले' अशी साक्ष स्वतः समर्थच दासबोधात देतात.

समर्थांचा 'दासबोध' म्हणजे जसे त्यांचे आत्मचरित्र आहे तसेच ते एक अमोल असे सामाजिक प्रबोधन आहे. अर्थात या प्रबोधनात कालपरत्वे वर्णभेदासारखे संकुचित स्वरुपाचे विचार अंतर्भुत असल्याने व ब्राम्हणांचे अवास्तव आणि अतिशयोक्तीपूर्ण स्तोम माजविल्याने हा ग्रंथ बऱ्याच अंशी बहुजन समाजाच्या रोषास पात्र ठरला असून समर्थ हे

ब्राम्हणधार्जिण्या वृत्तीचे व ब्राम्हणांचा अवास्तव उदोउदो करणारे होते अशी टीकाही करण्यात येते. तथापि, 'दासबोध' वाचताना वाचकानी आपली भूमिका गुणग्राहकतेची ठेवल्यास त्यातील वैगुण्याची विशेष तीव्रता जाणवणार नाही.

प्रस्तुत 'दासबोध' ग्रंथात समर्थांनी प्रामुख्याने लोकसंग्रहाची शिकवण देऊन प्रखर प्रयत्नवादाचा पुरस्कार केलेला आहे. त्यादृष्टीने दासबोध हा ग्रंथ 'पुरुषार्थाचा ग्रंथ' आहे असे मानले जाते. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे' हे त्यांचे दासबोधातील वचन तर सुभाषितासारखे सर्वतोमुखी झाले आहे.

समर्थांचा दासबोध म्हणजे त्यांच्याच वचनानुसार सद्गुरू-कृपा होय.

"भक्तांचे नि साभिमाने। कृपा केली दाशरथीने।
समर्थ कृपेची वचने। तो हा दासबोध॥"

(द. २०, स. १० ओ. ३०)

असे ते स्वत:च सांगतात. समर्थांचा दासबोध त्यातील काही वैगुण्ये वगळता महाराष्ट्राचे अमोल संस्कार धन आहे यात संशयच नाही. फार मोलाचे मार्गदर्शन त्यातून केल्या गेले आहे. हा ग्रंथ वाचण्यासंबंधी समर्थ सुचवितात की–

"जयास जोडला परमार्थ। तेणे पाहावा हा ग्रंथ।
अर्थ शोधिता परमार्थ। निश्चये बाणे॥"

(द. ७ स. १ ओ. ३०)

अर्थात हा ग्रंथ सर्वांनी वाचावा. एकदम जरी त्याचे आकलन झाले नाही तरी हळूहळू त्याचे आकलन होण्यास अवघड जाणार नाही असे ते म्हणतात–

"वीस दशक दोनीसे समास। साधके पाहावे सावकास।
विवरतां विशेषाविशेष। कळो लागे॥"

(द. २० स. १० ओळी ३२)

श्रीमत् दासबोधाची रचना इ. स. १६५९ मध्ये झाली असा समज आहे. त्यावेळी महाराष्ट्रात म्लेंच्छांचे राज्य होते. श्री शिवाजी महाराजांचा उदय झाला होता परंतु उत्कर्ष व्हावयाचा होता. अशा महाराष्ट्राच्या मरगळलेल्या स्थितीत या ग्रंथाने मार्गदर्शनाचे मौलिक कार्य केले आहे.

या संदर्भातील इतिहासाचार्य कै. राजवाडे यांचे विधान उल्लेखनीय आहे. ते म्हणतात–" शके १५५४ म्हणजे इ. स. १६३२ या साली नाशकातील पंचवटीस असताना, यवनांनी आक्रमलेल्या महाराष्ट्राचा उद्धार व सनातन धर्माची स्थापना करण्याचा संकल्प समर्थांनी केला होता. त्या संकल्पाचा मूर्तिमंत अवतार हा दासबोध ग्रंथ होय.

(ग्रंथमालेतील निबंध ' रामदास ' पान–९)

समाजाच्या अत्यंत अवनतीच्या काळात ऐहिक व पारमार्थिक दृष्टीने ' दासबोधा ' ने केलेला हितोपदेश निश्चितच बोधप्रद आहे. आबालवृद्धांनाही उपयुक्त ठरेल अशाप्रकारचे प्रबोधन त्यातून करण्यात आले आहे. या ग्रंथाची निर्मिती औटघटकेची नाही. त्याच्या निर्मितीला दीर्घकाळ लागला असणे संभवनीय आहे. त्यामुळेच तत्कालीन व्यापक अनुभूतीचा आविष्कार त्यात आढळतो. या ग्रंथातून त्यांनी समाजाला जशी परमार्थाची मुख्य शिकवण दिली तशीच व्यवहार चातुर्याचीही दिलेली आहे. ' व्यवहार न कळला ज्याला । परमार्थ कशाचा त्याला । ' अशी त्यांची स्पष्ट भूमिका आहे. समर्थांच्या दासबोधात ज्ञानेश्वरी किंवा तुकारामांच्या अभंगांसारखे काव्यात अभिप्रेत असलेले भावनात्मकता, भाषासौंदर्य इत्यादी गुण विशेष प्रमाणात आढळत नाहीत, म्हणून समर्थांना कवी संबोधण्यापेक्षा श्रेष्ठ ग्रथकारच संबोधणे काही लोक उचित समजतात. तथापि त्या ग्रंथातील विचारांची विशालता व विषयांची विविधता, एखाद्या महाकवीला साजेशीच आहे असे काही सूज्ञांचे मत आहे. अर्थात समर्थांच्या दासबोधात भाषेची ' सजावट ' आढळत नाही म्हणून त्यांचे कवित्व नाकारणे अन्यायकारक होईल कारण त्यांनीच सांगितल्या प्रमाणे–

" जेणे देहबुद्धि तुटे । जेणे भवसिंधु आटे ।
जेणे भगवंत प्रगटे । या नाव कवित्व ॥ "

अशी कवित्वाची व्याख्या जर मान्य केली तर त्यांचे कवित्वही निःसंशय मान्य होण्यासारखे आहे. ' दासबोध ' हा अध्यात्मशास्त्रावरील अवघड ग्रंथ आहे यात शंकाच नाही. अर्थात याची स्पष्ट जाणीव समर्थांनाही होती. म्हणून तो वाचण्यापूर्वी घ्यावयाच्या खबरदारीविषयी ते सांगतात–

" थांबा थांबा ऐका ऐका । आधींच ग्रंथ सोडू नका ।
सांगितले ते ऐका । सावधपणे । (द. १७ स. ३ ओ. १)
जयाचे चंचळ हृदय । तेणे ग्रंथ सोडूंचि नये ।
सोडितां अलभ्य होये । अर्थ येथीचा । (द. ७ स. १ ओ. २९)

असा इशारा देऊन ग्रंथ वाचण्याविषयी समर्थ स्पष्टच सांगतात की–

" चित्त सुचित्त करावे । बोलिले ते जीवी धरावे ।
सावध होऊनी बैसावे । निमिष्य एक ॥ "
(द. ६ स. १ ओ. १)

अशा प्रकारे प्रसन्न मनाने सावधानपूर्वक ग्रंथ वाचनास आरंभ करावा. घाईघाईने ग्रंथ वाचू नये. अर्थातच दासबोध हा केवळ पारायण करण्याचा ग्रंथ नव्हे. ग्रंथाच्या शेवटी समर्थ सांगतात–

" वीस दशक दासबोध । श्रवणाद्वारे घेतां शोध ।
मनन कर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥ "
(द. २० स. १० ओ. ३१)

समर्थ रामदास ' दासबोधा ' च्या रूपाने अमर झालेले आहेत. त्यांना आपल्या अंतकाळाची चाहूल लागताच चिंताग्रस्त भक्तगणाला धीर देण्याच्या दृष्टीने ते सांगतात–

" माझी काया माझी वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी ।
परि मी आहे जगज्जीवनी । निरंतर ॥ "
" आत्माराम दासबोध । माझे स्वरुप स्वतःसिद्ध ।
असता न करावा खेद । भक्तजनी ॥ "

भीमस्वामीनी समर्थांच्या अंतकाळच्या केलेल्या वर्णनात वरील ओव्या आलेल्या आहेत.

अशाप्रकारे आपला देह आता दिसणार नाही, आपली वाणीही कानाने ऐकता येणार नाही परंतु आपले स्वरूप मात्र दासबोधात स्वतःसिद्ध असल्याने प्रत्यक्ष मीच आपल्यात असल्याचा अनुभव खचितच येईल म्हणून माझ्या निर्याणाने उगीच खेद मानण्यात अर्थ नाही असे समर्थच आपल्या भक्तगणांचे सांत्वन करताना सुचवितात. एकंदरीत, समर्थ जरी देहरूपाने आपल्यातून गेले असले तरी त्यांच्या 'दासबोध' ग्रंथाने 'मरावे परि कितीरुपे उरावे' असे ते अमर झालेले आहेत.

ग्रामगीता–

तुकडोजी महाराजांची हिंदी–मराठीतील एकूण अर्धशतकाच्या वर पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यांची यादी यापूर्वीच्या प्रकरणात देण्यात आलेलीच आहे. या सर्व साहित्य-निर्मितीमध्ये त्यांचा 'ग्रामगीता' हा ग्रंथ प्रमुख मानला जातो. या ग्रामगीता ग्रंथामध्ये एकूण ४१ अध्याय असून त्यातील ओवीसंख्या ४६७५ आहे. प्रत्येक अध्यायाला त्यांनी खालीलप्रमाणे नावे दिलेली आहेत. **(१) देवदर्शन, (२) धर्माध्ययन, (३) आश्रमधर्म, (४) संसार-परमार्थ, (५) वर्ण-व्यवस्था, (६) संसर्ग-प्रभाव, (७) आचार प्राबल्य, (८) प्रचार महिमा, (९) सेवा-सामर्थ्य, (१०) संघटनशक्ती, (११) ग्रामरक्षण, (१२) ग्रामशुद्धी, (१३) ग्राम-निर्माण कला, (१४) ग्राम-आरोग्य, (१५) गोवंश-सुधार, (१६) वेष-वैभव, (१७) गरीबी-श्रीमंती, (१८) श्रम-संपत्ती, (१९) जीवनशिक्षण, (२०) महिलोन्नती, (२१) वैवाहिक जीवन, (२२) जीवन संस्कार, (२३) सणोत्सव, (२४) यात्रा-मेळे, (२५) देव-देवळे, (२६) मूर्ति उपासना, (२७) सामुदायिक प्रार्थना, (२८) प्रार्थना व विश्वधर्म, (२९) दलित सेवा, (३०) भजन प्रभाव, (३१) संत-चमत्कार, (३२) संत स्वरुप, (३३) अवतार कार्य, (३४) प्रारब्धवाद, (३५) प्रयत्नप्रभाव, (३६) जीवनकला, (३७) आत्मानुभव, (३८) ग्राम-कुटुंब, (३९) भूवैकुंठ, (४०) ग्रंथाध्ययन** आणि **(४१) ग्रंथमहिमा.**

प्रत्येकी पहिल्या पाच अध्यायांचे एक पंचक केले असून शेवटच्या आठव्या पंचकामध्ये सहा अध्यायांचा अंतर्भाव केलेला आहे. त्या पंचकांना अध्यायातील विवरणांप्रमाणे वेगवेगळी नावे दिलेली आहेत. ती अशी–

(१) सद्धर्ममंथन पंचक, (२) लोकवशीकरण पंचक, (३) ग्राम-निर्माण पंचक, (४) दृष्टिपरिवर्तन पंचक, (५) संस्कारशोधन पंचक, (६) प्रेमधर्मस्थापन पंचक, (७) देवत्वसाधन पंचक आणि शेवटचे (८ वे) आदर्श जीवन पंचक.

वरील विविध विषयांच्या विस्तारावरून ग्रामगीता ग्रंथाचा व्याप सहजच लक्षात येतो. ग्रामगीतेच्या अगदी आरंभी महाराजांनी 'अर्पण-पत्रिका' दिलेली असून ती ग्रामनाथाला अर्पण केलेली आहे. या अर्पण-पत्रिकेच्या आरंभीच महाराज ग्रामनाथाला उद्देशून म्हणतात–

"सर्व ग्रामासि सुखी करावे । अन्न-वस्त्र पात्रादि द्यावे ।
परि स्वतः दुःखचि भोगावे । भूषण तुझे ग्रामनाथा ॥
कष्ट करोनि महाल बांधसी । परि झोपडीहि नाही नेटकीशी ।
स्वातंत्र्या करिता उडी घेशी । मजा भोगती इतरचि ॥
ऐशा भोळ्या शंकरासि । सौख्य लाभावे सर्व देशी ।
मानवाची पूर्णता तुजसी । प्राप्त व्हावी मना वाटे ॥
म्हणोनि केली 'ग्रामगीता' । जागृत व्हाया ग्राम-देवता ।
संबंध यावा सागर-सरिता । ऐसा तुझा सर्वांशी ॥"

या अर्पणपत्रिकेवरून महाराजांच्या ग्रामगीता-निर्मितीचे प्रयोजन आपल्या लक्षात येते. महाराजांच्या दृष्टीपुढे प्रामुख्याने या देशातील असंख्य खेड्यांचा आणि त्यात वास्तव्य असणाऱ्या गरीब-श्रमजीवी लोकांच्या सर्वतोपरी उन्नतीचा प्रश्न सातत्याने उभा होता. या देशातील बहुसंख्य जनता खेड्यापाड्यात राहते. तिचा सर्वांगीण विकास साधण्या-साठी खेड्यापासूनच सुरुवात होणे आवश्यक आहे हे मर्म महाराजांनी ओळखले आणि ग्रामगीता-लेखनास सुरुवात केली. इ. स. १९५३ च्या आषाढी एकादशीस पंढरपूर क्षेत्री ग्रामगीता-लेखनाची स्फूर्ति महा-राजांच्या मनात निर्माण झाली आणि लगेच विजयादशमीच्या सुमुहूर्तावर

महाराजांनी ग्रामगीता–लेखनाचा श्रीगणेशा केला. महाराजांचा भजन-भाषणांच्या निमित्ताने चालू असलेला सारखा दौरा व कामाचा प्रचंड व्याप पाहून 'ग्रामगीता' लेखनाचे त्यांनी आरंभिलेले कार्य लवकर पूर्ण होणार नाही असे प्रथमतः कुणालाही वाटणे स्वाभाविकच होते. परंतु धावत्या प्रवासातही फावल्यावेळी लेखन करून १९५४ च्या मे अखेरपर्यंत अगदी अल्पावकाशात त्यांनी ग्रामगीता–ग्रंथ पूर्ण केला ही आश्चर्यकारक गोष्ट मानली पाहिजे. १९३० सालापासून महाराजांनी भक्तीमार्गाच्या माध्यमातून जे जनजागृतीचे व लोकशिक्षणाचे कार्य आरंभिले होते, त्याचेच प्रतिबिंब ग्रामगीतेतून उमटलेले दिसते. महाराजांनी प्रत्येक अध्यायाच्या शेवटी–

'इति श्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु–शास्त्र–स्वानुभव–संमत'

असे म्हटले आहे. त्यावरून त्यांच्या विराट अनुभवविश्वाच्या आविष्काराबरोबरच ग्रंथाला सद्गुरु आणि शास्त्राचीही मान्यता प्राप्त झालेली आहे असे दिसून येते. ग्रामगीतेच्या रूपाने महाराजांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा आणि आचाराचा आदर्शच समाजापुढे ठेवलेला आहे.'यादृष्टीने ग्रामगीतेला महाराजांचा जीवनग्रंथच म्हणणे खरोखरी योग्य होईल' (ग्रामगीता पृ. १६ पंचम आवृत्ती.)

हा कै. ग. त्र्यं. माडखोलकरांचा अभिप्राय मान्य होण्यासारखा आहे. जुन्या-नव्याचा मनोहर मेळ महाराजांनी या ग्रंथातून साधलेला आहे. विज्ञान आणि अध्यात्म यांच्या संयुक्त संस्कारातून एक सुंदर, समृद्ध समाज निर्माण व्हावा हे महाराजांचे स्वप्न या ग्रंथातून साकारले आहे. समाजाच्या परंपरागत धर्मजीवनाचा धागा धरूनच प्राप्त परिस्थितीला अनुरूप असे परिवर्तन त्यातून अत्यंत हळूवारपणे महाराजांनी सुचविले आहे. उदा० सणोत्सव, विवाह समारंभ, अंत्यसंस्कार, इत्यादी विषयींचा महाराजांचा कालोचित दृष्टिकोन लक्षात घेण्यासारखा आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे. म्हणून खेड्यांच्या उन्नतीवरच भारताचे उज्वल भवितव्य अवलंबून आहे. राष्ट्रोन्नतीसाठी प्रत्येक खेड्याचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीनेच स्वयंपूर्ण, स्वावलंबी

व सर्वांगीण उन्नत अशा खेड्यांचे चित्र दृष्टीपुढे ठेऊन महाराजांनी ग्रामगीता लिहिलेली आहे. आज खेड्या-पाड्यांत अत्यंत दैनावस्था आहे. रात्रंदिवस अविश्रान्त कष्ट उपसूनही तेथील लोकांना अंगभर वस्त्र व पोटभर अन्न मिळत नाही. आपल्या मुला-बाळांना शिक्षण देणे सुद्धा त्यांना शक्य होत नाही. या अवस्थेचे आमूलाग्र परिवर्तन व्हावे आणि शहरांप्रमाणेच सर्व सुखसोयी खेड्यात उपलब्ध व्हाव्यात असा महाराजांचा प्रयत्न होता आणि त्यानुसार त्यांनी वर्‍याचशा योजना आखून त्या कार्यान्वित करण्याचे कृतीशील प्रयोगही केले. या सर्व योजनांचे आणि कृतीशील प्रयोगांचे प्रतिपादन महाराजांनी ग्रामगीतेतून अतिशय सोप्या भाषेतून केलेले आहे.

दैन्य, दारिद्र्य, अन्याय, अत्याचार आणि सातत्याने या देशात टिकलेले दीर्घकालीन पारतंत्र्य यामुळे भारतीय समाजाची फार मोठी हानी झालेली आहे. अशा दैन्यावस्थेत भारतीय संतांनी आपापल्या काळात फार मोठी वाङ्मयीन निर्मिती करून समाजात सुबत्ता व स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याची प्रेरणा दिली. विशेषतः महाराष्ट्रातील ज्ञानेश्वरांपासून तर तुकाराम-रामदासांपर्यंतच्या संतपरंपरेने आपल्या मौलीक वाङ्मयीन कर्तृत्वाने जनजागृतीचे व लोकशिक्षणाचे महद् कार्य केले आहे. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, नामदेवांचे अभंग, एकनाथांचे भागवत, तुकारामांची गाथा आणि रामदासांच्या दासबोधाने जे भरीव सामाजिक कार्य केले तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त कार्य काळाची परिवर्तनशील पावले ओळखून महाराजांची ग्रामगीता करीत आहे. त्यादृष्टीने वरील वेदतुल्य ग्रंथमालिकेत आरूढ होण्याचा मान महाराजांच्या ग्रामगीतेलाही सहजच मिळण्यासारखा आहे. ग्रामगीता ही संसार सागरातील दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी-मानवसमाजाला महाराजांकडून मिळालेली एक परमेश्वरी देण आहे.

"गांवागांवांसि जागवा । भेदभाव हा समूळ मिटवा ।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ॥"

ही ग्रामगीतानिर्मितीमागील महाराजांची कालोचित अशी मूलभूत प्रेरणा होती. समर्थांच्या 'दासबोधा'तील 'रामराज्या' प्रमाणेच

महाराजांनी 'ग्रामगीते' तून आदर्श 'ग्रामराज्या' चे चित्र रेखाटून भावी भारताचे दृश्य दृष्टीपुढे उभे केले आहे.

आपल्याला या ग्रंथलेखनाची प्रेरणा कशी झाली हे सांगताना महाराज पहिल्या अध्यायात म्हणतात–

"पुण्यक्षेत्र पंढरपुरी । बैसलो असता चंद्रभागेतिरी ।
स्फुरू लागली ऐसी अंतरी । विश्वाकार वृत्ति ॥ (अ. १-४३)
तेथे दृष्टान्त होई अद्भूत । कासया करावी विश्वाची मात ।
प्रथम ग्रामगीताचि हातात । घ्यावी म्हणे ॥" (अ. १-४४)

महाराज पांडुरंगाच्या चरणी चंद्रभागेच्या वाळवंटात ध्यानस्थ बसले असताना पांडुरंगांनी त्यांना दृष्टान्त दिला की, विश्वाची चिंता करण्यापेक्षा विश्वाचा लहान घटक असलेल्या ग्रामाच्या उन्नतीचाच विचार कर आणि त्यासाठी 'ग्रामगीता' लिहिण्यास आरंभ कर. या पांडुरंगांच्या दृष्टांतानुसार–

"गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा ।
गावचि भंगता अवदशा । येईल देशा ॥" (अ. १–४९)

–ही जाणीव ठेऊनच महाराजांनी ग्रामगीता ग्रंथ लेखनास आरंभ केला. ग्रामगीता लिहित असतांना महाराजांची दृष्टी संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यांच्याप्रमाणे भूतदयावादी होती. रंजलेल्या–गांजलेल्या, दीन–दुबळ्या देहात देव शोधून त्यांची सेवा करण्याचा संत-परंपरेतील परिपाठ महाराजांनीही ग्रामगीतेतून पूर्णपणे पाळलेला दिसतो.

"मंदिरी बैसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे ।
दुःखितांशी प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थस्थानाहुनी ॥"
(अ. १८–१९)

हे त्यांचे सरळ सोपे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे.

महाराजांच्या मते ग्राम हे परमेश्वराचे पवित्र मंदिर असून समग्र मानवजात ही त्या मंदिरातील देवाची सुंदर मूर्ती होय. महाराजांची ही शाब्दिक सेवा असली तरी ती आपल्या मनावर उत्तम संस्कार करणारी

व सर्वांगीण उन्नत अशा खेड्यांचे चित्र दृष्टीपुढे ठेऊन महाराजांनी ग्रामगीता लिहिलेली आहे. आज खेड्या-पाड्यांत अत्यंत दैनावस्था आहे. रात्रंदिवस अविश्रान्त कष्ट उपसूनही तेथील लोकांना अंगभर वस्त्र व पोटभर अन्न मिळत नाही. आपल्या मुला-बाळांना शिक्षण देणे सुद्धा त्यांना शक्य होत नाही. या अवस्थेचे आमूलाग्र परिवर्तन व्हावे आणि शहरांप्रमाणेच सर्व सुखसोयी खेड्यात उपलब्ध व्हाव्यात असा महाराजांचा प्रयत्न होता आणि त्यानुसार त्यांनी वर-याचशा योजना आखून त्या कार्यान्वित करण्याचे कृतीशील प्रयोगही केले. या सर्व योजनांचे आणि कृतीशील प्रयोगांचे प्रतिपादन महाराजांनी ग्रामगीतेतून अतिशय सोप्या भाषेतून केलेले आहे.

दैन्य, दारिद्र्य, अन्याय, अत्याचार आणि सातत्याने या देशात टिकलेले दीर्घकालीन पारतंत्र्य यामुळे भारतीय समाजाची फार मोठी हानी झालेली आहे. अशा दैन्यावस्थेत भारतीय संतांनी आपापल्या काळात फार मोठी वाङ्मयीन निर्मिती करून समाजात सुबत्ता व स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याची प्रेरणा दिली. विशेषतः महाराष्ट्रातील ज्ञानेश्वरांपासून तर तुकाराम-रामदासांपर्यंतच्या संतपरंपरेने आपल्या मौलीक वाङ्मयीन कर्तृत्वाने जनजागृतीचे व लोकशिक्षणाचे महद् कार्य केले आहे. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, नामदेवांचे अभंग, एकनाथांचे भागवत, तुकारामांची गाथा आणि रामदासांच्या दासबोधाने जे भरीव सामाजिक कार्य केले तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त कार्य काळाची परिवर्तनशील पावले ओळखून महाराजांची ग्रामगीता करीत आहे. त्यादृष्टीने वरील वेदतुल्य ग्रंथमालिकेत आरूढ होण्याचा मान महाराजांच्या ग्रामगीतेलाही सहजच मिळण्यासारखा आहे. ग्रामगीता ही संसार सागरातील दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी-मानवसमाजाला महाराजांकडून मिळालेली एक परमेश्वरी देण आहे.

"गांवागांवांसि जागवा । भेदभाव हा समूळ मिटवा ।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ॥"

ही ग्रामगीतानिर्मितीमागील महाराजांची कालोचित अशी मूलभूत प्रेरणा होती. समर्थांच्या 'दासबोधा'तील 'रामराज्या' प्रमाणेच

महाराजांनी 'ग्रामगीते' तून आदर्श 'ग्रामराज्या' चे चित्र रेखाटून भावी भारताचे दृश्य दृष्टीपुढे उभे केले आहे.

आपल्याला या ग्रंथलेखनाची प्रेरणा कशी झाली हे सांगताना महाराज पहिल्या अध्यायात म्हणतात–

"पुण्यक्षेत्र पंढरपुरी । बैसलो असता चंद्रभागेतिरी ।
स्फुरू लागली ऐसी अंतरी । विश्वाकार वृत्ति ॥ (अ. १-४३)
तेथे दृष्टान्त होई अद्भूत । कासया करावी विश्वाची मात ।
प्रथम ग्रामगीताचि हातात । घ्यावी म्हणे ॥" (अ. १-४४)

महाराज पांडुरंगाच्या चरणी चंद्रभागेच्या वाळवंटात ध्यानस्थ बसले असताना पांडुरंगांनी त्यांना दृष्टान्त दिला की, विश्वाची चिंता करण्यापेक्षा विश्वाचा लहान घटक असलेल्या ग्रामाच्या उन्नतीचाच विचार कर आणि त्यासाठी 'ग्रामगीता' लिहिण्यास आरंभ कर. या पांडुरंगांच्या दृष्टांतानुसार–

"गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा ।
गावचि भंगता अवदशा । येईल देशा ॥" (अ. १–४९)

–ही जाणीव ठेऊनच महाराजांनी ग्रामगीता ग्रंथ लेखनास आरंभ केला. ग्रामगीता लिहित असतांना महाराजांची दृष्टी संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यांच्याप्रमाणे भूतदयावादी होती. रंजलेल्या–गांजलेल्या, दीन–दुबळ्या देहात देव शोधून त्यांची सेवा करण्याचा संत-परंपरेतील परिपाठ महाराजानीही ग्रामगीतेतून पूर्णपणे पाळलेला दिसतो.

"मंदिरी बैसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे ।
दुःखितांशी प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थस्थानाहुनी ॥"
(अ. १८–१९)

हे त्यांचे सरळ सोपे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे.

महाराजांच्या मते ग्राम हे परमेश्वराचे पवित्र मंदिर असून समग्र मानवजात ही त्या मंदिरातील देवाची सुंदर मूर्ती होय. महाराजांची ही शाब्दिक सेवा असली तरी ती आपल्या मनावर उत्तम संस्कार करणारी

जणु आपली माताच आहे असे वाटते. समर्थांच्या रामराज्याप्रमाणे भारतात सर्वत्र आदर्श ग्रामराज्य निर्माण व्हावे हाच महाराजांचा ग्रामगीता-लेखनाचा मुख्य हेतू आहे.

ग्रामगीता-महिमा

आपल्या ग्रामगीतेचा महिमा महाराजांनी शेवटच्या एकेचाळिसाव्या अध्यायातून अतिशय विनम्रतेने विशद केलेला आहे. ते म्हणतात–

"ग्रामगीता दुःखासि नाशवी । ग्रामगीता मृत्यूसि हसवी ।
ग्रामगीता सहकारी तत्व वाढवी । मानवधर्मा फुलवाया ।।"

(अ. ३९–५)

ग्रामगीता दुःखाचा नाश करते. मरणारासही प्रसन्न करते. मानवधर्म प्रस्थापित करण्यासाठी ती सहकारी तत्त्वाचा प्रसार करते. ग्रामगीतेच्या संस्काराने मानवधर्माचा प्रसार होतो आणि त्यामुळे माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागण्याचा नवा धर्म कळतो. ग्रामगीता ग्रंथांचा हा महिमा जाणून महाराज त्याचे देवळाच्या पारावर लोकांपुढे पारायण करण्यास सांगतात. अर्थात ते पारायण अर्थहीन नसावे, किंवा पुण्य पदरी पडण्याच्या आशेनेही ते पारायण नसावे. अज्ञानाचा अंधःकार दूर होऊन ज्ञानाचा प्रकाश पसरावा या हेतूनेच त्याचे पारायण व्हावे. तसेच ग्रामगीता हा केवळ पाठांतराचा ग्रंथ नाही. त्यातील ओव्यांच्या अर्थाचे आकलन झाले पाहिजे. वाचत असताना शब्दांचा चढ–उतार लक्षात घ्यावा. वाचणाऱ्याचे व्यक्तिमत्व व चारित्र्यही चांगले पाहिजे तरच त्याचा प्रभाव श्रोत्यांवर पडेल. यादृष्टीने पाहू जाता महाराजांच्या ग्रामगीतेवर केवळ फुले वाहून व तिची पूजा करून किंवा ओव्यांचे पठन करून मानवीजीवनाचे सार्थक होणार नाही याची स्पष्ट जाणीव होते. महाराजांचो ग्रामगीता त्यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे–

"ग्रामगीता माझे हृदय । त्यात बैसले सद्गुरु राय ।
बोध त्यांचा प्रकाशमय । दिपवोनि सोडील ग्रामासि ।।"

(अ. ४१–१०६)

अशाप्रकारे ग्रामगीता म्हणजे महाराजांची हृदयगाथा आहे. ती सांप्रत युगाची संजीवनी बुटीच आहे. संसारात त्रस्त झालेल्या आणि संकटात सापडलेल्या जीवांना ती धीर देते. अत्याचाऱ्यांच्या अंत:करणात देवत्व जागवून त्यांना वठणीवर आणते. अशाप्रकारे ग्रामगीता–वाचनाने मनुष्यावर उत्तम संस्कार होऊन तो चारित्र्यवान बनेल असा महाराजांना दृढविश्वास आहे. तसेच या ग्रंथांच्या वाचनाने द्वेषबुद्धीचा लोप होईल आणि मनुष्य सत्कार्य करण्यास प्रवृत्त होईल, इतकेच नव्हेतर या ग्रंथाच्या वाचनाने मनुष्याला आत्मज्ञानही प्राप्त होईल असे महाराज मोठ्या आत्मविश्वासाने सांगतात. एकंदरीत, महाराजांचा प्रस्तुत ग्रंथ हा सर्वांनाच वाचनीय असा आहे. स्वत: सुधारून समाजाची सुधारणा करण्याची स्फूर्ती त्यातून मिळते. महाराजांची ही केवळ ग्रामगीता नसून भगवान श्रीकृष्णाच्या गीतेप्रमाणे ती 'संग्रामगीता' आहे. यादृष्टीने डॉ. वि. भि. कोलते म्हणतात त्याप्रमाणे 'ग्रामगीता' ही भगवद्गीतेचा पुनरावतारच होय' (ग्रामगीता–पंचमावृत्ती-पृष्ठ १४) हे मत सहजच मान्य होते. कर्तव्यपराङ्मुख झालेल्या अर्जुनाला कर्तव्यप्रवृत्त करण्यासाठी भगवान श्रीकृष्णाला कुरुक्षेत्रावर गीता सांगावी लागली, त्याप्रमाणे आपले कर्तव्य–कर्म विसरलेल्या लोकांना कर्तव्याची जाणीव देण्यासाठी व त्यांचा उद्धार करण्यासाठी ग्रामगीतेचा जन्म झालेला आहे. माणूस आपले कर्तव्य–कर्म नीट सांभाळू लागला की, त्याची सुधारणा किंवा प्रगती आपोआपच होते आणि माणसाची प्रगती झाली की, गाव आपोआपच उन्नत होतो. अर्थातच गाव हा देशाचा महत्त्वाचा घटक असल्याने ग्रामोन्नती झाली की, देशही स्वाभाविकच प्रगतीपथावर पोहचतो असे हे महाराजांचे गामगीतेसंबंधीचे थोडक्यात समीकरण आहे.

महाराजांची ग्रामगीतेतील रचनाशैली अतिशय प्रसन्न असून दासबोधाप्रमाणेच ती अल्पांशाने संवादात्मक आहे. नवव्या अध्यायाच्या आरंभीच श्रोते महाराजांना विचारतात–

"आदर्श प्रचारक मिळणे कठीण । मिळाले तरी टिकणे कठीण ।
आमुच्यासाठी दुजा मार्ग कोण । ग्रामोन्नतीचा ? ॥"

(अ. ९–२)

श्रोत्यांच्या प्रश्नाला महाराज उत्तर देतात–

" तरी ऐका याचे उत्तर । मी एक गाव पाहिले सुंदर ।
शिस्त, शांतता, व्यवस्था घरोघर । लोक निर्व्यसनी तेथीचे ।।"
(अ. ९–३)

पुढे ते म्हणतात–

" अहो ! उत्तम प्रचारक नाही बोलला । तरी आवडे त्याचे वर्तन लोकाला ।
मोह पाडी गावकऱ्याला । सेवा प्रेम त्याचे ।। " (अ. ९–१२)

" ऐसेचि लोक गाव सुधारती । देशाचे नाव उज्ज्वल करिती ।
नसेना कोणा त्यांची माहिती । सुगंध उधळती वनपुष्पे ।। "
(अ. ९–१५)

अशाप्रकारे काही ठिकाणी अल्पांशाने का असेना परंतु संवादात्मक रचनाशैली असल्याने जणु श्रोतृवृन्द महाराजांसमोर वसला असून महाराज त्यांच्या प्रश्नांचे उत्तर देऊन शंकासमाधान करीत आहे असा भास होतो. सोप्या व प्रासादिक शब्दामुळे ग्रामगीतेतील ओव्यांचा अर्थ सहजच आकलन होतो. शब्दकोषाची आवश्यकता पडत नाही. तसेच ग्रामगीतेतील महाराजांचे विचार सुस्पष्ट असल्याने खेड्यापाड्यांतील बहुजन समाजालाही ते सहजच समजू शकतात. महाराजांची ग्रामगीता साधी, सरळ व सोपी असूनही सुलभ भाषेतील अलंकारामुळे तिचे सात्विक सौंदर्य अधिक खुलून दिसते. पावसाच्या सरी मागून सरी याव्यात त्याप्रमाणे पहिल्या अध्यायात आत्मस्वरुपाचे व भगवंताच्या कर्तव्योपदेशाचे विवेचन करताना उपमा अलंकाराची अगदी रेलचेल झालेली आहे. पहा–

" सूर्य जैसा नभी उगवला । अंधःकाराचा नाश झाला ।
तैसा तू हृदयी प्रकटला । जीव झाला विश्वव्यापी ।।
चंद्राचे किरण व्यापले । चकोरचित्त प्रसन्न झाले ।
तैसे तू आपुलेसे केले । मग पळाले ताप सारे ।।
जोवरि पंचानन नाही दिसला । तोवरि अतिगर्व जंबुकाला ।
तैसा तुझा प्रकाश नाही पडला । तोवरि ग्रासतो विकारशत्रु ।।

सूर्ये जीवन देता आपुले । कमल जैसे हसले, फुलले ।
तैसे तुझ्या दर्शनाने झाले । कृपापात्र जीवांचे ॥
राजहंसे चोच पुरविता । पाणी, दुधाची होय भिन्नता ।
तैसे तुझे ज्ञान स्पर्शे चित्ता । दोष-निर्दोषता उमगे ॥ "
(अ. १ ओ. २१ ते २५)

तसेच-

मृत्यूबद्दलची मनातील भीती काढून टाकताना महाराज उपमा अलंकाराचा मार्मिक उपयोग करतात-

" जैसा कपडा अंगीचा बदलावा । नवीन अंगावर ओढून घ्यावा ।
तैसाची जीव मरणी समजावा । शरीर बदली इच्छेने ॥ "
(अ. ३४ ओ. ८९)

" जैसी नदी सागरासी मिळे । सोडोनि भेदभाव कष्ट बळे ।
तिचे कार्यचि होते सगळे । मिळण्यासाठी सागरी ॥ "
(अ. २२ ओ. ५०)

तसेच-

महाराजांनी ग्रामगीतेत योजिलेल्या मार्मिक कोटचाही लक्षात घेण्यासारख्या आहेत. पहिल्या अध्यायातील एकशे सोळावी ओवी पहा-

" देव म्हणजे घेवचि नव्हे । सर्व काही देवचि आहे "
(अ. १ ओ. ११६)

दासबोधातील ओव्यांप्रमाणे ग्रामगीतेतील काही ओव्या सुभाषितासारख्या सहज स्मरणीय झाल्या आहेत. उदा०-

" गढूळ पाणी ढवळो जाता । घाणचि उफाळोनि ये हाता ॥ "
किंवा
" विचाराविण जे जे करणे । ते सर्वचि होते लाजिरवाणे ॥ "
किंवा
" झाला वासनेचा नाश । त्यासचि नाम असे संन्यास ॥ "
किंवा
" सर्व विश्वचि व्हावे सुखी । ही धर्माची दृष्टी नेटकी ॥ "

किंवा

" दया, क्षमा, शांति, विवेक । यांचे केंद्रस्थान साधु देख ॥ "

किंवा

" संतापाशी एकचि धर्म । सकल जीवांचे कल्याणकर्म ॥ "

अशा प्रकारे वाङ्मयीनदृष्टचा देखील ग्रामगीतेचे महत्त्व कमी नाही. एकंदरीत, ग्रामगीतेत जीवनोपयुक्त असे भरपूर ' टॉनिक ' आहे. केवळ ते प्राशन करून चालणार नाही; त्याला पचविताही आले पाहिजे. या ग्रंथात मृतातही चैतन्य ओतण्याचे सामर्थ्य आहे. प्रगतीच्या नव्या दिशा त्यातून दिसतात. आदर्श मानव व आदर्श ग्राम वनण्याचे संस्कार त्यातून घडतात. शोषणविरहित, स्वयंपूर्ण अशा नवसमाजनिर्मितीची स्फूर्ती त्यातून मिळते. माणसाच्या मनातील देवत्व जागविण्याची क्षमता या ग्रंथात निश्चितच आहे. आपल्या देशातील लहान गावांना महान बनविण्यासाठी त्यांच्या सर्वांगीण उन्नतीची आवश्यकता दृष्टीपुढे ठेऊन त्यादृष्टीने आपल्या ग्रंथाला महाराजांनी ' ग्रामगीता ' हे दिलेले नाव अगदी सार्थ आहे.

दासबोध-ग्रामगीता : तौलनिक दर्शन :-

समर्थांचा ' दासबोध ' आणि महाराजांची ' ग्रामगीता ' हे दोन्ही ग्रंथ सामान्यतः सारख्याच स्वरुपाचे आहेत. या दोन्ही ग्रंथांच्या लेखन-काळात जवळ जवळ तीनशे वर्षांचे अंतर आहे. त्यामुळे त्यांतील विषयांत व विवरणात तत्कालीन परिस्थितीनुरूप काही फरक आढळणे स्वाभाविक आहे. तथापि दासबोध वाचताना त्याची रचनापद्धती पाहून ग्रामगीतेची आवर्जून आठवण व्हावी व ग्रामगीता वाचताना दृष्टीपुढे ' दासबोध ' उभा राहावा इतके त्या दोहोतील रचनाशैलीत साम्य आहे. समर्थांच्या एकूण प्रकाशित साहित्यात जसा ' दासबोध ' हा मुख ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला आहे; तसाच ' ग्रामगीता ' हा ग्रंथही महाराजांच्या सर्व प्रकाशित पुस्तकांमध्ये प्रमुख ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला आहे. दासबोधात एकूण २० दशकांचा अंतर्भाव असून प्रत्येक दशकात १० समासांचा समावेश केलेला आहे. ग्रामगीतेत मात्र दशकांऐवजी महाराजांनी

अध्याय असे नामाभिधान देऊन प्रत्येक पाच अध्यायांचे एक पंचक असे सात पंचक व शेवटचे ८ वे पंचक सहा अध्यायांचे केलेले आहे. प्रत्येक समासाच्या शेवटी दासबोधात **'इति श्री दासबोधे गुरूशिष्यसंवादे'** असा उल्लेख आढळतो. ग्रामगीतेतील अध्यायाच्या शेवटी **' इति श्री ग्रामगीता ग्रंथ । गुरूशास्त्र-स्वानुभव संमत '** असा उल्लेख आलेला आहे. समर्थांच्या दासबोधातील प्रत्येक समासाप्रमाणेच महाराजांच्या ग्रामगीतेतील प्रत्येक अध्याय एक स्वतंत्र व्याख्यान होण्याच्या योग्यतेचा आहे. दासबोध आणि ग्रामगीता या दोन्ही ग्रंथांत विविध विषयांचे विस्तृत विवेचन आलेले आहे. तथापि, या दोन्ही ग्रंथांच्या विषयांमध्ये मात्र बऱ्याच प्रमाणात फरक जाणवतो. प्रपंच-परमार्थ किंवा प्रयत्न-प्रारब्ध-विषयक विचारांमध्ये दोन्ही संताची भूमिका सारख्याच स्वरूपाची असल्याचे दिसून येते. तसेच समर्थांप्रमाणेच महाराजांची वाणी रोखठोक असून व्यवहारचातुर्यविषयक विचारातही बरीच समानता आढळते. तथापि, ' दासबोध ' हा प्रामुख्याने अध्यात्मशास्त्रावरील गहन ग्रथ असल्याने त्यात अध्यात्मानुरूप विषयांचेच विवरण अधिक प्रमाणात आलेले आहे; उलट ' ग्रामगीता ' या ग्रंथाचा जन्मच मुळी ग्रामोन्नतीसाठी झाला असल्यामुळे ग्रामोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या बाबींवरच प्रामुख्याने प्रकाश टाकण्यात आलेला आहे. दासबोध व ग्रामगीता हे भिन्न काळातील ग्रथ असलेत, तरी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामाचे अभंग इत्यादी वेदतुल्य ग्रंथमालिकेत त्यांचा अंतर्भाव व्हावा इतके ते दोन्ही श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथ आहेत. ' दासबोध ' जसा समर्थांचा चरित्र-ग्रंथ मानण्यात येतो, तसेच ग्रामगीता ग्रंथही महाराजांचे जीवनदर्शन घडविणारा ग्रंथ मानण्यात येतो. या दोन्ही संतांना गुरूकृपा प्रसादानेच ग्रंथ निर्मितीची प्रेरणा झाली असल्याचे दोघेही प्रतिपादन करतात. दासबोधाची रचना पारतंत्र्याच्या काळात झाली आणि ग्रामगीता मात्र भारतीय स्वातंत्र्याच्या काळात अवतरली; त्यामुळेही विषय-विवरणात भेद जाणवणे संभवनीय आहे.

दासबोधात जसे समर्थ म्हणतात की-

" आत्माराम दासबोध । माझे स्वरुप स्वतः सिद्ध ।
असता न करावा खेद । भक्त जनी ॥ "

तसेच महाराजही सांगतात–

" ग्रामगीता माझे हृदय । त्यात बैसले सद्गुरूराय ।
बोध त्यांचा प्रकाशमय । दिपवोनि सोडील ग्रामासि ।। "

यावरून या दोनही संतांचे स्वरूप व हृदय त्यांच्या ग्रथावरून उघड होते. दासबोधातील समर्थांच्या उत्तम पुरुषाची आणि ग्रामगीतेतून महाराजांनी वर्णिलेल्या आदर्श प्रचारकाची लक्षणे सामान्यत: सारख्याच स्वरुपाचो वाटतात. तसेच समर्थांनी दासबोधातून रंगविलेले रामराज्याचे स्वप्न आणि महाराजांच्या ग्रामगीतेतील आदर्श ग्रामराज्याचे चित्र यातही बरेच साम्य आहे. तथापि समर्थांपेक्षा महाराजांची दृष्टी ग्रामीण विकासाकडे अधिक प्रमाणात वळलेलो असल्याने ग्रामीण समस्यांचा उहापोहच ग्रामगीतेतून सविस्तर स्वरूपात झालेला दिसतो.

या दोनही संतांचा काळ भिन्न, राजकीय–सामाजिक परिस्थिती भिन्न आणि त्यामुळे तत्कालीन समाजाच्या समस्याही भिन्नच होत्या. अर्थात त्या सर्व समस्यांचे तपशीलवार निराकरण या दोन्ही संतांच्या प्रस्तुत ग्रंथांतून करण्यात आलेले आहे.

या दोन्ही ग्रथांनी आपापल्या काळात लोकशिक्षणाचे व जनजागृतोचे कार्य उत्कट तळमळीने केले आहे व सध्याच्या काळातही करीत आहे. आपला 'ग्रंथ' कसा वाचावा यासबंधी दोघांनोही मौलिक सूचना करून ठेवल्या आहेत समर्थांना 'दासबोध' निर्मितीला दीर्घकाळ लागला आणि ते स्वाभाविकही होते. कारण त्यांनी तो एकटाकी, एकबैठकी लिहिलेला नाही. परंतु भजने–भाषणांचा प्रचंड व्याप सांभाळूनही महाराजांची ग्रामगीता मात्र त्यामानाने बऱ्याच लवकर लिहून पूर्ण झाली. अर्थात दासबोधतील ओव्यांचो संख्याहो ग्रामगीतेतील ओव्यांपेक्षा अधिक आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. या दोन्ही संतांनी भाषेच्या सजावटीकडे विशेष लक्ष दिलेले दिसत नाही, चिंतनातून व समाज जीवनाच्या सूक्ष्म अवलोकनातून जसे सुचले तसे ते लिहित गले असावे असे वाटते. दोघानांही कवित्व बहाल करण्याच्या बाबतीत काही विद्वान मंडळींचा कटाक्ष असला तरी–

"जेणे देहबुद्धी तुटे । जेणे भवसिंधु आटे ।
जेणे भगवंत प्रगटे । या नाव कवित्व ॥"

असे समर्थांनी म्हटल्याप्रमाणे या दोनही संतांचे कवित्व मान्य होण्यासारखेच आहे. हे दोनही संत ईश्वराची भक्ती आपल्या जीवनात सतत अनुभवत होते. या उत्कट भक्तीच्या उमाळ्यातूनच त्यांच्या मुखातून उस्फूर्तपणे काव्य बाहेर पडले आहे. या दोनही संतकवींनी काव्य ग्रंथांतून वापरलेल्या प्रतिमा सौंदर्यवादी असून त्यांच्या प्रखर वाणीमुळे श्रोत्यांवर सहजच प्रभाव पडतो. या दोनही संतांना त्यांच्या काळात जनजागृतीचा ध्यास लागला असल्याने त्या ध्यासातूनच दोघांचीही वैखरी उद्रेक पावलेली आहे आणि म्हणूनच दोघांच्याही शब्दप्रयोगामध्ये सहजता आढळून येते. समाजोन्नतीच्या उत्कट तळमळीपोटीच भाषा द्रोक झाला असल्याने दोन्ही संतांच्या ग्रंथांतील भाषा ओजस्वी असूनही ती खडबडीत स्वरुपाची झाली आहे. भावनाधीन न होता किंवा भाषेला सालंकृत न करता अगदी स्पष्ट शब्दांत या दोन्ही संतांनी आपले विचारधन समाजाच्या स्वाधीन केलेले आहे. वर्णनाचा तपशील हा तर दोन्ही संतांच्या लिखाणाचा विशेष गुणधर्म आहे. अगदी तपशिलात जाऊन बारीक-सारीक गोष्टींचे वर्णन या दोन्ही ग्रंथातून केल्या गेले आहे. दोघांच्याही ग्रंथांत कृत्रिम नटवेपणा नसून ते संपूर्ण वास्तववादी विचारसरणीतून प्रकटले असल्याचा प्रत्यय येतो. या दोन्ही संतांचे जीवन समर्पित असल्याने त्यांच्या समर्पित जोवनाचे प्रतिबिंबही त्यांच्या साहित्यातून प्रकटले असल्याचे जाणवते.

एकंदरीत, समर्थ रामदास आणि संत तुकडोजी यांच्या वाङ्मयाची प्रेरणा सारखीच होती. त्यांच्या अंतःकरणामध्ये असलेला उत्कट भक्तीचा उमाळा केवळ त्यांनी ईश-स्तवन करण्यासाठी उपयोगात आणला नाही; तर कालपरत्वे सामाजिक व राजकीय परिस्थितीचे यथोचित भान ठेऊन आपापल्या काळातील लोकांना त्यांनी योग्य ते मार्गदर्शन केले आहे. ते करीत असताना या दोन्ही संतांची दृष्टी आपल्या राष्ट्रावरून किंचित्ही

ढळली नाही; उलट स्वराज्याची व सुराज्याची स्फूर्ति त्यांच्या साहित्यातून सहजच उपलब्ध झाली. दोघांच्याही ग्रंथांमध्ये कल्पनांच्या भरारीचा अभाव असला तरी प्राप्त परिस्थितीचे मूर्तिमंत चित्र रेखाटण्यात व त्यातून भावी जीवनासाठी प्रेरणा देण्यात हे दोनही संतकवी यशस्वी झालेले आहेत. दोघांच्याही ग्रंथात विचारांचा जिवंतपणा आढळतो. मात्र वर्णनाच्या सूक्ष्म तपशीलावरोबरच दोघांच्याही ग्रंथात काही प्रमाणात पाल्हाळ व पुनरावृत्ती आली आहे. रामदासांनी काही स्वयंनिर्मित शब्द योजिल्याने व अध्यात्माचे गहन निरूपण केल्याने ग्रामगीतेपेक्षा 'दासबोधा' ला एकप्रकारची क्लिष्टता आली आहे, त्यामुळे काही ओव्यांच्या अर्थाचे आकलन होणे अवघड जाते.

तथापि, या दोन्ही संतांच्या समाजजीवनाच्या सूक्ष्म अवलोकनाने व व्यापक अनुभवाने त्यांच्या ग्रंथांमध्ये एकप्रकारची समृद्धता, व्यापकता व उदारता आली आहे. या दोन्ही ग्रंथांचे वाचन करीत असताना वाचकवृंद त्यातील वाङ्मयीन गुणांचा शोध घेत नाहीत; तर त्यातील मौलिक विचारधन प्राप्त करून घेण्यातच धन्यता मानतात.

अशा प्रकारे अध्यात्मरूपी अमृताचा वर्षाव करणारा समर्थांचा 'दासबोध' आणि ग्रामविकासाच्या उत्कट तळमळीने युक्त अशी महाराजांची 'ग्रामगीता' माउलीच्या पान्ह्याप्रमाणे आपला प्रेरणास्त्रोत समग्र मानव समाजाला अब्जधारांनी अखंड देत राहतील यात मुळीच शंका नाही.

—

संतद्वय साम्य-भेद दर्शन

साम्य :

प्रत्येक संत पुरूष हा त्या त्या युगाचा प्रसव आणि प्रवर्तक असतो. काळाप्रमाणे परिस्थिती बदलते आणि परिस्थिती प्रमाणे प्रवर्तकाच्या विचार व आचार प्रणालीमध्ये परिवर्तन घडत असते. समर्थ रामदास व संत तुकडोजी हे वास्तविक पाहता दोन काळांचे दोन प्रतिनिधी आहेत. दोघांचेही कार्य मौलिक स्वरूपाचे आहे. परंतु त्यांचा भिन्न काळ, त्यांच्या काळातील भिन्न परिस्थिती आणि उभयतांची भिन्न प्रवृत्ती यामुळे या दोनही संतांच्या विचार व आचार प्रणालीत आणि कार्यपद्धतीत वेगळेपणा जाणवणे स्वाभाविक आहे. तथापि, समर्थ आणि महाराज यांचे संतत्व इतर संतांपेक्षा भिन्न प्रकारचे असून ते दोघेही सातत्याने समाजोन्मुख राहिले व दोघांनीही देशालाच देव मानून त्याची आयुष्यभर अखंड पूजा केली. अमोघ वक्तृत्व, अखंड प्रयत्न, कडक वैराग्य वृत्ती, निर्भय प्रवृत्ती, प्रसंगी एकान्त व लोकान्त साधण्याची हातोटी आणि लोकांवर प्रभाव पडणारे तेजस्वी व्यक्तिमत्व अशा अनेक उत्तम गुणांचा परिपाक दोघांच्याही ठायी दिसून येतो. या दोन्हीही संतांच्या चरित्र-चारित्र्याचा आणि कार्य-कर्तृत्वाचा अभ्यास केला, तर एक गोष्ट प्रामुख्याने दृष्टीपुढे उभी राहते आणि तो म्हणजे समर्थ आणि महाराज हे दोघेही अध्यात्मनिष्ठ पण समाजाभिमुख असे कर्तृत्ववान संत होते. त्यांच्या अध्यात्मामध्ये समाजापासून परावृत्त होण्याचा पलायनवाद सामावलेला नव्हता. दोघांनीही भक्तीमार्गाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा ध्यास धरला होता. दोघांचाही रोखठोकपणा, व्यवहार-चातुर्य, लोकजीवन विशुद्ध करण्याची उत्कट तळमळ, संघटनाचातुर्य इत्यादी गुण दोघांच्याही व्यक्तित्व-कर्तृत्वातील साम्य ठळकपणे दर्शविते. रामदास हे जसे आपणास 'दास' म्हणवितात तसेच 'तुकड्यादास' लिहून महाराजही आपणास 'दास' च म्हणवितात. नावाप्रमाणेच या दोघांच्या राष्ट्रीय भूमिकेचा व वाङ्मयीन कार्याचा तोंडवळाही सारखाच आहे. महाराजांचे राजकीय विचार आणि त्यांच्या 'ग्रामगीते' ची

रचनापद्धती दासबोधी थाटाची वाटते. सुस्त समाजाला जागृत करून त्यांच्यात स्फूर्ति निर्माण करण्याचे तत्त्व समर्थांना सतराव्या शतकात स्फुरले, तसेच स्फूर्तिप्रद तत्त्व महाराजांना वीसाव्या शतकात स्फुरले आणि त्यातूनच समर्थांच्या दासबोधाप्रमाणे ग्रामगीतेचा जन्म झाला. "**बन्ही तो चेतवावारे। चेतविताच चेततो।**" असे स्फूर्तिदायक आवाहन समर्थ आपल्या अनुयायांना करतात आणि महाराज देखील–

"**अरे! उठा, उठा श्रीमंतांनो!**
अधिकान्यांनो! पंडितांनो!
सुशिक्षितांनो! साधु, संतांनो!
हाक आली क्रांतीची॥"

अशा प्रकारचे आवाहन समाजातील सर्व स्तरातील लोकांना करतात. यावरून या दोन्ही संतांच्या अंतःकरणातील समाज व राष्ट्राच्या उन्नती-विषयीची उत्कट तळमळ सहजच लक्षात येते. समर्थांना जसे रामराज्य हवे होते तसेच महाराजांनी आदर्श ग्रामराज्याचा ध्यास धरला होता. या दोनही संतपुरुषांच्या स्वप्नातील हे रामराज्य आणि ग्रामराज्य म्हणजे सुखसमृद्धीचा काळ होता.

समर्थांच्या शब्दांत–

'**संतोष समस्त लोकां। रामराज्य भूमंडळी।**'

आणि महाराजांच्या शब्दांत–

'**सर्व जनांचे समाधान। याहूनि स्वर्ग नाही महान।**
नांदती द्वेष मत्सराविण। बंधुभावे सर्व जेथे॥"

अशा जमान्याचे स्वप्न हे दोघेही संत पाहात होते. समर्थ व महाराज या दोघांही महापुरुषांनी आपली काया, वाणी व लेखणी रामराज्य व ग्रामराज्य यांच्या निर्मितीसाठी झिजविली. या दोघांचाही आदर्श राम-भक्त हनुमान होता. समर्थांप्रमाणेच महाराजांनी व्यायाम करून आपली शरीरयष्टी दणकट बनविली होती. गावोगावी आखाडे निर्माण करणे, मारूतीच्या मंदिराची स्थापना करून तरूणांपुढे बलदंड मारूतीचा आदर्श

उभा करणे; त्यांना मारुतीची उपासना शिकवून सामर्थ्याचा संजीवन मंत्र देणे, तरूणांची सशक्त संघटना उभारणे, इत्यादी बाबतीत या दोनही संतांमध्ये बरेच साम्य जाणवते. महाराजांनी तर आखाडा संघटन समितीचे अध्यक्षपदही भुषविले होते. समर्थांनी गावोगावी परिभ्रमण करून जशी मठांची स्थापना केली व असंख्य अनुयायी जमविले तसेच महाराजांनी देखील अव्याहत दौरे काढून, प्रसंगी, पायपीट करून गावोगावी श्रीगुरुदेव सेवामंडळाची स्थापना केली आणि हजारोंच्या संख्येनी सेवाभावी सेवक व संस्था निर्माण केल्या. दोघांनीही आपापल्या अनुयायांना आपला कार्यभार नीट सांभाळण्याचा, कठोर नियमांचा व कडक शिस्तीचा पाठ दिला. समर्थांनी लोकशिक्षणासाठो जसा कथा–कीर्तनाचा मार्ग हाताळला, तसाच महाराजांनी देखील लोक शिक्षणासाठी भजन–भाषणाचा मार्ग हाताळला. या दोन्हीही संत पुरूषांनी आपापल्या आचार–विचारांमध्ये निवृत्ती व प्रवृत्ती मार्गाचा संयोग आणि प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधला. प्रारंभी या दोन्हीही संतांनी निवृत्ती मार्गाची जोपासना केली. परंतु पुढे सामाजिक उत्थापनाच्या दृष्टोने त्यांनी प्रवृत्ति मार्गाचाही अवलंब केला आणि तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे–

'प्रवृत्ती निवृत्तीचे आटुनिया भाग। उतरिले चांग रसायन।'

(गाथा–४३३१)

असे प्रवृत्ती–निवृत्तीच्या संयोगीकरणाचे सुंदर रसायन तयार केले. औषध कडू असले की, लहान मुलांच्या गळी उतरविणे कठीण जाते. त्यावेळी सूज्ञ आई–बाप मधाच्या माध्यमातून ते कडू औषध लहान लेकरांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करतात. तद्वतच् या दोनही संतांनी अध्यात्मासारखे गहनज्ञान आपल्या मधरूपी मधुर वाणीच्या माध्यमातून समाज पुरूषाच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न केला. तसेच आपल्या अध्यात्माचे एकांगी स्वरुप न ठेवता त्यांनी व्यवहारवादी व बुद्धिनिष्ठतेच्या अधिष्ठानावर अध्यात्माला उभे करून समाजाला कालोचित् नीट वळण लावण्याचाही प्रयत्न केला.

या दोन्ही पुरूषांचा त्या–त्या शतकातील अवतार म्हणजे नव्या युगाची नवी नांदीच होती. नवे युग म्हणजे नवो समाजरचना. समाज-

जीवनात कालानुरूप क्रांतीचे बीजारोपण करण्यासाठी समर्थांसारख्या व महाराजांसारख्या धुरीणांची गरज असते. ही काळाची गरज ओळखूनच या दोन्हीही संतांचा अवतार या पावनभूमीवर झाला असावा असे वाटते. सद्गुण संवर्धनावर व दुर्गुण निर्मूलनांवर या दोघांनीही विशेष भर दिला दिला आहे. या दोघांचेही विशेष हे की, समाजाला सन्मुख होत असताना ते दोघेही महापुरूष परमेश्वराला कधीही विन्मुख झाले नाहीत.

"जयाचेनि नामे महादोष जाती ।
जयाचेनि नामे गती पाविजे ती ।
जयाचेनि नामे घडे पुण्य ठेवा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥"

अशाप्रकारे समर्थांनी भगवंताच्या नामस्मरणाचे माहात्म्य वर्णन केले आहे; आणि **'मंदिर-मंदिर क्या घुमता है। पहले सेवा कर गरिबोंकी।'** असा गरिबांविषयीचा कळवळा व्यक्त करणारे महाराज–

'मंगलमय नाम तुझे सतत गाऊ दे' अशी परमेश्वराची करूणा भाकताना दिसतात. या दोन्हीही पुरुषांनी प्रयत्नवादाचा प्रखर पुरस्कार करून समाजजीवनात पुरुषार्थ जागविला. **'हाती काम व मुखी राम'** हे तत्त्व या दोघांनीही आपल्या अनुयायांना शिकविले प्रत्येकाने **'उत्तम पुरुष'** व्हावे **'आदर्श माणूस बनावे'** अशी या दोघांच्याही अंत:करणातील तीव्र इच्छा होती. या संतद्वयाला परमेश्वराचा साक्षात्कार समाजजीवनाच्या प्रत्येक घडामोडीत जाणवतो.

समर्थांचे व महाराजांचे संघटनकौशल्य आणि संस्थानिर्मितीचे कार्य जवळ जवळ सारख्याच स्वरूपाचे होते. समर्थांप्रमाणेच देशाच्या उज्ज्वल उन्नयनाची आकांक्षा बाळगून आपल्या प्रभावी प्रचारकार्याने महाराजांनीही पारतंत्र्याच्या काळात जनजागृतीचे लोकोत्तर कार्य केले आहे. व्यक्तिगत प्रपंच न केलेल्या या दोन्ही साधूंनी सामाजिक कार्याचा प्रचंड प्रपंच उभा केला, परंतु त्यात ते गुंतून पडले नाहीत. या दोन्हीही संतांच्या राष्ट्रीय बाण्याचे व सामाजिक क्रांतिकार्याचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यातून अगदी ठळकपणे जाणवते.

विशेष म्हणजे समर्थांच्या काळात महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांसारखे व संत तुकाराम महाराजांसारखे थोर पुरुष अवतरले होते व समाजाच्या आणि राष्ट्राच्या उन्नतीच्यादृष्टीने त्यांचा फार मोठा आधार समर्थांना वाटत होता. तद्वतच्, महाराजांच्याही काळात त्यांना कार्यपूर्तीसाठी महात्मा गांधी, विनोबाजी भावे, संत गाडगे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पू. साने गुरुजी यांच्यासारख्या थोर पुरुषांची सोबत मिळाली होती व त्यांच्या सहकार्याने महाराज अस्पृश्योद्धाराचे व नवभारत–निर्मितीचे स्वप्न साकार करण्यासाठी अविश्रान्त परिश्रम घेत होते. शिवाजी महाराजांच्या निधनाने समर्थांना फार मोठा धक्का बसला व इत:पर जगण्यात त्यांना 'राम' वाटेनासा झाला. महाराजांच्याही बाबतीत तसेच झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील भ्रष्टाचाराची बजबजपुरी, सत्तास्पर्धेचे कुटिल राजकारण, गरिबांची उपासमार, अत्याचारांचा अतिरेक पाहून महाराज परमेश्वराला कळवळून म्हणाले–

" भगवान मुझे मरना दे । नहि देख सकूं मैं जादे ।
इस भारतकी दैना को । या तो फिर दुःख मिटा दे ॥ "

अशाप्रकारे सुखी, समृद्ध समाजजीवनाचे स्वप्न पाहणाऱ्या या दोनही संतांच्या जीवनात आयुष्याच्या शेवटी एक प्रकारचे वैफल्य निर्माण झाले होते असे दिसून येते. तथापि दोघांच्याही मनात समाधान एकच होते– आणि ते म्हणजे–

" देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगासी तुटी ।
सर्व अर्पावे सेवटी । प्राण तोहि वेचावा ॥ "

या समर्थ वचनाप्रमाणे सर्वव्यापी परमेश्वराशी तादात्म्य पावण्यासाठी या दोन्ही संत पुरुषांनी आपले सर्वस्व समर्पित केले होते.

भेद :–

समाज परिवर्तनाचे, लोकशिक्षणाचे आणि जनजागृतीचे कार्य करणाऱ्या प्रत्येक पुरुषाच्या कर्तृत्वाला काळ परिस्थितीच्या मर्यादा पडतात. समर्थ रामदास आणि संत तुकडोजी यांनी आपापल्या काळात समाज

परिवर्तनाचे, लोकशिक्षणाचे आणि जनजागृतीचे महान कार्य केले आहे. अर्थातच त्यांच्याही कर्तृत्वाला काळ व परिस्थितीच्या अशाच मर्यादा पडलेल्या जाणवतात. त्यांच्यासारख्या द्रष्ट्या संत कवींच्या प्रवृत्ती त्या त्या काळच्या सामाजिक परिस्थितीच्या प्रवाहातून निर्माण झालेल्या आहेत.

समर्थांच्या काळाचे सिंहावलोकन केले तर आत्यंतिक धर्मग्लानीचा व सामाजिक घडी विस्कटलेला काळ दृष्टीपुढे उभा राहतो. समर्थ धर्म-रक्षणाच्या स्फूर्तीने प्रेरित झाले होते. धर्मग्लानी, राजकीय पारतंत्र्य आणि समाजातील कर्मकांडाचे प्रस्थ व रूढि–परंपरांचे प्राबल्य पाहून त्यांनी या परिस्थितीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प केला. परंतु महाराज केवळ स्वातंत्र्य चळवळीचा स्फूर्तिदायक संदेशच देऊन थांबले नाहीत, तर पेटलेल्या स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात प्रत्यक्ष स्वतःलाही त्यांनी झोकून दिले व त्यासाठी इ.स. १९४७ साली तुरुंगवासही भोगला.

समर्थांप्रमाणेच तुकडोजी महाराजही स्वतंत्र बाण्याचे समाजसुधारक व समाजचिंतक होते खरे, परंतु त्यांच्या काळातील सामाजिक व राजकीय समस्या अगदीच भिन्न स्वरूपाच्या होत्या. त्यामुळे त्या समस्यांना अनुसरून त्यांनी केलेल्या प्रबोधनात समर्थांपेक्षा वेगळेपणा जाणवतो. विशेषतः बालविवाह, विजोडविवाह, पुनर्विवाह, हुंडापद्धती, आटचासाटचाचा विवाह इत्यादी विवाहपद्धतीत अंतर्भूत होणाऱ्या बाबी, व मृत्यू–अंत्य-विधी, दत्तकप्रथा, महिलोन्नती, कुटुंब नियोजन, जीवनशिक्षण कृषिविषयक विचार, गरीबी–श्रीमंती, वेष–वैभव, यात्रा–मेळे, लोकशाही, दलितसेवा, इत्यादी विषयक महाराजांचे विचार कालोचित व शास्त्रशुद्ध स्वरूपाचे वाटतात. महाराजांच्या मते विवाह हा एक समाजोपयोगी उत्तम संस्कार असून सामाजिक जीवनाची सुरूवात या संस्कारातूनच होते.

"ईश्वराच्या इच्छेचे पूरक । समाजाचे दोनचि घटक ।
पुरुष आणि महिला देख । सृष्टीचक्र चालविती ॥
चालावा जगाचा प्रवाह । व्हावा निसर्ग गुणांचा निर्वाह ।
यासाठीच योजिला विवाह । धर्मज्ञांनी तयांचा ॥"

(ग्रामगीता अ. २१ ओ. १–२)

अशाप्रकारे विवाहाचे महत्त्व विशद करून समाजजीवन नासविणाऱ्या बालविवाहपद्धती, विजोडविवाहपद्धती, हुंडापद्धती आदिंचा त्यांनी निषेध केला आहे.

"ऐशा गोष्टीस मात्र जपावे । बाळपणीहि लग्न नसावे ।
समजूतदारीने करूनि द्यावे । लग्न प्रसंग ॥" (ग्रा. अ. २१-३८)

असे ते बालविवाहाविषयी प्रतिकूल मत प्रदर्शित करतात. तसेच ते विजोड विवाहपद्धतीविषयी म्हणतात–

"बालक–बालिकेसी वाचा नसते । तोंड फोडोनि बोलेना ते ।
परि हे कसाब म्हणावेत पुरते । जे विजोड लग्न योजिती ॥"
(ग्रा. अ. २१–५१)

हुंडापद्धतीबद्दल महाराज समाजाला स्पष्टच आवाहन करतात की–

"ज्याने मुला–मुलीचे पैसे घेतले । त्यासि समाजाने पाहिजे निषेधिले ।
तरीच ते दुराग्रह मोडले । जातील आता ॥"
(ग्रा. अ. २१-५३)

महाराजांच्या काळात आटचासाटचाचीही पध्दती अस्तित्वात होती. आताही ती काही प्रमाणात आहे. आटचासाटचाची पध्दती म्हणजे एकाच घरातील मुला–मुलीचा दुसऱ्या घरातील मुला–मुलीशी लग्नयोग घडवून आणणे. परंतु महाराजांना ही पध्दतीही मान्य नाही. ते म्हणतात–

"मुला–मुलीची नसता जोड । आपुलिया सोयीसाठी उघड ।
लावितो मानेवरि जोखड । मायबाप ॥"
(ग्रा. अ. २१-५८)

अशाप्रकारे प्रस्तुत विवाहपद्धतीविषयी प्रतिकूल मत प्रदर्शित करून विवाहसोहळचाची अगदी साधी पद्धत महाराजांनी सुचविली आहे. पहा–

"खर्च नको भव्य मंडपाचा । देखावा असावा निसर्गाचा ।
अथवा सभामंडप मंदिराचा । योजावा या कार्यासि ॥"
(ग्रा. अ. २१–४९)

तसेच, ते सामूहिक विवाहपद्धती अतिशय सोयीची मानतात–

"गावाचे सर्व जमोनि मित्र । सहकार्य अर्पावे सर्वत्र ।
बसवोनि वधु–वरांना एकत्र । करावे लग्न कार्य ॥"

(ग्रा. अ. ३९–३४)

महाराजांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केलेला आहे.

"ज्या विधवेस वाटे लग्न करावे । तिने वडीलधाऱ्यांशी सांगावे ।
त्यांनी सहृदयपणे लग्न योजावे । जीवधर्म म्हणोनिया ॥"

(ग्रा. अ. २१–४५)

परंतु एखाद्या विधवेची पुनर्विवाहाची इच्छा नसल्यास महाराज सांगतात–

"ज्या विधवेची इच्छा नाही । तिला छळू नये कदाहि ।
ती सती, संन्यासिनी समजोनि देही । राखावी समाजाने ॥"

(ग्रा. अ. २१–४६)

कुटुंबनियोजनाचा प्रश्न अलीकडील काळात अत्यंत महत्वाचा मानला जातो. देशातील लोकसंख्या भरमसाट वाढल्याने व मृत्यूचे प्रमाण बरेच कमी झाल्याने या प्रश्नाला विशेष चालना मिळालेली आहे. देशामध्ये दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येमुळे दारिद्र्य, बेकारी, उपासमार, यासारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणून कुटुंबनियोजनाचे महत्त्व विशद करताना महाराज म्हणतात–

"पुत्र शिकूनि मोठा झाला । एक होता दुसराहि जन्मला ।
तिसरा होताचि ससार संपला । पाहिजे पित्याचा ॥"

(ग्रा. अ. ३–५७)

किंवा

"जरी सर्वांनी संसारी असावे । तरी संतति नियमन सांभाळावे ।
तीन पुत्रांवरि पुत्र व्हावे । ऐसे इच्छु नये कोणी ॥"

(ग्रा. ३९–३७)

अशाप्रकारे महाराजांनी फक्त तीन मुलांची मर्यादा घालून दिली आहे. आज महाराज असते तर कदाचित त्यांनी तीन ऐवजी दोनच

मुलांची मर्यादा दर्शविली असती. कारण आजचा 'हम दो हमारे दो' चा जमाना आहे. तसेच महाराजांनी दत्तक घेण्याच्या प्रवृत्तीमागे असलेल्या मनोभूमिकेचे व्यवस्थित विश्लेषण करून त्याची इष्टानिष्टताही पटवून दिली आहे. मृत्यूविषयी माणसाच्या मनात भीती असते. ती भीती दूर करून मृत्यूची महती सांगताना महाराज म्हणतात–

" मृत्यु संस्काराचा ऐका खुलासा । लोक मृत्यूसि समजती भलतिसा ।
मी म्हणतो मृत्यू जैसा । उत्तम नाही कोणीह ।। "

(ग्रा. अ. २२–४)

अंत्यविधीसंबंधीही महाराजांनी अगदी साधी व सरळ पद्धती सांगितली आहे. मृत्यूला मंगलमय मानून दिंडी घोषांनी ते मृतशरीर स्मशानयात्रेत न्यावे व सर्वांच्या सहकार्याने त्यांचा अंत्यविधी आटोपावा. ते म्हणतात–

" मृत्यूहि सुमंगल समजावा । स्मशान यात्रेस सहयोग द्यावा ।
दिंडीघोषे मार्गसुधारावा । भूषवावे प्रसंगी ।। "

(ग्रा. अ. २२–२७)

सणोत्सव व यात्रा–मेळचा संबंधीही महाराजांचा अभिनव दृष्टिकोण आहे. सणोत्सवासंबंधी ते सांगतात–

" प्रगतीसाठी सणवार करावे । काही सण एके ठायीच घडवावे ।
सर्वांनी मिळोनि आचरावे । सहकार्याने ।। "

(ग्रा. अ. २३–८८)

यात्रेसंबंधी ते सांगतात–

" यात्रेस जावे तरि सेवेसाठी । विचार स्फूर्ति आणाया गाठी ।
तेणे गाव करावे उठाउठी । यात्रारूप आपुले ।। "

(ग्रा. अ. २४–५१)

तसेच महाराजांनी ग्रामगीतेच्या 'जीवन–शिक्षण' या अध्यायात जीवनाला उपयुक्त असणाऱ्या शिक्षणाची शिफारस केलेली आहे. ते स्पष्टच सांगतात–

"शिक्षणातचि जीवनाचे काम । दोन्हींची सांगड व्हावी उत्तम ।
चिंता नसावी भोजनासाठी दाम । मागण्याची भीक जैसी ॥"
(ग्रा. अ. १९–१०)

मराठी चार वर्गही शिक्षण नसलेल्या तुकडोजी महाराजांसारख्या समाजशिक्षकाचे शैक्षणिक विचार अत्यंत उपयुक्त स्वरूपाचे आहेत. समर्थांच्या काळात शिक्षणासंबंधी विचारांचा विशेष विकास झालेला नव्हता. परंपरेने बहुधा घरीच मुलांचे शिक्षण होत असे. स्त्री–शिक्षणही घरगुती वातावरणातच होत असे. त्यामुळे समर्थांच्या साहित्यात त्याचा फारसा उल्लेख नाही. महिलोन्नतीसंबंधीही महाराजांचे विचार अतिशय मूलगामी व शास्त्रशुद्ध स्वरूपाचे आहेत (त्याचे विवेचन यापूर्वी आलेलेच आहे) त्या तुलनेत समर्थांनी स्त्रीविषयक व्यक्त केलेले विचार तेवढचा प्रगल्भ स्वरूपाचे वाटत नाही. अर्थात हा सर्व काळाचा व परिस्थितीचा परिणाम म्हणावा लागेल.

देश स्वतंत्र झाला तरी शेतकरी सुखी झाला नाही याचे शल्य महाराजांच्या हृदयात शेवटपर्यंत सलत होते. शेतकरी सुखी आणि संपन्न होण्यासाठी त्यांनी वरेच कालोचित उपाय सुचविले आहेत. समर्थांच्या साहित्यातून यासंबंधीचा विशेष उल्लेख आढळत नाही. तसेच स्वावलंबन, कुटिर–लघुउद्योग, जोडधंदे अशा सध्याच्या स्थितीत आवश्यक असलेल्या बाबींचाही महाराजांनी आपल्या साहित्यातून सविस्तर उहापोह केलेला आहे. लोकशाही–भांडवलशाही–समाजवाद, गरिबी – श्रीमंती इत्यादी संबंधीचेही महाराजांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. समाजात एकाजवळ भरपूर संपत्ती असावी आणि कष्ट उपसणाऱ्या लक्षावधि लोकांना पोटभर अन्नही मिळू नये ही ईश्वरी रचना नसून मानवांचा सैतानी खेळ आहे हे सांगताना–

"धन हे गरीबाचे रक्त । समजोन वागोत श्रीमंत ।
श्रम ही गावाची दौलत । म्हणोनि व्हावा मान तिचा ॥"
(ग्रा. अ. १७–५४)

असे आपले स्पष्ट मत ते व्यक्त करतात.

एकंदरीत, समर्थ व महाराज हे दोघेही समाजाभिमुख संत असले, तरी त्यांच्या काळातील समाजस्थितीला अनुसरूनच त्यांनी आपापले विचार व्यक्त केले असल्याने त्यांच्या कार्यपद्धतीत व विचार प्रणालीत बराच भेद जाणवतो. विशेषत: वर्णाश्रमासंबंधीच्या या दोन्ही संतांच्या विचारसरणीतील तफावत किती मोठी आहे याचा सविस्तर विचार मागील प्रकरणातून मांडलेलाच आहे.

वैज्ञानिक व औद्योगिक क्रांतीच्या लोकशाहीप्रधान काळात महाराजांचे जीवितकार्य संपन्न झालेले असल्याने समर्थांपेक्षा त्यांच्या वरील-प्रमाणे उल्लेखिलेल्या बहुविध कार्यात व विचारसरणीत अनेक प्रकारचे पुरोगामी वेगळेपण प्रत्ययास येते. महाराजांनी समाजासमोर मांडलेले विधायक विचारांचे कृतिशील प्रयोग समर्थांच्या तुलनेत कालोचित असून अधिक समाजोपयुक्त आहेत. जुन्या व नव्या विचारांचा महाराजांनी साधलेला सुंदर समन्वय समर्थांच्या साहित्यातून फारसा प्रकट होत नाही. समर्थांचा काळ लक्षात घेता ते शक्यही नाही.

समर्थ रामदासांच्या तुलनेत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा परामर्श घेत असताना अध्यात्मातील तपशीलाच्या व सविस्तर विवेचनाच्या बाबतीत जसे समर्थ अधिक सखोल वाटतात, तद्वत्च, सामाजिक कृतीशील प्रयोगाच्या आणि पुरोगामी विचारसरणीच्या बाबतीत महाराज समर्थांपेक्षा पुष्कळ पुढे असल्याचे जाणवते. अर्थात समर्थांपेक्षा महाराज तीनशे वर्षे पुढे असल्यानेही या वैज्ञानिक युगाचा हा परिणाम असू शकेल.

एकंदरीत, तुकडोजी महाराजांच्या कर्तृत्वाचे ठळक वैशिष्टचे लक्षात घेता असे दिसून येते की, त्यांनी आपल्या पूर्वकालीन संतांच्या पारमार्थिक विचारांचा व समकालीन श्रेष्ठीच्या समाजकार्याचा सुंदर समन्वय आपल्या विचारात व प्रचारात साधलेला आहे. विनोबाजींची भुदान-चळवळ, साने गुरुजींची सर्वोदय-भावना, महात्मा गांधींचे ग्रामराज्य,

गाडगे बाबांचा सेवाभाव, या सर्व समकालीन श्रेष्ठांप्रमाणेच ज्ञानेश्वरांची ज्ञानमहती, नामदेवांचे भक्तिमाहात्म्य, एकनाथांची दुःखितांच्या देहात देव शोधण्याची दृष्टी, तुकारामाची समाजोन्नती विषयीची उत्कट तळमळ आणि समर्थांचे रामराज्य व डोळस राष्ट्रवाद या सर्वांच्या मनोहर मिलाफाचे दर्शन महाराजांच्या उक्तीत व कृतीत घडते.

अशाप्रकारे दोन भिन्न काळातल्या परंतु महाराष्ट्राच्याच भूमीत अवतरलेल्या या दोन संतांच्या परस्पर–वेगळेपणाचा शोध घेताना कालानुरुप जसा त्यांच्या आचार–विचारात भेद जाणवतो तसेच दोघांमध्ये तीनशे वर्षाचे अफाट अंतर असूनही बऱ्याच प्रमाणात असलेले साम्य–दर्शनही घडते.

समारोप

समर्थ रामदास व संत तुकडोजी हे दोन काळांचे दोन प्रतिनिधी आहेत. दोघांच्या कालखंडात तीनशे वर्षांचे अंतर असल्याने ते दोघेही संत भिन्न-भिन्न राजकीय, सामाजिक व धार्मिक संस्कारात घडलेले होते. अर्थातच त्याचा प्रभाव त्यांच्या कार्यावर व विचारावर पडलेला दिसतो. तथापि, दोघांचेही कार्य मौलिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या अध्यात्माला सामाजिक अधिष्ठान लाभलेले होते. समृद्ध समाज जीवन जगण्यासाठी स्फूर्तिदायी संदेश त्यांनी आपल्या साहित्यातून दिला. समर्थांचा 'दासबोध' व महाराजांची 'ग्रामगीता' हे या दोनही संतांचे चिरंतन स्वरुपाचे वाङ्मयीन कार्य आहे. भारतीय संस्कृतीचे ते अमोल संस्कार-धन आहे. भारतीय समाजाची दुरवस्था दूर करून भौतिक व आध्यात्मिक उन्नती साधण्याचा सोपा व सरळ मार्ग या संतद्वयाने त्यातून सांगितला आहे. या दोनही संतांच्या विचार प्रणालीत कालपरत्वे काही बाबतीत फरक जाणवत असला, तरी 'प्रयत्न-प्रारब्धवाद', 'प्रपच-परमार्थ समन्वय', निवृत्ती-प्रवृत्तीमार्गाचा संयोग, स्त्रीविषयक पुरोगामी दृष्टिकोण, देशालाच देव मानण्याची राष्ट्रनिष्ठा, बलसंवर्धन, उत्तम पुरूष लक्षण, सद्गुण संवर्धन व दुर्गूण निर्मूलन इत्यादीविषयक विचारांमध्ये या दोन्ही संतांचे बरेच साम्य दिसून येते. त्या सर्व विचारांचा परामर्श आतापर्यंतच्या विविध प्रकरणांतून घेण्यात आलेला आहे.

हे दोनही संत केवळ गळचात माळ आणि हातात टाळ घेऊन भजन-किर्तन करणारे संत नव्हते; भक्तीमार्गाचा प्रचार करीत असतानाच त्यांनी आपल्या संस्था स्थापन करून सशक्त संघटना उभारणीचे कार्य केले. समर्थांनी जागोजागी मठ-स्थापना केली आणि महाराजांनी गावो-गावी श्रीगुरुदेव सेवामंडळे निर्माण केली. हे सर्व करीत असताना त्यांनी देशाचेही यथोचित भान ठेवले आणि देशालाच देव मानून त्याची पूजा करण्याचो प्रेरणा लोकांमध्ये निर्माण केली.

या दोन्ही संतकवींनी आपल्या साहित्यातून वर्णिलेले रामराज्य व ग्रामराज्य म्हणजे समृद्ध भारताच्या उज्ज्वल भवितव्याचे एक मधुर स्वप्न

आहे. ते स्वप्न साकार करण्याची तीव्र तळमळ त्यांच्या शब्दा-शब्दातून प्रकट झाली आहे. मरगळलेल्या समाज जीवनात चैतन्य निर्माण करण्यासाठी या दोनही संतांनी सामाजिक जागृतीचे आणि प्रगतीचे परोपरीने जे प्रयत्न केलेले आहेत, त्या प्रयत्नांचे प्रतिबिंबच त्यांच्या कार्यात व वाङ्मयात आढळून येते.

वृक्षाचे रसगंधमाधुर्य त्यांच्या फळात एकवटलेले असतात, तद्वतच प्रपंच-परमार्थ विषयक सरस व सुरस सारबोध या संतद्वय-साहित्यातून साकार झालेला आहे.

हे दोघेही संत आपापल्या काळात आपापल्याकार्याने लोकादरास पात्र ठरले असून आजही त्यांना मानणारा त्यांचा विशाल परिवार आपल्याला दिसून येतो. या दोन परिवारांमध्ये या दोन्ही संत-पुरुषांचे जीवन-दर्शन घडावे व त्यांच्या कार्य-कर्तृत्वाविषयीची नीट माहिती मिळून या संतांविषयीचा मनातील संकुचित व दूषित भाव दूर व्हावा या सद्हेतूनेच 'समर्थ रामदास व संत तुकडोजी-तौलनिक दर्शन' या ग्रंथलेखनाचे व्रत मी स्वीकारले होते. संत-कृपा-प्रसादाने व माझ्यावर निरपेक्ष प्रेम करणाऱ्या माझ्या सन्मित्रांच्या प्रेरणेने त्या संकल्पाची सांगता होण्याचा आनंदप्रद योग मला प्राप्त झाला असून त्यामुळे मनाला अतीव समाधान वाटत आहे.

प्रस्तुत ग्रंथातील निरनिराळचा दहा प्रकरणांतून संत द्वयाचे जीवन-दर्शन घडवून त्यांच्या वहुविध कार्यावर सविस्तर प्रकाश टाकण्याचा यथाशक्य प्रयत्न केलेला आहे. तथापि, या दोनही संतांच्या कार्याचा व वाङ्मयाचा प्रचंड व्याप लक्षात घेता त्या सर्वांचाच समावेश प्रस्तुत ग्रंथात करणे शक्य झाले नाही. करिता-

" न्यून ते पुरते। अधिक ते सरते।
करूनि घेयावे हे तुमते। विनवितु असे। "

या संत ज्ञानेश्वरांच्या ओवीने क्षमायाचना करून समारोप करतो.

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

REFBK-0025781



प्रा. डॉ. राम घोडे

एम्.ए. मराठी, एम्.ए. राज्यशास्त्र, बी.एड्., पीएच्.डी.

- नागपुरातील हिस्लॉप कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक.
- वाचन, लेखन, वक्तृत्व आणि नाट्यक्षेत्रात अभिरुची.

■ प्रकाशित ग्रंथ -

संसारी सुरुंग कांचनाचा (३ अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक), संत तुकाराम : संत तुकडोजी तुलनात्मक दर्शन, निवडक निबंध - संग्रह, ग्रामगीता गाधसार, तरुणांचे तुकडोजी, आजीचे विचारधन, समर्थ रामदास : संत तुकडोजी तौलनिक दर्शन.

■ आगामी प्रकाशने -

वळणांवरचा वाटसरू (कादंबरी), बायको बिलंदर कारटी कलंदर (नाटक)

राजीव प्रकाशन

प्रा.सौ. रेखा घोडे, यू-९, लक्ष्मीनगर नागपूर-२२